म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. १३६८



# पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ

REFBK-0015261
REFBK-0015261

४१४३२
चरित्र
९२५८०
१३६०

पाश्चात्त्य

# पुरुषश्रेष्ठ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम. ४१४३२ वि: चरित्र
क्रमांक १३६० नों: दि: १८/०४/२०००

REFBK-0015261

एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२६१

प्रकाशक

विदर्भ मराठवाडा बुक कं. पुणें २

प्रकाशक :

**अ. ज. प्रभु**

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

१३२० शुक्रवार पेठ, पुणें २

सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ति पहिली १९३१

पुनर्मुद्रण १९४६

पुनर्मुद्रण १९६६

मूल्य रु. ४·००

मुद्रक :

**य. गो. जोशी**

आनंद मुद्रणालय

१५२३ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रस्तावना

पुढील दोनएकशें पानांत युरोपांतील कांहीं पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें दिलीं आहेत. वास्तविक भूगोलदृष्ट्या जीझस क्राइस्ट हा आशियाखंडांतील व हॅनिबल हा आफ्रिकाखंडांतील होता. पण यूरोपच्या सरहद्दीपासून चारदोन पावलांवर जरी ते राहत असले तरी त्यांच्या मतांचा व कृतींचा प्रभाव यूरोपांतच दिसून आला. म्हणून त्यांचीं चरित्रें ‘ पाश्चात्त्य पुरुषश्रेष्ठां ’ च्या मालिकेंत दिलीं आहेत.

२. प्रत्येक देश कोणाच्या नांवानें ओळखला जातो किंवा त्या त्या देशाच्या जीविताची घडी कोणाच्या हस्तें विशेष प्रकारें बसविली गेली हें ध्यानांत घेऊन चरित्र-नायकांची निवड केली आहे.

३. अशा तऱ्हेचीं सर्व पुरुषश्रेष्ठांचीं, मग त्यांची श्रेष्ठता कोणच्याही प्रकारची असो, चरित्रें लिहिण्याचा मूळ हेतु आहे.

श्री. म. माटे

# अनुक्रमणिका


| चरित्र | पृष्ठ |
|---|---|
| शिकंदर ... ... ... | ५ |
| हॅनिबल ... ... ... | २७ |
| जूलियस सीझर ... ... ... | ४७ |
| येशू ख्रिस्त ... ... ... | ८१ |
| मार्टिन् ल्यूथर ... ... ... | १०१ |
| कोलंबस ... ... ... | १२२ |
| ऑलिव्हर क्रॉम्वेल ... ... ... | १४८ |
| जॉन सोबेस्की ... ... ... | १६९ |
| पीटर दि ग्रेट ... ... ... | १८६ |


* * *

स्थळप्रत

दा. क्र. १५२६१

# पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ

## शिकंदर

इसवी सनापूर्वी ३५६ व्या वर्षी मॅसिडोनियांतील पेला नांवाच्या राजधानीच्या शहरीं शिकंदर याचा जन्म झाला. एकीकडून हर्क्युलस व दुसरीकडून ॲकिला अशा शूर पुराणपुरुषांच्या कुळांत शिकंदर निपजला! खुद्द त्याचा बाप जो फिलिप तोही मोठा मसलती, साहसी व महत्त्वाकांक्षी असे. त्याचें मूळचें राज्य म्हणजे डोंगरकठडीचा एक लहानसा टापू होता. पण फिलिपनें त्याचें मोठें राष्ट्र बनविलें. वास्तविक पाहतां फिलिपनें तें पहिलें लहानसें राज्यसुद्धां बळकाविलेलेंच होतें. पण तो येवढ्यावर थांबला नाहीं. कवाइती फौजेचें बळ काय असतें हें त्यानें ओळखलें होतें. आणि म्हणून हजारों जवान त्यानें आपल्या फौजेंत दाखल करून त्यांस कवाईत शिकवून भोंवतालच्या लोकांच्या मुलुखांत धुंडावा मांडिला. होतां होतां त्याचें बळ इतकें वाढलें कीं, त्या लहान लहान ग्रीक संस्थानांनीं त्याला मोठेपण देऊन आपल्या तोलाचा म्हणून कबूल केलें. दरम्यान उपस्थित झालेल्या शत्रूंवर धाडावयास हाच योग्य आहे असें पाहून त्यांनीं त्याचीच योजना केली. त्यानेंही होय म्हणून आपला उपयोग होऊं दिला. कारण त्यालाही आपलें महत्त्व वाढवावयास

हवेंच होतें. त्याचें प्रस्थ माजूं देऊं नये म्हणून थीब्ज व अथेन्स येथील लोकांनीं त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. पण फिलिपनें या दोघांही लोकांच्या फौजांचा शिरोनिया गांवीं सडकून पराभव केला. अर्थात् जे लोक अनुकूल होते ते होतेच; व जे प्रतिकूल होते ते पराभूत झाले. याप्रमाणें फिलिपचा जम उत्तमच बसला. पराभूत शत्रूंना त्यानें फार उदारपणानें वागविलें. लवकरच सर्व ग्रीक संस्थानांची परिषद् भरली व तेथें सर्वांनुमतें फिलिप याची "ग्रीस देशाचा सेनापति" म्हणून निवड झाली. या सुमारास ग्रीक लोकांचें पार्शियन लोकांशीं झुंज सुरू होणार होतें; त्याचें पुढारीपण घेण्याचीही त्यानें तयारी दाखविली. पण इतक्यांत या हव्यासी व शूर शिपायाचा खून झाला आणि मोठा जेता होण्याची त्याची मनीषा तशीच राहून गेली.

पण जें त्याला साधलें नाहीं तें त्याच्या मुलानें करून दाखविलें. शिकंदर लहानपणापासूनच मोठा तेजस्वी होता. आपल्या पाणीदार मुलाकडे पाहून फिलिपला मोठें समाधान वाटे. त्यानें त्याच्या शिक्षणाची फार उत्तम व्यवस्था केली होती. शिक्षकांनींही या वांड मुलाला शिस्त लावण्याची पराकाष्ठा केली. पण रोजच्या रोज बापाच्या पराक्रमाचीं वर्तमानें घरीं येत असल्यामुळें मुलाचें लक्ष मात्र अभ्यासापेक्षां युद्धविषयाकडेच जास्त लागे. आपण बापासारखे कधीं होऊं असें त्यास होऊन जात असे. फिलिपनें नित्य नवीन विजय मिळवून आज हा परगणा, उद्यां तो परगणा जिंकल्याच्या कथा त्यानें ऐकल्या म्हणजे हा अल्पवयी शिपाई म्हणे कीं, "मला हे कांहीं राहूं देणार कीं नाहीं? का आपणच सगळें जग जिंकून टाकणार?" पण ही त्याची चुळबूळ चालू असतांना शिक्षणाचा असा कांहीं क्रम चालूच होता. खुद्द ॲरीस्टॉटल हा त्याच्या अध्यापकांपैकीं एक होता! होमरचें महाकाव्य या गुरूनेंच शिकंदरास शिकविलें; पण गुरु कितीही मोठे असले आणि

शिकवावयाचीं पुस्तकें फार नामी असलीं तरी शिष्य हा हटकून अभ्यासी असतो असें थोडेंच आहे! शिकंदरचें लक्ष वर सांगितल्याप्रमाणें खेळाकडेच असे. घोडयावर बसण्याचा तर त्याला छंदच होता. कसलेंही अडेल घोडें असलें तरी त्याच्यावर स्वारी करून त्याला जेरीस आणण्याच्या कामीं लहानपणापासूनच तो वाकबगार असे. एकदां एका सौदागरानें एक मोठा उमदा पाठाळ घोडा फिलिपकडे विक्रीसाठीं आणला. फिलिपनें पदरच्या स्वारांना घोडा चालवून पाहण्यास सांगितलें. पण तो घोडा कोणाला नीट स्वारी करूं देईना. थोडी पाठीला मांडी लागली कीं बेफाम बने! असें बऱ्याच वेळां झालें. बापाशेजारीं मुलगाही घोडयाची मजा पहात उभा होता. स्वारांचें कांहीं चालत नाहींसें पाहून शिकंदर बापास म्हणाला, "मी घोडा चालवून दाखवितों." मुलाचा हिय्या पाहून बापानेंही परवानगी दिली. शिकंदरनें तत्काळ घोडयावर उडी मारली व त्याच्या झिपऱ्या धरून त्याला रंगणावर धरलें. घोडयानें पुष्कळ गडबड केली, उडया मारल्या, पाठ काढून घेण्याची खटपट केली; पण हा छोटा स्वार गोमाशीसारखा जो एकदां बिलगून बसला तो कांहीं केल्या हलेना. शेवटीं रंगणें काढकाढून थोडी दमछकी झाल्यावर घोडा आपोआप उभा राहिला! मुलाचें धैर्य व चिकाटी पाहून फिलिप अत्यंत खूष झाला व त्यानें त्याला तो बुसिफॅलस नांवाचा घोडा बक्षिस दिला. पुढें याच घोडयावर बसून शिकंदरनें हजारों लढाया केल्या व 'जगज्जेता' हें नांव मिळविलें. घोडयावर बसण्यांत जसा, तसा इतर कसरतींतही तो निपुण असे. शरीर चांगलें पिळदार बनविण्याकडे त्याची प्रवृत्ति असे; पण मस्तवाल पहिलवानी मात्र त्याला नको होती. कारण तिच्या योगानें माणूस सुस्तावतें असें त्याचें मत असे. खाणेंपिणें इत्यादी बाबतींत तो लहानपणींसुद्धां अगदीं बेतानें वागे. हें ज्ञान त्याला आपोआपच होतें.

पळणें, रपेटी करणें, शर्यती मारणें याचाही त्याला शोक असे. पण हें करतांनासुद्धां आपण राजपुत्र आहों ही गोष्ट तो कधीं विसरला नाहीं. एकदां त्याला कोणीं म्हटलें, " सरकार, आपण येवढ्या शर्यती करतां, तर एकदां ऑलिंपिक शर्यतींत जा ना ! " शिकंदरनें मोठ्या कुऱ्यानें उत्तर केलें, " होय जाईन; पण तेथें माझ्याशीं चढाओढ करणारे सगळे राजपुत्रच असले तर ! " प्रत्यक्ष पुस्तकी अभ्यास असा जरी त्यानें फार थोडा केलेला असला आणि आडदांडपणाकडे जरी त्याचा कल होता तरी शिकंदर हा जात्याच मोठा खोल होता आणि अल्पवयांतही मोठें प्रौढपणचें शहाणपण त्याच्या अंगीं दिसे. एकदां फिलिप कोठें स्वारीवर असतां त्याच्या पश्चात् इराणचे वकील दरबारांत आले. राजा नसल्यामुळें त्यांनीं कौतुकानें म्हणून छोट्या सरकारपाशींच बोलणें केलें. पण बोलतांना त्यानें सर्व आविर्भाव मोठ्या कर्त्या माणसासारखा ठेविला होता. त्यांच्या देशासंबंधीं जे प्रश्न त्यानें त्यांस विचारले त्यावरून तर हा बेटा बापसे सवाई होणार हें त्यांनीं तेव्हांच ताडलें. फिलिपलाहि मुलाचें पाणी पाहून राज्यविस्ताराचें स्फुरण जास्तच चढलें. वर उल्लेखिलेल्या अथेन्सवरील स्वारीच्या वेळीं आपल्या केवळ सोळा वर्षांच्या मुलाला कारभारी नेमून त्यानें शत्रूवर चाल केली; इतका त्याच्या कर्तबगारीवर बापाचा विश्वास बसला. आणि या विश्वासाचें चीज मुलानें ताबडतोब करून दाखविलें. फिलिप दूर आहे व कारभारी म्हणजे एक कोंवळें पोर आहे असें पाहून राज्यांतील एका जमातीनें पुंडावा मांडला. शिकंदरनें लगोलग तिकडे कूच केलें आणि बंडखोरांवर तो इतक्या त्वेषानें जाऊन पडला कीं, त्यानें त्यांचीं घरेंदारेंसुद्धां खणून काढलीं ! पुढें थोडयाच दिवसांनीं फिलिपच्या फौजेंतच तो दाखल झाला आणि आरंभीं सांगितलेली – जी शिरोनियाची लढाई तिच्यांत त्यानें बापाच्या हाताखालीं बडी मर्दुमकी गाजविली.

पण हा बापलेकांच्या नात्याचा जम विसकटण्याचा प्रसंग लवकरच आला. फिलिप हा एरवीं ठीक होता; पण बायका किती कराव्या याचा त्याला फारसा विधिनिषेध नव्हता. कोठें स्वारीवर फिरत असतां त्यानें क्लेओपाट्रा नांवाच्या एका रूपवती स्त्रीस झनानखान्यांत आणून ठेविलें. इजिप्तची राणी जी क्लेओपाट्रा ती ही नव्हे. ही झनानखान्यांत आल्याबरोबर शिकंदरची आई जी ऑलिंपिया तिच्या अंगाचा संताप झाला. मुलगाही आतां कांहीं लहान नव्हता. बापानें आपल्या आईला ही सवत करून आणली ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागून राहिली. थोड्याच दिवसांत बातम्या उठूं लागल्या कीं, या नव्या पट्टराणीच्या मुलाला गादी मिळावयाची आहे! लवकरच शिकंदरच्या बहिणीचें लग्न निघालें. ऑलिंपियेच्या माहेरचाच कोणी नवरदेव होता. सगळे वऱ्हाडी जमून लग्नाचे सोहाळे चालू असतां कोणी पोसेनिया नांवाच्या इसमानें एकाएकीं फिलिपच्या अंगांत खंजीर खुपसला. फिलिप तावडतोब गतप्राण होऊन पडला. कोणी म्हणतात, फिलिपची व त्याची कांहीं खाजगी अदावत होती; पण दुसरे कोणी म्हणतात कीं, ऑलिंपिया व शिकंदर यांनींच त्या खुनी माणसाला चिथावणी देऊन फिलिपचा खून घडवून आणिला. खरें काय याचा निकाल अर्थातच होण्यासारखा नाहीं. इतकें खरें कीं, यामुळें शिकंदर राज्याचा मालक झाला.

हा नवा राजा केवळ वीस वर्षांचा म्हणजे पोरसवदाच होता. लहानपणींसुद्धां जरी त्यानें पराक्रम दाखविला होता, तरी याच्या अंगीं आटोप असेल व हा बापाचें राज्य आवरूं शकेल असें कोणास वाटत नव्हतें. लोकांस वाटलें, बाप पाठीवर होता म्हणून यानें थोडी टुरटुर केली; आतां उघडा पडल्यावर याच्या हातून काय होणार? म्हणून तो गादीवर येतांच बंडखोरांनीं आणि फिलिपनें ज्यांना दुखविलें होतें त्यांनीं माना वर केल्या. तसेंच, गादीवर वारसा सांगणारेही कित्येक राजपुत्र

उपस्थित झाले. शिकंदरच्या बापानें तरी गादी बळकावलेलीच असल्या-मुळें हे नवे वारस उपस्थित होणें साहजिक होतें. शिकंदरनें प्रथम या हक्कदारांची वासलात लाविली. कोणास कैद केलें व कोणास अजिबातच नाहींसें केलें. नंतर तो बंडखोरांकडे वळला. पहिल्या सपाट्याला कॉरिंथ शहरला जाऊन त्यानें सर्वांकडून "ग्रीसचा सेनापति" ही बापाची पदवी आपल्याला घेतली व मग तो उत्तरेकडे निघाला. एकामागून एक अशा अनेक पुंड जमाती त्यानें खिळखिळ्या करून टाकल्या. त्यांची रग साफ नाहींशी करून तो तसाच पुढें चालला; तों जातां जातां डॅन्यूब नदीपर्यंत सर्व मुलूख त्यानें पादाक्रान्त केला. या त्याच्या तडफेमुळें तिकडील बाजूला त्याचा विलक्षण वचक बसला. पण मुख्य राजधानींतून कित्येक दिवस दूर राहिल्यामुळें तो मेला अशा कंड्या इकडे त्याच्या वैऱ्यांनीं उठविल्या. कारण त्यांना तो मरावयास हवा होता. अथेन्स शहरांत डेमॉस्थिनीस यानें वक्तृत्वाचा सपाटा चालू ठेविला आणि या पोराला चिरडून टाकून आपलें स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित करा, असा सारखा घोष त्यानें चालविला. थीब्ज शहरही पुन्हा उसळून उठलें व तेथील लोकांनीं त्याच्या शिपाईप्याद्यांची कत्तल उडविली. हीं वर्तमानें हळूहळू डॅन्यूब नदीवर जाऊन पोंचलीं. शिकंदरच्या ध्यानांत आलें कीं येतां येतां आपण फारच दूर आलों. त्यानें लगेच परत कूच म्हणून नगारे केले आणि मजल दरमजल अवघ्या पंधरा दिवसांत तो थीब्ज शहराच्या दाराशीं येऊन थडकला. तो मेल्याच्या कथा खुळ्या लोकांनीं खऱ्या मानिल्या होत्या व शहाण्यांनीं असें ठरविलें होतें कीं, तो आला तरी वर्ष सहा महिन्यांत येत नाहीं. पण त्याच्या फौजेच्या गर्जना जेव्हां त्यांनीं शहरापलीकडेच उठलेल्या ऐकिल्या, तेव्हां त्यांची गाळण झाली. शिकंदरही थोड्या विचारानेंच वागला. त्यानें लोकांस कळविलें कीं, अपराध कबूल करा व शरण या.

वि:



जर आलांत तर तुमच्या जिवास धक्का पोहोंचणार नाहीं. पण त्यांना वाईट विचार आठवला आणि वाट न पाहतां त्यांनीं आपण होऊनच त्याजवर हल्ला चढविला. शिकंदरच्या भालाईत शिपायांनीं या लोकांना आपल्यासमोर क्षणभरहि ठरूं दिलें नाहीं. हजारों प्रेतें आपल्या पायाशीं पाडीत हे भालाईत नगरच्या वेशीकडे चालले होते. पाठीवर शिकंदर स्वतः आरोळ्या ठोकीत चालला होता. वेस भंगली आणि हे योद्धे गांवांत शिरले. रस्त्यारस्त्यांतून कचाकची चालू झाली आणि सहा हजार थीबियन शिपाई कामास आले. शिकंदरही अगदीं बेभान होऊन गेला होता. त्याला रक्तपाताची धुंदी चढली. त्यानें हुकूम केला कीं, सगळा गांव, घर न् घर खणून काढा. पण निशेतही एक उदारपणाची गोष्ट त्यानें केली. महाकवि जो पिंडार त्याच्या वंशजांचें घर मात्र त्यानें वगळलें. उपाध्ये, पिंडार कवीचे वंशज व आपल्या बाजूचे लोक इतके सोडून बाकीचे तीस हजार लोक शिकंदरनें गुलाम म्हणून विकले. याप्रमाणें शत्रूच्या या शहराचा त्यानें निःपात करून टाकला. हा कडाका पाहतांच अथीनियन लोकांनीं नमतें घेतलें, कॉरिंथ शहरीं पुन्हा परिषद् भरवून त्यास "ग्रीसचा सेनापति," ही पदवी त्यांनीं अर्पण केली व नवीन उत्पन्न झालेल्या पर्शियन शत्रूशीं टक्कर देण्याची तयारी आपणच करावी असेंही त्यांस विनविलें.

याप्रमाणें खुद्द ग्रीस निष्कंटक करून टाकल्यावर पर्शियाच्या साम्राज्यसत्तेवर आघात करण्याचें त्यानें ठाम ठरविलें. हें साम्राज्य फार अवाढव्य होतें. सध्यांचा एशियामायनर, ईजिप्त, तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान, बलुचिस्तान, मध्य एशियाचा कांहीं भाग येवढ्या मुलुखावर हें साम्राज्य विस्तारलेलें होतें व हळूहळू हें सर्वभक्षक राज्य युरोपांत शिरून मॅसिडोनिया, ग्रीस इत्यादींचा ग्रास करील कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली होती. दारियस हा सम्राट पांच कोट प्रजेवर

राज्य करीत होता ! त्याचा दरबार मोठा भव्य असून साम्राज्यवैभवाच्या सर्व खुणा तेथें दिसत असत. मोठमोठीं सुशोभित शहरें आणि कला-कौशल्याचीं आगरें सर्व साम्राज्यभर पसरलेलीं होतीं आणि प्रसंगच पडला तर दहापांच लाख फौज उभी करून संभाळणें ही गोष्ट त्याला सहजसाध्य होती. भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर त्यानें थोडें आरमारही ठेविलें होतें. अशा या बलाढ्य सत्तेशीं शिकंदरला झुंजावयाचें होतें. दीडदोन वर्षें तयारी चालू होती. मधून मधून तो साधुसंतांचे आशीर्वाद घेण्यासाठीं आणि देवदर्शनासाठीं इकडे तिकडे हिंडत असे. एकदां कॉरिंथ येथील प्रसिद्ध तापसी जो डायोजिनीस त्याच्या दर्शनासाठीं तो गेला. वेळ सकाळची होती, म्हणून तो तापसी ऊन खात बसला होता. शिकंदरच्या हें ध्यानांत न आल्यामुळें तो त्याचें ऊन धरूनच उभा राहिला व नम्रपणानें म्हणाला, " साधुमहाराजांचें मीं काय बरें करावें ? " तो निःस्पृह विरागी तुसड्या आवाजानें म्हणाला, " तेवढा उन्हांतून दूर हो म्हणजे झालें ! " हा त्या तापशाचा निःस्पृहपणा पाहून अलेक्झँडर मनांत ओशाळला; कां कीं, आपल्यासारखा एवढा राजा समोर उभा असतां हा वैरागी कांहीं आशा दाखवील असें त्यास वाटलें होतें. त्यानें तसें तर कांहीं केलें नाहींच; पण आशा दाखविण्याच्या मिषानें त्याच्या तारतम्यशून्यतेवर मात्र त्यानें टीका केली. पण शिकंदर रसिक होता. भोंवतालच्या लोकांकडे पाहून तो लागलीच उद्गारला। " मी जर शिकंदर नसतों तर डायोजिनीस होणेंच मला आवडलें असतें ! " तेथून पुढें तो डेल्फी येथील मंदिराकडे गेला. तेथील पुजारी जोगतीण खरें भाकित करते असा प्रवाद होता. बराच वेळ ती कांहींच बोलेना. शेवटीं शिकंदर खिजला आणि त्यानें त्या जोगतिणीला फरफटत बाहेर आणिलें व विचारलें, " मी स्वारीवर निघणार आहें. काय होईल, बोल ! " ती झटकन् उद्गारली, " तूं अजिंक्य आहेस ! "

राजालाही येवढें पुरेसें होतें. तोच शकुन मानून तो परत फिरला व फौजेंत दाखल झाला. आपण यश घेऊन परत येणार ही त्याची बालंबाल खात्री होती. अँटिपीटर या नांवाच्या एका वयस्क व अनुभवी माणसास त्यानें घरचा कारभार सांगितला व ऑलिंपियेची मर्जी राखून असत जा म्हणूनही बजाविलें. जवळ काय होतें तें त्यानें सर्व मित्र-गणास देऊन टाकलें व "तुम्हीं आपल्याला काय ठेविलें आहे?" म्हणून कोणीसें विचारतांच त्यानें उत्तर केलें कीं, "मीं स्वतःसाठीं फक्त 'आशा' शिल्लक ठेविली आहे!"

शिकंदरच्या चरित्रांतील फार मनोरंजक भाग येथून सुरू होतो. या वेळीं तो अवघा बावीस वर्षांचा होता. तेवढ्यांतच स्वतःच्या देशांत तो अजिंक्य ठरला होता. पण आतां फार प्रचंड कामगिरी त्याच्या शिरावर येऊन पडली होती. पर्शियन साम्राज्य कधीं कांसवाच्या तर कधीं सशाच्या पायानें पुढें पुढें येत होतें. त्यास थोपवून धरणें व जमल्यास त्याच्या लाटा परत वळविणें हें काम त्यास करावयाचें होतें. सर्व जमवाजमव होतांच त्यानें समुद्रकांठानें हेलेस्पॉटच्या सामुद्रधुनीकडे कूच केलें. जेथें जावें तेथील लोकांना बरें वाटेसें, असें कांहीं कांहीं करण्याचा त्यानें प्रघात ठेविला होता. वाटेंत तें उद्ध्वस्त झालेलें ट्रॉय शहर लागलें. शिकंदरनें तेथें थोडा मुक्काम केला; कांहीं देवदेवतार्चन केलें; आकिलाचें श्राद्ध केलें आणि त्या ओसाड नगरीचें पुनरुज्जीवन करावें असा हुकूम केला. यामुळें भोंवतालच्या ग्रीक लोकांना फार हर्ष झाला. तेथून पुढें कूच करून तो ग्रॅनिकस नदीवर येऊन दाखल झाला. या ठिकाणीं पर्शियन फौजेशीं त्याची पहिली चकमक झडली. उंच दरड पुढें ठेवून पर्शियन फौजा नदीच्या पलीकडे उभ्या होत्या. शिकंदरनें नदी उतरावयाचा बेत करून पाण्यांत घोडीं घालण्याचा हुकूम केला. हें काम फार साहसाचें होतें. पलीकडे पोंचतांच निसरड्या

दरडीवर त्याच्या घोडेस्वारांची थोडी कुचंबणा झाली. शिकंदर त्वेषानें पुढें शिरला आणि त्यानें पर्शियनांच्या मध्यावर हल्ला चढविला. चकमकींत त्याच्या चिलखतावर व शुभ्र तुऱ्यावर नेम धरून एका शत्रूनें तलवार उगारिली. थोडक्यांत चुकलें, नाहींतर येथेंच सर्व संपावयाचें. पण शिकंदरच्या मागें त्याचा मित्र क्लायटस उभा होता; त्यानें त्या शत्रूचा वर उगारलेला हात वरच्या वरच कापून टाकला. त्याची ही तुरमुंडी शत्रूंना आवरेना; ते मागें खचूं लागले. मध्यफौजा हटल्याशा पाहून बगलांनींही पळ काढला आणि ही लहानशी लढाई गमावून पर्शियन सेनापति झपाट्यानें निघून गेले. लढाई लहान खरी; पण शिकंदरला तिचें महत्त्व फार होतें; हीच लढाई जर का तो हरता तर त्याच्याविरुद्ध काहूर उठवावयास घरीं कांहीं लोक सिद्धच होते. पण या विजयामुळें त्या सर्वांचीं तोंडें बंद झालीं. शेंकडों कैदी व इतर लुटीचें सामान त्यानें घरीं पाठविलें व ज्या अथीनियन लोकांची त्याच्याविरुद्ध सारखी कुरकूर असे त्यांची समजूत करण्यासाठीं लुटीपैकीं तीनशें चांगलीं चांगलीं चिलखतें त्यानें अथेन्सला पाठवून दिलीं. या एका झुंजीनें बरेंच काम केलें. आशियामायनरचा पश्चिम भाग अगदीं मोकळा झाला. पुढें पूर्वेकडे सरून त्यानें बारीकसारीक शहरें काबीज केलीं व अनेक रानवट लोकांच्या विरोधाची पर्वा न करतां तो गॉर्डिअम गांवीं प्राप्त झाला. शिकंदरला शकुन, भाकितें, नवससायास इत्यादींचें बरेंच वेड होतें असें दिसतें. या गांवांत एका देवळापुढें एक गाडा होता; त्याच्या धुरीला एक गवताचा दोर अशा खुबीनें बांधलेला होता कीं, त्याची गांठ कोठेंही दिसत नसे. देऊळवाल्यांनीं याच गोष्टीचें मोठें बंड माजविलें होतें. ते म्हणत, जो कोणी ही गांठ सोडवून दाखवील त्याला प्राची दिशेचें राज्य मिळेल. अलेक्झँडर खरोखरच प्राची दिशा जिंकावयास निघाला होता. दोराचा लौकिक ऐकून तो देवळाकडे गेला.

ती गांठ सोडण्यासाठीं त्यानें थोडी धडपड केली, पण हें काम सोपें नाहीं हें त्याच्या ध्यानांत आलें. बरें, हरलों म्हणावें तर प्राची दिशेचें राज्य आपल्याला मिळणार नाहीं असें ठरावयाचें व लोकांत तोच प्रवाद चालू व्हावयाचा. त्याच्या मानी स्वभावाला हें मानवेना; म्हणून मागें डेल्फीच्या देवळांतील जोगतिणीला त्यानें जसें जबरीनें बोलावयास लाविलें तसाच कांहींसा प्रकार येथेंही त्यानें केला. गांठ सुटत नाहींसें पाहतांच त्यानें कमरेची समशेर काढली व "अलेक्झँडर असल्या गांठी या अशा सोडतो" असें म्हणून त्यानें तीं दोरांचीं एकमेकांवर चढलेलीं भेंडोळीं एकाच तडाक्यानें तोडून टाकिलीं! साध्या व बारकाईच्या इलाजांनीं एखादी गोष्ट निकालांत निघेना म्हणजे एखादा सपाट्याचा आसुरी उपाय करावा लागतो असा शिकंदरचा अभिप्राय. तेथून तो दक्षिणेकडे वळला.

तिकडे सम्राट् दारियसनें बाबिलन शहरीं पांच लाख फौज जमा केली व तो पश्चिमेच्या रोखानें निघाला. एकमेकांस थोडया हुलकावण्या देतां देतां शेवटीं इस्सस गांवाजवळ त्यांची गांठ पडली. शिकंदरची फौज दारियसच्या पासंगालासुद्धां लागण्यासारखी नव्हती. मॅसिडोनियांतील शूर भालाइतांनीं दारियसच्या सैन्याच्या धुरेवर जोराचा हल्ला केला. पुष्कळ वेळ झटापट चालू राहूनही ही धुरा भंगतां येईल असें दिसेना. शिकंदरनें पाहिलें कीं, असाच प्रकार जर चालू राहूं दिला तर आपली फौज निराश होईल. या वेळीं त्याची तडफ आणि जिवाविषयींची बेफिकिरी उत्तम दिसून आली. शत्रूच्या फौजेचा नायक माघारा फिरला कीं, केवढीही फौज असली तरी परत फिरते हें त्यानें मागच्या लढाईंत पाहिलें होतें. आपल्या शूर शिपायांच्या पराक्रमानें जें त्याला साध्य दिसेना तें त्यानें स्वतःच्या हिंमतीवर करून दाखविलें. एक टोळी बरोबर घेऊन तो दारियसच्या रोखानें मारामारी करीत पुढें

घुसला. मोठी खेंचाखेंच झाली आणि त्याला वार लागला. तरी त्याची परवा न करतां रक्ताळलेल्या अंगानें तो तसाच तलवार चालवीत, शत्रूची फौज फाडीत फाडीत, खुद्द दारियसच्या सन्मुख येऊन ठेपला. त्याबरोबर दारियसनें भय खाल्लें. घाबरटपणानें त्यानें आपलें ठाण सोडलें आणि स्वार होऊन त्यानें रणावरून पळ काढला ! त्याहीपेक्षां आश्चर्य हें कीं, त्याचें हें पलायन पाहून लाखोंच्या लाखों मर्दांसारखे मर्द शिपाई जीव घेऊन रानोमाळ पळत सुटले. सरासरी चाळीस हजार माणूसबळा-वर शिकंदरनें पांच लाख फौजेची धुळधाण उडविली. एकमेकांला चेंगरण्यानेंच हजारों लोक मरण पावले. शिकंदरच्या लोकांनीं जवळपास एक लाख लोक कापून काढले. दारियस पळाला तो युफ्रेटिस नदीच्या पूर्वकांठावर येऊन थांबला. शिकंदरनें पाठलाग केला नाहीं. कारण या विजयानें त्याला मिळालेलें अपरंपार बक्षीस त्याच्यानें टाकवेना. वैभवाच्या लुटीला कांहीं पारावार नाहींसा झाला. हत्यारें, चिलखतें, तंबू, उंची पोशाख अशांसारख्या वस्तु इतक्या पडल्या होत्या कीं, कोणी लुटावयास भेटेना, अशी स्थिति झाली. पण यांत विशेष नाहीं. त्या कैदी सम्राटानें इतर वस्तूं-बरोबर आपली आई, राणी व मुलेंबाळेंसुद्धां तेथेंच सोडून दिलीं ! शिकंदर जेव्हां त्यांच्यापुढें येऊन उभा राहिला तेव्हां त्यांना पराकाष्ठेची ओशाळगत झाली व त्यालाही फार अवघड झालें. तेव्हांच्या तिकडील रीतीप्रमाणें या स्त्रियांची लाज तरी गेली असती किंवा जीव तरी गेला असता; पण शिकंदरनें ही कोणतीच आपत्ति त्यांजवर आणिली नाहीं. त्यानें त्यांचा बहुमान करून त्यांस सोडून दिलें. ग्रीक फौज शूर खरी, पण भिकार; आणि म्हणून वैभवाला वखवखलेली. तिनें जेव्हां ही इतकी लूट पाहिली तेव्हां तिला काय घेऊं आणि काय नको असें झालें. साम्राज्यवैभव म्हणजे काय हें या शिपायांनीं कधीं पूर्वीं पाहिलेंच नव्हतें. शिपायांच्या मनाची अशी स्थिति झाली असेल यांत नवल नाहीं. खुद्द

शिकंदरलासुद्धां राजवैभव म्हणजे काय याची ओळख येथेंच झाली. दारियसच्या तंबूशीं जेव्हां तो आला तेव्हां तो राजवाड्यासारखा भव्य व अलंकृत कापडी इमला पाहून त्याला विस्मय वाटला. आंत शिरल्या-वर तेथील भरगच्च जरतारी पडदे, वस्त्रभूषणें, सुखासनें आणि सोन्याचीं ताटेंवाट्या पाहून तो चकितच झाला! आणि उद्गारला, "राजवैभव म्हणजे असें असतें अँ!" या यशामुळें ग्रीस देशांतील विरोधाची कुरबूर अगदीं बंद पडली. प्रसिद्ध वक्ता डेमॉस्थिनीस हा शिकंदरच्या विरुद्ध सारखा ओरडत असे व अथीनियन लोकांना त्याच्याविरुद्ध चिथवीत असे. पण आतां त्याला आपलें सगळें वक्तृत्व गिळून बसावें लागलें. कॉरिंथ येथें ग्रीसमधील सर्व संस्थानांची परिषद् भरून शिकं-दरला एक सोन्याचा 'विजयमुकुट' म्हणून देण्याचें ठरलें. याप्रमाणें आपल्याच देशांत आपल्याविरुद्ध कोणी उचल करील कीं काय ही त्याची भीति कांहीं दिवस तरी नष्ट झाली. तिकडे दारियसनें बोलणें लावलें कीं, युफ्रेटिसच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख मी आपणांस देतों; आपण तह करावा. शिवाय आपली मुलगीही अलेक्झँडरला देण्याचें त्यानें आश्वासन दिलें; व वरदक्षणा म्हणून आणखी क्रोडो रुपये देऊं केले! हे देऊं केलेले पाहतांच शिकंदरच्या सेनापतींना मोठा आनंद झाला. पारमेनिओ नामक एक लोभाळू सेनापति म्हणाला, "मी जर शिकंदर असतों तर असला देकार मीं एकदम पत्करला असता." शिकंदरनें त्याची किंमत त्याला कळावी म्हणून उत्तर केलें, "होय, मी जर पारमेनिओ असतों तर मींही हा एकदम पत्करला असता!" पण शिकंदरला आहेराची किंवा लालुचीची कांहींच किंमत नव्हती. त्यानें दारियसला सडकून कळविलें कीं, "मला हें नको. युफ्रेटिसच्या पश्चिमेचा नव्हे तर अखिल आशियाचा मी स्वामी आहें हें कबूल कर आणि होत नसेल तर पुन्हा युद्धाला उभा राहा. कोणतेंच न करतां पळून जाशील

तर मी तुला चैन पडूं देणार नाहीं; दडशील तेथून हुसकून काढीन." दारियसनें काय उत्तर केलें हें इतिहासाला आठवत नाहीं; पण इतकें खरें कीं, शिकंदर युफ्रेटिसकडे गेला नाहीं; तर दक्षिणेकडे वळला. असें करण्यांत त्याचा हेतु असा होता कीं, समुद्रकांठचा पर्शियन अंमल उठवावा व जमल्यास ईजिप्तवर जाऊन तेथें तेंच करावें. त्याप्रमाणें सायडोन, टायर इत्यादि व्यापाराचीं ठाणीं हस्तगत करून त्यानें सगळा एशियामायनर व सीरिया खुला केला आणि तेथून तो खालीं ईजिप्तकडे गेला. तेथील लोकांना पर्शियनांचें राज्य नकोसेंच होतें. यानेंही त्यांच्या राजधानीस जाऊन तेथील देवाची पूजाअर्चा केली व मी तुमच्यापैकींच आहें असें त्यांस भासविलें. तेथें आपली सत्ता प्रस्थापित करून तो पुन्हा वर वळला व दारियसशीं पुन्हा गांठ घालावी म्हणून युफ्रेटिसकडे निघाला. दरम्यान मॅसिडोनियावर संकट उत्पन्न झालें होतें; पण त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. कांहीं रानटी टोळ्या ग्रीसला उपद्रव देऊं लागल्या होत्या. पण तो म्हणाला, "त्या उंदरांना मारावयास मी जाणार नाहीं." तसेंच स्पार्टा संस्थानानेंही बंड केलें होतें. पण घरीं ठेविलेला कारभारी जो अँटिपिटर त्यानें मोठी मर्दुमकी करून हें बंड साफ मोडून टाकलें. असो. मेसापोटेमियांतून त्वरेनें कूच करून तो दारियसावर चाल करून आला. दरम्यान त्या बादशहानें दशलक्ष फौज उभी केली होती. कारण शिकंदराचा ससेमिरा एक वर्ष बंद पडून त्याला पुरेशी उसंत मिळाली होती. तायग्रीस नदीच्या पूर्व किनाऱ्यावर लढाई देण्याचें त्यानें ठरविलें व आपल्या घोडेस्वारांना सोपें जावें म्हणून अवघें रणमैदान त्यानें सपाट करून ठेविलें. याप्रमाणें खंबिरी करून दारियस शत्रूची वाट पहात बसला होता. एवढी फौज व येवढें बळ हातीं होतें तर तो आपण होऊन शिकंदरवर चाल करून कां गेला नाहीं हें कळत

नाहीं. त्याची फौज तर पन्नास हजारांहून जास्त नव्हती. तरी येवढयाशा फौजेनिशींच दारियसशीं पुन्हा गांठ घालण्याची ईर्षा धरून शिकंदर सन्मुख आला. दारियसचें हें बळ पाहतांच त्याला व त्याच्या शिपायांनाहि थोडें संकटच वाटूं लागलें. शिकंदरनें पूर्वी कधीं न केलेली गोष्ट या वेळीं केली; ती ही कीं, सल्ला घेण्यासाठीं हाताखालची चार मंडळी त्यानें बोलाविली. पुष्कळांनीं मत दिलें कीं आपण थोडें आहों, तेव्हां रात्रींचा छापा घालावा. पण शिकंदर म्हणाला, "मला असें चोरटें यश नको." बराच वेळ वाटाघाट होऊन काय करावयाचें तें मनाशीं ठरवून तो खुशाल झोपीं गेला. दुसरे दिवशीं इसवी सनापूर्वी ३३१ च्या ऑक्टोबर महिन्यांत हा दुसरा रणसंग्राम सुरू झाला. मागल्या लढाईचें वर्णन केलें आहे तेंच येथें थोड्याफार फरकानें लागू पडतें. शिकंदरनें या फौजेच्या अवाढव्यपणाकडे लक्ष न देतां नेहमींप्रमाणें मध्यभागावर जोराचा हल्ला चढविला व मग व्हावयाचें तेंच झालें. मधली फळी फुटली. दारियस घाबरला, पळाला; व नायक पळाला म्हणून इतर फौजही पळाली! हीं युद्धवर्णनें वाचलीं म्हणजे त्यांच्या खरेपणाविषयीं शंका येते. दशलक्ष लोक उगाच पळतात म्हणजे काय? एक तर दारियसची फौज इतकी मोठी नसावी किंवा शिकंदरची तरी मोठी असावी. विशेष प्रकारच्या हत्यारपात्यारांचा, शिस्तीचा वगैरे उपयोग होतो हें खरें, पण याही बाबतींत दारियस अगदीं तोटका होता हें संभवतें तरी कसें? येवढें विशाल साम्राज्य कशाच्या बळावर चाललें होतें? साधारण अनुमान इतकेंच निघतें कीं, या युद्धाचीं वर्णनें फार थोड्या माहितीवर रचलीं असावीं. पण तें कसेंही असलें तरी दारियसचा पराभव झाला हें खरेंच आहे. पुन्हा हतबल होऊन दारियस रणांगणावरून पळाला. या दुसऱ्या विजयानें शिकंदरनें पर्शियन साम्राज्य पार मोडून टाकलें.

मग तो खालीं वळून फार दिवस गाजत असलेल्या त्या पुराण्या बाबिलोन शहराकडे गेला. तेथील वैभव पाहून तो हर्षभरित झाला. तेथून पुढें सरून त्यानें दारियसच्या ‘ सूसा ’ नांवाच्या राजधानींत प्रवेश केला. तेथें त्यास अगणित संपत्ति मिळाली. पार्सिपोलिस नगरांतही त्याला अशीच लूट मिळाली. शेवटीं ही लुटालूट शिपायांच्या व राजाच्या हातींपायीं आली. हे सर्व सुखावले. स्त्री, शराब आणि इतर सुखोपभोग यांत सर्वजण गर्क होऊन गेले. शिकंदरची नेकी आणि दिलदारपणा हीं या निशेंत कांहींशीं नष्ट झालीं. दारूच्या अंमलांत असतां एका कसबिणीच्या आग्रहावरून त्यानें तेथील परम सुंदर आणि भव्य प्रासाद मोठी शेकोटी व्हावी म्हणून पेटवून दिला. प्राप्त झालेल्या यशानें बेहोष न होण्याइतपत गंभीरपणा त्याला अजून प्राप्त झाला नव्हता. पण शिकंदरानें ही विलासवासना फार वेळ टिकूं दिली नाहीं. दारियसचा पुरा निःपात त्याला करावयाचा होता. दारियसला पळतां भुई थोडी झाली. सगळें राज्य मागें टाकून तो उत्तरेकडे आपल्या एका नातलगाकडे गेला, पण त्यानेंच त्याला कैदेंत ठेविलें व त्याची हरतऱ्हेनें मानखंडना केली. त्याच्या पाठीमागें शिकंदरही तेथें गेला. शिकंदर इकडेच येत आहे हें ऐकून तो भेकड नातेवाईक आपल्या कैद्यांसह पळत सुटला. शेवटीं पळतां पळतां, आतां पळवत नाहींसें पाहून, दारियसनें जिवाची आशा सोडली व तो वाटेंतच पडून राहिला. त्याच्याबरोबरच्या लोकांना अजून पळावयाचें असल्यामुळें ते पुढें गेले. पण जातां जातां त्यांनीं त्याला प्राणांतक जखम मात्र केली. दरम्यान शिकंदर तेथें आला; तों दारियसनें प्राण सोडला होता. कांहीं दिवसांनीं तो दारियसचा नातेवाईक त्याच्या हातीं लागला; तेव्हां शिकंदरनें हालहाल करून त्याला ठार मारलें. याप्रमाणें दोन वर्षांपूर्वीं पर्शियन सम्राटावर शिकंदरने उगारिलेल्या शस्त्राचें काम संपलें. सर्व राज्य बुडालें, कुलाची अब्रू गेली,

वैभवें धुळीस मिळालीं, व खुद्द राजा कुत्र्याच्या मरणानें मेला.

आतां मात्र शिकंदर पुन्हा बेफाम बनत चालला. हाताखालच्या लोकांशीं तो फार मग्रूरीनें वागूं लागला. ज्याला त्याला टाकरून बोलूं लागला व मन मानेल तसें वर्तन करूं लागला. आपला ग्रीक पोषाख घालावयाचें सोडून देऊन तो जित लोकांचा पोषाख करूं लागला. कोणी मित्रसुद्धां समजुतीच्या गोष्टी बोलूं लागले तर तें त्याला खपेना. एकदां पारमेनिओ हा आपल्या जिवाला इजा करण्याच्या खटपटींत आहे अशी त्याला शंका आली आणि एकदम त्यानें त्या वृद्ध सरदारास फांशीची शिक्षा दिली. ज्या क्लायटसनें त्याचा जीव वांचविला होता त्याला दारूच्या धुंदींत त्यानें ठार मारलें. शिकारींत एक हुजऱ्या आपल्यापुढें धावला म्हणून त्यानें त्यास चाबकाखालीं झोडपलें. ॲरिस्टॉटल्च्या पुतण्यास एक विद्वान् म्हणून त्यानें बरोबर नेलें होतें; पण तो हवें त्याला मान डोलवीना व इतर लोकांसारखा साष्टांग नमस्कार करीना म्हणून त्यानें त्याची निर्भर्त्सना केली. येवढ्यानेंच झालें नाहीं. रोशन नांवाच्या आपल्या राणीच्या सहवासांत दिवसचे दिवस तो घालवूं लागला. दारू पिणें हें तर ग्रीक लोकांच्या पांचवीलाच पुजलेलें; त्याही व्यसनांत तो निपचित पडून राहूं लागला. पण इतकें झालें तरी पृथ्वी जिंकण्याचा त्याचा हव्यास तिळप्रायही हटला नव्हता.

त्याच्यापुढें काय आहे, त्याच्यापुढें काय आहे, हें पाहण्याचा व जें दिसेल तें जिंकण्याचा स्वतःचा हव्यास मात्र शिकंदरला जिंकतां येईना. वास्तविक पाहतां, ग्रीक राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर गदा आणूं पाहणाऱ्या पर्शियन साम्राज्यावर त्यानें उठावें हें जरी साहजिक असलें तरी आतां तें सर्व साम्राज्य व त्या साम्राज्याचा सम्राट् या सर्वांचा त्यानें अगदीं चोळामोळा करून टाकला होता; आणि म्हणून त्यानें परत फिरावयास हवें होतें. पण पर्शियन साम्राज्याच्या पूर्वसीमेवर आल्यावर

त्याच्या कानीं भारतवर्षांतील संपत्तीच्या व वैभवाच्या कथा पोंचल्या असाव्या आणि जें राज्य आपण जिंकिलें त्यासारखींच मोठमोठीं राज्यें व जे मुलूख पाहिले त्याहून सहस्रपट परम सुंदर प्रदेश आपण पुढें गेलों असतां आपणांस भेटतील असें वाटून त्यानें सिंधुनदीच्या रोखानें निघावयाचें ठरविलें. त्यानें आजूबाजूच्या शूर लोकांतून शिपायांची नवी भरती केली; व जवळ जवळ एक लाख फौजेसह तो हिंदुकूश पर्वताच्या बारींतून इकडे येण्यास निघाला. बरोबर लुटीचें सामानसुमान इतकें जमा झालें होतें कीं, दिवसाच्या कांठीं मजल फार थोडी होऊं लागली. हें त्याला आवडेना, म्हणून सर्व फौजेंत त्यानें हुकूम सोडले कीं, अगदीं जरूर तेवढेंच सामान प्रत्येकानें जवळ ठेवावें व बाकीचें जाळून टाकावें. कदाचित् शिपाई लोक कांकूं करतील हें ध्यानांत घेऊन त्यांना उदाहरण घालून देण्याच्या हेतूनें त्यानें आपल्या विलासाच्या व सुखोपभोगाच्या सर्व वस्तूंची शिपायांच्या समोर होळी केली. अर्थात् शिपायांनाही तसें करणें प्राप्तच झालें. मजल दरमजल करीत शिकंदर खैबर घाटांतून प्रत्यक्ष हिंदुस्थानांत उतरला.

तक्षशिलेस एक लहानसें राज्य होतें. येथील राजानें गोडीगुलाबीनें वागून हें अरिष्ट पुढें लावून दिलें; पण झेलम नदीच्या अलीकडे मात्र त्याची प्रगति इतकी सहजासहजीं होण्यासारखी नव्हती. तेथून खालीं पोरसचें बलाढ्य राज्य पसरलें होतें. खुद्द पोरस एखाद्या राक्षसासारखा महाधिप्पाड माणूस होता. ह्या अरिष्टाची वर्दी लागतांच शत्रूला अड-विण्यासाठीं नदी धरून तो बसला. नदीलाही पूर येऊन पाणी आसमंतात् पसरलें होतें. दोन्ही दळें नदीच्या दोन तीरांवर ठाण मांडून राहिलीं. पण पोरसला हुलकावण्या देण्याचें काम शिकंदरनें लवकरच चालू केलें. त्याच्या तोंडावर बरीच फौज ठेवून नदी उतरण्याचा डौल त्यानें अनेक ठिकाणीं घातला. हें त्यानें इतक्या वेळां केलें कीं, याच्यानें नदी उतरवत

नाहीं अशी पोरसच्या लोकांची खात्री झाली. शेवटीं एके दिवशी रात्रीं नदीकांठानें बरेंच वर सरकून त्यानें एक उतार शोधून काढला ; व तेथून सुमारें बारा हजार लोक झेलमच्या अलीकडे आणले. यांनीं सकाळ होतांच पोरसच्या बगलेवर मारा करण्यास सुरुवात केली. बगलेवर हल्ला होतांच हिंदु फौजेनें आपला मोहरा तिकडे वळविला. पण हें करतांना एक चूक झाली. तिचा नदीचा आसरा सुटला. नदीपासून पोरस दूर सरकलासें पाहून शिकंदरनें आपली मुख्य फौज झेलम उतरून अलीकडे आणिली आणि शत्रूच्या मध्यावर जोराचा तडाखा देण्याचा त्याचा नेहमींचा डाव त्यानें सुरू केला. पोरसपाशीं तीनशें हत्ती होते; ते धुंद करून ठेविलेले होते. त्यांच्यापुढें शिकंदरच्या भालेकऱ्यांचें फारसें कांहीं चालेना. पण इतक्यांत ते मस्त झालेले हत्ती पोरसच्या फौजेकडे तोंडें करूनच धिंगाणा घालूं लागले. शत्रूवर सोडण्यासाठीं आणलेलें हें नागास्त्र पोरसच्या फौजेवरच वळलें व त्यानें तिची दाणादाण केली. तसेंच पोरसचे मोठमोठाले युद्धरथ चिखलांत रुतूं लागले. शिवाय शिकंदरचें माणूसबळही पोरसच्यापेक्षां मोठें होतें. स्वतः पोरसनें बहुत शर्थीनें तलवार चालविली. त्यामुळें शिकंदरच्या मनांत त्याच्याविषयीं आदर उत्पन्न झाला. पण शेवटीं पोरसचा पराभव झाला. "राजा म्हणून मला वागविशील तरच मी शस्त्र खालीं ठेवीन" असें बाणेदारपणाचें उत्तर त्यानें शिकंदरला केलें. त्यानें हें पोरसचें तेज पाहून त्याच्याशीं सख्य केलें. तेथून खालीं दक्षिणेकडे येऊन गंगेच्या खोऱ्यांतील उत्तमोत्तम प्रदेश काबीज करावे अशी शिकंदरची फार इच्छा होती ; पण आतां त्याचे शिपाई कुरकूर करूं लागले. शेवटीं शिपायांची मर्जी पाहून त्यानें दक्षिणेकडील रोख सोडून सिंधूच्या कांठानें समुद्राकडे जाण्याचें ठरविलें. समुद्रापर्यंत पोंचावयास त्याला तब्बल वर्ष लागलें !

सध्यांच्या बलुचिस्तानांतून तो फौजेसह पश्चिमेकडे निघाला. पण या डोंगराळ मुलुखाची त्याला बरोबर कल्पना नव्हती. वाटेनें त्याच्या फौजेचे भयंकर हाल झाले. उन्हाच्या तिरपीनें हजारों लोक होरपळून मेले. जे आजारी पडले त्यांस वाटेंतच टाकावें लागलें. ओझ्याचीं तट्टें मारून खाण्याचा प्रसंग आला ! डोळ्यांस लावावयासुद्धां पाणी मिळेना. एकदां कोठेंसें सांपडलेलें सुंदर पाणी शिपायांनीं डोकीच्या टोपांतून त्याच्यासाठीं म्हणून आणलें; पण माझ्या फौजेची तहान भागेपर्यंत मी हें पिणार नाहीं असें म्हणून या दिलदार सेनापतीनें तें पाण्याचें भांडे दूर केलें ! याप्रमाणें रखडत रखडत ते कसेबसे या रेताडांतून बाहेर पडले. पण ह्या वेळपर्यंत अर्धी-निम्मी फौज केवळ वाटचालींतच मरून गेली. शेवटीं एकदांचे ते इराणांत पोहोंचले. दारियसचें जिंकलेलें साम्राज्य त्यानें टाकून दिलें नव्हतें; तें त्यानें आपल्या ताब्यांत ठेविलें होतें व हिंदुस्थानाकडे जातांना तेथील कारभाराची व्यवस्था करून तो पुढे गेला होता. शिकंदर परत येत आहेसें पाहून अधिकाऱ्यांनीं त्याच्या स्वागताची तयारी करून ठेविली व त्यामुळें हायसें होऊन शिकंदर व त्याचे शिपाई विश्रांति घेऊं लागले. सर्व तऱ्हेच्या सुखसोईंची व्यवस्था झालेली होती. हे वाळून गेलेले आणि वखवखलेले लोक इतके सुखावले कीं, कित्येक महिनेपर्यंत त्यांना दुसऱ्या कशाची आठवणच झाली नाहीं. या सुखनिद्रेंतून जागा होतांच शिकंदर कारभाराच्या सुधारणेस लागला. दारियसची राजधानी जी सुसा तेथेंच त्यानें आपलीही राजधानी केली. आधीं नेमून ठेवलेल्या अंमलदारांना दुर्बुद्धि आठवून त्यांनीं कारभारांत बजबज माजविली होती; त्यांस त्यानें कामावरून दूर केलें व जरूर तर कडक शासनही केलें. त्याच्या मनांत इकडेच राहून हिंदुकुशपासून डॅन्यूबपर्यंत साम्राज्य चालवावें असें येऊं लागलें. लोकांना स्वतःसंबंधानें आपलेपणा वाटावा

म्हणून त्यानें त्यांचा पूर्वकालीन थोर सम्राट् जो कुरु त्याच्या समाधीची डागडुजी करावयास आरंभ केला. याप्रमाणें आठदहा वर्षें मनस्वी श्रम करून प्राप्त करून घेतलेलें हें विशाल साम्राज्य सुस्थिर करण्याची त्यानें शिकस्त केली. सर्व स्थिरस्थावर होऊन राज्याचा गाडा सुयंत्र चालू होतांच झोपीं गेलेली त्याची पृथ्वी जिंकण्याची वासना पुन्हा खडबडून उठली.

पण त्याचें वासना-बळ जरी वाढत होतें तरी त्याचें शरीरबल क्षीण होत चाललें होतें. वास्तविक तो मोठ्या पिळदार बांध्याचा असून त्याची गर्दन, दंड, मांड्या पहिलवानासारख्या असत. त्याचे निळसर घारे डोळे अत्यंत पाणीदार असत. केंस पिंगट भुरे असून ते त्याच्या वळीव मानेवर पडले म्हणजे तो एखाद्या सिंहासारखा दिसे. दाढीमिशा काढण्याचीच त्याची रीत होती. शरीरकष्ट असे त्यानें कधीं जुमानिलेच नाहींत. लढाईच्या प्रसंगीं शिपाई थोडे कचरत आहेत असें त्याला दिसलें तर तो क्षणभरही विचार न करतां ऐन खेंचाखेंचींत उडी फेंकीत असे. या त्याच्या उग्रपणाच्या आंतील भागांत मात्र मातृभक्तीची अशी एक नाजूक जागा होती. एरवीं लढाईच्या गर्जना चालू असल्या तरी आईच्या आठवणीनें तो विव्हळ होत असे. आणि तें साहजिकच होतें. त्याच्या आईस बापानें अवमानिलें होतें, म्हणून त्याची मातृभक्ति अधिकच दृढ झाली होती. हा इकडे आल्यावर अँटिपेटरनें तक्रार करून त्याला कळविलें कीं, आपल्या आईसाहेब कारभारांत उगाच ढवळाढवळ करीत असतात. हें पत्र वाचून शिकंदरनें त्याला चार समजुतीच्या गोष्टी लिहिल्या व कळविलें कीं, “ माझ्या आईच्या डोळ्यांतून जर एक अश्रु निघाला तर माझें राज्य व माझा पराक्रम हीं केवळ मातीमोल होत. ” असो.

याप्रमाणें सर्व योजना चालू असतां त्याला थोडा थोडा ताप येऊ

लागला. अगोदर ग्रीक लोक भारी दारूबाज आणि त्यांत आतां तर तो इराणांत रहात असलेला! मग काय विचारावें? शिराजचें परम सुगंधित व मादक मद्य त्याला सोडीचना. त्यांतच ताप येऊं लागला. भोंवताल्च्या लोकांनीं विचारलें, "आतां मागची व्यवस्था काय?" त्यानें सांगितलें, "जो समर्थ असेल त्याच्या हवालीं हें राज्य करा!" रोशन राणी गरोदर होती; पण अजून प्रत्यक्ष राजकुलीन संतान कांहींच नव्हतें. त्यामुळें तो तरी दुसरें काय सांगणार? हे वरील शब्द किती खरे होते. पण या त्याच्या उद्गारांनीं पुढें सर्व साम्राज्याची दाणादाण उडाली; कारण समर्थ कोण याविषयीं मतभेद सुरू झाले. हळूहळू त्याची प्रकृति बिघडत चालली. राजवैद्यांनीं सर्व कांहीं केलें पण गुण वाटेना. या वेळीं त्याला केवळ बत्तिसावें वर्ष होतें! पण येवढ्याशा वयांत त्यानें केवढें साम्राज्य पैदा केलें! पराभव असा त्याचा कधीं झालाच नाहीं; पण रूपसंपदा, धनसंपदा, दिलदारी, आणि जयश्री यांनीं कायमचें वरिलेल्या या शूर वीरास दारूनें पोखरून टाकलें आणि कोणाच्याही औषधोपचाराचा उपयोग न होतां हा शिकंदर बादशहा, कीं ज्याचें नांव चांगल्या नशिबाचें विशेषण होऊन बसलें आहे तो कालवश झाला! ही गोष्ट इ० सन पूर्व ३२३ व्या वर्षीं घडली.

* * *

# हॅनिबल

प्रसिद्ध कार्थेजवाला सेनापति हॅनिबल हा इसवी सनापूर्वी २४७ व्या वर्षी जन्मला. युद्धाचे नियम जाणणारे इतिहासकार हॅनिबल याची गणना सगळ्या जगांत जे मोठमोठाले सेनापति होऊन गेले त्यांत करतात. पण हा जर केवळ सेनापति म्हणूनच मोठा होऊन गेला असता तर त्याचें महत्त्व इतिहासांत इतकेसें शिल्लक राहिलें नसतें. त्याच्या नांवाशीं एका मोठ्या राष्ट्राचा व संस्कृतीचा इतिहास संलग्न झालेला आहे. त्याच्या अपयशाबरोबर तें राष्ट्र व ती संस्कृति हीं झपाट्यानें लयास गेलीं; व नामशेष शब्दाच्या खऱ्या अर्थानेंच इतिहासाला त्यांची सध्यां ओळख आहे. हें राष्ट्र म्हणजे कार्थेजेनिअन लोकांचें होय, व ही संस्कृति म्हणजे फिनिशिअन लोकांची होय. हॅनिबलनें त्यांच्या उत्कर्षासाठीं जें अचाट कृत्य केलें त्यांत जर त्याला यश मिळालें असतें तर तेथून पुढील इतिहासाची घडण खास निराळी झाली असती. हें कार्थेजेनिअन राष्ट्र व ही फिनिशिअन संस्कृति यांसंबंधानें थोडीशी ओळख प्रथम व्हावयास हवी.

भूमध्यसमुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावर जो एक सीरिया नांवाचा देश

आहे, त्याच्या पश्चिमेस असलेल्या उंच पर्वताच्या व समुद्राच्या मध्यें एक कोंकणपट्टी आहे. ही सरासरी दीडशें मैल लांब व दहा पंधरा मैल रुंद अशी आहे. पाठीमागें डोंगरांच्या रांगावर रांगा पसरलेल्या असल्यामुळें पूर्वेकडून या सखल प्रदेशांत फारसें कोणी उतरत नसे; आणि समोर अफाट समुद्र पसरला असल्यामुळें तिकडूनही येथें कोणी येत नसे. अशा या निवान्त प्रदेशांत जे लोक रहात त्यांस फिनिशिअन असें म्हणत. हे तरी तेथें कोठून आले याची वार्ता इतिहासाला नाहीं. कारण त्यांनीं स्वतः एक स्वतंत्र लिपि उत्पन्न करून जरी ती जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांस दिलेली असली तरी त्या लिपीनें सुद्धां स्वतःचा इतिहास लिहून ठेवण्याचें ते अगदींच विसरले. विद्येकडेही या लोकांचें फारसें लक्ष नव्हतें. त्यांची सगळी जातच्या जात व्यापारी पेशाची असे. नवे नवे पदार्थ बनवावे, इतकेंच नव्हे तर जहाजांवर भरून ते इटली, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड किंबहुना आफ्रिकेचें खालचें टोंक व हिंदुस्थान येथपर्यंत-सुद्धां नेऊन पोहोंचवावे हा त्यांचा क्रम असे. ही दर्यावरची मुशाफरी त्यांनीं कित्येक शतकें चालविलेली होती. त्यामुळें पृथ्वीचा नकाशा त्यांना प्रत्यक्षच फार बारकाईनें माहीत झाला होता. समुद्रकांठीं सांपडणारे कांहीं विशेष प्रकारचे मासे शिजवून त्याच्या चरबीचा एक जांभळा रंग ते तयार करीत. तो लोंकरीवर इतका सुंदर बठे कीं, त्याचीं उत्तम दोन पुटें दिलेली अच्छेर लोंकर जवळपास पांचशें रुपयांला लोक आनंदानें विकत घेत. या लोंकरीचे केलेले लहंगे असे तकतकीत दिसत कीं, अगदीं साधें सणंगसुद्धां हजार रुपयांपर्यंत जाई. युरोपांतील मोठमोठ्या राजेरजवाड्यांच्या व सरदार-जहागिरदारांच्या झनान्यांत या रंगीत लोंकरीला फार मोठी गिऱ्हाइकी असे.

प्रथम याच लोकांनीं कांच तयार केली. पण नुसती कांच बनविण्यावरच ते खूष राहिले नाहींत. तर तिचे पुष्कळ प्रकारही ते बनवीत.

एक कांच शुद्ध पारदर्शक, दुसरी रंगीत पट्टयापट्टयांची व तिसरी हिरेमाणकांच्या जातीची. जर या तिसऱ्या कांचेचीं माणकें इत्यादि बनविलीं, तर खरें माणिक कोणचें आणि बनावट कोणचें याचा दर्दी जवाहिऱ्यालासुद्धां भ्रम पडे. रंगीत कांचेचीं ते तऱ्हेतऱ्हेचीं भांडींही करीत. ह्या कांचेच्या सामानावर व रंगीत लोंकरीवर जसे ते गबर झाले, तसेंच शेजारीं असलेल्या सायप्रस बेटांतील इमारतीच्या लांकडावरही त्यांनीं अगणित पैका मिळविला. सध्यां सायप्रस नांवानें माहीत असलेलें जें इमारतीचें लांकूड आहे त्याच्या नांवाचा आरंभ या फिनिशिअन लोकांच्या व्यापारांत सांपडेल. याच सायप्रस म्हणजे कायप्रस बेटांत त्यांनीं कॉपर ( तांबें ) धातूचा शोध लाविला व या वस्तु इतर देशांत नेऊन त्यांनीं मानवी संस्कृति निःसंशय अधिक रम्य तऱ्हेची केली.

त्यांचा देश संपत्तीनें गडगंज भरला तो त्यांच्या कौशल्यामुळें व उद्योगशीलतेमुळें. पण शेजारच्या उचल्या लोकांना, कीं ज्यांना स्वतः कष्ट करावयास नको होते पण दुसऱ्यांचें लुबाडण्याची ताकद मात्र ज्यांच्या अंगांत होती, त्यांना हें त्यांचें वैभव खपेना. मोठमोठाल्या टोळ्या करून ते यांजवर चालून येत. ते आले म्हणजे त्यांनीं त्यांस पुरेसा मलिदा चारावा व वाटेस लावावें. असें कित्येक वर्षे चाललें होतें. ज्ञान आणि वाणिज्य यांच्या उत्पत्तीला आणि रक्षणाला समाजांत क्षात्रधर्म असावा लागतो हें त्यांस समजलें नव्हतें. शेवटीं त्यांच्या संपत्तीची वार्ता शिकंदर बादशहाच्या कानीं गेली. अवघी पृथ्वी पादाक्रांत करावयास निघालेला हा वीसबावीस वर्षांचा अलेक्झँडर त्याच्या या समृद्ध देशाच्या हद्दीवर येऊन थडकला. त्याच्यापुढें अर्थात त्याचें कांहींएक चालेना. तेव्हांपासून साधारण मानानें या लोकांची पिछेहाटच सुरू झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. या आपत्कालीं त्यांच्यांतील कित्येक लोक परागंदा झाले व आपल्या जहाजांच्या

मुक्कामासाठीं भूमध्यसमुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावर ट्यूनिश शहराजवळ जो त्यांनीं एक टप्पा बनविला होता तेथें ते जाऊन राहिले. ज्ञान-वाणिज्याबरोबर क्षात्रधर्मही त्यांनीं आपल्या लोकांत उत्पन्न केला आणि भोंवतालच्या अडाणी व रानवट लोकांवर आपली हुकमत चालू करून, त्यांच्या फौजा बनवून त्यांनीं कार्थेज नांवाचें एक बलाढ्य राष्ट्र बनविलें. हळूहळू भूमध्यसमुद्राच्या दक्षिण किनाऱ्याची सर्व पट्टी त्यांनीं व्यापून टाकली व भूमध्यसमुद्र म्हणजे केवळ त्यांच्या पायाखालची वाट असल्यामुळें त्यांतील बहुतेक सर्व बेटें त्यांनीं हस्तगत केलीं. शेवटीं त्यांच्या राज्यविस्ताराची हद्द पसरतां पसरतां प्रसरणशील असें जें रोमन साम्राज्य त्याच्या शिवेशीं यांची शीव जाऊन भिडली व दोन बलिष्ठांच्या गांठी पडल्यावर जें व्हावयाचें तें सुरू झालें.

या कार्थेजवाल्यांनीं वीस मैलांच्या आवारभर आपलें शहर वसविलें होतें व भोंवतालीं भल्या भक्कम भिंती घालून मधून मधून दांडगे बुरूज उभारलेले होते. यांच्या आंतल्या अंगाला हत्तींचे व घोड्यांचे तबेले असत. समुद्रकांठीं मोठ्या बंदराच्या पोटांत लहान बंदर अशीं त्यांनीं दोन बंदरें बनविलीं होतीं. शहरांतील मोठमोठाले उंच प्रासाद आणि देवळें बांधलेलीं होतीं. लांकडावर व निरनिराळ्या धातूंच्या पत्र्यांवर सुंदर नक्षीचें काम करून त्यांनीं इमारतीस पराकाष्ठेची शोभा आणिली होती. जागोजाग सुंदर बागा, मनोरे, फुलांचे ताटवे, मधून मधून लाल फुलांनीं शोभिवंत दिसणारीं हिरवळीचीं मैदानें, पोंवळीं पसरलेल्या बागांतील पायवाटा, सोनेरी वण उठलेल्या संगमरवरी दगडांचे सुंदर खांब व त्यांवर पसरलेले सुरम्य सौध, वर पोंचावयास बांधलेले शिसवीचे काळेभोर जिने, भोंवतालचीं फळांनीं लकटलेलीं अंजिरांचीं झाडें अशा, एक ना दोन, वैभवाच्या आणि विलासाच्या हजारों खुणा त्यांच्या शहरभर पसरल्या होत्या; पण वैभवाच्या निशेंत या लोकांचें

मन मात्र पांगुळलें नव्हतें.

त्यांची राज्यघटना म्हणजे शहाण्यानें सांगावें आणि इतरेजनांनीं ऐकावें अशा तऱ्हेची असून सुफेती नांवाचे दोन राजासारखे अधिकारी ते नेमीत. ज्यास आपण धर्म म्हणतों त्याची कल्पना त्यांस बेताचीच होती. कांहीं क्रूर व अक्राळविक्राळ देवतांची पूजा ते करीत व त्यांच्या-पुढें माणसांचे बळी देत. पण ही गोष्ट कांहीं त्यांनाच लागू होती असें नाहीं. सुधारलेले म्हणून ठरलेल्या तेव्हांच्या रोमन लोकांतही असली बलिदानाची पद्धत चालू होतीच. साध्या पातकासाठींसुद्धां माणसाला सुळावर चढवीत. असो. राष्ट्राच्या रक्षणासाठीं त्यांनीं एक फार मोठें आरमार तयार केलें होतें व त्याच्या बळावर सर्व समुद्रभर ते आपली सत्ता गाजवीत आणि रोमन लोकांस केवळ कःपदार्थ लेखीत.

रोमन लोकांशीं कटकटी सुरू झाल्यावर खिस्तपूर्व २६५ सालीं पहिलें प्यूनिक युद्ध सुरू झालें. प्यूनिक शब्दाची व्युत्पत्तीही मनोरम आहे. फिनिशिअन या शब्दापैकीं फिनि म्हणजे पिनि अथवा प्यूनि एवढाच शब्द रोमन लोकांनीं त्या लोकांचा वाचक म्हणून ध्यानांत ठेवला व त्यापासून प्यूनिक असें विशेषण बनविलें. हें युद्ध सिसिली बेटांत झालें. कार्थेजवाल्यांचा पराभव झाला. समुद्र ओलांडून रोमन लोक कार्थेजवर आले. कार्थेजवाले त्यांना इतके कमकुवत वाटले कीं, त्यांनीं आपली निम्मी फौज घरीं पाठवून दिली. हें पाहतांच कार्थेजवाले जोरानें उलटले व त्यांनीं रोमन लोकांचा फन्ना उडविला. अशी यशापयशाची देवघेव होतां होतां हॅमिलकर बार्का, कीं जो एक सुफेती होता, त्यानें मोठा पराक्रम करून रोमन लोकांस सिसिली बेटांतून परत हांकून लाविलें. इतक्यांत खुद्द कार्थेज शहरांत बंडें उपस्थित झालीं. भाडोत्री फौजा आपल्या-पगाराच्या थकलेल्या बाक्यांसाठीं राजद्वारीं धरणें धरून बसल्या. शेवटीं कंटाळून हा शूर हॅमिलकर स्पेन देशास निघून गेला. तेथें एक " नवें

कार्थेज " नांवाचें शहर आगाऊच स्थापन झालें होतें. हॅमिलकर याचा हेतु असा होता कीं, तेथें राहून स्पेनच्या द्वीपकल्पांत आपली सत्ता कायम करावी, व तेथून रोमन लोकांच्या सत्तेस शह द्यावा. या हॅमिलकरच्या मनांत रोमन लोकांबद्दलचा द्वेष इतका बाणला होता कीं, एके दिवशीं, त्यानें अग्नीस साक्षी ठेवून आपल्या दहा वर्षांच्या मुलाला म्हणजेच हॅनिबलाला अशी शपथ घ्यावयाला लाविली कीं, " मी मरेपर्यंत रोमन लोकांचा द्वेषच करीत राहीन. " हॅमिलकरच्यानें पुढें फारसें कांहीं झालें नाहीं; पण बापाची इच्छा मुलानें तृप्त केली.

हॅमिलकर वारला तेव्हां हॅनिबल लहान होता. म्हणून हॅमिलकरचा जांवई हॅज्ड्रुबल हा कारभार पाहूं लागला आणि स्पेन देशांत कार्थेजेनिअन लोकांचें सामर्थ्य वाढविण्याची त्यानें पराकाष्ठा केली. थोड्याच दिवसांनीं हॅज्ड्रुबलचा खून झाला आणि आतां वयांत आलेला हॅनिबल सर्व कार्थेजेनिअन फौजांचा सेनापति व त्या राष्ट्राचा पुढारी बनला. दरम्यान कार्थेजमध्यें या उलाढाली चालू असतां तिकडे रोमन लोकांनीं चांगलें आरमार तयार केलें आणि आसपासच्या समुद्रांत आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. हॅज्ड्रुबल आणि हॅनिबल यांनीं चालविलेलें स्पेन देशाचें आक्रमण रोमन लोकांस खपेना. म्हणून त्यांनीं हॅनिबल यांस ताकीद दिली की, एब्रो नदीपर्यंतच तुम्हांला उत्तरेकडे पाय पसरावयास आम्ही परवानगी देऊं. तुम्ही पुढें सरकल्यास कामास पडणार नाहीं. हॅनिबलला त्यांचें मन पाहावयाचें होतें. म्हणून त्यानें एब्रो नदीच्या दक्षिणेसच असलेल्या, पण रोमन लोकांना हवें असलेल्या सागंटम शहरावर हल्ला केला व तें शहर त्यानें काबीज केलें. रोमचें सरकार संतापून गेलें व त्यांनीं कार्थेजला वकील धाडून तेथील सरकारास चमकविलें कीं, 'तुमच्या सेनापतीनें आमचा अपमान केला :

याची भरपाई म्हणून त्यास तुम्हीं आमच्या हवालीं करावें.' कार्थेजेनिअन सेनेटपुढें हा फार मोठाच प्रश्न येऊन पडला. फेबिअस नांवाचा जो रोमन वकील आला होता त्यानें विचारिलें कीं, 'तुम्ही ही अट पत्करतां कीं युद्धास उभे राहतां? एक काय तें बोला.' त्यावर सेनेटनें उत्तर केलें, 'तुम्हांस काय हवें तें तुम्हीच सांगा.' त्यावर फेबिअसनें आविर्भावानें दर्शविलें कीं, आपणांस युद्धच हवें. रोमन लोकांचें हें युद्धाचें आव्हान वांया गेलें नाहीं. सर्व सभासद गर्जून ओरडले, 'बेहेत्तर! तुम्हांस युद्ध हवें तर आम्हीही युद्धच करतों.' याप्रमाणें त्यांनीं युद्धाचें शिंग फुंकलें. हें दुसरें प्यूनिक युद्ध होय. हॅनिबल यानें मोठी मसलत रचण्याचें ठरविलें. ज्यांना ज्यांना रोमन राष्ट्रानें दुखविलें होतें त्या त्या सर्व लोकांना एकत्र करून त्यानें मोठी फौज उभारली. रोमचें राष्ट्र गारद करून टाकण्याचा बेत त्यानें ठरविला. कोणास फारशी वार्ता लागूं न देतां त्यानें एक लाख शिपाई जमविले, व नव्या कार्थेजहून उत्तरेकडे कूच केलें.

स्पेन, फ्रान्स, स्वित्झर्लंड, व इटली या चार देशांचा नकाशा वाचकांनीं आपल्या डोळ्यांपुढें नीट कल्पिला तरच त्यांस पुढील हकीकत सोपी वाटेल. इटली देशाच्या उत्तरेस आल्प्स् पर्वताचें प्रचंड धूड पडलें आहे. ज्या कोणास उत्तरेकडून खालीं इटलींत यावयाचें असेल त्याला शेंकडों दऱ्याखोरीं आणि घाट हीं उतरावीं लागतात. स्पेनमधून चाल करून जावयाचें, म्हणजे एक जहाजांतून भूमध्यसमुद्रावरून जावयाचें, किंवा दुसरें, उत्तरेकडे जाऊन, पिरनीज पर्वत ओलांडून, तेव्हांच्या गॉल देशांतून चाल करून, आल्प्स् पर्वतांत शिरावयाचें व तेथून दक्षिणेस इटलीच्या मैदानांत उतरावयाचें. पैकीं हॅनिबल यानें हा दुसरा मार्ग कायम केला. वास्तविक दोनही मार्ग दुर्घटच होते. परंतु समुद्रावरील स्वारीची अटकळ कोणासही करतां येण्या-

सारखी होती. कारण तेव्हांसुद्धां मोठाल्या फौजांची समुद्रावरून ने-आण लोकांनीं पाहिली होती. पण हा दुसरा मार्ग म्हणजे कोणाच्या ध्यानीं ना मनीं असा होता. जी गोष्ट सांगितली तरी सुद्धां खरी वाटणार नाहीं ती प्रत्यक्ष करून दाखविण्याची ईर्षा हॅनिबल यानें धरिली व शेंकडों संकटांस न जुमानतां तडीस नेली यांतच त्याचें मोठेंपण आहे. आतांप्रमाणें तेव्हां वाहतुकीचीं व बातमींचीं साधनें सुलभ आणि सोयीचीं नव्हतीं. वाटेंत शेंकडों अरण्यें होतीं. या अरण्यांतून अनेक रानवट व क्रूर जाती दबा धरून बसलेल्या असत. आल्प्स् पर्वत तर अस्मान उंच आहे आणि त्यावर पडलेले बर्फाचे खच कधीं वितळल्याचेंही कोणास माहीत नाहीं. हॅनिबल, त्याचे शिपाई लोक व बरोबरचे हत्तीघोडे यांना उन्हाची संवय होती; कारण ते भूमध्य-समुद्राच्या दक्षिणेस राहणारे होते. पण फ्रान्स किंवा आल्प्स् यांतील थंडी त्यांना सहन होण्यासारखी नव्हती. एब्रो नदी ओलांडून पलीकडे जातांच मारामारी सुरू करणें त्यांस भागच पडलें. कॅटलन लोकांशीं त्याचा खडाजंगी सामना झाला व पिरनीज पर्वत मागे टाकून तेथून तो झपाट्यानें र्‍होण नदीच्या खोर्‍यांत उतरला. तेथें इतिहासप्रसिद्ध जे गॉल नांवाचे लांडग्यासारखे रानटी लोक त्यांच्यांशीं त्याची गांठ पडली. ते त्याला र्‍होण नदी उतरूं देईनात; म्हणून तो नदीकांठानें थोडा वर सरकला व तेथील कांहीं रानट्यांस त्यानें चुचकारून वश करून घेतलें व तो र्‍होणपार झाला. नंतर आल्प्स् पर्वतांतील वांकणें आणि आडवाटा माहीत व्हाव्या म्हणून कित्येक माहितगार वाटाडे त्यानें बरोबर घेतले. हॅनिबल नेमका कोणच्या खिंडींतून आंत घुसला हें निश्चित सांगतां येत नाहीं; पण कोणच्याही खिंडींतून गेला असें मानलें तरी या साहसी कृत्याचा अचाटपणा यत्किंचितही कमी होत नाहीं. सहा महिने तर येथपर्यंत पोंहोंचावयासच लागले. वाटेंत येतांना अनेक मारामार्‍या

कराव्या लागल्या व डोंगर, नद्या ओलांडाव्या लागल्या; त्यामुळें त्याच्या फौजा अगदीं दमून गेल्या होत्या; त्यांतच आल्प्सच्या बारींतून आंत शिरतांच कोठें उंच सुळके भेटावे; कोठें खोल कड्यावरून रांगेनें जावें लागावें असें सुरू झालें. थंडीचा कडाका तर सपाटून पडला आणि ज्या डोंगरकरी लोकांना या हॅनिबलच्या स्वारीचा अर्थ कळेना ते त्याच्या फौजांच्या अंगावर मोठमोठाल्या शिळेखालीं लोटून देऊं लागले. कांहीं कांहीं ठिकाणीं तर सुरुंग लावूनच वाटा कराव्या लागल्या. स्वदेशाशीं कांहींतरी संबंध राहावा म्हणून सर्व वाटभर माणसें पेरीत पेरीतच त्याला पुढें जावें लागलें. त्यांतच थंडी इत्यादिकांची भर पडून इटलीच्या उतरणीला लागल्यावर मोजून पाहतां आपल्यापाशीं अवघे पंचवीस हजार लोकच शिल्लक आहेत असें त्यास दिसून आलें ! येवढी मोठी एक लाख लोकांची फौज डोंगरामागें डोंगर आणि देशामागें देश ओलांडून आठनऊ महिने घोंघावत चालली असतां तिकडे इटलींत तिची कुणकूण सुद्धां लागली नाहीं ! प्रसिद्ध रोमन सेनापति सिपिओ यांस मात्र ऱ्होणच्या आसपास कांहीं थोडी गडबड असल्याची शंका आली होती. पण हॅनिबल हा आल्प्स् पर्वतांतून खालीं उतरेल असें त्यांस केव्हांही वाटलें नाहीं. इतक्यांत तो इटलींत उतरल्याची वार्ता हां हां म्हणतां सर्वत्र पसरली. सिपिओ शत्रूशी गांठ घालण्यासाठीं परत वळला आणि मोठ्या झपाट्यानें पो नदीच्या खोऱ्यांत दाखल झाला. दुसरा रोमन सेनापति सिंप्रोनिअस् यानेंही त्वरेनें उत्तरेकडे कूच केलें. मैदानांत उतरल्यावर हॅनिबललासुद्धां आपल्या सामर्थ्याची खरी बेरीज करतां आली. दाणावैरण नीट न मिळाल्यामुळें फौजेंतलीं घोडीं अगदीं चोपून गेलीं होतीं. त्यानें शेंकडों हत्ती बरोबर आणिले होते, अशासाठीं कीं, रोमनांच्या फौजा नुसत्या तुडवूनच माराव्या. पण उष्ण मुलुखांतले हे विलासी गजराज आल्प्स्मधील थंडीच्या कडाक्यांत इतके गारठून गेले

कीं, त्यांतल्या बहुतेकांनीं वाटेवरच देह ठेविले. पण हॅनिबल दम सोडणारा माणूस नव्हता. तसेंच तो नुसता आडदांड शूर नव्हता; तर त्याच्या स्वभावांत हुन्नरही पुष्कळ होतें. आसपासच्या ज्या लोकांवर रोमनांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें होतें त्यांच्यांत त्यानें प्रथम अस्वस्थता व मग फितुरी उत्पन्न केली. त्यांनीं त्याला दाणागोटा, गवतकाडी हीं तर पुरविलींच; पण इतर दृष्टीनेंही त्याचा उपराळा केला. सिपिओशीं त्याचा पहिला खटका आतांच्या ट्यूरिन शहरापाशीं उडाला. त्यांत त्याच्या घोडेस्वारांनीं सिपिओच्या फौजा उधळून लाविल्या. खुद्द सिपिओस मोठी जखम लागली. मग सिपिओ आंवळून उभा राहिला. हेतु इतकाच कीं, हॅनिबलची दक्षिणेकडील वाट अडवावी. हॅनिबल समोरासमोर सामना करण्याची तयारी दाखवी, पण सिपिओ लढाई पत्करीना. इतक्यांत सिंप्रोनिअस दक्षिणेकडून रणभूमीवर येऊन दाखल झाला. त्याचा दम ताजा होता; म्हणून नवीन पाडव्याच्या आधीं एक चांगली लढाई ठोकून दाखवावी असा मनसुबा करून तो हॅनिबलवर तुटून पडला. ट्रेबिआ नदीच्या कांठावर आणि थंडीच्या कडाक्यांत हा झगडा सुरू झाला. हॅनिबल हें काय प्रकरण आहे हें या ठिकाणीं रोमन लोकांच्या चांगलें चरचरून ध्यानांत भरलें. सिंप्रोनिअसची निम्मी फौज ठार झाली आणि जर का दिशा धुंद करणारें सोसाट्याचें वादळ उठून दिसेनासें झालें तें झालें नसतें, तर एकही रोमन शिपाई जिवानिशीं सुटता ना. आल्प्स् पर्वतांतून एखाद्या लोंढ्याप्रमाणें तो खालीं आला ही बातमी कळली तेव्हांच त्याच्या नांवाचा धाक रोमन लोकांस बसला होता. त्यापुढें आतां दोघाही सेनापतींच्या वेगवेगळ्या झालेल्या पराभवांचें वर्तमान जेव्हां रोम शहरीं पोंचलें तेव्हां तर ते गडबडून गेले. हॅनिबलचें पाणी काय आहे हें पाहतांच बलिष्ठाशीं मैत्री करावी म्हणून गॉल लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या फौजेंत येऊन दाखल झाल्या.

त्यानें त्या सर्वांस चाकरीस ठेवून पन्नास-साठ हजार फौज उभी केली. पण इतकें झालें तरी तो धूर्तपणानें वागत होता. आपण शत्रूच्या देशांत आहों, स्वदेशाशीं आपला संबंध पूर्ण तुटला आहे, रसद मिळविणें कठीण होणार आहे, आणि येऊं म्हणालेले ग्रीक लोक मदतीस येण्याचें मुळींच चिन्ह दिसत नाहीं; या सर्व बावी त्याच्या ध्यानांत होत्या. खुद्द कार्थेजहूनही कांहींच मदत येईना. बरोबरच्या आफ्रिकी शिपायांना थंडी सहन होईना. उरलेसुरले हत्ती पटापट मरूं लागले. नवीन ठेवलेले रानटी शिपाई शिस्त पाळीनात. पण इतकें झालें तरी या हाडवैरी आणि आपल्या जिवावर उठलेल्या राष्ट्राचा नाश करूं अशी त्यास पुरी धमक होती. थोडी दिवसगत झाल्यावर त्यानें पुन्हा नवीन फौज बनविली. लवकरच हुलकावणी दाखवून त्यानें फ्लेमिनिअस या नव्या रोमन सेनापतीस आपल्या कैचींत आणिलें आणि जोराच्या लढाईला तोंड लागलें. उभयपक्षांकडील शिपाई इतके बेहोष होऊन लढले कीं, लढाई चालू असतां बसलेला धरणीकंपाचा एक जबर धक्का या बहादुरांच्या ध्यानांतही आला नाहीं. रोमन लोकांनीं शर्थ केली. पण हॅनिबलनें सर्व फौजेचे तुकडे तुकडे केले. हें भयानक वर्तमान रोम शहरीं पोहोंचतांच जिकडे तिकडे हलकल्लोळ उडाला.

हॅनिबल शूर आणि हुन्नरी वीर खरा; पण रोम शहरही शूरांचीच खाण होतें. रोमन लोकांचा नवा सर्वसत्ताधिकारी क्विन्टस फेबिअस हा हॅनिबल यास तोंड देण्यास निघाला. ॲपिनाइन पर्वताच्या पश्चिमेस त्याला न येऊं देणें एवढेंच काम त्याला प्रथम तरी करावयाचें होतें. त्यानें मैदानांत लढाईस उभें राहावें अशी हॅनिबलची फार इच्छा होती. पण फेबिअस कोठेंच लढाई पत्करीना. मात्र हॅनिबल जेथें जेथें जाई तेथें तेथें आजूबाजूस तो कोठें तरी त्यास पायबंद देऊन उभा राही. राजकारणांत स्पष्ट व कडक भाषा बोलणें धोक्याचें झालें म्हणजे ज्याप्रमाणें

पुढाऱ्यांच्या भाषेंत उपरोध उत्पन्न होतो, त्याप्रमाणेंच समरांगणांत समोरून सामना करतां येईना, म्हणजे गनिमी कावा आपोआपच उत्पन्न होतो. फेबिअसनें हॅनिबलला इतका त्रास दिला कीं:तो अगदीं चिडून गेला. हॅनिबलचें हें गंडांतर फेबिअसनें कौशल्यानें थोपवून धरल्यानें रोम शहरीं प्रथम प्रथम त्याची मोठी वाहवा झाली. पण त्याचा सावधपणा कधीं संपेचना व तो लढाई अशी कोठेंच करीना. लौकरच एमिलिअस आणि व्हॅरो हे दोघे नवे अधिकारी झाले. या दोघांनीं एक लाख फौज उभी केली आणि ते मोठ्या तडफेनें हॅनिबलवर चालून गेले. युद्धाच्या हालचाली सुरू झाल्यावर जरा सावधपणानेंच वागलें पाहिजे असें एमिलिअस ह्यास वाटूं लागलें; पण व्हॅरो मात्र केवळ आडदांडासारखा वागला. तेव्हांच्या चालीप्रमाणें हे दोघे एक दिवसाआड आलटून पालटून सेनापतीपणा करीत. त्याचप्रमाणें आपली पाळी येतांच व्हॅरो हॅनिबलच्या अंगावर उसळून गेला. वास्तविक हॅनिबलच्या फौजेचे सध्यां हालच चाललेले होते. बोलून चालून तो शत्रूच्या देशांत सांपडला होता; आणि त्याचा देश हजारों कोस दूर राहिला होता. पण सेनापतीचें चातुर्य, शिपायाची छाती, मुत्सद्याचें कसब आणि कार्यसाधकाचा सोशिकपणा हीं सर्व त्याजपाशीं होतीं. त्यानें व्हॅरो यांस चांगलें पुढें येऊं दिलें व लढाई पुरती अंगावर घेतली. क्षणभर रोमन लोकांना यशाचा देखावा दिसला. पण थोड्याच वेळांत रोमन फौजांच्या पिछाडीवर हॅनिबलच्या फौजेनें अचानक हल्ला चढविला. दोन्हीकडून कोंडमारा होतांच रोमनांची गाळण झाली. लढतां येईना आणि पळतां येईना अशी स्थिति झाली. हे शरण जाईनात व तो शरण येऊं देईना. पन्नास हजार रोमन शिपाई धारातीर्थी पतन पावले. आणि रोमन फौज साफ बुडाली. खुद्द एमिलिअस, त्याचा दुय्यम सर्व्हिलिअस, घोडदळाचा नायक मिनूसिअस, एकवीस बडे सरदार व ऐशीं सेनेटर्स हे मृत्युमुखीं पडले. रुपये आणि खुर्दा किती

गमावला हें वर सांगितलेंच आहे. खुद व्हॅरो मात्र पांचपन्नास स्वारांनिशीं पळून गेला. हॅनिबलनें जी लूट जमा केली तींत एक पोतेंभर सोन्याच्या अंगठ्या होत्या! हॅनिबलच्या या तडाक्यामुळें रोमन लोकांची कंबरच मोडल्यासारखी झाली. या लढाईस कॅनीची लढाई असें म्हणतात.

एवढा मोठा विजय मिळाला तरी अजून हॅनिबलची इच्छा तृप्त होण्याचा संभव दिसेना. तरी त्यानें घाट तर मोठा घातला. कॅनीच्या लढाईची वार्ता ऐकून कार्थेजच्या सरकारानें फौज, पैसा आणि शेंकडो हत्ती हीं त्याजकडे पाठविलीं. मॅसिडोन देशाचा राजा फिलिप यानेंही मदतीस येण्याचें कबूल केलें. रोमन लोकांचे दक्षिणेकडील साथीदार त्यांजपासून तुटून निघाले. या नव्या रणगाजीच्या फौजेंत दाखल होण्यासाठीं आल्प्स पर्वतांतून हजारो जवान बाहेर पडले आणि त्यांना थोपविण्यासाठीं आड आलेली रोमन फौज त्यांनीं कापून काढली. पण तिकडे रोमन लोकांनीं आतां एक नवीनच डाव आरंभिला व सिपिओ याच्या हातांत फौज देऊन त्यांनीं ही लढाई हॅनिबलच्या देशांत नेऊन घातली. स्पेन आणि सार्डिनिआ इकडे फौज पाठवून त्यांनीं त्याचेच प्रांत उद्ध्वस्त केले. परंतु काय होतें ते पहात बसण्यापलीकडे आणि फौजफाटा संभाळून राहण्यापलिकडे हॅनिबलला कांहीं करतां येईना. रोमन लोकांनीं तिकडे फिलिपलासुद्धां पायबंद दिला आणि कार्थेजहून नव्या नव्या येणाऱ्या फौजा स्पेनच्या रक्षणासाठीं हॅनिबल यास तिकडे धाडाव्या लागल्या. म्हणजे असें कीं, बाहेरून मदतीचा सारखा ओघ राहीना. तरी रोमन राष्ट्र बुडविण्याची ईर्षा धरून हॅनिबल कांहीं वर्षें दक्षिण इटलींत तसाच बसला. दरम्यान अनेक रोमन सेनापति त्याजवर चालून आले; पण त्या सर्वांचा त्यानें पराभव केला. इकडे स्वदेशांत शिरलेला हॅनिबल काय वाटेल तें केलें तरी आटपत नाहीं हें पाहून रोमन लोकांनीं आपला सर्व मारा त्याच्या

देशाकडे वळविला आणि हॅनिबलच्या ताब्यांतील सर्व स्पेन देश काबीज केला; इतकेंच नव्हे, तर त्याची राजधानी जी नवें कार्थेज तीसुद्धां त्यांनीं हस्तगत केली. हॅनिबल याला हॅज्डुबल नांवाचा एक भाऊ होता. सर्वनाश झालेला पाहून आतां आपल्या भावास तरी सोडवावें म्हणून सिपिओच्या डोळ्यांदेखत हॅज्डुबल एका मोठ्या फौजेनिशीं पिरनीजमधून निसटला आणि हॅनिबल ज्या मार्गानें इटलींत घुसला होता त्याच मार्गानें तो इटलीकडे निघाला. हा शूर शिपाई हॅनिबलच्या तळापासून दोनशें मैलांवर येऊन ठेपला. तेव्हां मात्र रोमन लोकांची पुन्हा तारांबळ झाली. सिपिओनें स्पेन इत्यादि पादाक्रान्त केले हें सर्व खरें; पण हॅज्डुबल त्याच्या हातांतून निसटून पोक्त सरंजामासह आपल्या भावास येऊन मिळूं पहातो हें पाहून त्यांना भय उत्पन्न झालें. शेवटीं रोमन सत्ताधारी नीरो यानें या दोघांची गांठ पडण्यापूर्वींच हॅज्डुबलचा निकाल लावण्याचें ठरविलें व हॅनिबलच्या तोंडावर नेहमींप्रमाणें कांहीं फौज कायम ठेवून तो हॅज्डुबलवर झपाट्यानें चालून गेला. मेटॉरस नदीच्या कांठीं त्यानें हॅज्डुबलचा पराभव करून त्यास ठार मारिलें. तितक्याच त्वरेनें तो दक्षिणेकडे वळला आणि बरोबर कापून आणलेलें हॅज्डुबलचें शिर त्यानें हॅनिबलच्या शिबिरांत फेंकून दिलें. भाऊ येत आहे हें पाहून हॅनिबल यास फार आशा वाटत होती; पण हें त्याचें शिर पाहतांच हॅनिबल अतिशय खिन्न झाला आणि आतां रोम आपल्या हातून मरत नाहीं अशी त्याची पूर्ण खात्री झाली. त्यानंतर दोन वर्षांनीं त्याचा दुसरा भाऊ मॅगो हाही त्याच रस्त्यानें वडील भावास सोडविण्यासाठीं म्हणून इटलींत उतरला; पण त्याचीही तीच अवस्था झाली. अर्थात् आतां त्याचें सर्व घराणें या कामांत खलास झालें. बारा वर्षें झालीं, तो इटलींत बसलेला होता. खुद्द रोमन

लोकांनाही फारच जिगजिग झाली होती. फौजांच्या सारख्या येरझारांमुळें जमिनींची पायमल्ली होऊन लागवड होईना आणि देशांत सर्वत्र दुष्काळ पडूं लागले. या पेंचांतून बाहेर कसें पडावें हें यांस किंवा त्यास कोणासच सुचेना. तिकडे सिपिओनें मात्र हातीं घेतलेलें काम चिकाटीनें चालविलें होतें. स्पेन हस्तगत करून, म्हणजे हॅनिबलची आशा समूळ खणून काढून तो आफ्रिकाखंडांत उतरला; अशासाठीं कीं, खुद्द कार्थेज राजधानीवरच जावें आणि कार्थेजचें राष्ट्रच मारून टाकावें. हॅनिबलनें जसे आल्प्समधील रानटे नोकरीला ठेवले, तसे सिपिओनें तिकडील न्यूमिडिअन लोक चाकरीस ठेवून कार्थेजच्या आसपास धुमाकूळ माजविला. कार्थेजचा खुद्द सेनापति इटलींत अडकलेला; आणि त्याचे भाऊही ठार झालेले. अर्थात् राजधानींतले लोक गडबडून गेले व त्यांनीं सिपिओशीं तहाचें बोलणें लावलें; पण तहाला रोम शहराहून परवानगी येईपर्यंत या लोकांस पुन्हा थोडी आशा वाटूं लागली आणि त्यांनीं निकडीचीं पत्रें धाडून हॅनिबल यास परत बोलाविलें. वीस हजार फौजेनिशीं हा योद्धा मोठ्या नाखुषीनें स्वदेशास परत आला. त्यानें रोम राष्ट्रावर जी आपत्ति आणिली होती तीच सिपिओनें खुद्द त्याच्याच राजधानीवर आणली; पण तो येऊन दाखल झाल्याबरोबर सिपिओ यास मोठा धाक वाटूं लागला. शेवटीं थोडीशी तहाची वाटाघाट होऊन कांहीं जमत नाहींसें पाहून दोघांनीं युद्धाचाच विचार मुक्रर केला. ख्रिस्तपूर्व २०२ सालीं ही जगांतील सुप्रसिद्ध लढायांपैकीं झामा गांवची लढाई झाली. दोघांनाही तिचें महत्त्व चांगलें कळत असल्यामुळें फौजांनीं प्राणान्तक युद्ध केलें. शेवटीं हॅनिबलचा पराभव झाला व तो कार्थेजकडे पळाला. सिपिओनें तहाच्या अटी फारच कडक घातल्या. त्यानें कार्थेजला आपलें मांडलिक बनविलें, आफ्रिकेंत आपलें साम्राज्य

कायम केलें, कार्थेजचें सर्व आरमार इटलीला नेलें, कार्थेजच्या सर्व वसाहती आपल्या ताब्यांत घेतल्या, आपणास विचारल्याशिवाय कार्थेजनें इतरांशीं तह किंवा लढाई करूं नये असेंहि त्यानें ठरविलें आणि शेवटीं जबरदस्त खंडणी घेऊन मोठ्या विजयोत्सवानें हा रोमन वीर घरीं परत गेला.

तेथून पुढें वीस वर्षें हॅनिबल स्वदेशांतच होता. वास्तविक पाहतां त्याचें चरित्र तेथेंच संपलें. त्याचा हेतु तडीस गेला नाहीं, तरी त्याची योग्यता कोणच्याही रीतीनें कमी होत नाहीं. इतर मोठमोठाल्या सेनापतींशीं इतिहासकारांनीं त्याची तुलना केली आहे. कारण थोर सेनापतीचे सर्व गुण त्याचे अंगीं होते. त्याची हुकमत मोठी कडक असे; पण वरिष्ठांचे हुकूमही तो तितक्याच सक्तीनें पाळी. अर्थात् फौजेवर त्याची मोठी कदर असे. लहानपणीं सुद्धां कोणचेंही साहसाचें आणि कष्टाचें काम निघालें म्हणजे त्याच्या मेहुण्यानें त्यास हांक मारावी असा शिरस्ता होता. स्वतः विलक्षण धाडसी असल्यामुळेंच शिपायांचा त्याच्यावर फार विश्वास असे. संकटांत उडी घालण्यास तो भीत नसे व संकटांत सांपडला असतां मन व बुद्धि केवळ शांत ठेवी. त्याचें मन व शरीर श्रमाला कधींही कंटाळत नसत. त्याला कधीं उन्हाळा बाधला नाहीं कीं थंडीनें हींव भरलें नाहीं. पानावर बसला म्हणजे भूक असेल तेवढेंच खावें असा त्याचा शिरस्ता असे. त्याची निजण्याची वेळ मात्र केव्हांच ठरलेली नसे. रात्र झाली म्हणजे निजावयाचें, हा जो आपला नियम तो त्याला लागू नव्हता. काम संपलें म्हणजे मग तेव्हांपासून तो झोंप घेई. मग दिवस असो कीं रात्र असो. गाद्यागिरद्या अंथरून व निर्मक्षिक करून निजावयाची चाल आहे; पण त्याला वाटेल तसल्या कळ्यांत व उघड्या मैदानावर झोंप येत असे. अंगावरचा सरकोट एकदां तोंडावरून घेतला म्हणजे तो वाटेल तेथें डाराडूर निजत असे. कपड्यालत्त्यांचा त्याला

मुळींच शोक नसे; पण बसावयाचा घोडा आणि हातांतील समशेर यांविषयीं मात्र तो फार खाराखिरी करी. रणांत शिरतांना पाऊल सर्वांच्या पुढें आणि बाहेर पडतांना मात्र सर्वांच्या मागें अशी त्याची पद्धत होती. पण शत्रूंनीं लिहिलेल्या त्याच्या चरित्रावरून पाहतां तो मोठ्या उरफाट्या काळजाचा, शपथा मोडणारा आणि देवाधर्माला न जुमानणारा असा होता. सुप्रसिद्ध फ्रेंच बादशहा नेपोलियन याच्याशीं त्याची तुलना करण्यात येते. आपल्या राष्ट्रासाठीं आरंभिलेल्या झगड्यांत दोघेही जन्मभर राबले; दोघांनाही सर्व-राष्ट्रसंघाशीं लढावें लागलें. दोघांचाही पराभव केवळ एका लढाईंत झाला व तीच त्या दोघांचीही शेवटची लढाई ठरली. दोघांनाहीं विपरीत परिस्थितींत शेवटच्या लढाईंत लढावें लागलें आणि दोघांचेही पराभव त्यांच्याहून सर्वथा कमी दर्जाच्या सेनापतींकडून झाले. वेलिंग्टन आणि वॉटर्लू हीं जशीं नेपोलिअनला, तशीं सिपिओ आणि झामा हीं हॅनिबल यांस होत. दोघांनींही इटलीच्या मैदानांतच पहिल्यानें लष्करी कीर्ती मिळविली. दोघांनींही आल्प्स पर्वताच्या बरगड्या फोडून सृष्टीस तिरस्कारानें झिडकारिलें. दोघेही आपल्या फौजेस सारखेच आवडते असत. दोघेही नुसते वांझे सेनापतीच नव्हते तर मुत्सद्दीही होते. नेपोलिअननें ज्याप्रमाणें फ्रान्सांतलें अराजक मोडून सुयन्त्र राज्यपद्धति स्थापन केली त्याप्रमाणेंच हॅनिबलनेंही पदरीं अपेश आलें असतांही मरत असलेल्या कार्थिजेनिअन राष्ट्रांत नवें वारें भरलें.

कार्थिजेनिअन राष्ट्र केवळ मांडलिक कसें बनलें हें वर सांगितलेंच आहे. हॅनिबल आतां केवळ निर्माल्यवत् होऊन बसला. पण त्याचें मन विलक्षण महत्त्वाकांक्षी, बुद्धि तीव्र, आणि स्वभाव आशावादी होता. तो जिकडे पाही तिकडे सर्व पडापड झालेली त्याला दिसे. आपल्या भोंवतालचीं सर्व माणसें दुबळीं व मेंगीं आहेत असें त्यास वाटे. नवीन

पोरेंसोरें काय करतील हें त्याच्या अजून ध्यानीं आलें नव्हतें; परंतु 'चेंडू पडे आणि उठे तसाची' या न्यायास अनुसरून त्यानें स्वतःची निराशा झिंजाडून दिली. आणि तरुण पिढीस स्वदेशभक्तीचा मंत्र तो देऊं लागला. आपल्या राष्ट्राचें पुनरुज्जीवन करावें, लोकांत नवा उत्साह उत्पन्न करावा, आपलें पूर्वीचें राष्ट्र कसें होतें याचें स्मरण त्यांना द्यावें व नेट धरून पुन्हा रोमन लोकांशीं गांठ घालावी ही खोल आकांक्षा त्यानें बाळगिली होती. आपण गप्प बसलों तर हें राष्ट्र रसातळास जाणार आणि जुन्या फिनिशिअन वंशानें प्रस्थापित केलेल्या एका प्रचंड राष्ट्राचा रोमन लोक पृथ्वीवरून निःपात करणार हें स्वप्न त्यास खास पडलें असावें. म्हणून कुळांत अतिशय मरामर झाल्यावरसुद्धां उरल्यासुरल्या मुलांना हाताशीं धरून जसा एखादा कर्तबगार म्हातारा त्यांना शहाणे करतो आणि त्याच्या मनांत नवीन वासना उद्दीपित करतो, तसा शेंकडों यशाचीं उंच उंच शिखरें मागें टाकून कोठें तरी खबदाडांत जाऊन सांपडलेला हा स्वदेशभक्त वीरमणि नव्या पिढीला आपला मंत्र देऊं लागला. रोमन लोक त्याच्या राष्ट्रावर उठलेले होते म्हणून तर त्याच्या बापानें फार लहानपणीं त्याला रोमनद्वेषाची शपथ दिली होती. तो एक विचाराचा बाण त्याच्या मनांत सारखा रुतून बसला होता. आणि परिस्थितीचे फेरे कसेही फिरले तरी बापाचा मंत्र तो स्वतः कधीं विसरला नाहीं; किंबहुना तेंच त्याच्या जीविताचें सूत्र होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. ही त्याची नवी शिकवण नवीन पोरांच्या मनांत बळ धरूं लागली आणि कार्थेजमध्यें नव्या पिढीचा चांगला जम बसेल अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. हॅनिबलच्या करपलेल्या आशेलासुद्धां पुन्हा अंकुर फुटूं लागले; पण सर्व जगावर साम्राज्य स्थापण्यास निघालेले रोमन लोक हॅनिबलची ही पाताळयंत्री शिकवण न्याहाळून पहात होते. हा एक

नवीन राष्ट्र बनविणार हें त्यांस स्पष्ट दिसतांच त्यांनीं कार्थेज संस्थानास एकदम कळविलें कीं, हॅनिबल यास हद्दपार करावें. राजधानींत व दरबारांत बरीच भवति न भवति झाली. कोणी म्हणत, 'हॅनिबल-बरोबर आम्ही सर्व मरूं !' कोणी म्हणत, 'एकामुळें सर्वांवर मरण आणूं नका !' अशा द्वंद्वांत कांहीं वेळ गेल्यावर हॅनिबल स्वतःच स्वदेश सोडून निघून गेला. त्याचें जाणें म्हणजे कुडींतून प्राण जाण्यासारखेंच होतें. हॅनिबल गेला तरी लांब जाऊन तो तेथून कांहींतरी तेज उत्पन्न करील आणि रोमन लोकांच्या राज्यविस्ताराला मारक होईल म्हणून ही उरलेली कुडीच जाळून टाकली पाहिजे असा आग्रह रोमन वक्ते धरून बसले. कार्थेज मारलेंच पाहिजे हें पालुपद केटो नांवाचा सेनेटर आपल्या म्हातारपणीं सारखें घोळीत बसला होता. शेवटीं रोमन लोकांनीं स्वारी करून जाळपोळ करून कार्थेज शहर खणून काढलें. शहरांतील लोकांनीं स्वार्थत्यागाची पराकाष्ठा केली. वाक नव्हता म्हणून, स्त्रियांनीं आपले केस कापून, त्याचे दोर बनविले व तोफांचे गाडे ओढले. पण कार्थेज 'मारलेंच पाहिजे' हें वाक्य रोमन विसरले नाहींत आणि त्यांनीं कार्थेजच्या साध्या खुणासुद्धां भुईच्या पाठीवर शिल्लक राहूं दिल्या नाहींत !

अर्थात् ही गोष्ट हॅनिबल मेल्यावर कांहीं वर्षांनीं झाली; पण हें घडून येणार हें त्यानें ओळखिलेंच होतें. हद्दपारींत केवळ माश्या मारीत बसावें ही गोष्ट त्यास पसंत पडण्यासारखी नव्हती. तो आश्रयासाठीं ग्रीस देशांत गेला आणि रोमन राष्ट्रावर तेथून कांहीं उठावणी करितां येते का हें पाहूं लागला. पण तेथील राजास रोमन लोकांनीं चाप लावल्यावरून हॅनिबल आशिया मायनरमध्यें गेला व तेथील राजा अन्टिओकस याच्या पदरीं कांहीं दिवस राहिला. तो तिकडे असतांनाच त्याजवर विजय मिळविणारा जो सिपिओ

ॲफिकॅनस यालाही कृतघ्न रोमन राष्ट्रानें हद्दपारीची शिक्षा सांगितली होती. सिपिओ हद्दपारींत असतां त्यानें हॅनिबलची गांठ घेतली. उभयतां योद्धे बोलत बसले असतांना सिपिओनें विचारलें, "आजपर्यंत सर्वांत मोठे रणधुरंधर कोण झाले असें आपणांस वाटतें ?" हॅनिबल थोडा मर्यादेनें म्हणाला, "अलेक्झॅन्डर, पीऱ्हस व तुम्ही स्वतः." त्यावर सिपिओनें विचारलें, "झामाच्या लढाईत जर तुम्हीं मला जिंकलें असतें तर ?" हॅनिबल म्हणाला, "तर अलेक्झॅन्डर, पीऱ्हस आणि जे कोणी असतील नसतील ते, या सर्वांहून मी मोठा ठरलों असतों." युद्धविशारदांचें हेंच मत आहे. असो. ॲन्टिओकसला रोमन सरकारकडून खडसावण्यांत आलें कीं, 'हॅनिबल यांस आपल्या पदरीं आश्रय मिळतां कामा नये.' अर्थात हॅनिबल तेथूनही पळाला व पूर्वेकडे बिथिनिअसच्या राजाकडे आश्रय मागूं लागला. पण त्यास नाहींसें केल्याशिवाय रोमन लोकांना हायसें होणें शक्य नव्हतें. म्हणून त्याचा ससेमिरा तेथील राजाच्या दरबारासही पोहोंचला. याप्रमाणें आपलें बलाढ्य राष्ट्र डोळ्यां-देखत मरत चाललेलें पाहून, आपणास पृथ्वीच्या पाठीवर आतां कोठेंही आश्रय उरलेला नाहीं हें ओळखून आणि म्हणून निर्माल्यवत् जगण्यांत कांहीं भूषण नाहीं असें वाटून ख्रिस्तपूर्व १८२ सालीं या थोर पुरुषानें विषप्राशन करून आत्महत्या केली.

* * *

# जूलियस सीझर

इ. सनापूर्वी १०० या वर्षी जूलिअस सीझर याचा जन्म झाला. जगांत आजपर्यंत जे मोठमोठाले कार्यकर्ते होऊन गेले त्यांच्यांतील पहिल्या प्रतीच्या नांवांत सीझरचें नांव दाखल आहे. त्याच्या काळांतच लिहून ठेविलेल्या माहितीवरून त्याचीं चरित्रें लिहिलेलीं आहेत आणि म्हणून इतक्या भूतकाळीं त्यानें ज्या कांहीं प्रचंड उलाढाली केल्या त्यांचें चित्र आपल्या मनापुढें स्पष्ट उभें राहतें. केवळ बारीक अशा रूपरेखेच्या सांगाड्यांत कल्पनांचा यथेच्छ पेंढा भरून लेखकांनीं कित्येक प्राचीन वीरांचीं चरित्रें लिहून ठेविलीं आहेत; तीं केवळ कादंबऱ्याच होत; पण सीझरचें तसें नाहीं. प्रत्यक्ष त्याच्या काळीं त्याच्यासंबंधीं लिहिण्यांत आलेली हकीकत चांगली तपशीलवार असल्यामुळें त्याच्या चरित्राला अस्सल ऐतिहासिक रूप आहे असें वाचकांस वाटतें. शिवाय त्याच्या चरित्रावरून त्या वेळच्या अनेक थोर आणि पराक्रमी माणसांसंबंधानें किंबहुना सामान्यरीत्या त्या कालासंबंधानें सुद्धां आपल्याला बरीच स्पष्ट कल्पना येते. सध्यांच्या लोकसत्तावादाच्या ज्या गोष्टी आपण बोलतों त्या सीझरच्या वेळीं प्रत्यक्षच अमलांत होत्या. कारण

लोकसत्तेची कल्पना रोमन लोकांहूनही जुनी आहे. सभा, सेनेटें, प्रतिनिधि, निवडणुकी, व्होटें, व्होटासाठीं तोंडपूजा, पक्ष, उपपक्ष, वशिले, वशिल्याचीं तट्टें, लांचलुचपती, लोकमताचा लहरी स्वभाव, ऐदी श्रीमंत आणि मग्रूर गरीब हे सगळे आधुनिक काळांतील प्रकार तेव्हांसुद्धां जसेच्या तसे सांपडतात. पण हा एक प्रकार झाला. लोकसत्ता मानणाऱ्या युरोपांतील सध्यांच्या दुसऱ्या कांहीं गोष्टीही रोमन काळांत होत्या. घरीं लोकसत्तेचा डौल आणि बाहेर साम्राज्य-सत्तेची हांव हेंही पूर्वीच्या रोमन राष्ट्रांत होतें. घरच्या घरीं लोक-सत्तेचें मर्म त्यांस चांगलें कळे; व आपल्या शहरांत लोकसत्ताच असावी असा त्यांचा आग्रहही असे; पण या उदार तत्त्वाचा फायदा ते इतर कोणास द्यावयास केवळ नाकबूल असत. आणि म्हणून लहानशा रोम शहराच्या मर्यादा मागें टाकून त्या लोकांनीं प्रथम सर्व इटली देश व मग पूर्व-पश्चिम इतर देश झपाट्यानें आपल्या ताब्यांत आणिले; आणि तसतसें रोम शहराचें वैभव वाढत चाललें. वाढत्या वैभवाबरोबर लोकांच्या आकांक्षा बळावत जाऊन दरवर्षीं स्वारी-शिकारीस जावें, मर्दुमकी करावी आणि गबर व्हावें अशी वहिवाट पडून गेली. श्रीमंतीची भूक चांगली प्रखर असल्या-मुळें आणि अंगांत रगही चांगली भरलेली असल्यानें या लोकांनीं आपलें साम्राज्य खूपच विस्तारलें. अर्थात् मुलूख जिंकला म्हणजे तो हाताखालीं कायमचा ठेवण्याची जबाबदारी आपोआपच पुढें येते. रोमन लोकांचेंही असेंच झालें. मग तद्देशीयांशीं दळणवळण चालू होऊन इतर लोक आपले सेवक आहेत आणि आपण सेव्य आहों ही भावना त्यांच्यांत उत्पन्न झाली. भोगाची लालसा बळावली. फारसे श्रम न करतां जीवितांतील सुखें भोगतां यावीं हा आपला हक्कच आहे असेंही त्यांस वाटूं लागलें. स्वारीवर जाणारे लोक बरीचशी

लूट आपल्या मांडीखालीं दडवूं लागले आणि अशा रीतीनें दौलत संपादितां येते हें पाहून बाहेर देशाच्या स्वाऱ्यांवर आपली नेमणूक व्हावी म्हणून शूर व कर्तबगार लोक खटपटी करूं लागले. लोकसत्ता असल्यामुळें लोकरंजन केल्याशिवाय या खटपटीस यश मिळणें कठीण असे. अर्थात् लोकरंजनाचे सर्व प्रकार सुरू झाले. मतदारांनीं पैसा खाणें ही गोष्ट रोजच्या सरावाची होऊन बसली. तसेंच मोठमोठे अंमलदार आणि न्यायाधीश यांनीं सुद्धां खाजगी रीत्या पैका कमवण्याकडे सारखी दृष्टि ठेवावी असें झालें. बाहेरून येणाऱ्या पैशाची खैरात पहिल्या पहिल्यानें देशांत सर्व लोकभर होत असे; पण पुढें 'आम्हीं मरावें आणि सर्वांनीं श्रीमंत व्हावें हा न्याय कोठला ?' हें बोलणें सुरू होऊन स्वारीवर जाणारे तेवढे गबर होऊं लागले. संपत्तीचा सांठा एका अंगास व दारिद्य दुसऱ्या अंगास असें होऊन राष्ट्र एकारल्यासारखें झालें. बाहेरदेशाहून नुसतीच संपत्ति आणण्याची वहिवाट पडली असें नाहीं. कैदी धरून आणून गुलाम बनवून राबावयास लावणें यांतही कांहींच पातक नाहीं असें ठरलें. या पद्धतीनें भिन्नभिन्न देशांतील लक्षावधि माणसें रोम शहरीं जमलीं. मोठमोठे सरदार-दरकदार हजारों एकर उत्पन्ने करून बसले व जमीनमशागतीचें काम या गुलामांच्या हस्तें होऊं लागलें. बाहेरून आलेला पैका जसा, तशी स्वदेशाची जमीनही पिकवून खाण्यासाठींच कां होईना, पण सामान्य रयतांच्या वांटणीस येईना. इतिहास, पीठिका, परंपरा आणि संस्कृति यांच्या सहवासाला पोकळ फुशारकी, सत्त्वहीन खानदानी, आळस आणि सामाजिक बदफैली हे गुण राहावयास आले आणि एकंदर समाजाचे श्रेष्ठ व कनिष्ठ असे स्पष्ट वेगवेगळे दोन थर बनले. या श्रेष्ठांतून कित्येक जबरदस्त योद्धे, मुत्सद्दी आणि साहसी शिपाई पुढें आले.

आणि त्यांनीं रोम शहर व रोमन लोक यांचें नांव दशदिशा गाजवून सोडलें; हें खरेंच आहे; पण या श्रेष्ठकनिष्ठ भावाची बाधा रोमन सत्तेस हळूहळू होऊं लागली. लोकसत्तेची आवड त्यांस लागलेली होती; पण लोकसत्ता म्हटली म्हणजे तिच्या मर्यादा सारख्या फाटत जात राहतात हें त्यांस पत्करत नसे. लोकसत्ता खरी; पण ती आमच्याआमच्यांत; तुम्हीं जरा दूरच राहिले पाहिजे, आदबीनेंच वागलें पाहिजे, आणि आमच्या भोक्तृत्वावर डोळा ठेवितां उपयोगी नाहीं अशी या श्रेष्ठांची कनिष्ठांच्या बाबतींत प्रवृत्ति असे. आम्हीं तुम्हांस जपावें हें ठीक आहे; पण सुखें व वैभवें यांची समसमान वाटणी हवी असें म्हणाल, तर तुमचें आमचें बनावयाचें नाहीं असा श्रेष्ठांचा भाव असे. ही चुरस चालू असतां सुद्धां न्यायान्याय पाहण्याची सर्वच श्रेष्ठांची दृष्टि अंधावली होती असें नाहीं. कांहीं श्रेष्ठ न्यायबुद्धीला वश होऊन स्वकीयींचा रोष सहन करून कनिष्ठांचा पक्ष घेऊन भांडत व त्यांच्या सुखसोयीची व हक्कांची तरफदारी करीत. अर्थात् या फितुरांसंबंधानें श्रेष्ठांच्या पक्षांत मोठी तिरस्कारबुद्धि असे. पण या मानीव फितुरीमुळें श्रेष्ठ-कनिष्ठांचें जें अगदींच फाटावयाचें तें न होता प्रसंगोपात्त कळवंडत असतांसुद्धां हें उभयतां लोक रोमन साम्राज्य सारखें फैलावीतच होते. कनिष्ठांनी निवडून दिलेले प्रतिनिधीही स्वाऱ्यांवर जात, आपले गुण दाखवीत आणि श्रेष्ठ-कनिष्ठांच्या नात्यांतला करडपणा नाहींसा करण्यासाठी झटत. श्रेष्ठांपैकीं जे कनिष्ठांच्या आकांक्षांना अनुकूल असत त्यांनाही कनिष्ठांनीं आपल्यातर्फे निवडून द्यावें असें सुद्धां होई आणि यामुळें मनःसामर्थ्यें विकसित होण्यास अवसर मिळून न्यायबुद्धीही जागरूक राही. देशांतल्या देशांतच जर हे दोघे कोंडून राहिले असते तर हीं भांडणें विकोपास पोंचून राष्ट्राचें बळ आपापल्याशीं मस्ती करण्यांतच संपलें असतें; पण या रोमन लोकांना

१५२६१



बाहेरची हवा खाण्याची जी संवय लागलेली होती, तीच त्यांस तारक होत असे. नित्य नवे प्रसंग उद्‌भवत, दूरदूरच्या प्रांतांत सीमान्तांवर बंडें होत आणि मग, तो श्रेष्ठ असो कीं कनिष्ठ असो, जो कोणी पराक्रमी असेल, आटोप आणि आवरशक्ति दाखवील, त्यास तिकडे रवाना करण्यांत येई. तो जर श्रेष्ठ असला तर परत आपल्यावर श्रेष्ठांचें वर्चस्व वाढविण्याकडे आपलें वजन खर्च करी; कनिष्ठ किंवा कनिष्ठांचा पक्षपाती असला तर त्याच्या बाजूनें आपलें वजन खर्च करी. असाच एक मोठा प्रसंग प्राप्त झाला.

रोमन राष्ट्राचें आणि न्युमिडियाचा राजा जुगर्थ याचें फार दिवस वैर चालू होतें. शेवटीं या भांडणाचा निकाल करण्याचें काम कनिष्ठांचा वीर मारियस याजकडे आलें. हा मारियस मोठा सालस, कांहींसा भोळसट पण बडा शूर शिपाई होता. त्यानें जुगर्थाशीं जोराचा सामना केला. त्याच्या फौजा उधळून लावून त्याने त्यास पकडून आणिलें आणि तेव्हांच्या पद्धतीप्रमाणें या जुगर्थाला रथचक्रास बांधून त्यानें रोम शहरांत मोठ्या दिमाखानें प्रवेश केला. अर्थात् कनिष्ठांचा भाव वाढला. पण येवढ्यानेंच झालें नाहीं. रोम शहराला उत्तरेकडून नेहमीं मोठें भय असे. आल्प्स पर्वताच्या बाजूनें पलीकडचे लांडग्यासारखे क्रूर रानटी लोक मोठमोठ्या झुंडी बनवून रोमवर चालून येत. इ० सनापूर्वी १०२ च्या सुमारास अशीच एक मोठी टोळधाड वरून खालीं आली, या वेळीं मुख्य अंमलदार मारियस हाच होता. कित्येक वर्षें हाच निवडून येत होता. पण त्याच्यावर लोकांनीं टाकलेल्या विश्वासाला तो सर्वथा पात्र होता. मोठी फौज उभारून तो उत्तरेकडे गेला. खालीं येतांना किंब्री लोकांनीं एक मोठी रोमन फौज गारद केली व विजयोत्साहानें तेही दक्षिणेकडे चालून आले. एक्स गांवाजवळ या फौजांच्या गांठी पडून प्राणांतक युद्ध झालें. मारियसनें लढण्याची शर्थ केली आणि

एकही किंब्री शिपाई जिवानिशीं परत जाऊं दिला नाहीं. अवघी जमातच्या जमात त्यानें ठार करून टाकली. याप्रमाणें मोठें संकट गेल्यामुळें रोमन राष्ट्राच्या जिवांत जीव आला आणि मारियसबद्दल लोकांस पराकाष्ठेची आदरबुद्धि उत्पन्न झाली.

पण त्याची ही सद्दी लवकरच संपली; कां कीं, सूला नांवाचा एक श्रेष्ठ हळूहळू लोकांच्या नजरेंत भरूं लागला होता. यानें मारियसच्या हाताखालींच शिपाईगिरी केली होती. पण तेव्हांपासूनच मारियसच्या मनांत त्याच्याविषयीं व त्याच्या मनांत मारियसविषयीं खोल मत्सरबुद्धि वागत होती. लष्करांत वाढतां वाढतां तो मोठा शूर शिपाई आणि चतुर सेनापति म्हणून प्रसिद्धीस आला. दरम्यान गुलामांचें बंड उद्भवलें. रोमन लोकांनीं जिंकलेल्या शहरांनीं सारखी भुणभुण लाविली होती कीं, आपणांस मताधिकार द्यावा. रोमन लोक म्हणत, तुम्ही जित आहां; तुमच्या मतांवर आम्ही जेते आपला राज्यकारभार हांकावयास नाकबूल आहों. होतां होतां यादवी माजली. मारियस आणि सूला या दोघांनीं ती मोडली, तरी त्या शहरांना मतदानाचा अधिकार देणें भाग झालें. सूला याच्या मनांत कनिष्ठांविषयीं मोठा तिरस्कार असे. त्याला वाटे, आपण श्रेष्ठांनीं हें साम्राज्य विस्तारिलें आहे व हे कनिष्ठ उगाच लोकसत्तावादाचा फायदा घेऊन आपल्यावर कुरघोडी करावयास पहात आहेत. या त्याच्या तिरस्कारबुद्धींत वरील यादवीनें भर पडली.

यादवींतून तो मोकळा होतांच साम्राज्याच्या पूर्वेकडे एक मोठें प्रकरण उद्भवलें. तिकडे त्यास वळावें लागलें. आशियांतील राजा मातृदत्त हा दिग्विजयार्थ निघाला होता. त्यानें रोमन प्रदेशांत शिरून अनेक ठिकाणचे लोक रोमनांविरुद्ध उठविले आणि हजारों रोमन लोकांची कत्तल केली. पुढें झपाट्यानें कूच करून बास्परस ओलांडून

तो ग्रीस देशांत प्राप्त झाला व तेथील लोकांनीं रोमचा अंमल झुगारून द्यावा म्हणून त्यानें खटपट आरंभिली. अर्थात् आतां तिकडे कोणीं जावें असा प्रश्न निघाला. शहरांतील लोकांचीं मतें घेतलीं त्यांवरून असें दिसलें कीं, मारियसनें जावें असें त्यांस वाटत आहे. पण सूला म्हणाला, ही निवड नव्हे, नुसती मतांची चावट दंगल आहे; मी तुमचें ऐकत नाहीं. आणि तो फौजबंद होऊन रोम शहरावरच चालून आला. मारियस एकदम पळून गेला. सुल्यानें विरोधकांची कत्तल केली व आपला अंमल कायम करून तो मातृदत्तावर चाल करून गेला. जातांना त्यानें आपला एक हस्तक अंमलदार नेमिला होता, पण सुल्याची पाठ वळतांच तो लोकपक्षास म्हणजे कनिष्ठांस जाऊन मिळाला; आणि पळालेला मारियसही हलकेंच परत येऊन त्याच्या मसलतींत शिरला. राजसूत्रें हातीं घेतांच उभयतांनीं श्रेष्ठांची कत्तल उडविली व हजारों श्रेष्ठ घराणीं रोम सोडून चालतीं झालीं. तिकडे सुल्यानें मातृदत्ताची चांगलीच खोड जिरविली आणि रोमन साम्राज्यावरचें एक अरिष्ट वारिलें. आपल्या विजयोन्मत्त फौजेसह तो घराकडे परत फिरला. रोम शहरीं भलताच बनाव बनून राहिला आहे हें त्यास माहीत होतें. आपण केलेली व्यवस्था मोडून टाकून आपल्या पश्चात् हे लोक अधिकार बळकावून बसले याची त्याला पराकाष्ठेची चीड येऊन तो वेगाने रोमकडे आला.

वाटेनें झालेली आडकाठी त्यानें जुमानिली नाहीं. रोम शहराच्या वेशीबाहेर जोराची खडाजंगी उडाली. मारियस तर आधींच मरून गेला होता. सुल्यानें विरोधकांचा फन्ना उडविला व रोम शहरांत प्रवेश केला. श्रेष्ठांनीं त्याला सर्वाधिकारी नेमिलें आणि मग त्याच्य मनांत जी गोष्ट सारखी डांचत होती तिच्यावर त्यानें शस्त्र उगारिलें

लोकपक्षाचा नायनाट करण्याचा त्यानें विडा उचलल्यासारखें केलें. पांच हजार लोक खुद्द रोम शहरांत कापून त्यानें काढले आणि रक्ताच्या नद्या वाहविल्या. जो कोणी विरोधवचन बोलेल त्याला सुद्धां मृत्यूची घोर शिक्षा त्यानें फर्माविली. याप्रमाणें भयंकर रक्तपात करून या क्रूरकर्म्यानें आपली सत्ता प्रस्थापित केली. नवे कायदे रचून त्यानें श्रेष्ठसभेच्या हातीं अधिकारसूत्रें दिलीं; पण सूला इतका पिसाळल्या-प्रमाणें वागला तरी एक गोष्ट त्याच्या मनाला कधीं शिवलीही नाहीं. आपण सर्वाधिकारी रहावें असें त्यास कधींच वाटलें नाहीं. श्रेष्ठसभेच्या हातीं सूत्रें देतांच त्यानें अधिकारसंन्यास केला. फौज, अधिकार, दर्जा हीं सर्व सोडून तो एरवींच्या माणसासारखा एके खेडेगांवीं जाऊन कालक्रमणा करूं लागला. आणि चमत्कार हा कीं तेथें त्यास सुखानें मरण आलें. असलीं घोर शासनें केलेलीं, पण त्याच्या अंगास कोणीं हात लाविला नाहीं ! असो.

अशा रीतीनें रोम शहरीं मोठी खळबळ माजून राहिली होती. जो पक्ष जोरावर असेल त्यानें दुसऱ्यास नकोनकोसें करावें, आपलीं माणसें निवडून द्यावीं; व आपल्या हातीं सत्ता आणि हुकमत ठेवावी असा प्रकार नेहमीं चाले. सुल्याच्यापूर्वीही असल्या कत्तली झाल्या नव्हत्या असें नाहीं. इतकेंच कीं, सुल्यानें ही कत्तल फार पद्धतशीर रीतीनें केली. या लडथडींतून कांहीं मार्ग निघावयास हवा होता, हें खरें असलें तरी तो शेवटपर्यंत निघाला नाहीं. आणि शेवटीं रोमन प्रजासत्ताक राज्याचें माहात्म्य संपून गेलें. वास्तविक सुल्याच्या कत्तली आणि ही विपरीत परिस्थिति यांच्यामधील काळांत पॉंपे, सिसरो, व स्वतः सीझर यांच्यासारखे थोर थोर लढवय्ये व मुत्सद्दी होऊन गेले आणि त्यांनीं एका हातानें रोमन साम्राज्याचा विस्तार व दुसऱ्या हातानें श्रेष्ठकनिष्ठांच्या नात्यांचा मिलाफ करण्याचें काम पुष्कळशा सदिच्छेनें

व कुशलतेनें केलें. पण पुढें काय झालें त्यावरून जर पहावयाचें झालें तर असें म्हणावें लागतें कीं, रोमन साम्राज्याचा विस्तार पुष्कळ झाला असेल, तरी रोमन प्रजासत्ताक राज्यपद्धति मात्र टिकूं शकली नाहीं. बाहेरचा महत्त्वाकांक्षेचा आणि वैभवाचा ओढा होता म्हणून इतके दिवस तरी हें रिपब्लिक टिकलें. नाहींतर श्रेष्ठकनिष्ठांच्या भांडणांत खुद्द रोमन स्वातंत्र्याचासुद्धां लय व्हावयाचा.

या तीन श्रेष्ठ पुरुषांपैकीं सीझरचें माहात्म्य फार मोठें आहे. शिपाई बाणा आणि मुत्सद्दयाचे गुण याच्या अंगीं चांगले एकवटले होते. तो स्वतः एका अस्सल श्रेष्ठ कुलांतच जन्मला होता; पण मरेतोंपर्यंत त्यानें कनिष्ठांची तरफदारी केली. रोमन साम्राज्य तर त्याच्या पराक्रमानें इतकें वाढलें कीं, रोमचें नांव काढलें कीं सीझरची आठवण व्हावी असें झालें आहे. सुल्याची जरब सर्वत्र चालू होती, तेव्हां सीझर लहान होता. धरपकड आणि मानतोड यांचें पीक जिकडे तिकडे सुल्यानें माजविलें होतें. त्यामुळें अवघें शहर चिडीचीप झालें होतें. एक पिढीभर तरी आतां कोणी डोई वर करील असा सुमार राहिला नव्हता. असल्या या जरबीच्या शांततेंत सीझरचें बालपण गेलें. पण हें गांवांतल्या गांवांत श्रेष्ठकनिष्ठांपुरतें झालें. एवढ्या थोरल्या विशाल साम्राज्यांत कोठें ना कोठें दंगेधोपे चालू असतच व शिपाईबाण्याचा उपयोग फार असे. म्हणून इतर तरुण मुलांच्याप्रमाणें सीझरही शिपाई बनला. वास्तविक मूळ शरीरयष्टि, प्रकृति, व स्वभावाचा कल हीं पहातां सीझरला शिपाईबाणा मानवण्यासारखा नव्हता. लहानपणीं तो भारी नाजूक प्रकृतीचा असे. तो अंगानें अगदीं किडकिडीत होता, आणि त्याचा चेहेरा मोठा गोजिरवाणा होता. जरा छानछोकीची व नटण्याची हौसही त्याला होती. कंबरपट्टा जरा ढिला घालून म्हणजे पुढें थोडासा ओघळता ठेवून तो आपली रसिकता व

मर्द माणसाची नटण्याची जनानी ऐट दाखवीत असें. तो म्हातारा खविस सूला त्याला उद्देशून म्हणे, "तो ढिल्या पट्टयाचा छोकरा कुठें आहे ?" वाङ्मयवाचनाचीही त्याला गोडी असे. वरील सर्व आविर्भावास अनुसरून तो थोडी कविताही करी. हर्क्युलस्वर त्यानें एक कविता केली होती व इपिडस नांवाचें एक नाटकही त्यानें लिहिलें होतें. पण एकंदरीनें लहानपणीं तो सामान्य बुद्धीचाच होता.

मिसूड फुटलें नाहीं, तों सीझरचें लग्नही झालें. लोकपक्षाचा नायक सीना याची मुलगी त्यानें केली; यामुळें त्याच्या मताचा ओढा लोकपक्षाकडे आहे असें स्पष्ट दिसून आलें. मागें सांगितलेला जो प्रसिद्ध मारियस त्यानेंही या सीझरच्या श्रेष्ठ कुळांतील एका मुलीशीं लग्न केलें होतें. त्यामुळेंच राजकारणविषयक बाबतींत लोकपक्षाचा ओढा सीझर यास लागलेला होता, तो आतां कायम झाला. आपणा श्रेष्ठां-पैकीं एकानें हा असला विवाह लावला हें म्हाताऱ्या सुल्यास मुळींच खपलें नाहीं. म्हणून त्यास बोलावून आणून त्यानें सांगितलें कीं, ही पोर टाकून दे, काडीमोड कर व दुसरें लग्न लाव. तो काळ असा होता कीं, सुल्याचा शब्द प्रमाण होता; पण सीझरनें धैर्यानें उत्तर केलें कीं, "मी बायकोस टाकणार नाहीं." हें उत्तर खपवून घेणारां-पैकीं सूला नव्हता. पण अनेक मित्रांनीं गळ घातली म्हणून; नाहीं तर इतर हजारांबरोबर सीझरची गठडी वळली असती. सीझरची चमक या प्रसंगीं इतरांस व खुद्द सूल्यास चांगली कळली. म्हातारा सूला गुरगुरून म्हणाला, "हा पोर त्या मारियसच्या वरचढ होणार असें दिसतें." सीझरनेंही प्रसंगावधान राखिलें आणि झाली येवढी झक-पक पुरे असें ओळखून रोममधून पाय काढला; व दूर आशिया-मायनरमध्यें, कीं जेथें रोमन सेनापतींच्या फौजा मोहिमशीर होत्या, तिकडे तो शिपाईपेशा पत्करून निघून गेला. मातृदत्ताचें प्रकरण

अजून थोडें धुमसतच होतें. त्याच्या लोकांनीं ग्रीसच्या दक्षिणेकडील बेटांत धुमाकूळ चालविला होता. सीझरनें स्वतःच्या हिंमतीवर जरूर तितकीं जहाजें जमा करून या बंडखोरांचा खरपूस समाचार घेतला. या लहानशा स्वारींत सीझरच्या अंगीं धाडस भरलेलें आहे ही गोष्ट लोकांच्या चांगली प्रत्ययास आली.

पण या चकमकी चालू असतां तो आडदांड व ज्याला त्याला भिवविणारा सूला मरण पावल्याचें वर्तमान आलें. तें ऐकतांच सीझरनें रणभूमीला रामराम ठोकला. कां कीं, तो तिकडे कांहीं सुखासुखी गेलेला नव्हता. सुल्याच्या भयानें तो तिकडे राहिला होता. पण परत येण्यास सूला मेला यापेक्षां, तो मेल्यामुळें उत्पन्न होणारी नवी परिस्थिति हीच जास्त कारण झाली. सीझरच्या स्नेह्यांच्या मनांत सुल्यानें बनविलेली राज्यव्यवस्था साफ मोडून टाकून नवा बनाव बनवावयाचा होता. म्हणून त्यांनीं पत्रें धाडून सीझरला परत बोलाविलें होतें. या पत्रांमुळेंही तो कदाचित् तांतडीनें परत आला असेल. कसेंही असो; सीझर घरीं परत आला. अर्थात् अजमासाप्रमाणें तेव्हांचा सत्ताधिकारी जो लेपिडस् त्यानें एक गुप्त कट रचावयास सुरुवात केली होती. पुरेशी जमवाजमव होतांच जोराचा टोला देऊन सुल्याची घटना उलथून पाडून पूर्वींचा लोकपक्ष प्रबळ बनवावयाची धमक त्याला वाटत होती. सीझर परत येतांच त्यानें तें सर्व प्रकरण सूक्ष्मपणें पहिलें आणि लेपिडस् यास कळविलें कीं, आपल्याला ह्या प्रकरणांत मुळींच पडावयाचें नाहीं. परिस्थिति अनुकूल नव्हती हें एक आणि दुसरें असें कीं, सुल्याची घटना जरी रक्तपातावर उभारली होती तरी ती मोठी सुयंत्र चालू असून तिचे प्रवर्तक नव्या गोष्टी घेण्यास बिलकुल उन्मुख नव्हते. :अर्थात उगाच कांहीं तरी करावें आणि दंगाधोपा माजवावा हें सीझरला बिलकुल मान्य नव्हतें. एक पिढीभर तरी

क्रान्तीची जरूरी नाहीं असें त्याचें मत बनलें होतें. पण लेपिडसला काय तो सोक्षमोक्ष करावयाचा होता. सीझरचा मेहुणा धाकटा सीना हा लेपिडसला मिळाला. एट्रुरियांत त्यांनीं एक फौज उभी केली व लगोलग ते रोमवर चाल करून आले; पण खुद्द रोम शहरांत आतांपर्यंत सर्वप्रसिद्ध बनलेला जो पाँपे त्याच्याशीं त्यांची गांठ पडली. लेपिडस व सीना पराभूत होऊन पळून गेले आणि दुसऱ्या कटकटींची तयारी करण्यासाटीं त्यांनीं देशान्तरही केलें. या भानगडींत न पडण्याची सीझरनें दक्षता बाळगली हें फार चांगलें झालें. नाहीं तर त्याची अवस्था लेपिडससारखीच झाली असती.

पाँपे हा सीझरपेक्षां वयानें कांहींसा मोठा असून ह्यापुढें कांहीं वर्षें सीझर व त्याचा मित्र सिसरो हे वकिल्या वगैरे करून आपापल्या बुद्धया पाजळविण्यांत गुंतले असतां तो रोमन साम्राज्यावरचीं संकटें वारण्याच्या मोठमोठया कामगिऱ्यांत गुंतलेला असावयाचा, इतकें दोघांत अंतर होतें. शिपाईपेशा दूर ठेवून सीझर वकिली करूं लागला; पण त्या धंद्यांत जें खुमारीदार वक्तृत्व पाहिजे असतें तें त्यास नसे. सिसरो मात्र जबरा वक्ता बनला होता. त्याच्यापुढें सीझरचें कांहीं वजन पडत नसे. मग वक्तृत्वाचा अभ्यास करावयाचा असें ठरवून सीझर ऱ्होड्स् येथें जावयास निघाला. वाटेनें त्याला चाच्यांनीं पकडलें; पण मोठा खंड भरून तो मोकळा झाला व वक्तृत्वाचा अभ्यास थोडा दूर ठेवून त्यानें चार तरांडीं गोळा करून त्या चाच्यांवर अचानक छापा घातला व त्यांचीं हाडें नरम केलीं. येवढा उद्योग आटोपून तो ऱ्होड्स् येथें अभ्यास करावयास गेला. दोन वर्षेंपर्यंत अंगविक्षेप, आवाजाचे रोहावरोह, चेहऱ्याच्या निरनिराळ्या कळा यांचा त्यानें नीट अभ्यास केला; व मग मनाजोगती प्रगति झाल्यावर तो पुन्हा घरीं परत आला. आई, बायको व आपण एका लहानशा घरांत रहात. आपला धंदा बरा कीं

आपण बरे असें चाललें होतें; पण त्याचें आशियामायनरमध्यें जाणें, ग्रीक समुद्रांतील चांच्यांशीं मारामारी करणें इत्यादींवरून हा पुढें शूर शिपाई निवटेल असें लोकांस वाटूं लागलें होतें. तसेंच वकील म्हणूनही त्यानें लोकपक्षीय कज्जे चालविले होते. सीनाच्या घराण्याशीं लग्नसंबंध जोडून त्यानें सुल्यास दुखविण्याचें धैर्य दाखविलें होतें. अर्थात् हा एक नवा होतकरू तरुण माणूस आपला पुढारी होण्यास लायक आहे असें त्यांना वाटूं लागलें.

लवकरच लष्करी ट्रिब्यून म्हणून त्याची निवड झाली व तेथें त्यानें आपलें लोकपक्षीय धोरण अगदीं उघड करून दाखविलें. पुढें, कोठें तरी तरंगत असलेला आपला मेहुणा सीना याची केस त्यानें इतक्या कुशलतेनें व वजनदारीनें लोकांपुढें मांडिली, कीं सीन्यास माफी मिळाली. सीझर लोकांच्या मनांत भरत चालला. वयाच्या ३२ व्या वर्षीं त्याची क्वीस्टर म्हणून नेमणूक झाली व रोमन साम्राज्यावर हुकमत चालविणाऱ्या सेनेटमध्यें तो आतां वसूं लागला. येथें त्याची निरनिराळ्या लोकांशीं ओळखदेख होऊं लागली. पॉंपे हा सीझरहून सहाच वर्षांनीं मोठा होता. पण तो लहानपणापासून मोठा प्रतापशाली असल्यामुळें रोम शहरीं त्याचें वजन चांगलें बसलें होतें. पण पॉंपे नुसता शूरच नव्हता; त्याच्या अंगांत राजकारणाचें कसब नसलें तरी तो मोठा महानुभाव आणि सच्चा माणूस होता. चालू राज्यपद्धति व तिचे प्रवर्तक त्यास पसंत होते असें मुळींच नाहीं; पण तो योग्य माणसांची वाट पहात होता. सीझरकडे पाहून त्यास वाटे कीं, हा आपल्याला चांगला जोडीदार होईल. दरम्यान सीझरची बायको कार्नेलिया वारली. पॉंपेने हा रिकामा झालेला जांवई पाहून आपली पुतणी पॉंपिया त्याला देऊन टाकली, याप्रमाणें पॉंपे व सीझर सासरेजांवई झाले! सासऱ्यानें त्याला लागलीच स्पेन देशांत

एका कामगिरीवर पाठविलें आणि जांवयानेंही कामगिरी इतकी चोख बजाविली कीं, सासरा व लोक, सीझरवर खूष होऊन गेले. दरम्यान, तिकडे मिथ्रिडेट्स्चें बंड पुन्हा उद्भवलें व भूमध्यसमुद्रांत चांच्यांचा दंगा इतका माजला कीं, व्यापार बसला व प्रवास अशक्यप्राय बनला. सेनेटच्या हातून त्याचा नेहमींच्या उपायांनीं बंदोबस्त होईना; म्हणून तिनें पॉंपेची नेमणूक त्या कामावर केली. त्यानें तिकडे जाऊन इतक्या तडफेनें काम केलें कीं, ज्या कामास तीन वर्षें लागतील असा लोकांचा अंदाज होता तें त्यानें तीन महिन्यांत झोडपून टाकलें. अवघे चांचेनुचाचें त्यानें खणून काढले आणि मातृदत्ताचें प्रकरण कायमचें विझविलें. हा त्याचा कामाचा झपाटा व उरक पाहून रोमन राष्ट्र चकितच होऊन गेलें.

इकडे सीझरनें मोठी दुरान्देशी बाळगून लोकाराधन चालविलें होतेंच. लोकांनीं त्याला लवकरच मुख्य पॉंटिफच्या जागेवर निवडून आणलें. या निवडणुकीनें लोकांचा सीझरवर कायमचा विश्वास बसला आहे असें सिद्ध झालें. दरम्यान क्याटिलाइन नांवाच्या एका सरदारानें एक गुप्त कट आरंभिला. त्यानें चागलीं चांगलीं माणसें यांत गुंतविलीं. खुद्द सीझरचा हात यांत थोडा तरी गुंतला असावा असें मानण्यास जागा होती, पण सीझर लवकर सांवरला. कटवाल्यांच्या डोळ्यांपुढें कांहीं उदात्त ध्येय होतें म्हणावें तर तसें मुळींच नाहीं; पण कटवाल्यांची बातमी लवकर फुटली आणि धरपकड होऊन सर्वांना मुसक्या बांधून कोर्टांत आणिलें. सिसरोनें कटवाल्यांचीं अंडींपिलीं इतकीं बारकाईनें काढलीं व अशीं खुलवून मांडलीं कीं, क्याटिलाइन पळाला तरी त्याच्या साथीदारांना, तडकाफडकी निकाल देऊन व कायदा बाजूस ठेवून, फांसावर चढवावें असा अभिप्राय सेनटनें दिला. हें कृत्य बेकायदेशीर आहे असें सीझरनें जोरानें प्रतिपादिलें. लोकांना कटाचा तिटकारा आला

होता तरी चालू कायदा झुगारून लोकांना फांशीं देण्याचा हुकूम सेनेटनें द्यावा हें त्यांना पसंत पडेना. अर्थात् सीझरचें प्रतिपादन त्यांस फार पसंत पडलें व सीझर लोकपक्षीय म्हणून त्याची प्रतिष्ठा कायम झाली.

लवकरच त्यास प्रीटर नेमण्यांत आलें व स्पेनदेशाचें काम त्याच्या गळ्यांत पडलें. स्पेनचें कारभारीपण म्हणजे डोंगरकठडीचें राज्य हांकावयाचें काम! पण सीझर म्हणाला, रोममध्यें राहून दुय्यमपणा पत्करण्यापेक्षां स्पेनमध्यें जाऊन कुलमुखत्यारी चालविणें मला बरें वाटतें. त्याची महत्त्वाकांक्षा आतांपर्यंत योग्य तऱ्हेनें पोसून आता चांगली बळावली होती असें दिसतें. कारण कीं, याच सुमारास अलेक्झांडरच्या पुतळ्याकडे पाहून तो एकदां उद्गारला, "खरोखर! या जगज्जेत्यापेक्षां वयानें मी कितीतरी मोठा आहें; पण लोक आठवतील असें एकही कृत्य मीं अजून केलें नाहीं!"

स्पेन देशाचा कारभार हातीं येतांच सीझरनें एकही दिवस वायां जाऊं दिला नाहीं. मोठमोठाले दरवडेखोर, बंडखोर डोंगराळ मुलुखांत राहून, संधि साधून शेतवाड्यांवर आणि शहरांवर अचानक चालून येत आणि लोकांना उसंत म्हणून पडूं देत नसत. जिकडे तिकडे बजबज आणि कहर झाला होता. सीझरनें सारखी दौड चालू ठेविली आणि चारसहा महिन्यांत त्यानें या दरवडेखोर भामट्यांचा पुरा निःपात केला. सीझरच्या स्वभावांतला एक मोठा गुण येथें स्पष्ट झाला. कोणचेंही काम हातीं घेतलें म्हणजे तें अगदीं तळसून केल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे. थातुरमातुर, जुजबी, अगर तुरतातुरत ही भाषा त्याला येतच नव्हती. शत्रु मारावयाचे म्हणजे एकूण एक टिपून मारावयाचे; असे कीं, पुन्हा डोई वर होतां उपयोगी नाहीं! असो. याप्रमाणें या लुटारू चोरांचा उपद्रव नाहींसा करून सीझरनें पोर्तुगाल

व गॅलीशिया प्रांतांकडे आपला मोर्चा वळविला. लवकरच हे दोन्ही प्रांत सर करून सबंध स्पॅनिश द्वीपकल्प त्यानें रोमन साम्राज्यास जोडून टाकलें. जसें रणांगणांवर तसेंच कारभाराच्या कामांतही त्यानें विलक्षण तेज दाखविलें. कारभाराची पद्धति नीट बसवून देऊन त्यानें प्रजेंत विश्वास उत्पन्न केला आणि रोम शहरच्या हुजूर खजिन्यांत गाड्याच्या गाड्या पैका पाठवून दिला. याप्रमाणें स्वतंत्र अखत्यारी दिली असतां आपण काय करूं शकतों याचा पुरा प्रत्यय त्यानें रोमन राष्ट्रास आणून दिला. अर्थात् या बातम्या जसजशा घरीं येत तसतसा सीझरविषयीं आदर वाढूं लागला. आणि अगदीं पहिल्या प्रतीचीं जीं कांहीं तेव्हांचीं माणसें, त्यांच्यांत त्याची गणना होऊं लागली. सीझरनें लोकाराधन चालविलें होतें असें वर म्हटलें आहे व तें खरेंही आहे. निरनिराळ्या तऱ्हांनीं व पुनः पुन्हा संधि साधून त्यानें लोकांस वश करून घेतलें होतें; पण नुसत्या आराधनेनें भागत नाहीं; लोकांस कांहीं तेज दाखवावें लागतें. बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग, पराक्रम यांची कांहीं कडकडून साक्ष त्यांना हवी असते. स्पेनच्या राज्यकारभारानें व पोर्तुगाल आणि गॅलिशिया हस्तगत करून, त्यानें ही साक्ष त्यांस दिली.

तिकडे आशियाखंडांत शिरून पॉंपेनें मोठा दिग्विजय केला. एक कोट नवी प्रजा त्यानें रोमन राज्यांत आणिली. देशोदेशींचे तीनशें राजेरजवाडे कैदी म्हणून बरोबर आणिले व लुटीच्या आणि खंडणीच्या पैशानें सरकारी खजिना तुडुंब भरून वहावयास लाविला ! पॉंपेच्या आधीं कोणी इतरांनीं अशीं कृत्यें केलीं नव्हतीं असें नाहीं; पण ते सर्व वीर लोभाला बळी पडले व राष्ट्राला श्रीमंत बनविण्याच्या ऐवजीं आपणच श्रीमंत बनले. पॉंपेनें मात्र लोभ पुरा मारिला होता. आशियांतील नाना देशची धनश्री त्याच्या पायाशीं लोळण घेत आली

होती; पण तो तिला शिवलासुद्धां नाहीं. रोमचें नांव मात्र त्यानें जगभर गाजविलें. वहिवाटीप्रमाणें रोम नगरीनें मोठ्या जयजयकारानें त्याचें स्वागत केलें. पण त्याला पुन्हा कॉन्सलचें पद देण्यास सेनेट-सभा राजी होईना; कारण तो आधींच आठ वर्षे ओळीनें कॉन्सल झाला होता. वास्तविक त्याला दुष्ट बुद्धि झाली असती तर तो फौजेसकट रोमवर आला असता, व सेनेट वगैरे त्याला गुंडाळून ठेवितां आली असती. पण तो खरोखरच मोठा इमानी माणूस होता. इटलींत पाय ठेवण्यापूर्वीं त्यानें कायद्याप्रमाणें आपली फौज खालसा केली व खजिना सरकारांत गुदरला. हें सर्व खरें, पण याला कॉन्सलचें पद द्यावयाचें कितीदां असा प्रश्न सिसोरोनें उत्पन्न केला.

हा सिसोरो मोठा महत्त्वाकांक्षी पण भित्रा, आणि थोडें करून फार झाल्याचा देखावा उत्पन्न करणारा होता. वक्तृत्वाची कला त्यानें इतकी वश करून घेतली होती कीं, अजूनसुद्धां त्याचें नांव उपमान म्हणून उपयोजितात. त्याची बुद्धीही मोठी खोल व दूरांदेशी होती. त्यानें लिहून ठेवलेली तेव्हांची सर्व हकीकत इतिहासाचें साहित्य म्हणून फार उंच दर्जाची आणि विपुल अशी आहे. वक्त्याचे सर्व ढंग त्याच्या अंगीं असून सेनेटमध्यें एकदां त्याच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला म्हणजे प्रतिपक्षी भराभर घायाळ होऊन पडत. त्याचीं भाषणें वाचावयास फार मनोरंजक वाटतात; कां कीं, त्यांचें वाङ्मयरूप फार सुंदर आहे. लोकपक्षीय तत्त्वांचें ग्रहण करण्यास लागणारी बुद्धीची कुशाग्रता व मनाचें औदार्य हींही त्यांजपाशीं होतीं आणि श्रेष्ठ लोक फार ओढून धरतील तर हें साम्राज्याचें महावस्त्र फाटेल हें तो पूर्ण जाणून होता. पण सेनेटमध्यें तो श्रेष्ठपक्षीय म्हणूनच होता. आशिया खंड युफ्रेटिस नदीपर्यंत जिंकून परत आलेला पॉंपे रणमैदानांत मोठा जीरावरसिंग खरा; पण सेनेटमध्यें सिसोरोपुढें त्याची बोबडी वळे.

हा सिसोरो मोठा आत्मश्लाघी असून आपण म्हणजे या रोमन साम्राज्याचे एकच एक आधारस्तंभ आहों असें तो समजत असे. पाँपेसुद्धां श्रेष्ठच होता; पण तरीही त्याला पुन्हा कॉन्सलचें पद देण्यास सिसोरो तयार नव्हता.

अर्थात् पाँपेचा कल हळूहळू लोकपक्षाकडे झुकू लागला. श्रेष्ठांच्या दृष्टीनें सिसोरोनें मोठी चूक केली. तिकडे अवघे स्पॅनिश द्वीपकल्प जिंकून आणि रोम शहरास गडगंज खजिना आणून सीझरनें लोकमत केवळ भारून टाकलें होतें. त्याचें आजपर्यंतचें सर्व वर्तन लोकपक्षास सर्वथा अनुकूलच होतें. अर्थात् आतां आपण कॉन्सल म्हणून निवडून येण्यास कांहींच हरकत नाहीं हें त्यानें ओळखलें. म्हणजे पाँपे व सीझर हे दोघे लोकपक्षाचे म्हणून कायम झाले. पण तिसरा एक मोठा जबरदस्त माणूस हस्तगत झाल्याशिवाय लोकपक्षाचें सामर्थ्य पुरेसें दांडगें होणार नाहीं हें सीझरनें ओळखिलें होतें. तो गृहस्थ म्हणजे क्रॅसस. याच्यापाशीं अतोनात पैसा होता आणि त्याची प्रवृत्तीही लोकपक्षीय होती. निवडणुकी लढविणें म्हणजे पैशाचा खेळ आहे हें माणसाच्या जातीनें तेव्हांही ओळखलेलेंच होतें. अर्थात क्रॅससची मनधरणी करणें सीझरला प्राप्त झालें. त्या कामांत यश मिळून पाँपे, सीझर व क्रॅसस यांनीं आपला लोकपक्ष बनविला. पाँपेनें हांक मारतांच लक्षावधि शिपाई धूम ठोकीत त्याजकडे येणार, सीझर तर सामान्य जनसमूहाचा उघड उघड कैवार घेऊन भांडणार, आणि लागेल तितका पैका क्रॅसस पुरविणार, अशी ही योजना होती. याप्रमाणें तीन श्रेष्ठांनींच सामान्य जनसमूहाची कड घेऊन नवा प्रबल असा लोकपक्ष बनविला; पन्नास-साठ वर्षांत लोकपक्षाची इतकी उचल झालेली नव्हती. अर्थात् आतां आपल्याला अनुकूल असा नवा काळ आला असें लोकांस वाटूं लागून त्यांच्यांत विलक्षण हुरूप उत्पन्न झाला.

सीझर कॉन्सल म्हणून बिनबोभाट निवडून आला. पण त्याचा जोडीदार जो यावयाचा तो मात्र आपला असलाच पाहिजे असें श्रेष्टांनीं ठरवून हरहिकमतीनें बिब्यूलस यास निवडून आणिलें आणि केवळ लोकांनीं निवडलेल्या ट्रिब्यून्सपैकीं तिघेजण त्यांनीं श्रेष्ठांच्या बाजूस वळवून घेतले. येवढ्या तयारीवर सीझरला डांवून टाकतां येईल असा वरिष्ठांचा होरा होता. सीझर हा लोकपक्षीय म्हणून त्यांना त्याची भीति वाटे हें खरें, पण कॉन्सल झाला तर हा नेमकें काय करील याची त्यांना चांगलीशी अटकळ नव्हती. मारियस आणि सीना या लोकाग्रणींचीं जीं तत्त्वें तींच याचींही होतीं व त्यांच्याप्रमाणें या तत्त्वांचा तो निर्भयपणें उच्चार आणि पुरस्कार करी. पण सनदशीरपणा मात्र त्यानें केव्हांही सोडिला नव्हता व लोकपक्षाचें पुढारीपण म्हणजे मुर्दाड गुंडगिरी हाही न्याय त्यानें पत्करला नव्हता. अर्थात् शत्रु खरा; पण त्याच्याबद्दलचा वचकसुद्धां आदरमिश्रित होता. गेल्या साठ वर्षांत अनेक उलथापालथी झालेल्या होत्या. केव्हां वरिष्ठांचा तर केव्हां लोकांचा पक्ष जोरावर येतोसा दिसे. पण एकंदरीनें श्रेष्ठ हेच हुकमत चालवीत होते. जमिनीचे मालक बडे जमीनदार असून ते गुलामांकडून त्यांची मशागत करवीत, यामुळें सामान्य लोकांना फारशा जमिनीच नसत. रोम सोडून बाहेरच्या लोकांची मतदानाच्या हक्कांबद्दल सारखी हाकाटी चालूच होती. बंधमुक्त झालेल्या गुलामांच्या पुत्रपौत्रांचें समान हक्कांचें भांडण सुरूच होतें. ज्यांच्या उत्पन्नावर गुजारा करावयाचा ते पो नदीच्या पलीकडील प्रांत नुसते लोंबटासारखे वागविले जात. त्यांस मतदान नव्हतें. आणि मतदानाकडे पहावें तर मत म्हणजे नुसता पैका मिळविण्याची संधि आहे असें खुद्द लोकच मानीत. म्हणजे असें कीं, मताचा हक्क हवा म्हणून लोक भांडत; पण मिळाला म्हणजे आपली मतें योग्य माणसांना न देतां लांच खाऊन पैसे पेरणाऱ्याला ते तीं देत आणि मग मनासारखे

कायदे झाले नाहींत म्हणून तिकडूनही असंतुष्ट बनत. ही दुःखस्थिति सुधारावयास सीझरला सिद्ध व्हावयाचें होतें. वास्तविक त्याची स्वतःची प्रवृत्ति क्रांतीकडे मुळींच नव्हती; पण एकदम कांहीं उलथापालथ होऊं देणें किंवा न देणें हें श्रेष्ठांच्या कलावर अवलंबून होतें. सुधारणा तर व्हावयास हव्या होत्या; श्रेष्ठांस त्या नको होत्या. आणि त्या करणार म्हणून म्हणणारा गडी रणावर दाखल झालेला होता. असा हा प्रसंग होता.

इ० सनपूर्व ५९ च्या जानेवारींत नवे कॉन्सल कामावर दाखल होणार होते. पण आधी डिसेंबरांतच बातमी पसरली कीं, सीझर अधिकारावर येतांच शेतीचा कायदा सेनेटपुढें लगोलग येणार. अर्थातच उभयपक्षांत झुंजीची तयारी सुरू झाली. कामावर येतांच सीझरनें एक अत्यंत उपयुक्त उपक्रम सुरू केला. सेनेटसभेच्या वादविवादाचा सारांश रोजच्या रोज लोकांस कळेल अशा जागी तो चिकटविण्याची त्यानें व्यवस्था केली. यामुळें सांगोवांगी हकीकतीवर अगर लुच्च्या बातमीदारांवर विश्वसण्याची जरूरी लोकांस राहिली नाहीं. मग शेतीचा कायदा त्यानें सभेपुढें आणिला आणि कोणास कांहीं दुरुस्त्या, मुरडी, बदल सुचवावयाचे असतील तर ते त्यांनीं सुचवावे असें त्यानें सभासदांस सांगितलें. त्यानें करूं घातलेल्या कायद्याचें वास्तविक स्वरूप असें होतें. सरकारच्या जमिनी फार थोड्या खंडानें अमीर-उमरावांकडे लागलेल्या होत्या. त्या त्यांच्याकडून नुकसानभरपाईनें परत घेऊन परदेशच्या स्वाऱ्यांवरून परत आल्यावर घरीं रिकाम्या बसलेल्या शिपायांस वहिवाटावयास द्यावयाच्या असा सीझरचा संकल्प होता. बरें, या परत घ्यावयास सरकारांत पुरेसा पैसा होता व तोही त्या शिपायांनींच मिळवून आणिला होता. शिवाय, शिल्लक पैशांतून इतर ठिकाणीं मिळतील तेथें जमिनी खरेदी करून त्यांवर रोम शहरांत जमा झालेल्या

आणि निकामी राहिलेल्या लक्षावधि लोकांस नेऊन स्थापावें म्हणजे बेकारीचा प्रश्न थोडा तरी सुटेल असा सीझरचा अदमास होता.

पण मोठमोठाले जमीनदार, सरदार वगैरे जे श्रेष्ठ होते त्यांस वाटूं लागलें कीं, सीझर येथें थांबणार नाहीं. हा आपल्या हातून जमिनीची मालकी पुरी काढून घेईल. कोठल्या तरी उपटसुंभांना आमच्या बरोबरींचे व खानदानीचे बनविण्याचा हा सीझरचा डाव आहे. " आमच्या वाड-वडिलांनीं साम्राज्य विस्तारिलें आणि आतांचे आधुनिक लोक म्हणजे पकडून आणलेल्या गुलामाचे लडके आमच्या बरोबरीनें हक्कदारी सांगणार " हा विचार त्यांस सहन होईना. त्यांचा पुढारी कॅटो यानें एक दिवसभर सेनेटमध्यें सीझरवर सारखा भडिमार केला; इतका कीं, शेवटीं सीझरनें त्याला कैद करावयाचा धाक घातला, तेव्हां तो गप्प बसला. सेनेटचे सभासद संतापानें बेफाम होऊन गेले. सीझरनें चुच-कारून पाहिलें, थोडें कमीजास्त करा असें सुचविलें; पण सेनेट त्या कायद्याच्या मसुद्याला शिवेनासुद्धां. शेवटीं जर तुम्ही माझ्या या मसुद्याचा विचारसुद्धां करणार नाहीं तर अखिल–मतदारसभेपुढें मांडून मी हा कायदा पास करून घेणार ' असे निर्वाणीचे शब्द बोलून सीझरनें सभा बरखास्त केली.

श्रेष्ठांना निराळाच दम होता. सीझर कॉन्सल म्हणून जशी अखिल–मतदार सभा त्यास बोलावितां येत होती, तशी बिब्यूलस यास कॉन्सल म्हणूनच ती बरखास्तही करतां येण्यासारखी होती. दुसराही एक बाण त्यांच्या भात्यांत होता. चांदण्याकडे पाहून अमुक दिवस कामाला अशुभ आहे असें कॉन्सलनें सांगितलें तर त्या दिवशीं काम होऊं नये असा शिरस्ता होता. जरूर पडली तर बिब्यूलसनें आपल्या या हक्काचा वाटेल तितके दिवस उपयोग करुन कौन्सिलचें कामकाजच होऊं देऊं नये व अशा रीतीनें सीझरचा ताजा मसुदा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
............ दि: ..................
............ 

आंवळून सोडतां यावा अशीही त्यांनीं तयारी करून ठेविली. इकडे, टाकलेलें पाऊल परत न घेण्याचा निश्चय सीझरनेंही केला. दुसरे दिवशीं राजधानींतील मंडईचें पटांगण माणसांनीं फुलून गेलें. पटांगणांत कॅस्टरचें देऊळ होतें; त्याच्या पायऱ्यांवर सीझर आणि पॉंपे हे दोघेही उभे राहिले. शेजारीं बिब्यूलस व त्याचे साथीदार तिघे ट्रिब्यून्स हेही उभे होते. सीझरनें आपला मसुदा वाचून दाखविला आणि कांहीं फेरबदल करावयाचा असल्यास करा असें त्यानें बिब्यूलस यांस सुचविलें. सबंध अफाट सभा रागद्वेषांनीं भडकून गेली होती. श्रेष्ठकनिष्ठ सर्वच चवताळून जाऊन दांत करकरून बोलत होते. बिब्यूलस म्हणाला, ‘ मला असली क्रान्ति नको आहे, निदान मी कॉन्सल आहें तोंपर्यंत तरी मी ही घडूं देणार नाहीं. ’ हें ऐकतांच लोकांनीं त्याचा धिक्कार केला. जास्तच चिडून जाऊन तो म्हणाला, “ तुमच्यापैकीं एकूणएक माणसाला जरी हा कायदा हवा असला, तरी यंदा तरी तो नाहींच नाहीं होणार. सीझरनें समय ओळखला आणि कोणत्या प्रसंगीं कोणाची योजना करावयाची हें ध्यानांत घेऊन आपण बोलण्याच्या ऐवजीं त्यानें पॉंपेला बोलण्याची विनंति केली. जमलेल्या लोकांत शिपाईगडी खूप होते; तेव्हां पॉंपेची छाप समेवर तत्काळ पडेल हें त्यानें हेरलें. पण यांत सीझरचा आणखीही एक खोल डाव होता. पॉंपे लोकांसमोर उभा राहिला व साम्राज्य वाढविणारे आणि राष्ट्र श्रीमंत करणारे जे शिपाईगडी, त्यांची व शहरांतील दरिद्री लोक यांची कड घेऊन त्यानें सांगितलें कीं, मसुद्याचा शब्दन् शब्द आपणांस मान्य आहे. तत्काळ सीझरनें त्याजकडे वळून, जणुं कांहीं त्याला बांधून घेण्यासाठीं, सर्वांना ऐकूं जाईल असें त्यास विचारिलें, “ असें जर आहे तर हा कायदा येथें पास होऊन सुद्धां कोणी लोक तो मोडूं लागले तर तुम्ही कायद्याची कड घेऊन उठाल ना ? ” पॉंपेनें सीझरचा डाव

ओळखला व कायदा त्याला खरोखरच हवा असल्यामुळें, तो गंभीर योद्धा नम्रपणानें पण डुरकणी फोडून म्हणाला, " हां, कॉन्सलसाहेब, मी तर गरीब साधा माणूस आहें. माझ्या हातीं अंमल कांहींच नाहीं; पण जर तुम्ही लोक माझी मदत चाहतां तर येवढें सांगतों कीं, या कायद्यावर कोणीं तरवार उपसली तर तो सांभाळण्यासाठीं मी आपली ढाल खास पुढें करीन." हें ऐकतांच आपली शिपायांची गर्दन फुगवून एक लाख शिपाई गर्जून ओरडले, " भले बहाद्दर ! भले बहाद्दर !" पॉंपेच्या मागून क्रॅसस उभा राहिला. त्यानेंही संमति दिली. हा प्रकार पाहून व आपल्याच स्ववर्गीयांची ही वर्तणूक पाहून जमीनदार श्रेष्ठ अगदीं चिडून गेले. बिब्यूलस व लोकांचे तिघे फितूर ट्रिब्यून्स यांनीं हरकती घेतल्या. आजचा दिवस मुहूर्ताचा नाहीं; आणि म्हणून सभा बरखास्त आहे असेंही बिब्यूलस ओरडून म्हणाला. किंबहुना सर्व वर्षभर असल्या कायद्याला मुहूर्त नाहीं असेंही ठरवीन असें तो म्हणत होता. पण जनसंमर्दाच्या निषेधवचनांच्या कल्लोळांत त्याचें म्हणणें कोणास ऐकूंही जाईना. लोक संतप्त होऊन पायऱ्यांकडे धांवले. त्यांनीं बिब्यूलसला धरून खालीं आपटलें, त्याच्या रक्षकांच्या यष्ट्या मोडून टाकल्या, आणि फितूर ट्रिब्यून्सना चांगलें झोडपून काढिलें. मागे उल्लेखिलेला कॅटोही मोठा अडेल होता. इतकें झालें तरी त्याचे शिव्याशाप आणि हातवारे चाललेच होते. शेवटीं पोलिसांनीं त्याची उचलबांगडी करून त्याला उचलून नेले. मग थोडी स्थिरस्थावर होऊन सभेनें कायदा पसार केला; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक सेनेटरनेसुद्धां हा कायदा पाळलाच पाहिजे असाही आणखी एक कायदा पास केला !

ही सीझरची चढाई पसंत नसली तरी सेनेटर्सनीं या मनःस्थितींतसुद्धां झालेल्या कायद्यांना संमति दिली. बिब्यूलस मात्र सर्वांवरच रागावून घरीं जाऊन बसला ! कायद्याची अंमलबजावणी

लगोलग सुरू झाली; वीस लोकांची एक कमिटी नेमून सीझरनें तिजकडे हें काम सोंपविलें. याप्रमाणें पाँपेच्या शिपायांची आणि क्रॅससच्या शेतकऱ्यांची सोय लागली. पाँपेनें आशियांतील प्रांतांची जी व्यवस्था लाविली होती तीही सरकारांतून पसंत म्हणून ठरविण्यांत आली. सेनेट मात्र आतां कोणचेंच काम पाहीना; म्हणून सीझरनें अखिल-मतदार-समेशीं सर्व व्यवहार ठेवला. तो दारें लावून घरीं बसलेला बिब्यूलस त्रासिक स्वरानें दर वेळीं ओरडत असे कीं, हें मला पसंत नाहीं, तें मला पसंत नाहीं. परंतु सीझर या घरवशा जोडीदाराचें कांहीं एक ऐकेना. त्यानें जरूर होते ते कायदे भराभर पास करून टाकले.

न्यायाधिशांच्या अंगावर शस्त्र चालविण्याची संवय गुन्हेगारांना लागत चालली होती; लोक व्यभिचारी बनत चालले होते; न्यायाधीश लोक लांच खाण्यास सोकावलेले होते; मुलकी जमाबंदीकडील लोक पैशाची फार अफरातफर करीत; खोट्या नाण्यांचीही पैदास फार होऊं लागली होती; सरकारी कंत्राटें देण्यांतही लांचलुचपत चालत असे; निवडणुकीच्या वेळीं भामटे उमेदवार पैसा देत व तोंडानें लोकसत्तेच्या बाता झोकणारे लोक खुशाल मतांचा विक्रा करीत; आणि परप्रांतांवर धाडलेले सेनापति लुटीचा व खंडणीचा अपहार करून गबर होत असत. हे सर्व प्रकार बंद करण्याची हिम्मत धरून सीझरनें आपल्या कॉन्सलदारींत योग्य ते कायदे पसार केले व रोम शहर आणि रोमन साम्राज्य यांतील बजबज बरीच कमी केली. अर्थात् या त्याच्या शूरपणाबद्दल लोकांनीं त्याला दुवा दिला असेल हें लिहावयास नकोच. पण ही सर्व घडामोड होईतोंपर्यंत त्याची मुदत भरत आली व कायद्याप्रमाणें कॉन्सलदारीच्या शेवटीं साम्राज्यांत कोठें तरी कारभारी म्हणून जावयाची वेळ जवळ आली !

लोकशाहीच्या अनेक गैरसोयींपैकीं ही एक आहे कीं, लोकांनीं आपल्याला हवा आहे तो माणूस आणून जों कामास जुंपावा आणि त्याला थोडा अवसर मिळून अनुभव मिळावा तोंच नव्या निवडणुकी दाखल होतात व राहाळत चाललेल्या वाकब कामगारांचीं आसनें अस्थिर बनूं लागतात. पण सीझरला प्रकृत्याच ही सेनेटच्या आणि सभांच्या भांडणाची विशेषशी आवड नव्हती. जेवढया गोष्टी करावयास हव्या होत्या तेवढया त्यानें पार पाडल्या होत्या म्हणून बाहेर जावयास तो कबूल होता. पण जर बाहेर जावयाचेंच तर उगाच माशा मारीत बसावयाचा कारभार हातीं न घेतां एखादा धकाधकीचा मामला मिळाला तर पहावा अशी मात्र त्याची इच्छा होती.

वास्तविक पाहातां कॉन्सलदारीनें त्याचें मोठेंपण सर्वांच्या प्रत्ययास आलें; लोकांसाठीं निर्भयपणें झगडण्याची त्यांची तयारी स्पष्ट झाली; व रोमन राज्य हें या किंवा त्या वर्गापेक्षां मोठें असून तें टिकविण्या-साठीं औदार्य पत्करून लोकसत्ता अधिकाधिक लोकांत पसरूं द्यावी हा विचारही त्यानें कृतीनें खरा करून दाखविला. पण सीझरचें खरं वैभव हें नव्हे. त्याचें नांव इतिहासाला मोठा मुत्सद्दी म्हणून इतकेंसें आठवत नाहीं, तर धुरंधर सेनापति आणि जगांतील दोन चार जगज्जेत्यांपैकीं एक म्हणून आठवतें. सध्यां तो त्रेचाळीस वर्षांचा होता. पण यांपैकीं स्पेन देशांतलीं दोन वर्षें सोडलीं तर बाकीचीं प्रौढपणचीं त्याचीं सर्व वर्षें या पक्षोपपक्षांच्या भांडणांत व एकमेकांचे रागद्वेष खिजविण्यांतच गेलीं होतीं. स्वतंत्रपणें एखादें प्रचंड काम हातीं घेऊन तें करून दाखवावें आणि लोकांवर छाप बसवावी ही त्याची हौस अजून शिल्लकच होती. ती भागावयाची वेळ आतां प्राप्त झाली.

आल्प्स पर्वताच्या पलीकडे गॉलस, बेल्जी, नव्हीं, सेक्वानी, एडुई, हेल्वेटी अशा अनेक जमाती थेट उत्तर समुद्रापर्यंत पसरलेल्या होत्या.

गॉल्स सोडून त्यांतील बहुतेक लोक अर्धवट रानटी आणि उनाडच असत. दोनदोन तीनतीन लाखांचे तांडे बनवून या जमाती मुलूखभर भटक्या मारीत आणि साधल्यास स्थायिक लोकांच्या वस्तीवर जाऊन अचानक कोसळत असत. यांपैकीं एका म्हणजे गॉल नांवाच्या जमातीनें मागें एकदां रोम शहराचा जवळजवळ निःपात केला होता व किंब्री नांवाच्या जमातीनें तर मारियसच्या अमदानींतच रोमवर दौड करण्याचा धाक घातला होता. याचा अर्थ असा कीं, रोमन साम्राज्यावर ही रानटी लोकांची एक तीक्ष्ण तलवार सारखी लोंबत राहिलेली होती. ती केव्हां पडेल आणि रोमन राष्ट्राचा छेद होईल याचा नियम नव्हता. मधून मधून वातम्या येत कीं, आज अमुक जमातीनें तमकीकडे प्रयाण केलें; तमकीनें अमुक मुलूख उद्ध्वस्त केला. अर्थात् रोमन लोकांच्या पोटांत ऐन वैभवोपभोगांतही धस्स होई. सीझरसारखा मोहरा आतां रिकामा झाला होता. तेव्हां त्याला ही कामगिरी सांगावी आणि उत्तरेकडची कांहीं कायमची व्यवस्था झाल्यास पाहावी असा विचार करून राष्ट्रानें त्यास उत्तरेकडे पाठविलें. हें प्रकरण इतकें लांबत जाईल आणि सतत नऊ वर्षें आपल्याला तिकडे अहोरात्र झगडा करावा लागेल अशी सीझरची अटकळ नव्हती व रोमन राष्ट्राचीही नव्हती. पण एकदां त्या कामांत हात घालतांच तसलीं शेंकडों कामें त्याजवर गडगडत आलीं. तरीही येतील तितकीं झपाटून टाकण्याची पूर्ण शहामत आपल्या अंगीं आहे हें सीझरनें सर्व जगास सिद्ध करून दिलें. खरोखर, सीझरच्या उत्पातांनीं भरलेल्या चरित्रांतील हें उत्तरेकडील युद्धाचें पर्व वीर, अद्भुत व करुण अशा रसांनीं थबथबून भरलेलें आहे; पण त्यांतील प्रसंगांत सारखेसारखेपणा आणि त्यांची संख्याही फार असल्यामुळें त्यांचें वर्णन फार विस्तारानें देतां येत नाहीं. रक्तपाताला आणि कत्तलींना लागणारा कडवेपणा सीझरच्या ठिकाणीं पूर्ण भरला आहे हेंही ह्य

झगड्यांत दिसून आलें. "रोमन साम्राज्याची उत्तर निर्वेध करणें" हें ध्येय असें एकदां ठरल्यावर किती लक्ष माणसें आपण ठार मारतों याची फिकीरच त्यानें केली नाहीं.

स्वित्सलँडमधील डोंगराळ प्रदेशांतून हेल्वेटी जमात वरचेवर धाक दाखवीत असे. तिला वठणीवर आणावयाचें ठरवून सीझरनें प्रथम तिकडे कूच केलें. इतक्यांत वरून बातमी आली कीं, ३,६८,००० हेल्वेटी लोक आपापलीं ठाणीं सोडून पश्चिमेकडे निघाले असून रोमन साम्राज्यांतून वाट काढीत ते पश्चिमेकडे जाणार आहेत. ही टोळधाड वाटेसाठीं कां होईना, पण एकदां देशांत शिरली म्हणजे काय अनर्थ उडेल हें सीझरला माहीत होतें. झपाट्यानें पुढें जाऊन त्यानें वाटेंतील नदीचा पूल मोडून पाडला. दरम्यान हे हेल्वेटी नदीवर येऊन दाखल झाले व नदीपार होऊन तुमच्या मुलुखांतून जाण्याची परवानगी द्या असा निरोप त्यांनीं सीझरला धाडिला. पंधरा दिवसांत उत्तर धाडतों म्हणून सीझरनें जबाब पाठविला, व लढाई पंधरा दिवस पुढें ढकलून, दरम्यान पूर्ण तयारी करून मग साफ सांगून पाठविलें कीं, वाट मिळणार नाहीं. थोडें तोंड फिरवून ते रोमन सरहद्दीच्या शेजारून जाऊं लागले. त्या वेळीं सीझरला पक्का वहीम आला कीं, या रानटांचें पश्चिमेकडील प्रयाण म्हणजे पश्चिमेकडील गॉल देशांत रोमनांविरुद्ध होऊं घातलेल्या प्रचंड डावाची प्रस्तावना आहे. अर्थात् शेजारी जाऊं देवोत कीं न देवोत, आपल्या रक्षणासाठीं तरी त्यांना हालूं देतां उपयोगी नाहीं असें सीझर यानें ठरविलें. त्यांनीं मात्र शोण–नदीपार होण्याचें काम सुरू केलें. त्यांच्या फौजा दोहींकडे पांगल्या आहेत हें पाहून सीझरनें जोराचा हल्ला केला व एक सबंध तुकडी कापून टाकली. आम्हीं काय करावें म्हणून त्यांच्या नायकांनीं धाडलेल्या निरोपास 'आल्या वाटेनें परत जावें व परत येणार

नाहीं म्हणून माणसें ओलीस द्यावीं ' असें उत्तर सीझरनें धाडिलें. हेल्वेटीनीं उत्तर केलें, ओलीस देण्याची आमच्यांत चाल नाहीं; मागण्याची मात्र आहे ! ' थोड्याच दिवसांत लढाईस तोंड लागलें. त्यांच्यापाशीं ९२००० कडवे जवान लढाईस तयार होते. सीझरची फौज लहान होती; पण युद्धकलेचें ज्ञान आणि शिस्त यांपुढें नुसत्या आडदांडपणाचें आणि तामस बेफामपणाचें कांहीं चाललें नाहीं. बारा वाजल्यापासून रात्र पडेपर्यंत घनचक्कर युद्ध झालें. हेल्वेटीचीं निम्मी फौज गारद झाली. उरलेल्यांनीं बायकापोरांकडे पाहून पालविलें आणि ते सीझरला शरण आले. एवढी उठलेली वावटळ सीझरनें जागच्या जागीं जिरवून टाकली; यामुळें घरचे मित्र व उत्तरेकडील शत्रु चकित होऊन गेले. दुडगरीवर हात ठेवण्याऱ्या गॉल लोकांनीं अभिनंदनासाठीं वकील धाडले. पण मोठें काम अजून पुढेंच होतें.

स्वित्झर्लंडच्या पलीकडील जर्मन्स हे फार मग्रूर होते व त्यांचें संख्याबळही अवाढव्य होतें. ॲरिओरस्टस हा त्यांचा तरुण म्होरक्या वरून वरून रोमनांस इमान दाखवी; पण पोटांतून त्यांजवर जळफळत असे. त्याचा समाचार सीझरला घ्यावयाचा होता; कां कीं, आज ना उद्यां हे रानटे एक होऊन रोमन राष्ट्राच्या चिंध्या करणार हें स्पष्ट होतें. तसेंच हे जर्मन्स रोमन मांडलिकाच्या मुलुखांत शिरलेले होते. मोठी तयारी करून सीझर त्यांजवर चालून गेला. त्यांच्या पुढाऱ्यानें मुलाखतीसाठीं सीझरला बोलाविलें व तेथें विश्वासघात करून त्याला पकडण्याचें त्यानें ठरविलें. भेटीच्या वेळीं सीझरला लांचलुचपतीचेंही तो बोलला आणि तुम्हांला तुमच्या देशांत कोणीही विचारीत नाहीं, तुम्हांला धरण्याविषयीं मला गुप्तांतून लिहून आलें आहे, अशा अनेक गोष्टी करून त्यानें ठरविल्याप्रमाणें सीझरवर अचानक छापा आणला; पण तो झिंजाडून देऊन सीझर आपल्या तळावर परत आला. त्याच्या फौजाही

जर्मनांचें नांव ऐकून थोड्या दणकल्याच होत्या व कित्येक पलटणींनीं हुकूम तोडण्याचेंही ठरविलें होतें. पण सीझरने धाक दाखवून, चुचकारून, पाठ थोपटून, त्यांस ताळ्यावर आणिलें. झुंजाला तोंड लागलें. जर्मन्स राक्षसांसारखे लढले; पण रोमनांचीं शस्त्रें फार नामी होतीं त्यामुळें जर्मनांचा तग निघेना. ते घाबरे झाले आणि लढाई टाकून सुसाट पळूं लागले. सीझरचा हा दुसरा मोठा विजय होय.

जर्मनांचा मोड झाला पण अजून बेल्जी आणि नर्व्हीं हे ताठरच होते. फ्रान्सच्या उत्तरेकडे तो त्वरेने चालून गेला; आणि दारूला कधीं न शिवणाऱ्या त्या रणशूर नर्व्हींशीं त्यानें गांठ घातली. डुकर खळीस येतो तसे हे नर्व्हीं लढले. त्यांनीं सीझरला एकदां सपाटून चोप दिला; पण सीझरची दौड मोठी, आवरशक्ति मोठी, आणि युद्ध-कलेचें त्याचें ज्ञानही मोठें. तरी या उत्तरेकडील युद्धांत सीझरलासुद्धां घाबरें करणारा हा बलाढ्य शत्रु ठरला. अशा शत्रूशीं सीझरनें कधीं कोणीं ऐकला नाहीं असा सामना केला आणि सर्व रणांगण नर्व्हींच्या रक्तानें नाहून गेलें. सीझरच्या या तिसऱ्या विजयानें उत्तरेकडील शत्रूंची कंबर बसल्यासारखी झाली. उत्तरेकडे वर सरकून सीझर इंग्लिश चॅनलवर जाऊन उभा राहिला. आल्पसपासून उत्तर समुद्रापर्यंत म्हणजे आसेतुहिमाचल मुलूख सीझरनें पायतळीं घातला आणि रोमन साम्राज्याची ध्वजा समुद्र वलांडून खुद्द इंग्लंडांतही फडफडूं लागली. पुढील वर्षीं शत्रूंचें दुसरें एक पीक आलें. तेंही सीझरनें हातोहात कापून टाकलें आणि तिकडील मुलूख निष्कंटक करून टाकिला. या नऊ वर्षांत सीझरनें ३०,००,००० लोकांशीं लढाया केल्या. ८०० शहरें चढाई करून घेतलीं; ३०० राष्ट्रें खालसा केलीं; दहा लक्ष लोक ठार केले आणि दहा लक्ष कैद करून नेले; नेपोलियन हा आजपर्यंतच्या मारेकऱ्यांत मोठा मारेकरी म्हणून समजतात; पण

त्याने तरी इतकीं माणसें मारलीं असतील कीं नाहीं कोणास ठाऊक !

सीझरच्या या यशोदुंदुभीनें रोम शहरांतील लोकांच्या कानठळ्या बसेसें झालें. मित्रांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं; व शत्रूंना त्याच्याशीं दावा धरण्याची लाज वाटूं लागली.

मग क्रॅससला वाटलें आपणही कांहीं पराक्रम करावा म्हणून त्यानें युफ्रेटीसकडे एक स्वारी काढली. पण त्याला लढाईचें कांहीं ज्ञान नव्हतें. तो नुसता नवकोटनारायण होता. पहिल्याच लढाईंत त्याचा पराभव होऊन तो मारला गेला. म्हणजे सीझरच्या लोकपक्षापैकीं एक आधार कोसळला; दुसरा जो पॉंपे तोही डळमळूं लागला. कारण सीझरच्या यशानें तो दिपून गेला व त्याला मत्सर वाटूं लागून तो श्रेष्ठांच्या अंगास मिळाला. रोम शहरीं कित्येक लोकांना असें वाटूं लागलें कीं, या जयांनीं सीझर शेफारून जाईल व ससैन्य येऊन रोमचा मालक होऊन बसेल. म्हणून सेनेटनें त्याला एक वर्ष आधीं परत बोलाविलें. पॉंपेनेंही यास होकार भरला. मोहिमशीर सरदारानें फौज खालसा करून सड परत यावयाचें तसें या असा हुकूम सेनेटनें त्यास केला. सीझरनें उत्तर केलें कीं, पॉंपेची फौज खालसा करा मग मी आपली करतों. फार जास्त न बोलतां तो रुबिकॉन नदी उतरून खुद्द रोमन भूमीवर ससैन्य दाखल झाला. याचा अर्थ असा कीं, रोमन रिपब्लिकचा कायदा त्यानें पायाखालीं तुडविला. हें त्यानें गैर कृत्य केलें; पण लोक त्याला अनुकूल होते. या दहा वर्षांत पॉंपेही आंबल्यासारखा झाला होता. लोकांचा कल पाहतांच पॉंपे इटली सोडून गेला. पण तो शत्रु बनला आहे हें पाहून सीझरनें त्याला उसंत पडूं दिली नाहीं. त्याचा निःपात करावयाचें ठरवून सीझर ग्रीसपर्यंत गेला. मग पॉंपेचा मोड होऊन तो इजिप्त देशांत गेला. तेथें त्याला इजिप्तच्या राजानें ही ब्याद येथें नको म्हणून ठार मारून टाकलें ! याप्रमाणें या महानुभाव पॉंपेचा अंत

झाला. यामुळें लोकपक्षाचा झुकलेलाच पण दुसराही खांब वसला. तिकडे कॅटोनें आफ्रिकेंत श्रेष्ठांची जमवाजमव चालविली होती. म्हणून सीझरनें तिकडे जाऊन त्याचा मोड केला. म्हणून कॅटोनेंही आत्म-हत्या केली. शेवटीं सीझरच्या पिढीचे सगळे दांडगे लोक नाहींसे झाले. फक्त सिसरो काय तो उरला; पण तो नुसता तोंडपाटील होता. याप्रमाणें आफ्रिकेपासून इंग्लंडपर्यंत व टायग्रीसपासून पोर्तुगालपर्यंत सीझरला निर्वीरमुर्वीतलम झालें.

वीस दिवसपर्यंत रोम शहरांत जयजयकार चालू होते. होत्या त्या सगळ्या, आणि नव्हत्या त्या उत्पन्न करून, सेनेटनें सर्व पदव्या त्याला दिल्या. आपल्या विरुद्ध ज्यांनीं खटपटी केल्या होत्या त्यांना सीझरनें उदार मनानें माफी दिली. शत्रूचे कागदपत्र त्याच्या हातीं अचानक लागले; पण ते त्यानें न वाचतांच जाळून टाकले. त्यांत त्याचा थोरपणा दिसून येतो. लोकांस हवे होते ते कायदे त्यानें केले. सूला आणि पाँपे यांची स्वदेशाबद्दलची कामगिरी लक्षांत घेऊन त्यानें त्यांचे पुतळे उभे केले आणि 'मरणान्तानि वैराणि' हा न्याय खरा केला. आपली खासगी मिळकत त्यानें लोकांच्या नांवानें करून दिली व सावकारांस साफ न बुडवितां कर्जबाजाऱ्यांना सुटी दिल्या. लोकां-तील अनीतीला आळा घालण्यासाठीं कायदे केले. सेनेटमध्यें फक्त श्रेष्ठच असत. तेथें इतरांचाही प्रवेश त्यानें कायदेशीर ठरविला. पंचांगांत म्हणजे कालमापनांत फार चुका सांचत आल्या होत्या; म्हणून चालू वर्षांत तीन अधिक मास धरून त्यानें कालमापन शुद्ध केलें व सौरवर्ष चालू केलें. तेव्हां वर्ष मार्चांत सुरू होई. वर्षाच्या पांचव्या महिन्याला त्यानें ज्युलियस म्हणजे जुलै हें आपलें नांव दिलें. असो. अशा प्रकारें त्यानें रामराज्य चालू केलें. दरम्यान सीझरला राजा करावें अशी हूल कोणी भक्तांनी उठवली, अथवा खुद्द सीझरनेंच तो डाव

[illegible] ठा . स्थळप्रत
[illegible] ... .... वि: ....................
[illegible] .................. नों. दि: ..............

खेळून पाहिला असें कोणी म्हणतात. भर: दरबारांत ॲंटनीनें त्याच्या डोक्यावर राजमुकुट ठेवीत ठेवीत म्हटलें, "लोकांच्या तर्फे मी आपणांस हा अर्पितों." पण लोकांतून निषेधध्वनि उमटला. सीझर तर सावधानच होता. तो उंच घोष करून म्हणाला, 'हें राजभूषण मला नको, नको, नको; त्या देवतेला घाला.' त्याच्या वैऱ्यांनीं या गोष्टीचा फायदा घेतला. सीझरला आतां ५६ वें वर्ष लागलें होतें. पोटीं पुत्र-संतान नव्हतें. म्हणून भाचीचा मुलगा त्यानें दत्तक घेतला, हाच पुढें ऑगस्टस म्हणून गाजला.

सीझरची काठी उंच व सडपातळ होती. केवळ चेहऱ्यावरून पाहिलें तर तो इतर रोमन लोकांच्या मानानें जास्त सुसंस्कृत असावा असें दिसे. त्याचें कपाळ हुंडें आणि रुंद असून नाक पातळ व उंच होतें. ओंठ मोठेच होते; पण डोळे मात्र गरुडाच्या डोळ्यांसारखे काळसर घारे होते आणि गर्दन मोठी वळीव व भरलेली दिसे. तो दिसण्यांत फिकट दिसे. दाढीमिशा काढावयाचीच त्याची पद्धत होती. डोक्यावरचे केसही आंखूड व पातळ असून शेवटीं शेवटीं त्याच्या डोक्याला मोठें टक्कल पडलें होतें. तें झाकण्यासाठीं डोक्यावर तो हार घाली. सभेंत बोलत असला म्हणजे त्याचा आवाज उंच झाल्यामुळें कर्कश बने. मरेतोंपर्यंत त्याची प्रकृति अगदीं खणखणीत राहिली होती. फक्त शेवटच्या वर्षी त्याला वाताचे झटके येऊं लागले होते. कोणी म्हणतात त्याला जन्मभर घुरें येत असे. त्याला आंघोळीस पाणी फार लागे. आणि एकंदरीनें सगळ्याच बाबतींत स्वच्छतेसंबंधीं तो फार खाराखिरी करी. जेवतांना चांगलें लागलें म्हणून उगाच अन्नावर ताव मारणें हें त्यानें कधींच केलें नाहीं. किंबहुना पानांत काय पडेल तें बिन-तक्रार खावें हीच त्याची पद्धत होती. तो दारूला कधीं शिवला-

सुद्धां नाहीं. तरुणपणीं तो चांगला पहिलवानासारखा दिसे. सर्व मर्दानी खेळ खेळण्यांत तो बडा पटाईत असून घोडयावर बसण्यांत तर चांगलाच वाकबगार होता. या घोडयाच्या बाबतींत तर तो इतका चिकित्सक असे कीं, त्यानें आपल्यासाठीं म्हणून एका चांगल्या अवलादीच्या घोडयाची पैदास केली होती व तो घोडाही इतर कोणाची स्वारी स्वतःवर होऊं देत नसे. या घोडयाच्या पायाला गेळें होतें व म्हणून सीझरला यश मिळतें असें लोक समजत. अगदीं लहानपणापासूनसुद्धां सीझरच्या सच्चेपणाबद्दल त्याच्या मित्रांची खात्री असे. कोणीं कुरापत काढली तरीसुद्धां भांडत बसण्याचा त्याचा स्वभावच नसे. चांगल्या कुलीन घराण्यांत वाढल्यामुळें त्याची नेहमींची वागणूक शांत, सभ्यपणाची व आदबशीर अशी असे. एकदां असें झालें कीं, तो कोठेंसा जेवावयास गेला असतां पानांत वाढावयाची फोडणी अगदीं करपून गेली होती. तरी आपण ती खाल्ली नाहीं तर आपणांस जेवावयास बोलविणारास वाईट वाटेल म्हणून, त्यानें ती मुकाटयानें खाऊन टाकिली. ओपिअस नांवाच्या मित्राबरोबर रानांतून प्रवास करीत असतां त्याला एकदां एका खोपटांत मुक्कामास राहावें लागलें. तेथें पहातात तों एकच अंथरूण सांपडलें. पण ओपिअस थोडासा आजारी असल्यामुळें त्यानें तें ओपिअसला दिलें व आपण स्वतः उघडया भुईवरच निजला. वास्तविक या गोष्टींत विशेष कांहीं आहे असें नाहीं. पण कांहीं मोठया माणसांचें मोठेंपण असल्या बारीक गोष्टीपर्यंतसुद्धां पोंचलेलें असतें इतकें यावरून दिसून येतें.

अशा या परम धीरोदात्त पुरुषाचा अंत नकळत जवळ आला. हा पुढें मागें राजा होणार ही हूल बद्धमूल झाली. भक्तांनीं दाखविलेला नैवेद्य विषवत् झाला. ' रोमन लोकसत्ता बुडणार ' अशा खोटया अफवा

त्याच्या शत्रूंनीं उठवून गुप्त कट आरंभिला. निकटचे मित्र तोंडदेखलें हंसून शत्रू बनले. 'तुमच्या जिवाविरुद्ध कांहीं कट चालू आहे; संभाळा' असे इशारे अनेक आले; पण त्यानें ते हंसण्यावारी नेले. आपणांस कोणी व कां मारावें हेंच त्यास कळेना. ...जरेसुद्धां तो बरोबर घेईना व कमरेची तलवारही जवळ बाळगीना. इतकि...निर्धास्त तो बनला. मार्चची १५ तारीख आली. त्या दिवशीं सेनेटची...होती; म्हणून या सर्वाधिकाऱ्यास निमंत्रण आलें. मित्रांनीं खाजगतीन ...गितलें कीं, 'जाऊं नका.' पण तें त्यानें मानिलें नाहीं. वरांतून ...येशूर्वी...त्यांना त्याचा स्वतःचा पुतळा होता तो एकदम खालीं रेलला. हें अ... म्हणून ... पण तो थांबला नाहीं. सडकेनें एका हितचिंतकानें भवितव्याचे...र सुटल्यानंतर दिली ती त्यानें तशीच कुसकरून टाकिली. सेनेटमध्यें जाता

कपटी, बदमाष, मानकापू, पण वरवर हसणाऱ्या अशा मित्र सदाचार-स्वागत केलें; आणि तो स्थानापन्न होतांच त्या कटवाल्यांनी...ला होता हातीं एक अर्ज दिला. इतक्यांत एकानें त्याचा झगा हिसकला. ...हीं.' मिळतांच ते सर्व कटवाले आपल्या सुऱ्या घेऊन त्याच्यावर धावत... त्यांत पुत्रवत् मानलेला ब्रूटसही होता. "अरे ब्रूटस्, तूंही! (उलट-लास!)" असें तो खेदानें गद्गदून म्हणाला आणि आपल्या झग्याच्या पदरानें त्यानें आपलें तोंड झाकून घेतलें. एवढ्यांत त्याला दहावीस जखमा झाल्या. खालीं रक्ताचें थारोळें झालें आणि हा उमदा नरमणि, हा रणांगणावरचा व्याघ्र, हा लोकांचा कैवारी, हा विद्येचा व्यासंगी, हा पंडितांचा परामर्शी, हा मानवजातीचा प्रगल्भ प्रतिनिधि, मान लटकी पडून, गतप्राण होऊन खालीं कोसळला. ही गोष्ट ख्रिस्ती सनापूर्वी ४४ वे वर्षीं घडली.

* * *

# येशू ख्रिस्त

कर्ल व हेग                जो इसवी सन सध्यां चालू आहे तो
पुराणावरून पा                येशूच्या जन्मापासूनच धरलेला
झालेली होती                असल्यामुळें येशू केव्हां जन्मला हें
एकदां यात्र                निराळें सांगावयास नको. पॅलिस्ताइन

राहिला आ लिली परगण्यांत नाझारेथ येथें या थोर धर्मसंस्थापकाचा दोघे तर्सीला. कोणी म्हणतात कीं, नाझारेथच्या नजीक असलेल्या पुन्हा गांवीं तो जन्मला. रोमन शकाच्या ७५० सालीं ऑगस्टस यानें आपल्या साम्राज्याची खानेसुमारी करविली. तेव्हां हुकुमाप्रमाणें सर्व लोकांना नांवनिशी द्यावयास ठाण्यावर जाणें प्राप्त होतें. येशूचा बाप जोसेफ हाही आपल्या बायकोस घेऊन बेथलेम ठाण्यावर गेला होता. मेरी गरोदर होती. दिवस भरले होते, पण ठाण्यावर जाणें प्राप्त होतें. तेथें मुक्काम असतांच मेरी प्रसूत झाली. धर्मशाळेंत बाळंतिणीची व्यवस्था नीटशी लागेना. शेवटीं मेरीनें मूल बाळंत्यांत गुंडाळून गव्हाणींत निजविलें. पलीकडील रानांत मेंढपाळ आपलीं मेंढरें राखीत होते. एकाएकीं परमेश्वराचा दूत त्यांजपुढें प्रगट झाला व म्हणाला, ‘ मी तुम्हांला शुभवर्तमान सांगावयास आलों आहें. तुम्हांस तारणारा आज जन्मला आहे. गांवांत जा आणि पहा. बाळंत्यांत गुंडाळून गव्हाणींत

निजविलेलें जें बालक तुम्हांस दिसेल, तेंच तुमचा तारक होय.' धनगर भयानें व आश्चर्यानें चकित झाले! कारण, हा दूत परम देदीप्यमान होता व त्यानें सांगितलेली वार्ता त्यांना अभावितच होती. दूत अंतर्धान पावला व धनगर लगबगीनें बेथलेमकडे निघाले. येऊन पहातात तों गव्हाणींत एक गोजिरवाणें अर्भक निजविलेलें दिसलें. असें असें वर्तमान आपणांस देवदूतानें येऊन सांगितलें, इत्यादि गोष्टी त्यांनीं इतरांस सांगितल्या. सर्व लोक बालकाचें दर्शन घेऊन आश्चर्य करीत घरोघर गेले. आठ दिवस झाल्यावर तेथील पद्धतीप्रमाणें येशूची सुंता करण्यांत आली व त्याचें नामकरणही झालें. पुढें पहिला मुलगा म्हणून यरुशलेम येथील देवालयास ओहोरजत्रा करणें इष्ट असल्यामुळें सोयर सुटल्यानंतर आईबाप आपल्या मुलासह यरुशलेम येथें गेले.

या शहरांत कोणी सायमन नांवाचा अत्यंत सदाचार-संपन्न असा एक गृहस्थ राहात असे. त्यास दृष्टान्त झाला होता कीं, 'तुला ख्रिस्ताचें दर्शन झाल्यावांचून मरण यावयाचें नाहीं.' येशूला आईबापांनीं देवळांत आणतांच या सायमननें या लहानशा अवतारी पुरुषाला आपल्या हातांत घेतलें व परमेश्वराची स्तुति केली. पुढें कांहीं दिवसांनीं पूर्वेकडील प्रदेशांतून कोणी मागी नांवाचे लोक यरुशलेम येथें येऊन बोलले कीं, 'यहुद्यांचा जो नवा राजा उत्पन्न झाला आहे तो कोठें आहे? आम्हीं पूर्व दिशेला त्याचा तारा पाहिला व त्याला नमन करावयास आलों आहों.' हें ऐकून तेथील राजा हेरॉड फार घाबरा झाला. त्यानें मुख्य मुख्य पुजारी व वडवे यांस जमा करून विचारिलें कीं, 'मागी म्हणतात त्या येशूचा जन्म कोठें झाला असावा?' ते म्हणाले, 'बेथलेम गांवीं. कारण, पूर्वीचें असें भविष्यच आहे कीं, बेथलेम सुभ्यांतून इस्रायल लोकांना पाळणारा अधिकारी उत्पन्न होईल.' हेरॉड यानें मागी लोकांस सांगितलें कीं,

'तुम्ही या नवीन अवताराचा चांगला शोध करा. तो कोठें आहे हें कळलें म्हणजे मीही त्याच्या दर्शनास जाईन.' मागींनीं त्याचें मनोगत ओळखिलें. डोईवरील तारा जाईल तिकडे मागी गेले. येशू ज्या घरांत होता त्या घरावर येतांच तारा थांबला. खूण पटून मागी घरांत गेले व त्यांनीं येशूस नमन केलें. आपलें वटवे उघडून त्यांनीं सोनें, ऊद व बोळ हीं त्या मुलास अर्पिलीं व हेरॉड यास चुकविण्यासाठीं भलत्याच वाटेनें ते आपल्या देशीं निघून गेले. हेरॉडची ही दुष्ट इच्छा जाणून जोसेफ व मेरी यांनीं आपल्या गांवांतून मिसर देशाकडे पलायन केलें व हेरॉड मरेतोंपर्यंत तीं तेथेंच राहिलीं. जुन्या ख्रिस्ती पुराणावरून पाहतां हें असें घडून येईल अशी भविष्यवाणी आगाऊच झालेली होती. पुढें दरवर्षीं मुलाला घेऊन आईबाप यरुशलेमास जात. एकदां यात्रा संपवून परत जातांना त्यांना दिसून आलें कीं, येशू मागेंच राहिला आहे. त्यांना वाटलें मुलें मुलें मिळून येत असतील; म्हणून तीं दोघें तशींच पुढें झटकलीं; पण तो येतां दिसेना. असें पाहून तीं दोघें पुन्हा यरुशलेमास आलीं. पहातात तों शास्त्री-पंडितांच्या मेळांत बसून येशू कांहीं अध्यात्मचर्चा करीत आहे. त्याच्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीवरून हा मुलगा महान् बुद्धिमान् आहे असें सर्व लोक उमगले. चर्चा आटोपल्यानंतर आईबापांबरोबर येशू नाझारेथ येथें गेला. वास्तविक या वेळीं येशूचें वय केवळ बारा वर्षांचें होतें. पण एवढ्याशा वयांत त्याच्या बुद्धीला प्राप्त झालेलें परिणत रूप पाहून हा पुढें अवतारी पुरुष ठरणार अशी सर्वांची खात्री होऊन चुकली. हा अवतारी पुरुष आहे ही कल्पना करणें व ही कल्पना जुळणें फारसें अवघड नव्हतें. कारण अवतार येणार आहे अशी भविष्यवाणी अनेकदां उठली होती व नवीन अवताराची वाट मिसर देशांतील सर्व शहाणे लोक आतुरतेनें पहात होते.

पण ही अवताराची भूक समाजास कां लागली होती ? अवतार हा शब्द खिस्ती किंवा मुसलमानी धर्मतत्त्वांप्रमाणें चुकीचा आहे. त्यांचा खरा शब्द म्हणजे 'प्रेषित' हाच होय. 'ज्या ज्या वेळीं धर्माची ग्लानि होईल त्या त्या वेळीं मी अवतरतों, सज्जनांचें संरक्षण व दुष्टांचें निर्दलन मी प्रत्येक वेळीं करीत असतों' असें आश्वासन हिंदूंच्या देवानें त्यांस दिलें आहे. खिस्ती देव स्वतः केव्हांही अवतरत नाहीं, तर आपल्या पुत्रास धाडतो. देव स्वतः अवतरतो, कीं पुत्रांकरवीं कार्यभाग उरकून घेतो याचा निकाल करणें केवळ आध्यात्मिकांसच शक्य आहे; पण इहलोकची घडामोड पाहणारांस असें दिसतें कीं, कोणी ना कोणी – मग तो अवतार असो अथवा प्रेषित असो – भूलोकावर उत्पन्न होतो व त्या त्या ठिकाणच्या मनुष्ययोनीच्या जीवितांत जीं वैगुण्यें उत्पन्न झालीं असतील किंवा योग्य त्या गुणांचा अभाव झाला असेल, तीं दुरुस्त करून किंवा ते गुण उत्पन्न करून लोकांच्या जीविताचा गाडा सुरळीत चालू करून देतो. म्हणजे असें कीं, पूर्वी उत्पन्न झालेल्या पीठिका झिजत जातात व भावडीं माणसें त्या पीठिकांच्या धसड्यांसच लोंबकळत राहतात. त्यांना नवीन बंधनें हवीं असतात. लोक जेव्हां जुन्या शास्त्राच्या विरुद्ध बोलूं लागतात तेव्हां त्यांना शास्त्रच नको असतें असें नाहीं; तर तें जुनें शास्त्र नको असतें इतकेंच. म्हणून नवीन शास्त्र उत्पन्न करून त्या गवसणींत ह्यांचें जीवित जो कोणी बरोबर बसवून देईल तो त्या युगाचा आरंभक होय. ही गोष्ट इतिहासांत वरचेवर झालेली आपण पाहतों. एखादा मनुष्य आपल्या पिढीपुरताच तत्त्वज्ञानी किंवा कार्यकर्ता ठरतो. दुसरा एखादा अशी करामत करतो कीं, आजूबाजूचीं शंभर वर्षे त्याच्याच नांवावर मोडतात; लोक त्याला सेंचूरियन् म्हणतात. त्याची सद्दी संपली – म्हणजे त्याची शंभर वर्षे टिकणारी कल्पना संपली; म्हणजे नवीनाची सद्दी सुरू होते. हीच कर्तबगारीची व कल्पनेची

व्याप्ति वाढत गेली म्हणजे आपल्या सामर्थ्यानें आजूबाजूच्या हजार वर्षांवर हुकमत गाजविणारा पुरुष निःसंशय उत्पन्न होतो असें दिसेल. यालाच कदाचित् लोक परमेश्वराचा अवतार अथवा प्रेषिताचें येणें म्हणत असतील. पण हें अवताराचें अथवा प्रेषिताचें येणें म्हणजे कोणच्याही ठिकाणीं ज्याची घटना झाली नाहीं असा कांहीं उत्पात नव्हे. किंबहुना ज्याला आपण उत्पात म्हणून म्हणतों तो बिनचौकसबुद्धीला उत्पात वाटेल; कार्यकारणाची मीमांसा पाहणारांना वाटणार नाहीं. हे जे अवतारी किंवा प्रेषित पुरुष येतात त्यांच्या जीवितांतील संदेश केवळ त्यांच्याच तोंडून पहिल्यानें बाहेर पडतो असें नव्हे. त्या संदेशाची जरुरी आणि त्याची गुणगुण हीं आधीं कित्येक वर्षें समाजांत चालू असतात. इतकेंच कीं, हळूहळू वाढत असलेल्या व मंद आवाजानें नादावत असलेल्या या संदेशाला त्याच्या हातीं भव्य व कदाचित् उग्र असें सुद्धां रूप प्राप्त होतें व मग झोपा काढणारे लोक एकमेकांस सांगतात कीं, ‘उठा, अवतार झाला’; परंतु आधींच्या अज्ञानतिमिरांत जे ‘संयमी’ जागे असतात त्यांना प्रभातकालाचीं चिन्हें आधीं दिसूं लागतात, शुक्राचा तारा चमकूं लागतो व पूर्व दिशा उजळूं लागते. मागी लोकांना तारा दिसला व या ताऱ्याच्या मागोमाग येशूरूप ज्ञानसूर्याचा उदय खास होणार हें त्यांच्यासारख्या प्रज्ञावंतांनीं निश्चित ओळखिलें होतें.

पण येवढ्यानेंच झालें नाहीं. आपापले जीवितहेतु न ओळखणारे आपण बहुतेक असतों. आपल्या मनाच्या आकांक्षा व आपापलीं सामर्थ्यें यांची तोलदारी कितपत आहे याचा हिशेब लागलेला नसतांनाच आपला जीवितहेतु निश्चित करणारे शेंकडो लोक असतात व प्रत्येक ठिकाणीं फसगत झाल्यामुळें रोज नवीन कामाची उठावणी करतात; पण असेही कांहीं थोडे असतातच, कीं जे मागचें

पुढचें पहातात, आपलीं सामर्थ्यें तोलतात व मग त्यांस मनापासून असें वाटतें कीं, अमुक एक काम हें आपलेंच होय. त्यांत सर्व हयात खर्च केल्यावर आपल्याहून बलवत्तर माणसाची ते वाट पहात बसतात. या कामीं त्यांस मानहानि वाटत नाहीं. कारण ते तत्त्वज्ञानी असतात. येशू जन्मास येऊन आपलें काम करूं लागावयाच्या आधीं त्या प्रांतांत जॉन दि बॅप्टिस्ट म्हणजे बाप्तिस्मा देणारा योहान्न उत्पन्न झाला होता. हा योहान्न याच कोटींतील होता. लोक पातकी झाले आहेत, नीतिविचारांपासून भ्रष्टले आहेत. परमेश्वराचीं विकृत रूपें पूजीत आहेत आणि सर्वांहून वर, मानव्याचे सर्व विचार ज्याच्या रूपांत विलीन होतात त्याजवरची माणसांची श्रद्धा उडाली आहे, हें ज्ञाते लोक जाणतच होते. पण आतांच सांगितलेला जॉन समाजाची दुरुस्ती करण्याची कल्पना घेऊन उठला होता. हा धर्मसुधारक कडकडीत वैराग्यशील होता. कित्येकांच्या मतें हिंदुस्थानांतील बुद्ध-भिक्षूंच्या संन्यासविषयक कल्पना त्यानें हिंदुस्थानांतच अभ्यासिल्या होत्या. काषाय वस्त्रें अंगावर घालावीं; उंटाच्या लोंकरीचीं वस्त्रें पांघरावींत; रानावनांत झाडाचा पाला खावा; टोळ तोंडी लावावे व फळांचा मगज खाऊन नरवंटीनें पाणी प्यावें; चाळीस चाळीस दिवस उपवास करून शरीर कष्टवावें व या देहदंडानें आत्म्यावरील पातकाचे लेप जाळून टाकावे; असें तो कित्येक वर्षें करीत होता. याप्रमाणें आपली तयारी केल्यावर लोकांस पुनीत करण्याचें काम त्यानें आरंभिलें. पण त्यांना तरी शुद्ध कसें करावयाचें ? येथून तेथून सारें राष्ट्र पातक्यांनीं भरून गेलें होतें. या सर्व पातक्यांचें पुढें काय होणार ही चिंता या योहान्नास लागली होती. जरुरीप्रमाणें तत्त्वज्ञान वळवितां येतें. या संकटावर इलाज म्हणून जॉननें ठरविलें कीं, लोक जर पश्चात्ताप पावतील व ‘ क्षमस्व ’ म्हणून परमेश्वरास शरण जातील

तर ते उद्धरून जातील. ह्या इलाजाचा घोष त्यानें सर्वत्र उठविला. ‘ तुम्हांस पश्चात्ताप होऊं द्या. पश्चात्तापाचें चिन्ह म्हणून मी सांगतों हा प्रोक्षणविधि पवित्र जॉर्डन नदीचे तीरावर करा म्हणजे तुम्हांला सद्गति प्राप्त होईल ’ हाच त्याचा संदेश होय. हजारों लोक कीं, ज्यांनीं पातकें आचरिलीं होतीं; पण ज्यांना थोड्या शिक्षेनें सद्गति हवी होती त्यांना पश्चात्तापाचा इलाज अर्थातच मानवला असावा परमेश्वर न्यायी आहे हें तत्त्वज्ञान पातकी लोकांना मोठें जाचावें वनतें व म्हणून ते असें ठरवितात कीं, तो दयाळूही आहे. एकदां परमेश्वरास दयाळू म्हणून मानिलें म्हणजे ‘ माझे अपराध पोटांत घाल ’ अशी प्रार्थना कसल्याही पातक्यास सहजच करतां येते. परमेश्वराचें दयालुत्व जसें सोईचें आहे तसेंच पश्चात्तापाचें तत्त्वही सोईचेंच आहे. पण या प्रकरणांत उपरोधाचीही जरुरी नाहीं. पातक जर झालें असलें तर त्याची निष्कृति पश्चात्तापानें होऊं शकेल याची मनोमय साक्ष सर्वांनाच आहे; असो. बाप्तिस्मा देणारा जॉन प्रायश्चित्ताचा विधि सांगून व जॉर्डन नदीमध्यें बुचकळी मारावयास सांगून शेंकडों लोकांना पावन करून घेऊं लागला. सहस्रावधि लोक अशा रीतीनें मुक्त झाले. ठराविक धर्मोपदेशकांना मात्र हें नवीन कुलंगडें काय आहे हें कळेना.

हा वेळपर्यंत तिकडे येशू ख्रिस्त परमार्थविचारांत हळूहळू प्रगल्भ होत चालला होता. त्याच्या कानावर जॉनच्या पराक्रमाची वार्ता पोहोंचलेली होती. येशूपेक्षां जॉन हा सरासरी दहा–पंधरा वर्षांनीं मोठा असेल. अर्थात् तितक्या मानानें, व तसेंच जॉनचें कडकडीत वैराग्य, त्याची फटिंग वृत्ति, लोकसेवेची आतुरता व राजा असो, कीं रंक असो, त्याच्या पातकाचा निषेध करतांना प्रवृत्तीस चढणारा त्याचा उन्माद यांमुळें, येशूला तो आपल्याहून श्रेष्ठ आहे असें

सहजच वाटलें. अर्थात् हा वेळपर्यंत संभापणपद्धतीनें त्यानें जे चार दोन शिष्य बनविले होते, त्यांसह तो जॉनकडे बातिस्मा घेण्यासाठीं गेला. जॉन जरी अगदीं कडकडीत व अधिकाऱ्यांशीं फटकळ असा होता, तरी तो चांगल्या माणसाशीं फार विनयानें वागत असे. येशूस पाहून त्याला वाटलें कीं, हा पोरसवदा माणूस, पण आपल्याहून श्रेष्ठ आहे. तो म्हणाला, 'मी तुमचा जोडा पुसण्याच्या सुद्धां लायकीचा नाही. मीं तुम्हांस बातिस्मा काय द्यावा?' येशू म्हणाला, 'आपण असें बोलूं नये. जी आशा मीं मनांत धरली आहे ती सफल करावी.' मग जॉर्डनतीर्थावर जॉननें येशूस बातिस्मा दिला. ख्रिस्ती लोक मानतात कीं, या वेळीं आकाशाचे दरवाजे उघडले आणि परमेश्वराच्या शुद्ध हेतूस शोभणारें असें एक पांढरें स्वच्छ कबूतर शांतपणें आकाशांतून खालीं येऊन येशूच्या मस्तकावर बसलें. जॉननें ओळखलें कीं, हा आपणाहून पूर्ण आहे. गोऱ्या कुंभाराच्या थापटणीनें वाजविलें असतें तर जॉनचें मस्तक बदवदलें असतें आणि येशूचें खणखणून वाजलें असतें. यापुढचा जॉनचा जीवनक्रम अतिशय संकटांचा व कष्टाचा गेला; पण आपल्याला त्याशीं कर्तव्य नाहीं. राजसत्तेशीं हुज्जत घातल्यामुळें त्याजवर संकट आले, हें पाहून येशूनें राजकारणाकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. जॉनची शुद्धिकल्पना मात्र त्यानें जोरानें पुढें ढकलली व नदीचें तीर मुक्त होऊं इच्छिणाऱ्या यात्रेकरूंनीं रोजच्यारोज गजबजूं लागलें. त्याचें बोलणें गोड व त्यांतील अलंकारही अगदीं साधे असून दाखले रोजच्या व्यवहारांतील असत. मांसाशन बंद करणें, ब्रह्मचारी राहणें, मद्यास स्पर्श न करणें या गोष्टी निदान धर्मद्रष्ट्यांना तरी जरूर आहेत असें तेव्हांचें मत होतें. येशूनें हीं व्रतें संभाळिलीं होतीं असें दिसतें. सर्व पॅलिस्टिन प्रान्तांतून पाप-

विमोचनासाठीं येशूच्या मागें लोक धावूं लागले; पण केवळ गोड बोलणें व सदाचारसंपन्न असणें येवढ्यानेंच येशूला यश मिळालें असें नाहीं.

येशू हळूहळू चमत्कार करूं लागला होता आणि म्हणून लोक त्याच्या भोंवतीं जमूं लागले. तो एके दिवशीं आपल्या मावशीच्या घरीं जेवणावळ होती म्हणून गेला होता. कदाचित् पाहुणे आयत्या वेळीं जास्त आल्यामुळें पिपांतील द्राक्षारस संपून गेला. मावशीला आपल्या भाच्याच्या सामर्थ्याची कुणकूण आगाऊच लागलेली होती. ती बहिणीस म्हणाली, 'मुलाकडून माझी लाज राख.' येशूनें पहिल्यानें कांहीं करून दाखविण्याचें नाकारिलें. पण मग त्यानें घरच्या चाकरास पिपें पाण्यानें भरावयास सांगितलीं. व त्या पाण्याकडे एकदां पाहून तो वाढप्यास म्हणाला, 'आतां तुम्ही खुशाल वाढावयास न्या.' वाढपे पाहातात तों उत्कृष्ट द्राक्षारस पिपांतून भरलेला दिसला ! येशूनें केलेल्या अनेक चमत्कारांतील हा पहिला होय.

अर्थात् त्याच्या भोंवतीं शिष्यांचा मेळा झपाझप जमूं लागला. थोडासा जोर उत्पन्न होतांच दरसालच्या जत्रेसाठीं येशू यरुशलेमास गेला. देवाचें देऊळ हें भक्तीसाठीं केलेलें; तेथें सत्त्वशील माणसांनीं बसावें, भक्तांनीं प्रार्थना करावी, आणि आर्तांना आश्रय मिळावा; पण तेथील देऊळ म्हणजे एक बडा सराफकट्टा झालेला होता. माणसें जमतात असें पाहून व्यापारी लोकांनीं गुरामेंढरांचे बाजार तेथें सुरू केले होते; कबुतरें विकणारेही कबुतरांचीं खुराडीं घेऊन तेथें बसत असत, आणि लोकांच्या जिनग्या डुलवावयास सोकावलेले सावकार तेथेंच व्याजबट्टा करीत असत. हा तेथील प्रकार पाहून येशू पराकाष्ठेचा संतापला व चवताळून जाऊन त्याने सराफांचीं

सहजच वाटलें. अर्थात् हा वेळपर्यंत संभाषणपद्धतीनें त्यानें जे चार दोन शिष्य बनविले होते, त्यांसह तो जॉनकडे बाप्तिस्मा घेण्यासाठीं गेला. जॉन जरी अगदीं कडकडीत व अधिकाऱ्यांशीं फटकळ असा होता, तरी तो चांगल्या माणसाशीं फार विनयानें वागत असे. येशूस पाहून त्याला वाटलें कीं, हा पोरसवदा माणूस, पण आपल्याहून श्रेष्ठ आहे. तो म्हणाला, 'मी तुमचा जोडा पुसण्याच्या सुद्धां लायकीचा नाही. मीं तुम्हांस बाप्तिस्मा काय द्यावा?' येशू म्हणाला, 'आपण असें बोलूं नये. जी आशा मीं मनांत धरली आहे ती सफल करावी.' मग जॉर्डनतीर्थावर जॉननें येशूस बाप्तिस्मा दिला. ख्रिस्ती लोक मानतात कीं, या वेळीं आकाशाचे दरवाजे उघडले आणि परमेश्वराच्या शुद्ध हेतूस शोभणारें असें एक पांढरें स्वच्छ कबूतर शांतपणें आकाशांतून खालीं येऊन येशूच्या मस्तकावर बसलें. जॉननें ओळखलें कीं, हा आपणाहून पूर्ण आहे. गोऱ्या कुंभाराच्या थापटणीनें वाजविलें असतें तर जॉनचें मस्तक बदवदलें असतें आणि येशूचें खणखणून वाजलें असतें. यापुढचा जॉनचा ...नक्रम अतिशय संकटांचा व कष्टाचा गेला; पण आपल्याला ...ीं कर्तव्य नाहीं. राजसत्तेशीं हुज्जत घातल्यामुळें त्याजवर ... आले, हें पाहून येशूनें राजकारणाकडे ढुंकूनहि पाहिलें ...ॅनची शुद्धिकल्पना मात्र त्यानें जोरानें पुढें ढकलली व नदीचें तीर मुक्त होऊं इच्छिणाऱ्या यात्रेकरूंनीं रोजच्यारोज जाऊं लागलें. त्याचें बोलणें गोड व त्यांतील अलंकारही अगदीं ... असून दाखले रोजच्या व्यवहारांतील असत. मांसाशन बंद करणें, ब्रह्मचारी राहणें, मद्यास स्पर्श न करणें या गोष्टी निदान धर्मद्रष्ट्यांना तरी जरूर आहेत असें तेव्हांचें मत होतें. येशूनें हीं व्रतें संभाळिलीं होतीं असें दिसतें. सर्व पॅलिस्टिन प्रान्तांतून पाप-

विमोचनासाठीं येशूच्या मागें लोक धावूं लागले; पण केवळ गोड बोलणें व सदाचारसंपन्न असणें येवढ्यानेंच येशूला यश मिळालें असें नाहीं.

येशू हळूहळू चमत्कार करूं लागला होता आणि म्हणून लोक त्याच्या भोंवतीं जमूं लागले. तो एके दिवशीं आपल्या मावशीच्या घरीं जेवणावळ होती म्हणून गेला होता. कदाचित् पाहुणे आयत्या वेळीं जास्त आल्यामुळें पिपांतील द्राक्षारस संपून गेला. मावशीला आपल्या भाच्याच्या सामर्थ्याची कुणकूण आगाऊच लागलेली होती. ती वहिणीस म्हणाली, 'मुलाकडून माझी लाज राख.' येशूनें पहिल्यानें कांहीं करून दाखविण्याचें नाकारिलें. पण मग त्यानें घरच्या चाकरास पिपें पाण्यानें भरावयास सांगितलीं. व त्या पाण्याकडे एकदां पाहून तो वाढप्यास म्हणाला, 'आतां तुम्ही खुशाल वाढावयास न्या.' वाढपे पाहातात तों उत्कृष्ट द्राक्षारस पिपांतून भरलेला दिसला! येशूनें केलेल्या अनेक चमत्कारांतील हा पहिला होय.

अर्थात् त्याच्या भोंवतीं शिष्यांचा मेळा झपाझप जमूं लागला. थोडासा जोर उत्पन्न होतांच दरसालच्या जत्रेसाठीं येशू यरुशलेमास गेला. देवाचें देऊळ हें भक्तीसाठीं केलेलें; तेथें सत्त्वशील माणसांनीं बसावें, भक्तांनीं प्रार्थना करावी, आणि आर्तांना आश्रय मिळावा; पण तेथील देऊळ म्हणजे एक बडा सराफकट्टा झालेला होता. माणसें जमतात असें पाहून व्यापारी लोकांनीं गुरामेंढरांचे बाजार तेथें सुरू केले होते; कबुतरें विकणारेही कबुतरांचीं खुराडीं घेऊन तेथें बसत असत, आणि लोकांच्या जिनग्या डुलवावयास सोकावलेले सावकार तेथेंच व्याजबट्टा करीत असत. हा तेथील प्रकार पाहून येशू पराकाष्ठेचा संतापला व चवताळून जाऊन त्याने सराफांचीं

खुर्द्यांचीं पोतीं उधळून दिलीं; चौरंग उलथेपालथे केले आणि हातांत कोरडा घेऊन गुरेंमेंढरें व सावकार या सर्वांना त्यानें झोडपीत देवळांतून हांकून दिलें; आणि तो उद्गारला कीं, 'मी परमेश्वराचा पुत्र आहें. माझ्या पित्याच्या मंदिराचा असा बाजार बनवूं नका.' अत्यंत शान्त व क्षमाशीलत्वाचा केवळ पुतळा म्हणून गाजत असलेल्या या धर्मसुधारकाच्या पूर्वचारित्र्यांतील संतापाचा कढ निःसंशय बोधप्रद आहे.

येथून पुढें थोडीसुद्धां काचकूच न करितां येशू बेलाशक सांगूं लागला कीं, 'येणार, येणार' म्हणून गाजत असलेला परमेश्वराचा प्रेषित तो मीच होय. मला त्यानें पाठविलें आहे व मी या पातकी जगाचा उद्धार करणार आहें. पातक्यांकडून मी इतकेंच वांछितों कीं, त्यांनीं मजवर श्रद्धा ठेवावी. मनांत थोडेंही किल्मिष न बाळगितां जो कोणी परमेश्वराच्या पुत्रावर म्हणजे माझ्यावर श्रद्धा ठेवील त्यास सद्गति मिळेल. अशा प्रकारचें निश्चयाचें बोलणें जॉनच्या हातून होईना. कारण आपला अपुरेपणा त्यास नेहमीं प्रतीत होत असावा. उलट येशूला असली शंका केव्हां शिवलीसुद्धां नाहीं. आपण परमेश्वराचे पुत्र ही गोष्ट येशूनें अनेक चमत्कार करून सिद्ध करून दिली. तो नाझारेथ येथें गेला व प्रतिपादनासाठीं त्यानें धर्मग्रंथ उघडला; तों आरंभालाच अशी ओळ निघाली कीं, 'हीन, दीन, पातकी जे कोणी असतील त्यांस सद्गति मिळेल आणि परमेश्वराचें राज्य लवकरच सुरू होईल. हें शुभवर्तमान सांगावयास परमेश्वरानेंच मला अभिषिक्त केलें आहे.' यांतील मर्म म्हणजे स्वतःकडे प्रेषितत्वाचा अधिकार घेण्याचा येशूचा हेतु श्रोत्यांच्या ध्यानांत आला. त्यांना हें खपलें नाहीं. त्यांनीं त्यास गांवाबाहेर घालविलें व 'तुझा कडेलोट करूं' अशीही धमकी त्यास दिली. येशू मुकाट्यानें तें गांव

सोडून निघून गेला. यापुढें त्यानें हें श्रद्धेचें प्रतिपादन इतकें वाढवीत नेलें कीं, आपल्यावर जो श्रद्धा ठेवील त्याला सर्व पापें माफ करण्याची जिम्मेदारी त्यानें स्वतःकडे घेतली. लोक म्हणत, ' एका देवावांचून पापाची क्षमा करण्याचा अधिकार कोणास असणार आहे ? ' येशू उत्तर देई, ' मी त्याचा पुत्र आहें. तो अधिकार मला आहे. ' एकदां आपल्या या बोलण्याचें प्रत्यंतर त्यानें लगोलग दाखविलें. हातापायांची जुडी होऊन खुडुक बनलेल्या एका रोग्याला तो म्हणाला, ' तुला तुझ्या पातकाची मी क्षमा करतों. तूं जागचा ऊठ व डोक्यावर खाटलें घेऊन चालूं लाग. ' येशू इतकें बोलतांच तो कित्येक वर्षांचा जरत्कारू तटकन् उभा राहिला ! प्रतिपादन आणि त्याचें प्रत्यंतर हीं एकमेकांच्या इतकीं नजीक आल्यामुळें लोकांचा विश्वास अर्थातच बळावत चालला.

पुढें आपल्या शिष्यांपैकीं त्यानें बाराजण निवडून काढिले व त्यांना ' प्रेषित ' असें नांव दिलें. या बारा जणांस त्यानें केलेले प्रतिपादन फार महत्त्वाचें आहे. तो म्हणे, " जे मनानें नम्र आहेत, ते विश्वाचें राज्य करतील. जे मनानें खिन्न झाले आहेत त्यांनाच शांति प्राप्त होईल. जे कोणी लव्हाळ्यासारखे नम्र आहेत, त्यांच्या वांट्याला पृथ्वीचें वतन येईल. ज्या कोणास खरी परमार्थाची तहान लागली आहे ते तृप्त होतीलच होतील. जे स्वतः लोकांवर दया करतात, ते स्वतः दयेस पात्र होतील. जे अंतःकरणानें शुद्ध, त्यांना परमेश्वर भेटेल. तुम्ही आज माझ्या मागें फिरत आहां, पण तुम्ही त्याच वेळी धन्य व्हाल किंवा धन्य ठराल, कीं जेव्हां लोक तुमची निंदा करतील, तुमच्या पाठीस लागतील, व माझ्यासाठीं तुमच्या कपाळीं सर्व तऱ्हेचे अपवाद येतील. शपथ वाहूं नका; आकाशाची शपथ वाहूं नका, कारण तें देवाचें आसन आहे; पृथ्वीची वाहूं नका,

कारण कीं, ती परमेश्वराची पायरी आहे; यरुशलेमाची वाहूं नका; कारण कीं, ती त्याची राजधानी आहे; इतकेंच काय, स्वतःच्या मस्तकाची सुद्धां आण वाहूं नका; कारण कीं, तें तुमचें नव्हे. त्यावरचा एकही केस आपल्या इच्छेप्रमाणें तुम्हांस काळा किंवा पांढरा करतां येत नाहीं. 'होय' म्हणावयाचें असेल तर 'होय' म्हणावें, 'नाहीं' म्हणावयाचें असेल तर 'नाहीं.' म्हणावें याहून जास्त जें बोलाल ती सैतानाची बरळ आहे. वाइटाचा प्रतिकार करूं नका, इतकेंच नव्हे तर कोणी तुमच्या उजव्या थोबाडीत मारली, तर डावा गाल त्याजपुढें करा. जर कोणी तुम्हांवर फिर्याद केली आणि अंगचा सदराही छिनवून नेला तर त्यास म्हणावें, 'हें धोतरही घेऊन जा.' जो कोणी तुम्हांस वेठीस धरून मैलभर रखडीत नेईल, त्यास म्हणावें, 'मी तुजबरोबर आणखी एक मैल येतों.' आजपर्यंत तुम्हांस सांगत आले आहेत कीं, शेजाऱ्यांवर प्रेम करावें व शत्रूंचा द्वेष करावा. तसेंच, डोळा फोडणाराचा डोळा फोडावा आणि दांत पाडणाराचा परत दांत पाडावा असेंही तुम्हीं ऐकत आला आहां. पण मी येशू तुम्हांस असें प्रतिपादितों कीं, तें चूक आहे. तुम्ही शत्रूंवरसुद्धां प्रेमच करा. जे तुमच्यावर बोटें मोडतील, त्यांचें सुद्धां शुभ चिंतीत जा. जे तुमचा द्वेष करतात, त्यांजवर उपकार करा. जे कोणी तुम्हांस छळतात आणि दुष्टाव्यानें राबवितात 'त्यांना देव सुखी ठेवो' असें म्हणा. हें तरी मी तुम्हांस कां सांगतों ? तर आपण परमेश्वराचीं लेंकरें आहों या तुमच्या म्हणण्याला कांहींतरी अर्थ उरावा. परमेश्वर काय करतो पहा. भल्याच्या व वाइटाच्या घरांवर आपल्या सूर्याचा प्रकाश तो सारखाच पाडितो ना ? न्यायी व अन्यायी यांच्या घरांवर त्याचे मेघ सारखेच वर्षतात ना ? मग तुम्ही जीं त्याचीं लेकरें तीं सुष्टांशीं सुष्ट पण दुष्टांशीं दुष्ट काय म्हणून होणार ? जो तुम्हांवर प्रेम करतो,

त्यावर तुम्हीं प्रेम केलें किंवा तुम्ही आपल्या भावासच नमस्कार केला तर यांत काय नवल? वाटचा चोरसुद्धां ही गोष्ट करतो. तुम्ही त्याच्याहून कांहीं जास्त असावें. परमेश्वर जसा समदृष्टि आहे तसें तुम्हीं असावें."

त्या वेळपर्यंत चालत आलेल्या यहुदी तत्त्वज्ञानांत व धर्मविषयक कल्पनेंत येशू ख्रिस्तानें हा स्पष्ट फरक पाडिला. हे त्याचे थोर उद्गार उपहास्य मानणें अतिशय सोपें आहे; ते कोणालाही करतां येतें; पण आपल्याला जी गोष्ट व्यवहार्य बनवितां येत नाहीं, तिचें स्वयंभू उंचपण केवळ अव्यवहार्यतेच्या मुद्दयावरच कोणासही ठेंगणें करतां यावयाचें नाहीं. तें उंचपण आपल्या मुठींत आलें नाहीं म्हणून उंचपणच नव्हे असें म्हणणें धाडसाचें होईल. दूर कां होईना, तें मनापुढें सारखें तेवत असलें, तर त्याच्या हव्यासानें रोखठोक व्यवहारांत थोडी तरी मृदुता उत्पन्न होईल.

येशूच्या चमत्कारांचा सपाटा सारखा चाललाच होता. आतांपर्यंत त्यानें रोगी तर कित्येक बरे केले होते; पण आतां एका गरीब विधवेच्या मेलेल्या मुलाच्या तिरडीला हात लावून त्यानें त्यास जिवंत केलें! या त्याच्या अद्भुत कृत्यामुळें त्याच्या भविष्यवादीपणाचा लौकिक सर्वत्र पसरला व आसपासच्या मुलुखांतून शेंकडों आर्त लोक दुःखमुक्त होण्यासाठीं जमूं लागलें! असले पराक्रम जरी तो करीत होता आणि सर्व मनुष्ययोनींहून आपण श्रेष्ठ आहों अशी ग्वाही आपणच देत होता, तरी त्याच्या वृत्तीला उन्माद असा कधीं शिवलाच नाहीं. बोलणें गोड व विनयाचें असल्यामुळें आणि अंगीकारिलेलें व्रत पापाची क्षमा करणें हें असल्यामुळें, वाटेल त्या प्रकारचे पातकी त्याच्या भोंवतीं गोळा होऊं लागले. जों जों पातक्याचे अपराध जास्त, तों तों येशूला त्याचा कळवळा जास्त. पातक्यास क्षमा करणें हें एकदां ठरल्यानें,

जास्त पातक्यास जास्तच दया दाखविणें हे मूळ विचारास अनुसरूनच ठरलें. सामान्य लोकांना ही तर्कपद्धति पटेना. एके दिवशीं एक वाईट चालीची बाई त्याजकडे आली व रडत, स्फुंदत त्याच्या पायांपाशीं उभी राहून, तिनें पदराखालीं आणलेली तेलाची वाटी बाहेर काढली. येशूच्या पायास तें तेल तिनें लाविलें व पश्चात्तापानें ती इतकें खळखळून रडली कीं, तिच्या अश्रूंनींच येशूचे पाय धुऊन निघाले! यावर तिनें आपले लांब सडक केंस हातांत धरून त्याचे पाय पुसले व ती शेजारीं मोठ्या अदबीने उभी राहिली. येशू म्हणाला, 'तुला पातकाची क्षमा झाली आहे. कारण, तूं मजवर प्रेम केलेंस व मजवर विश्वास ठेविलास.' वादळ शान्त करणें, पांच भाकरी व दोन मासे एवढ्यावरच पांच हजार लोक जेवावयास घालणें, पाण्यावरून चालणें, कोड्या लोकांस बरे करणें, जन्मान्धास दृष्टि देणें, मेलेल्यास जिवंत करणें, भुतें व झोटिंग काढणें अशांसारखे शेंकडों चमत्कार त्यानें भक्तमंडळास करून दाखविले.

अर्थात् जों जों भक्तमंडळी जास्त जमा झाली, तों तों त्यास आपल्या सामर्थ्याची जाणीव उत्पन्न होऊं लागली. पूर्वी एकदां यरुशलेम नगरींतील देऊळ शुद्ध करण्याचा उपक्रम त्यानें केलाच होता. तीच गोष्ट पुन्हा एकदां करण्याचें त्याच्या मनानें घेतलें. अर्थात् हा प्रयत्न जर केला तर विरोधाची वावटळ जोरानें उठेल व कदाचित् आपल्याला प्राणाचीसुद्धां किंमत द्यावी लागेल; पण द्यावी लागली तरी शुद्धीकरणाचा आपला हेतु खास तडीस जाईल असे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. आपलें मनोगत त्यानें शिष्यांस कळविलें. या त्याच्या भीषण कृत्यांत त्याला कोण मदत करणार? अर्थात शिष्यमंडळींत बरीच भवति न भवति झाली असावी. त्यानें मात्र निक्षून सांगितलें कीं, 'ज्याला माझ्या मागें यावयाचें असेल त्यानें आपल्या जिवाची आशा

सोडावी. आपला सूळ आपल्या खांद्यावर घ्यावा. जो कोणी जिवाची आशा धरून बसेल त्याला मृत्यु ठरलेलाच आहे. पण जो कोणी मरण पत्करील तो अनंत काल जिवंत राहील.' मग त्यानें आपले सहा सात शिष्य बरोबर घेतले व तो दूरच्या एका डोंगरावर चढला. तेथें उभे राहतात तों त्याचा चेहरा सूर्यासारखा तेजस्वी झाला आणि त्याची वस्त्रें सूर्याच्या कान्तीसारखीं शुभ्र झालीं व त्याच्या पूर्वीं होऊन गेलेले मोठाले प्रेषित जे मोझेस व एलिया हे दोघे त्याच्याशीं बोलत आहेत असें शिष्यांनीं पाहिलें. हे दिव्य पुरुष एकमेकांशीं बोलतांना पाहून भक्तांचे डोळे दिपले व भयानें ते खालीं तोंड करून भुईवर पसरले. येशूनें त्यांना धरून उठविलें व सांगितलें कीं, 'मी मरून पुन्हा उठेपर्यंत आतां पाहिलेली गोष्ट कुणास कळवूं नका.' येथून पुढें ते यरुशलेमास गेले. तेथें देवळांत येशूनें आपलें नवीन तऱ्हेचें प्रतिपादन जोरानें चालू केलें. पुजारी, बडवे व उपदेशक यांच्यांत मोठी चुळबूळ चालू झाली. श्रोते म्हणूं लागले, 'हा बेधडक नव्या गोष्टी बोलतो आणि हे देऊळवाले तर हूं कां चूं करीत नाहींत. त्यांची वाचा का बसली? येणार, येणार म्हणून म्हणतात तो प्रेषित हा नव्हे ना?' त्यांस उद्देशून येशू उद्गारला, 'मी असा तसा कोणी नव्हें. मला प्रत्यक्ष परमेश्वरानें धाडिलें आहे. हे त्याचे शब्द ऐकून त्याच्या मुसक्या बांधाव्या म्हणून पुष्कळांच्या मनांत आलें; पण कोणाच्यानेंही त्याजवर हात टाकवेना.

अशा प्रकारें त्याचा अंमल वाढत चालला. त्याचा उपदेश सर्व लोक मानूं लागले. एकानें त्याला विचारलें, 'मला अनंतकाल टिकावयाचें आहे, मीं काय करावें?' येशू उपदेश करूं लागला : व्यभिचार करूं नको; हत्या करूं करूं; चोरी करूं नको; खोटी साक्ष देऊं नको; कोणाला टकवूं नको; आईबापांचा मान ठेव.' मुमुक्षु म्हणाला,

'हें सर्व मी तर करीतच आलों आहें.' येशूनें उत्तर केलें, 'अजून एका गोष्टीची उणीव आहे. तुझ्यापाशीं तुझें म्हणून जें जें कांहीं आहे तें सर्व विकून टाक, तो पैका गरिबाला देऊन टाक, वधस्तंभावर येण्याचा निश्चय करून मग माझी पाठ धर. असें केलेंस म्हणजे तूं चिरंजीव होशील.' यरुशलेम येथें पुन्हा जाण्याचा त्याचा निश्चय कायम झाला. त्यानें एक गाढव पैदा केलें आणि त्याच्यावर अंगावरील पंचा टाकून शिष्यांसह तो नगरांत शिरला. हा वेळपर्यंत त्याचें नांव सर्वत्र पसरलें होतें. बडे लोक काय वाटेल तें म्हणोत, आपणांस तारावयासाठीं हा उत्पन्न झाला आहे अशी सामान्य जनसमूहाची बालंबाल खात्री झाली. होती. त्याचे चमत्कार, त्याची शालीनता, पातक्यांवर कृपादृष्टि, उपदेशाचा सोपेपणा इत्यादींचा विलक्षण परिणाम लोकांच्या मनावर झाला होता. तो अशा गरीबीनेंसुद्धां शहरांत शिरतांच लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमा झाल्या. त्यांनीं आपल्या अंगावरील वस्त्रें काढून तीं त्याच्या मार्गावर अंथरिलीं. कित्येकांनीं हिरवीगार पालवी पसरून त्याचा मार्ग सुशोभित केला. आणि त्याच्या नांवाचा जयजयकार करीत, टाळ्या पिटीत त्यांनीं त्याची मिरवणूक काढली. येशू सरळ देवळांत गेला आणि तेथील दुकानदार, गिऱ्हाईक, सावकार आणि कुळें, कोंबडेवाले इत्यादिकांस त्यानें हांकून दिलें व तो म्हणाला, 'हें स्थळ प्रार्थनेसाटीं आहे. पण तुम्हीं त्यास उचल्यांचा खुंट बनविलें आहे.' मग कित्येक आंधळे, पांगळे त्याजकडे आले; त्यांस त्यानें बरें केलें. त्यानें केलेले चमत्कार पाहून मुलेंसुद्धां जोरजोरानें 'दाउदाच्या पुत्राचा जयजयकार असो!' असें ओरडूं लागलीं. येशू देवळांतून बाहेर गेला व आपल्या शिष्यांजवळ अशी भविष्यवाणी बोलला कीं, 'या देवळाचा सत्यानाश होणार आहे. माझ्यामुळें तुमच्यावर संकटें येतील, खोटे

भविष्यवादी उपस्थित होतील, तुमच्यावर आमची श्रद्धा आहे असें जें कोणी आतां म्हणत आहेत ते सर्व थंडावतील व जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल.' त्याला सांगावयाची होती ती गोष्ट आतां संपत आली. आपला जीवितहेतु संपला याची जाणीव त्याला आली.

वार्षिक यात्रेसाठीं पुन्हा यरुशलेमला जावयाचें त्यानें ठरविलें. काय असेल तें असो; पण त्याला वाटूं लागलें कीं, दोन दिवसांच्या आंत आपल्याला मृत्यु येणार. मग आपल्या शिष्यांच्या मेळांत बसून एकदा जेवावें असें त्यानें ठरविलें. नम्रता म्हणजे काय हें शिष्यांस दाखवावें म्हणून त्यानें आपल्या शिष्यांचे पाय धुतले व तो म्हणाला, 'मी तुमचा गुरु व स्वामी असतांना मीं तुमचे पाय धुतले तर तुम्हींही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत. उदाहरणासाठींच हें मीं केलें.' हे शब्द तो उच्चारीत आहे तोंच त्याला खिन्नता आली व तो म्हणाला, 'तुम्हांस खात्रीनें सांगतों, तुमच्यापैकींच एकजण मला शत्रूच्या हवालीं करील.' तेव्हां सगळे शिष्य एकमेकांकडे संशयानें पाहूं लागले. येशू म्हणाला, 'मी तुकडा बुचकळून ज्याच्या हातीं देईन तोच माझा घात करील.' त्यानें तुकडा बुचकळिला व सायमनचा मुलगा यहुदा इस्कारयोत याच्या हातीं दिला. शेवटचें सांगणें म्हणून येशूनें त्यांना सांगितलें कीं, 'माझें जसें तुमच्यावर प्रेम आहे तसें तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. तसें तुम्हीं केलें म्हणजेच तुम्हीं माझे शिष्य आहां असें ठरेल. मुलांनो, मी आतां जातों. तुमचा माझा सहवास फार थोडा उरला आहे. मी जातों तेथें तुमच्यानें येववणार नाहीं.' सायमन म्हणाला, 'प्रभू, तूं कोठें जातोस? माझ्यानें तुझ्या मागें कां येववणार नाहीं? मीं तुझ्यासाठीं जीव देण्याला तयार आहें.' येशूनें उत्तर केलें, 'काय म्हणतोस? माझ्यासाठीं तूं आत्मत्यागसुद्धां करशील? अरे भोळ्या शिष्या! तुझ्या हातून हें तर होणारच नाहीं. आतां रात्र पडली आहे. पण तुला सांगतों

पहाटेचा कोंबडा आरवण्याचे पूर्वींच तूं लोकांस त्रिवार सांगशील कीं, ‘ येशूचा आणि माझा कांहीं संबंध नाहीं. ’ मजवर तुमचें जर कांहीं खरोखरी प्रेम असेल तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळा. मी आतां खास जातों. पण मी तुम्हांस दुःखांत सोडून जातों असें समजूं नका. शांतिब्रह्म मी तुम्हांसाठीं ठेवून जात आहें; तें चित्तांत सांठवून ठेवा. मी गेलों म्हणून खिन्न होऊं नका, भयानें गांगरूं नका. मी तुम्हांस सांगतों, मी आतां गेलों तरी पुन्हां परत येईन. तुमचें मजवर प्रेम आहेना ? मग मी माझ्या पित्याकडे जात असतां तुम्हांस खिन्नता कां यावी ? मी द्राक्षाचा वेल आहें, आणि माझा बाप बागवान आहे. तुम्ही माझ्या शाखा आहां. तुम्ही माझ्यांत व मी तुम्हांत आहें. जो माझ्यांत राहील तोच फळ धरील; पण जो मीरूप बुंध्यापासून तुटून जाईल, तो वाळून जाईल. येथून पुढें मी तुम्हांस सेवक म्हणणार नाहीं. कारण धन्याच्या मनांत काय आहे हें सेवकांस कधीं कळत नाहीं. पण मीं तर माझें सर्वस्व तुम्हांस सांगून टाकिलें आहे कीं, एकमेकांवर प्रेम करा. म्हणून इतउत्तर तुम्ही माझे मित्र आहां. ’

मग तो आपल्या शिष्यांबरोबर गेतसेमाने येथील बागांत आला. आपल्यावर संकटें सांचत चाललीं आहेत, अधिकारी चवताळले आहेत, वडवे, पुजारी, शास्त्री त्यांचे कान फुंकीत आहेत; या सर्व गोष्टी त्याचे कानीं भराभर येत होत्या आणि पाखंडी माणसाला सुळावर ठोकून मारतात हेंही त्यास माहीत होतें. त्यामुळें तो कांहींसा घाबरा झाला व शिष्यांस म्हणाला, ‘ येथें माझ्याभोंवतीं जागे रहा. ’ पण रात्र पडली आणि शिष्यांना झोपेनें ग्रासलें. तो म्हणाला. ‘ तुम्हांस थोडे-सुद्धां जागवत नाहीं काय ? ’ थोडक्याच वेळांत ते सर्व झोंपी गेले. येशू निराशेनें म्हणाला, ‘ आतां खुशाल निजा. माझी घटका भरली. परमेश्वराच्या पुत्राचा विश्वासघात झाला. लबाडांनीं त्याला पातक्यांच्या

हातीं लोटलें.' इतकें तो बोलत आहे तोंच बुचकळलेला तुकडा स्वीकारणारा यहुदा व नागव्या तलवारी घेतलेले शेंकडों लोक आणि धर्मोपदेशक तेथें जमा झाले. तेव्हां येशू त्यांस तडफेनें म्हणाला, 'असे चोरासारखे रात्रीचे कां आला ? मी रोजच्या रोज तुमच्यादेखत प्रतिपादन करीत होतों ना ?' त्यांनीं एकदम येशूस धरिलें. इतक्यांत येशूच्या लोकांपैकीं एकानें तलवार उपसली आणि मुख्य धर्मगुरूच्या एका चाकराचा कान कापला. येशू शिष्यास म्हणाला, 'तलवार चालवूं नको. जे तलवार चालवितात ते तलवारीनेंच मरतात.' त्यास पेंचांत धरण्यासाठीं धर्मगुरूंनीं बरोबर साक्षीदार आणले होते. एक-जण म्हणाला, 'येशू म्हणाला कीं, मी हें देऊळ पाडीन व तीन दिवसांत पुन्हा उभें करीन.' 'तूं असें म्हणालास काय ?' असें धर्मगुरूनें विचारिलें असतां येशू गप्पच राहिला. पुन्हां त्यानें विचारलें, 'तूं ख्रिस्त आहेस, नाहीं ? तूं परमेश्वराचा पुत्र आहेस, नाहीं ?' येशू गंभीर आवाजानें म्हणाला कीं, 'होय. मीच तो आहें.' तेव्हां त्यांनीं त्याचे कपडे फाडिले, हा पाखंडी आहे असें ते म्हणाले. ते त्याच्या तोंडावर थुंकले आणि त्यांनीं त्याला चपराका मारिल्या. हें होत असतां त्याचा आवडता शिष्य सायमन बाहेर बसला होता त्यास कोणी म्हणाले, 'तूही त्याच्यापैकींच आहेस.' जणूं आपण त्या गांवचे नव्हे अशा स्वरानें सायमन तीनदां म्हणाला, 'जीजस माझा कोणी नव्हे !' त्यानें हें उत्तर करतांच कोंबड्यानें सांथ घातली. येशूचें भाकित खरें झालें. त्याच्या शिष्यांनीं त्याला फसविलें व ते सारे पळून गेले. शिपायांनीं येशूस पकडून सुभेदारापुढें उभें केलें. तोही बुचकळ्यांत पडला. तो दिवस सणाचा होता आणि म्हणून एका कैद्याला मुक्त करण्याचा अधिकार या दिवशीं त्याला होता. येशूबरोबरच बॅरॅबस नांवाचा एक विलंदर डाकू कैद झाला होता. सुभेदारानें लोकांस विचारलें,

'या दोघांपैकीं कोणास सोडूं?' ते अज्ञ लोक गर्जून म्हणाले, 'बॅरॅबस यास सोडा.' संसारी लोकांनीं दरवडेखोर स्वतःसाठीं मागून घेतला आणि शांतिक्षमेचा पुतळा फांसावर चढविण्यासाठीं सुभेदाराच्या हवालीं केला! मग शिपायांनीं कांटेरी मुकुट करून त्याच्या डोक्यावर घातला आणि 'अहो यहुद्यांचे राजे' असें म्हणून त्याची टवाळी केली, त्यास द्रोणभर आंब प्यावयास दिली, व शेवटीं त्यांनीं त्याच्या हातापायांवर खिळे ठोकून त्यास वधस्तंभापाशीं कायम केलें. येशूची मान लटकी पडली. तो म्हणाला, 'परमेश्वरा! मला विसरलास काय?' तो असें म्हणाला काय? याविषयीं फार वाद आहे. असो. कांहीं वेळानें त्याचें प्रेत गुहेंत ठेवण्यांत आलें व त्याच्या आड एक दगड उभा करण्यांत आला. तो पुन्हा जिवंत होणार आहे हें भाकित खोटें ठरविण्यासाठीं अधिकाऱ्यांनीं सक्त पहारा ठेविला होता. तिसरे दिवशीं दगड काढून पहातात तों येशू ख्रिस्त जिवंत झाला. श्रद्धाळू ख्रिस्त्यांचा या कथेवर पूर्ण विश्वास आहे. येशू ख्रिस्ताचें हें पुनरुत्थान म्हणून समजलें जातें. असो. अशा प्रकारें या नवीन धर्मसंस्थापकाचा अंत झाला.

* * *

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. १५२६९
संग्रह शाखा

# मार्टिन् लूथर

इसवी सन १४८३ सालच्या नवंबर महिन्याच्या ११ व्या तारखेस सॅक्सनी परगण्यांतील एसल्बन येथें या विख्यात पुरुषाचा जन्म झाला. अमुक एक मूल पुढें दिग्विजयी होणार आहे असें आगाऊच कळत नसल्यामुळें त्याच्या लहानपणाच्या आठवणी लोकांना फार थोड्या राहतात. पुढें मोठेंपण प्राप्त झालें म्हणजे त्या मोठेपणाचा लोट मागें पसरत जातो व त्याच्या लहानपणाविषयीं कांहीं कळावेंसें वाटतें; पण मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ही म्हण खरी असूनसुद्धां सामान्यपणें असें दिसून येईल कीं, पुढें दिगंत कीर्ति केलेल्या माणसाविषयीं त्याच्या लहानपणीं कांहीं विशेष कुतूहल उत्पन्न झालें होतें असें नाहीं. लूथरचें असेंच होतें. त्याच्या लहानपणची हकीकत माहीत आहे ती केवळ बेताबाताचीच. पहिल्या पहिल्यानें बापाच्या घरची गरिबीच होती. पण पुढें हळूहळू त्याचा जम बरा बसत चालला आणि त्यानें घरदारही केलें. हा गृहस्थ स्वभावानें थोडा तापटच असावा. कारण पोरांबाळांवर त्याची कदर मोठी असे. कोणाची कांहीं चूक झाली तर गय करणें त्यास माहीत नसे. चूक

करणारास सडकून चोप बसत असे. बापाच्या या वचकामुळें ‘ आपलें कुठें कांहीं चुकत आहे कीं काय ’ असें लहानग्या ल्यूथरला सदैव वाटावें. आपल्या हातून चुका होतात व म्हणूनच बाप शिक्षा करतो, ही गोष्ट त्याच्या मनांत कायमची बाणून गेली होती. आपण चुकीस पात्र आहों हा संसारांतील साधा नियम, म्हणजे घरीं‍दारीं आपल्या रोजच्या व्यवहारांत आपल्या हातून प्रमाद होतात ही साधी जाणीव, त्याच्या मनांत पसरत जाऊन तिचें पुढें असें रूप झालें कीं, मनुष्य जात्या प्रमादशील आहे म्हणजे पातकी आहे आणि घरांतील चुकांबद्दल जसा बाप, तसा इहलोकच्या प्रमादाबद्दल परमेश्वर मनुष्यप्राण्याला शासन करतो. ‘ मी पातकी, मी पातकी ’ ही जाणीव त्याला लहानपणच्या चुकांमुळें प्राप्त झाली. गांवच्या शाळेंतील पंतोजी मोठा खाष्ट असून लिहिणें, वाचणें, आणि थोडें जुजबी लॅटिन याच्यापलीकडे जरी फिरकत नसला तरी असल्या धड्यांपायीच तो पोरांना वेदम मारीत असे. ल्यूथरलाही त्याच्या हातचा प्रसाद पुष्कळदां मिळत असे. या पंतोजीची पुंजी संपल्यानंतर बापानें त्यास दुसऱ्या एका शाळेंत घातलें. पण तेथें तो एक वर्षच राहिला; कारण यापुढें बापाला खर्चाचें झेपेना. बाप कडक असला तरी मुलाला ‘ वाबां ’ ची आवड फार. पण कांहीं झालें तरी शिकणें हें प्राप्तच आहे, हें पाहून बापानें आपल्या पंधरा वर्षांच्या मुलास आपल्यापासून दूर केलें. इसेनास गांवीं त्याची रवानगी करण्यांत आली. तेथें त्याला नादारी मिळाली आणि त्याच्या जेवणाखाण्याचीही सोय झाली. ल्यूथरनें शिक्षणासाठीं हें दैन्य पतकरलें. ल्यूथरचा आवाज गोड होता. कोणाला पदें म्हणून दाखवावीं आणि चार दोन आणे मिळवावे असेंही त्यास करावें लागे. पण या वाइटांतून एक चांगलें निघालें. कोटा नांवाच्या एका श्रीमान् स्त्रीला या मुलाचा केविलवाणा आणि गोड स्वर

आवडल्यामुळें ती त्याला थोडीबहुत मदत करूं लागली आणि तिच्याच घरीं खानदानीच्या व सुसंस्कृत अशा माणसाच्या चालीरीति लूथर यास माहीत झाल्या. या गांवीं लूथरनें चार वर्षें शिक्षण घेतलें.

इ० सन १५०१ सालीं लूथर मॅट्रिक्युलेट झाला. हा वेळपर्यंत बापाची सांपत्तिक स्थिति चांगली सुधारली होती; व आजपर्यंत आपल्या मुलाचे हाल झाले ते झाले, आतां त्याला पदरखर्चानें कॉलेजांत घालावयाचें असें ठरवून त्यानें त्यास एरफूर्ट शहरीं पाठविलें. तेथील विद्यापीठाचा लौकिक सर्व जर्मनींत मोठा होता. शिकविणारेही चांगले जाडे पंडित असत. तर्क, न्याय, तत्त्वज्ञान, अलंकार, खगोलविद्या इत्यादीचा अभ्यास लूथरनें या ठिकाणीं केला. ग्रीक, लॅटिन भाषांतील अभिजात वाङ्मयाची त्याला आवड लागली. पण वाङ्मयाकडे त्याचा ओढा फार दिवस राहिला नाहीं. तो जात्याच विचारप्रवण असल्यामुळें तत्त्वज्ञानविषयाचें चिंतन करण्यांतच तो मग्न होऊं लागला. अभ्यासाची हौस असल्यामुळें इ० सन १५०२ मध्यें तो बी. ए. झाला आणि इ० सन १५०५ सालीं एम्. ए. झाला. ही शेवटची परीक्षा झाली तेव्हां त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. एम्. ए. ची डिग्री देण्याच्या वेळीं तेव्हां मोठा दिमाख व वडेजाव करीत. या नव्या उमेदवाराची वाहवा तर होईच होई; पण मिरवणूक सुरू झाली म्हणजे त्याच्यापुढें ज्ञानदीप म्हणजे प्रत्यक्ष मशाली धरीत असत! अर्थात् उमेदवाराला मोठी ऐट वाटत असे. लूथरच्या बापाचा आनंद पोटांत मावेना. आपला मुलगा एम्. ए. झाला, त्यांजपुढें मोठमोठ्या पंडितांच्या परवानगीनें ज्ञानदीप पाजळले हें पाहून आपण कृतकृत्य झालों असें त्यास वाटूं लागलें आणि त्या आनंदांत मुलानें पुढें कायद्याचा अभ्यास करावा म्हणून त्यानें पुस्तकेंही खरेदी केलीं. मुलगा कायद्याचीं लेक्चरें

ऐकूं लागला. पण इतक्यांत कोणाच्या ध्यानीं ना मनीं अशी एक गोष्ट या नव्या होतकरूनें अचानक करून टाकली. सगेसोयरे, मित्रपरिवार यांना वाटलें कीं, हा आतां कायदेपंडित होणार. पण एके दिवशीं वातमी कळली कीं, हें सर्व बाजूस सारून हा मुंडण करून मठांत जाऊन जोगी होऊन बसला आहे!

हा प्रकार ऐकून सर्व लोक चकित होऊन गेले. हातातोंडास आलेला मुलगा आतां प्रापंचिक बनून गृहस्थाश्रमाचे आचार चालवूं लागावयाचा तो विरागी म्हणजे बैरागी झालेला पाहून बाप तर बद्‌गडासारखा निश्चेष्टच झाला. कोणाच्या मनांत काय गडबड चालू असते हें अगदीं निकटच्या माणसांनासुद्धां पुष्कळदां कळत नाहीं. मागील पिढीच्या अपेक्षा आणि चालू पिढीच्या प्रवृत्ति यांत फरक पडत चाललेला असतो. तो स्थूल रूप धरून अशासारख्या रीतीनें बाहेर फुटला म्हणजे जुनीं माणसें स्तिमितच होतात. प्रस्तुत ठिकाणीं हा फरक कां पडत चालला होता हें कळावयास हवें; कारण ल्यूथरच्या जीवितांतील इतिकर्तव्यतेचें रहस्य समजावयास त्याचें ज्ञान जरूरच आहे. वर जी हकीकत दिली आहे ती केवळ बाह्य स्वरूपाची आहे, तिनें ल्यूथरच्या या आकस्मिक विरागाचा उलगडा होण्यासारखा नाहीं.

धार्मिक आचार्यपीठाच्या अमलाखालून, म्हणजे त्यांच्या ऐहिक राजसत्तेखालून, युरोप हळूहळू मोकळा होत होता. पूर्वी धर्मगुरूच राज्याधिकारी असत. पुढें धर्मगुरु व राजे असे समाइकीनें देशावर अम्मलदारी चालवूं लागले. हाही प्रकार निर्लेप राजशासनाच्या दृष्टीनें कुचंबणेचाच होऊं लागला. एकाच लोकांवर धर्मगुरु आणि राजे यांचा दुहेरी अम्मल कसा चालूं शकणार? इहलोकचें जिणें सुखाचें व्हावें म्हणून राजशासनाची आवश्यकता; पण त्यांत धर्मगुरूचीही छाप असली तर राजशासनपद्धति केवळ आपल्या एकान्तिक सामर्थ्यानें

जितकी उपयोगी व्हावयाची तितकी होऊं शकेना. सर्वत्र असा आग्रह सुरू झाला कीं, धर्मगुरूंची ऐहिक सत्ता पार लयास जावी व भली कणखर अशी राजसत्ता निर्माण व्हावी. या आग्रहाचा जोर पाहून पोपमहाराजांनींही आवरतें घेतलें होतें. तरी पण अजून गांवोगांवच्या मठांकडे हजारों जमिनी लावलेल्या असत; लग्नादि संस्काराला धर्माधिकाऱ्यांची जरूरी असे; व वारसे ठरविण्याच्या कामांतही त्यांचा हात असेच. अर्थात हाही प्रकार बंद होत जावा, विशेषतः जमिनीचें जें लक्षावधि रुपयांचें उत्पन्न रोम शहरीं पोपमहाराजांच्या खजिन्यांत जाऊन पडत असे तें तर मुळींच जाऊं नये असा रोख सर्व राजे लोकांच्या दरबारीं चालू होता. राजांना फौजा बाळगाव्या लागत; स्वाऱ्या करणें, परचक्रें सांभाळणें ह्या कामांना अतोनात पैका लागे. अर्थात् हा फुकाफुकी चाललेला पैसा घरच्या घरीं कां ठेवून घेऊं नये असा त्यांचा विचार होता. पोप चुळबूळ करूं लागले म्हणून खटक्यांचे प्रसंग वारंवार येऊं लागले. एकदां बिनसलें म्हणजे परस्परांचीं उणीं काढण्याची प्रवृत्ति सुरू होते. पोप व त्यांचे अधिकारी तेवढे नीतिदृष्ट्या दुष्ट होते व राजे आणि त्यांचे साथीदार म्हणजे मोठे धर्मावतार होते असें मुळींच नव्हतें व नसावयाचेंच. पण धार्मिकांच्या नांवाशीं अनीति नेऊन चिकटविली म्हणजे ती चांगली चिघळत जाते हें मर्म लोकांनीं ओळखलें होतें. शिवाय, कित्येक गांवचे भिक्षुक खरोखरच दुराचारी झाले होते व केवळ आचाराचें बंड शिल्लक राहिलें होतें. धार्मिक विचार स्पष्ट रूपानें समाजांत बळ धरून राहावे म्हणून कांहीं ठराविक आचारविचार धर्मविचारांचे प्रणेते घालून देतात; पण कालांतरानें त्या आचार–कांडांतील मूळ विचार शोषून जातो व घोंटीव वळणाची कांहीं वाळकी उठाठेव मात्र शिल्लक उरते. पण ही माणसाची जात कांहीं कांहीं वेळां अशी मद्द

बनते कीं, त्या त्या आचाराच्या भ्रमणकक्षेंतून फिरत राहाण्यांत सर्व कांहीं आलें असा तिचा समज होऊन राहतो. उजळणी या शब्दाचा धात्वर्थ माणसें विसरतात. मलिन झालेला विचार उजळा देऊन जागृत करावा लागतो याची जाणीव राहात नाहीं. मूळ विचारांचें तेज नष्ट होऊनही वाडवडील करीत आले या भावनेचा गडद रंग त्या त्या आचाराला चढतो आणि कुंभाराचा हात सुटल्यानंतरही शतकानुशतक या चाकाचा गरगराट चालूच राहातो. लहान पोरें जशा समुद्राच्या रेताडांतील वाळक्या शिंपा ओंजळींत घेऊन त्यांजकडे पाहातात तसें आपण आचाराचीं टरफलें ओंजळींत घेऊन त्यांजकडे कौतुकानें पाहतों; पण आपण तरी दुसरें काय करणार ? तीं टाकून दुसरें काय घ्यावयाचें हें कोणी दाखवितोंपर्यंत असेंच व्हावयाचें. असो. युरोपांत हेंच झालें होतें. ठराविक वळणें बसून गेलीं होतीं. पण लूथर जन्मास येण्याच्या आधीं थोडी चलविचल सुरू झाली होती. बुद्धिमान लोक हीं कोंडाळीं पत्करीनात. खुद्द धर्माधिकाऱ्यांतही चळवळ सुरू झाली होती. धर्म व नीति हीं एकत्र असावयास हवीं अशी घोषणा सर्वत्र उठत होती. केवळ विश्वास म्हणजे श्रद्धा कोणास पटेना. जो तो कारण विचारूं लागला. ' हें कां बरोबर ' असा जोराचा प्रश्न सर्व लोक करूं लागले. ज्याला त्याला मीमांसा हवीशी वाटूं लागली; अर्थात् या सार्वत्रिक भावनेचे जोराचे पुरस्कर्ते उत्पन्न होणें ओघानेंच प्राप्त झालें. बुद्धिमंतांतून इरॅस्मस हा धिटाईनें पुढें आला आणि धार्मिक विचारांच्या लोकांतून मार्टिन् लूथर हा निघाला.

मार्टिनच्या घरीं रोजचें धार्मिक कर्म म्हणून त्यास कांहीं शिकविलेलें होतेंच; पण त्याचें रूप अगदीं साधें होतें. म्हणजे एक दोन प्रार्थना, अष्टकें, स्तोत्रें इतकेंच. पण मागें उल्लेख आलाच आहे कीं, आपण पातकी आहों व यासाठीं परमेश्वर आपणांस शिक्षा करील,

ही भावना ल्यूथरच्या चित्तांत कायम झाली होती. ल्यूथरच्याचशीं काय? तत्कालीन सर्वच ख्रिस्त्यांच्या मनांत ही भावना बद्धमूल झालेली होती. परमेश्वर म्हणजे कोणी एक तिरसट, आडदांड पंतोजी असून वेळोवेळीं खसाखस अंगावर येतो, त्याला दया-माया मुळींच नाहीं; तुम्हीं पुढें जातांच एखाद्या तामसी संन्याशाप्रमाणें एकदां तुमच्याकडे तो करड्या नजरेनें पाहतो व सजा बजावितो इतकीच तत्कालीन ख्रिस्तीसमाजाची परमेश्वराविषयींची कल्पना होती. तो दयाघन आहे, पातकांची क्षमा करतो, त्याला दोन हात जोडून शरण गेलें तर तो आपले अपराध पोटांत घालतो अशा प्रकारचें परमेश्वराचें कारुणिक स्वरूप त्यांनीं पत्करिलें नव्हतें. परमेश्वर म्हणजे एक केवळ कडकडीत पावित्र्याचा पुतळा; आपण पातक्यांनीं त्याच्या आसपासही फिरकण्यालागीं नाहीं, त्याच्या जाज्वल्य पावित्र्याला भिऊन त्याच्यापासून शंभर कदमांवर उभे राहावें व पतिताप्रमाणें दूर उभें राहून त्यास वंदन करावें असेंच त्यांस वाटे. प्रत्यक्ष येशूख्रिस्त, कीं जो मनुष्ययोनीच्या पारमार्थिक कल्याणासाठीं फांसावर चढला, सर्व लोक शिक्षेंतून मुक्त व्हावे म्हणून ज्यानें आपला आत्मा दंडनासाठीं परमेश्वराजवळ गहाण टाकिला, व दयालुत्व हेंच ज्याचें जीवितांतील सारसर्वस्व तोही महा कडक, करडा व भोंवतीं मोठी कदर उत्पन्न करणारा असाच होऊन बसला होता. एतावता काय कीं, देव ही आवडती आणि प्रेमाची वस्तु नसून शिक्षा करावयास टपलेल्या दंडेल अधिकाऱ्याचीच प्रतिमा आहे अशी सरसहा समजूत होती. परमेश्वर जर असा व आत्मिक कल्याण जर त्याच्या हातीं तर मग तें साधावें कसें? आपण तर पातकी हें खास; मग तरणोपाय काय? याला माणसाच्या व्यवहारज्ञ मनानें उत्तरही शोधून काढिलें.

येशू असेल कडक, पण त्याच्या दरबारांतील अमीर-उमराव जे Saints म्हणजे संत त्यांच्याकडे बोलणें लावलें पाहिजे; तसेंच या

येशूची आई जी महासाध्वी मेरी तिला शरण गेलें असतां तिला कळवळा येईल व हे संत व विशेषतः त्याची परमप्रिय माता यांनीं भीड खर्च केली तर येशू इतकासा कठोर राहणार नाहीं,' त्यांच्या मुर्वतीस्तव तो आपल्याला क्षमा करील अशी समजूत झालेली होती व तीस अनुसरून संतपूजा व मेरीची पूजा सर्वत्र पसरली होती. पण येवढ्यानेंच झालें नव्हतें. येशूला वळवावयास मेरी उपयोगी हें खरें; पण मेरी वळेना तर? अर्थात् तिच्या आईकडे म्हणजे ॲनकडे जाणें युक्त, असा कयास होऊन ॲनची पूजाही सुरू झाली होती. तिचें नांवही एका शहराला देण्यांत आलें होतें. म्हणजे काय कीं, परमेश्वराच्या मूळ स्वरूपासंबंधींच्या कल्पना लुप्त होऊन केवळ भीतीनेंच त्यांचीं मनें त्रस्त झालेलीं असत. यांत आणखी एका गोष्टीची भर पडली होती.

सर्व युरोपांत प्लेगचा प्रसार जारी झाला होता आणि हा परमेश्वरी क्षोभ आहे अशी ठाम समजूत बनली होती. तिकडे उंडारलेल्या तुर्कांचेंही भय सारखें मागें लागलें होतें. त्यांच्या फौजा बाल्कन् द्वीपकल्प पोटांत घालून वीएनापर्यंत येऊन थडकलेल्या होत्या व त्यांचा जोर असाच कायम राहिला तर थोड्याशा वर्षांत ख्रिस्ती राष्ट्रांची फटफजिती उडेल; इतकेंच काय, ख्रिस्ती धर्म व संस्कृतिही ठार होतील ही धडकी सर्वत्र पसरली होती. अर्थात् या भावी अनर्थांच्या आगाऊ निष्कृतीसाठीं व्रतवैकल्यें, उपासतापास, जपजाप्य, यमनियम, तीर्थयात्रा, नवससायास यांचाही सपाटा सुरूच होता. लोकांना जादूटोणा, चेटूक इत्यादि गोष्टी खऱ्या वाटत. कारण सैतान जो, तो श्रद्धाळू लोकांना भ्रष्ट करावयासाठीं काय करामत करील न कळे अशी चिंता त्यांस वाटत असे.

खुद्द ल्यूथर मोठा धर्मसुधारक खरा; पण तसा तो भित्राच असे. चेटकादींवर त्याचा विश्वास होता. ही जी तत्कालीन ख्रिस्ती मनाची ठेवण वर्णिली आहे तीच ल्यूथरच्या मनाचीही होती. लहानपणापासूनच

तो तरी एकदम खडखडीत निराळा कसा असूं शकणार ? वयांत आल्याबरोबर पोटाच्या धंद्याला लागणारीं सामान्य माणसें वर लिहिलेलें देवादिकांचें प्रकरण उमगतच; पण त्याच्या छाननीकडे लक्ष देण्यास, त्याची शहानिशा करावयास व अनुकूल प्रतिकूल असें कांहीं प्रत्यक्ष करण्याला त्यांस कामाखालीं उसंत तरी कोठली असणार ? पण लूथरचें तसें नव्हतें. तो विद्वान् होता, आत्मानात्मविचारास त्याला सवड होती व जात्याच मनाची रचना धर्मविचारप्रवण असल्यामुळें या विचाराचा ठाव पाहिला पाहिजे अशी हौस त्याच्या ठिकाणी उपजली होती. तो बुद्धीनें चांगला चपळ व वादविवादाच्या कोटिक्रमांत चांगला सराईत होता. पण हें सर्व खरें असलें तरी उपर्युक्त आत्मिक भीति त्याच्या चित्तास पोखरीत असे. या विचाराच्या मागें सारखें लागल्यावांचून आपल्या आत्म्याचें कल्याण होणार नाहीं, व हा परमेश्वरी शिक्षेचा ससेमिरा चित्ताला शांति मिळूं देणार नाहीं, हें पाहून त्यानें जोगी होण्याचें ठरविलें. एकदां जोगी होऊन बसल्यावर मग खुशाल गूढ चिंतनांत वेळ घालवावयास सांपडेल, त्याच विचारांत वावरणारांशीं गांठीभेटी होतील व विचारांची देवघेव होऊन कांहीं उलगडा होईल असा त्याचा अजमास होता. कित्येक म्हणतात कीं, त्याला एकदम उपरति झाली व कांहीं आगापिछा नसतांना तो ‘ साधु ’ बनला. कसेंही असो. हा विचारी पुरुष आपल्या गोतांतून तटकन् उठून बैरागी बनला.

आतां आत्मानात्मविचारास त्याला वाटेल तितका वेळ मिळूं लागला. ऑगस्टिनियन बैराग्याच्या मठांत लूथर दाखल झाला होता. तेथे तरी थोडी उमेदवारी केल्याशिवाय त्याला मुंडावयास ते अर्थातच तयार नव्हते. त्याची बुद्धि, विवेचकपणा व तळमळ पाहून मुख्य महंतही खूप होई. तेथें आत्मविद्येचा अभ्यास चालत असे; पण लूथरनें भगवीं

वस्त्रें केवळ या अभ्यासासाठीं पांघरलीं नव्हतीं. त्याला आत्मिक कल्याणाची प्रत्यक्ष चिंता लागली होती. आत्मविद्येचा अभ्यास हा कदाचित् बुद्धीचा विलास होऊं शकेल; पण माझ्या जीवाचें पुढें कसें होणार, हा निकडीचा विचार केवळ शिळोप्याचाच राहूं शकत नाहीं. मी पातकांतून निघून कसा मुक्त होईन ? परमेश्वर म्हणतो माझें आज्ञा-दशक नीट संभाळ म्हणजे सर्व कांहीं होईल; पण हें आज्ञादशक पाळणें तरी कसें शक्य आहे ? हरघडीं या आज्ञा मोडाव्या लागत आहेत. असें जर आहे, म्हणजे प्रत्येक मानवाला जर या आज्ञा मोडाव्या लागतात तर त्या करण्यांत तरी काय तात्पर्य व त्या पाळणेंच जेथें अशक्यप्राय तेथें मोडल्या म्हणून शिक्षा तरी काय म्हणून ? नियमांतून जो घसरेल त्याला शिक्षा; पण घसरणें हाच जर नियम झाला, तर शिक्षा तरी कशी संभवते ? परमेश्वर म्हणतो. मी तुला क्षमा करीन – होय, पण ती केव्हां ? तर तुला अनुताप होऊन तुझी चित्तशुद्धि होईल तेव्हां. पण हा अनुताप तरी इतका खोल व चित्तांतील किल्मिषें दग्ध करील इतका दाहक कसा व्हावा ? एतावता काय, कीं हा अनुताप होणें नाहीं; अनुताप नाहीं तर परमेश्वरी क्षमा नाहीं व केवळ आज्ञा पाळल्यानें मुक्ति मिळावयाची ती तर केवळ अशक्य. म्हणजे काय कीं, परमेश्वरी क्षोभ शिल्लकच उरतो. या विचाराच्या चक्रव्यूहांत ल्यूथर भ्रमत असतां त्या मठांतील एका महंतानें त्याला मंत्र दिला कीं, तूं येशूवर श्रद्धा ठेव व केवळ तन्मय होऊन त्याच्याद्वारा परमेश्वरी पावित्र्य अंगीं आणण्याची खटपट कर म्हणजे त्यांत सर्व आलें. येशूच्याद्वारा माणसाच्या आत्म्याला परमेश्वराशीं अल्पांशीं तरी सरूपता प्राप्त करून घेतां येते, हाच या मंत्राचा निष्कर्ष असावा. या उपदेशानें ल्यूथरचें चित्त शांत झालें. त्याच्या मनांतील हजारों संदेह मावळून गेले. त्याच्या चित्तास आनंद झाला व वैराग्याच्या वेषाचें चीज झालेंसें त्यास वाटूं लागलें.

इतकें होईतों एक वर्ष निघून गेलें व लूथरची बुद्धि व कडकडीतपणा पाहून मठाधिकारी महंतांनीं विचार केला कीं, ज्या पक्षीं हा आपल्या कसोटीस उतरला आहे त्या पक्षीं त्यास मुंडावयास हरकत नाहीं. लवकरच त्याला उपाध्येपणाची दीक्षा यथाविधि देण्यांत आली. उपाध्याय व उपदेशक बनण्यांत कांहीं गैर आहे असा कितूही लूथरच्या मनांत कधीं आला नाहीं. परमेश्वर क्षमा करतो पण तें व्हावयास येशूपुढें सश्रद्ध लीन झालें पाहिजे या गोष्टीवर त्याचा आतां पूर्ण विश्वास बसल्यामुळें इतरांना तो सांगावयास आणि संशयी आत्मे सन्मार्गावर आणण्यास संकोच वाळगण्याची जरूरी नाहीं असें ठरवून तो उपाध्याय बनला. नवीन निघणाऱ्या विटंवर्ग येथील विश्वविद्यालयांत शास्त्री म्हणून त्याची नेमणूक झाली. बुद्धिमान्, कांटेकोर विचार करणारा व तळमळीनें बोलणारा असल्यामुळें हां हां म्हणतां सर्व जर्मनीभर उत्तम अध्यापक म्हणून त्याची कीर्ति पसरली. त्याचीं भाषणें ऐकावयास चोहोंकडून विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी जमा होऊं लागल्या. सहकाऱ्यांचाही त्याच्यावर विश्वास उत्पन्न झाला आणि लवकरच कांहीं कामानिमित्त आपला प्रतिनिधि म्हणून त्यांनीं रोम शहरीं त्याची रवानगी केली.

ख्रिस्ती धर्माच्या या आचार्यपीठाशीं लूथरचा प्रत्यक्ष संबंध असा हा पहिलाच आला. रोमला जातांना आपण एका मोठ्या तीर्थास जात आहों अशी त्याची भावना होती. तेथील प्रकार पाहून मात्र त्याला पराकाष्ठेचा विस्मय व उद्वेग वाटला. जे उपाध्याय म्हणून मिरवत ते केवळ नास्तिकांसारखे वागत आणि खुद्द प्रार्थनेच्या वेळीं फिदीफिदी हंसत. यांच्यावरचे जे उपगुरु ते शुद्ध बदफैली लोक होते. खुद्द आचार्य जो दुसरा ज्यूलिअस तो निदान संस्थानांचा कारभार तरी नीट चालवी; पण त्याच्या आधींचा जो अलेक्झांडर तो मात्र महा पागल म्हणून

सर्वांना माहीत होता. यांत एक मात्र ध्यानांत ठेवावयास हवें कीं, रोमन लोक जर्मनांना शुद्ध नंदीबैल समजत व या त्यांच्या प्रवृत्तीमुळें ल्यूथरचें मन अगोदरच पूर्वग्रहदूषित होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. तिकडून परत आल्यावर विटंबर्ग येथें आत्मविद्येचा तो मुख्य अध्यापक झाला. इतर ठिकाणी ही जागा पत्करतांना 'पोपची आज्ञा उल्लंघिणार नाहीं' अशी शपथ घ्यावी लागत असे. तसें येथें नव्हतें. इतकेंच कीं, धर्मपीठानें जें मत त्याज्य मानिलें तें मात्र या अध्यापकांनीं पत्करणें गैरकायदा होतें. या ठिकाणचींही लूथरचीं प्रवचनें फार रसभरित होत. अर्थात् तरुण लोकांवर त्याची मोठी छाप बसली आणि लवकरच लूथर म्हणजे एक बडें प्रकरण होऊन बसलें. अशा प्रकारें सर्व प्रकार सुरळीत चालू असतां उत्पाताची वेळ नजीक येऊन ठेपली.

To sell indulgences हा शब्दप्रयोग इंग्रजी इतिहासांत सर्वांनीं वाचिला असेल व त्याचा अर्थ "पापविमोचन विकणें" असा स्थूलपणें समजण्यांत येतो. पण ही कल्पना बारकाईनें पाहिली पाहिजे, आणि तशी ती पाहिली तरच लूथरचें म्हणणें नेमकें काय होतें हें ध्यानांत येईल. Indulgence म्हणजे सूट किंवा माफी. एकाद्यानें पातक आचरिलें व त्यास अनुतापही झाला आहे असें जरी असलें तरी, जुन्या ख्रिस्ती धर्मसमजुतीप्रमाणें, या पातक्यानें कांहीं तप करावें लागतें; म्हणजे प्रत्यक्ष देहदंड सोसावा लागतो. पातक झालें, पश्चात्ताप झाला; पण देहदंडन मात्र सोसावयाचें होईना तर काय करावयाचें ? अशा माणसाला सद्गति नाहींच काय ? केवळ पश्चात्तापानें शुद्धि नाहीं म्हणून मुक्तीही नाहीं. पश्चात्ताप तर झालाच पाहिजे; पण त्यावर देहदंडनही सोसलें तर मात्र माणसाला सद्गति मिळते अशी जुन्या ख्रिस्त्यांची समजूत. पातक्याला अनुतापही होईना तर तो नरकलोकास जातो; अनुताप

झाला तर हें वांचतें. पण देहदंडन झालें नसेल तर आत्म्याला भयंकर क्लेश देणारा असा दुसरा एक 'पर्डिशन' नांवाचा 'यातनालोक' आहे, तेथें जावें लागतें. पण अवश्य तें देहदंडनही झालें असेल तर या 'यातना-लोका'कडे आत्म्याची पाठवणी अर्थात् व्हावयाची नाहीं. अशा ह्या अनुतप्त व देहदंडित पातक्यासच मुक्ति मिळावयाची अशी समजूत होती. यांत एक गोम आहे. अनुताप होणें हा एक मनोधर्म आहे व तो पातक्याला होईलही. निदानपक्ष झाल्याचा देखावा तरी पातकी करील. खरें कीं खोटे हें पाहावयास अर्थात कांहीं साधन नाहीं. पण 'यातना-लोक' चुकवावयास देहदंडन हवें व तें तर प्रत्यक्ष व्हावयास हवें. केवळ झालें म्हटल्यानें भागण्यासारखें नाहीं. अर्थात् येथें काय ती खरी अडचण होती. पातकी सगळेच असत व अनुताप झाल्याचा निदान बहाणा तरी सर्वांसच करतां येण्यासारखा होता. पण देहदंडाचें काय? बहुतेक वेळां अगदीं मरणाच्या द्वारीं आल्यावरच माणसाला अनुताप होतो! मग त्याच्यापुढें त्यानें देहदंडन केव्हां सोसावयाचें? किंवा अनुताप होऊनही मनुष्य अशक्त असला, व्यथित असला किंवा वृद्ध असला तर त्यानें 'यातना-लोक' चुकवावयासाठीं देहदंडन कसें करावयाचें? अशा लोकांची कांहीं तरतूद होणें जरूरच होतें व ती तशी झालीही. जर येशू ख्रिस्ताचे प्रतिनिधि जे धर्मगुरु ते म्हणाले कीं, "तुला देहदंड माफ आहे" तर देहदंडनाशिवाय पातक्याला सद्गति मिळूं शके. ही जी देहदंडाची माफी किंवा सूट देणें त्याचें नांव 'इन्डलजन्स' व या सुटीसाठीं दक्षणा घेणें त्याचें नांव selling indulgence सूटपत्र किंवा माफीपत्र विकणें. हा मोबदला होता. म्हणून माफीचा विक्रय असें व्यावहारिक नांव त्यास मिळालें.

याच्या जोडीला दुसरी एक कल्पना ध्यानांत ठेवावयास हवी.

वर एके ठिकाणीं असें आलेंच आहे कीं, येशू ख्रिस्तानें आपला आत्मा गहाण टाकिला व सर्व लोकांचें तारण केलें. येशूचा पुण्य-संचय एवढा मोठा कीं, अखिल मानव प्राण्यांना त्यांच्या पापांतून मुक्त करून स्वर्गी पोहोंचविण्यास त्याचा एकट्याचा पुण्यसंचय सहज पुरेसा आहे असें परमेश्वरानेंसुद्धां मानिलें. अखिल ख्रिस्ती समाजाच्या सर्व धर्ममतांची उभारणी या पायावर कायम केलेली आहे. यांतूनच एक एक विचारतंतु कसा वाढला हें पाहण्यासारखें आहे. सर्वांच्या उपयोगी पडणारा येशूचा हा पुण्यसंचय लोकदृष्ट्या मिळवणी न होतां राहूं शकला नाहीं. आपापली मुक्ति साधण्यासाठीं सर्वांनीं येशूच्या पुण्यसंचयरूप गंगाजळींतून पुण्य घ्यावयाचें हें खरेंच; पण या गंगाजळींत लोकदृष्ट्या शतकानुशतकें भर पडत चालली होती. येशू जसा मोठा तसे त्याचें शिष्यवर आणि संतमहंत हेही मोठे व येशूनें ठेविलेल्या गंगाजळींत यांचेही पुण्य सामील होऊन ती फुगत जाव-याची. संतमहंत जसे मोठे तसे जे जे कोणी सत्कृत्यें करून पुण्य संपादितील त्यांचें पुण्यही या विशाल पुण्यकोशांत दाखल व्हावयाचें; अशी विचारसरणी चालू झाली आणि ही विचारपरंपरा साहजिकच होती. येशूची पुण्याई जर इतरांच्या उपयोगी पडते, तर संतमहंतांची कां पडूं नये? व संतमहंतांची जर पडावयाची तर लहानसहान लोक आपआपल्यापरी जो पुण्यसंग्रह करितात तोही कां उपयोगी पडूं नये? अर्थात् आजपर्यंत जें जें म्हणून पुण्य झाले आहे त्या सर्वांची एक प्रचंड गंगाजळी झाली आहे व होत आहे, असा लोकांचा समज. ज्या पातक्यांना पापविमोचन हवें असेल त्यांनीं या खजिन्यांतून जरूर व शक्य तेवढें पुण्य उचलावें असा विचार त्या काळच्या लोकांत स्पष्टपणें रूढ झाला होता; पण या सार्वजनिक खजिन्यांतून तरी पुण्यांश कोणास मिळावयाचा? तर वर सांगितल्या-

प्रमाणें जे कोणी पातकी अनुतप्त झाले, परंतु देहदंडनास मात्र अपात्र ठरले त्यांसच फक्त मिळावयाचा आणि बहुतेक सगळेच लोक एवं-गुणविशिष्ट असल्यामुळें सर्वांनाच मिळावयाचा.

आतां जिवंत माणसास हा पुण्यांश मिळणें जर शक्य व युक्त आहे तर यातना-लोकांत अडकलेल्या मृतांस त्यांच्या पुत्रपौत्रांच्या द्वारें तो मिळणें तितकेंच शक्य व युक्त होतें. हा पुण्यांश मिळणें म्हणजेच वर सांगितलेली देहदंडनाची माफी किंवा सूट मिळणें होय. इकडे एका 'क' नांवाच्या गृहस्थास धर्मगुरूच्या द्वारां माफी मिळाली म्हणजे तिकडे सार्वजनिक गंगाजळींत तितकें पुण्य खर्चीं पडलें असा न्याय मानीत असत. ही सूट मिळवितांना प्रायश्चित्तदक्षिणा देणें हेंही सामान्य लोकांच्या दृष्टीनें अगदीं ओघानें येणारेंच होतें. जें आपणांस धर्मशास्त्रांत सांगित-लेल्या पद्धतीच्या देहदंडनानें साधतां येईना तें इतर ठिकाणीं आपला देह झिजवून आपण जें द्रव्य संपादिलें असतें तें खर्चून कां साधतां येऊं नये? देहदंड विहित पद्धतीनें सोसावयाचा, त्याच्या ऐवजीं लौकिक पद्धतीनें सोसून जें द्रव्य संपादिलें तें त्याच कामासाठीं खर्च केलें म्हणजे देहदंडनाचें श्रेय मिळावयास हरकत असूं नये असा व्यवहारज्ञानी माणसांचा हिशेब असावा. हा सर्व लोकोपयोगी पुण्यसंचय येशूचे प्रतिनिधि जे धर्मगुरु म्हणजे रोम शहरचे पोपमहाराज त्यांच्यापाशीं असतो अशी सार्वत्रिक समजूत होती व या पोपनें आज्ञापत्रें काढिलीं म्हणजे गांवोगांवच्या धर्माधिकाऱ्यांस या गंगाजळीच्या बळावर दक्षिणा घेऊन माफीपत्रें विकतां येत असत. अशी हीं माफीपत्रें विकण्याची कल्पना होती.

हीं माफीपत्रें घेण्याचा सपाटा सर्वत्र सुरू झाला. पोप दहावा लिओ यानें बांधूं घातलेल्या एका देवळाचें काम खितपत पडलें होतें. तें पुरें करावयास पैसा पाहिजे होता. हा माफीपट्टा त्यानें विकावयास काढून

गांवोगांव आज्ञापत्रें धाडलीं. वर दिलेल्या इतक्या बारकाव्यांत सामा लोकांना शिरतां येईना. ते समजूं लागले कीं, हा माफीपट्टा एकदं विकत घेतला कीं काम झालें. देहदंडन लांबच राहिलें; पण अनुतापाची सुद्धां जरूर नाहीं असा त्यांनीं समज करून घेतला. वास्तविक ल्यूथरच्या मतानेंही केवळ तत्त्वदृष्टया यांत म्हणजे वरील बारकाव्यांत कांहीं गैर होतें असें नाहीं. पण लोक त्याचा भलताच अर्थ करतात व अनुतापाचीसुद्धां जरूर नाहीं असें मानितात, ही गोष्ट त्याला फार भयप्रद वाटली. उपाध्याय म्हणून तो जेव्हां आसन्नमरणांची जबानी घ्यावयास जाई तेव्हां ते माफीपट्टा दाखवीत आणि म्हणत. 'आतां पातकाचा पोटउकला करण्याची जरुरी काय ?' हें पाखंड बंद झालेंच पाहिजे, असें ठरवून त्यानें आपलें शस्त्र उगारिलें व मठाच्या दरवाज्या-वर माफीपट्ट्यांतील प्रमेयांचें खंडन छापून चिकटवून दिलें. जिकडे तिकडे याचा गवगवा झाला. ल्यूथरचें म्हणणें कीं, पातक्याला अनुताप हा झालाच पाहिजे व देवानें सांगितलेला अनुताप झाल्याशिवाय आचार्यपीठासही माफी देतां येत नाहीं. उत्तरोत्तर वादाचें मूळ या बाबींतून लांबत चाललें.

अनुतापादि प्रकारांसंबंधीं ल्यूथरप्रमाणेंच हजारों विद्वानांचें मत होतें. पण आचार्यपीठास अमुक एक म्हणण्याचा हक्क वा योग्यता नाहीं हें जें ल्यूथरचें म्हणणें तें पुष्कळांस मानवेना. तुमचें म्हणणें काय आहे तें मजपुढें प्रत्यक्ष येऊन मांडा म्हणून पोपनें ल्यूथर यास आज्ञापिलें. रोम शहरीं गेल्यावर परत येण्याची शाश्वती नाहीं असें त्यास वाटल्यावरून राजेमहाराजे मध्यस्थी घालून, जर्मनींतच पंचायत झाली तर मी जबानीस येतों असें त्यानें कळविलें ! पोपनें हें पत्करलें. ऑग्जबर्ग गांवीं कॅटेजन याच्याशीं तूं वाद करून आपलें म्हणणें सिद्ध कर असा इशारा त्यास आला. कॅटेजन म्हणूं लागला, तूं आपलें पाखंड पहिल्यानें परत घे, मग

पोशीं वाद करत येईल. लूथर कबूल होईना. शेवटीं सभेंतून कांहींच निघालें नाहीं आणि हें प्रकरण येथेंच थबकलें. पण पोपला निकाल लावून घेणें भाग होतें. कारण लूथरनें माफीपट्ट्याचें खंडन प्रसिद्ध केल्यापासून त्याची विक्री सपाट्यानें बसत चालली व रोम शहरीं गल्ला जमा होईना! अर्थात् पोपनें मिल्टिझनाम्या दुसऱ्या शास्त्र्यास वादासाठीं पाठविलें. हा गृहस्थ शास्त्रही जाणी व घावडावही जाणी. त्यानें लूथरकडून लिहून घेतलें कीं, आचार्यपीठाविषयीं आपणांस आदरभाव आहे; आणि माफीपट्ट्याला परमार्थविचारांत महत्त्व आहे. पण पोपमहाराजांच्या अधिकाराविषयीं प्रश्न उपस्थित झाला होता तो तसाच लोंबत राहिला.

जॉन एक यानें या वादास रंग आणिला व प्रतिपादिलें कीं, पोपचा अधिकार मानिलाच पाहिजे, तरच खिरस्ती माणूस खिरस्ती राहूं शकतो. यासाठीं मोठी वादसभा भरली व तींत लूथर थोडासा नामोहरम झाला. तरीपण त्याचें मुख्य मत जें कीं, 'येशूवर श्रद्धा असली म्हणजे तो खिरस्ती; मग त्याला पोपचा अधिकार मान्य असो वा नसो,' तें प्रतिपादावयास त्यानें सुरुवात केली. 'धर्म ज्याचा त्याचा आहे, त्यानें पोपास मानिलेंच पाहिजे हें खोटें आहे; उलट धर्मासारखी स्वतंत्र वस्तु पोपनें आपल्या मालकीची करून ठेवून तीस बंदींत घातलें आहे; म्हणून सर्व खिरस्त्यांनीं स्वतंत्र व्हावें व हें करावयास पोपशीं जोराचा विरोध करावा.' असे विचार जर्मनीभर त्यानें पसरून दिले. माफीपट्टे लोकांनीं घेतल्यामुळें देशांतून खंडोगणती पैसा परदेशीं म्हणजे रोमकडे जात असल्यामुळें ठिकठिकाणचे राजे-महाराजे यांना हें लूथरचें प्रतिपादन पसंतच पडलें व त्यांनीं आंतून त्याला चांगलीच फूस दिली. कित्येक ठिकाणचे शास्त्री-पंडितही म्हणूं लागले, कीं ज्या पवित्रशास्त्राच्या जोरावर पोप असला हक्क सांगतात त्या शास्त्राचा अर्थ करण्याचा मक्ता पोपासच कोणीं दिला? पवित्रशास्त्रावरून पाहतां पोपला असली अम्मलदारी

प्राप्त होत नाहीं. याप्रमाणें सगळीकडूनच अंगाशीं येत आहे हें पाहून पोप थोडा चपापला; पण त्याच्या हातीं एक जबरदस्त शस्त्र होतें, तें त्यानें उपसलें. त्यानें ल्यूथरवर ग्रामण्य पुकारलें व आज्ञापत्र काढून फर्माविलें कीं, ल्यूथर हा पाखंडमतवादी आहे, तो ख्रिस्ती धर्मांतून बहिष्कृत आहे व सर्व श्रद्धाळू ख्रिस्त्यांनीं त्याच्याशीं असलेला आपला संबंध तोडून टाकावा. हें आज्ञापत्र कसलें ? विजेचा लोळच तो. ल्यूथर भला खंबीर होता व लोक आपल्या पाठीशीं आहेत हेंही त्यास माहीत होतें. पोपचें कृत्य कडकडीत, तसें ल्यूथरचें प्रत्युत्तरही कडकडीतच हवें होतें. " पोपच्या आज्ञापत्राची संभावना काय करतों ती पाहावयास या " अशी दवंडी त्यानें पिटविली. दुसरे दिवशीं शहरांतील तमाम लोक मठापुढें जमा झाले. एका महंतानें एक चिता पेटविली. हातीं आज्ञापत्र घेऊन ल्यूथर पुढें झाला आणि आज्ञापत्रास उद्देशून गरजला कीं, " त्वां येशूच्या परमेश्वरास अवमानिलें, दुखविलें, म्हणून मी आतां तुझी होळी करतों. " असें म्हणून त्यानें तें पत्र आगींत झुगारून दिलें !

या त्याच्या भयानक कृत्यामुळें जिकडे तिकडे कल्लोळ माजला. मतांच्या बारीक बारीक छाया-पडछाया समाजांत नेहमींच असल्यामुळें घरोघरीं मतभेद, भांडणें, केशाकेशी, ग्रामण्यें, बंडें यांचा सुकाळ झाला. सर्व युरोपभर या चितेचा उजेड पडला. हा शुद्ध मूर्खपणा आहे असें लोकांस वाटलें. झालें तें ठीक; झालें असें म्हणणारेही हजारों होते. असली बंडखोरी पायाखालीं ठेंचून टाकिली पाहिजे अशी आरोळी श्रद्धाळू धार्मिकांतून उठली व रोमन आचार्यपीठाच्या वतीनें मोठमोठाले राजे आपल्या फौजा या धर्मभ्रष्ट जर्मनीवर वळविणार असा बोभाटा उठला.

पोपनें सम्राट् चार्ल्स यांस हांक मारून कांहीं इलाज करा म्हणून सांगितलें. कारण पवित्र-रोमन-साम्राज्याचा मुकुटमणि तोच होता.

मोठी पंचाईत झाली. त्याचे हितसंबंध यूरोपभर पसरले होते. त्याला कोणासही दुखवावयास नको होतें. जर्मनींतील आपले राजे-मित्र लूथरला अनुकूल आहेत हें त्यानें ओळखिलें होतें. म्हणून आपल्या हिताहिताची नीट व्यवस्था लावून त्यानें लूथर यास कळविलें कीं, " तुम्हांस इकडून अभय देण्यांत येत आहे; तुमचें म्हणणें आमच्या दरबारीं येऊन कथन करा. " चार्ल्सचा दरबार म्हणजे हजारों राजे-रजवाडे, अमीरउमराव, आचार्य, शास्त्री, पंडित यांनीं खेंचलेला असावयाचा. लूथरनें आमंत्रण स्वीकारलें. दरबार वर्म्स शहरीं भरला होता. तिकडे जावयास तो निघाला तों वाटेनें त्याचा मान एखाद्या विजयी वीराप्रमाणें होत चालला. दरबारांत त्याच्या सर्व लिखाणांचा एक ढीग रचून ठेविला होता. त्याजकडे बोट दाखवून खटला सुनावणारा म्हणाला, " हें सारें पाखंड आहे, तुम्ही परत घ्या. " लूथर म्हणाला, " हें पाखंड आहे असें पवित्र शास्त्रांतील आधारांनीं सिद्ध झाल्यास मी स्वतःच हे ग्रंथ जाळून टाकीन. " चार्ल्सनें कळविलें कीं, " या प्रकरणाचा फैसला सरकारनें नेमलेल्या कमिटीनें पूर्वीच केला आहे, आतां आधारांची वगैरे जरुरी नाहीं. तुम्ही पोप इत्यादिकांविषयीं जें कांहीं बहकलां तें परत घेतां काय ? " लूथर म्हणाला, " पोप हा केवळ प्रमादरहित आहे असें मी समजत नाहीं. तोही चुकीस पात्र आहे; म्हणून माझीं मतें शास्त्राच्या आधारें बरोबर कीं चूक तें ठरवावें. " राजा म्हणाला, " सर्व पंडितांची सभा चुकली व तुम्ही तेवढे बरोबर हें तुम्हांस भावतें तरी कसें ? " लूथरनें उत्तर केलें कीं, " जें बोललों आहे तें खरें आहे. त्यांतून कांहीं परत घेणार नाहीं. देवा, तूं मजवर दया कर. " चार्ल्सनें दरबार खलास केला व वायद्याप्रमाणें लूथर यास आपल्या गांवीं जाऊं दिलें, पण साम्राज्यांतून त्यास बहिष्कृत केलें. या प्रसंगीं लूथरच्या धैर्याची कसोटी लागली. तो जर लेचापेचा माणूस

असता तर दरबारास जावयाचेंच टाळता. पण हें साहस त्यानें आपले मतासाठीं हौसेनें अंगीकारिलें. असो.

यापुढें कांहीं वर्षें ल्यूथर यास आपल्याच देशांत पण अज्ञातवासांत राहावें लागलें. जर्मन राजे त्यास आंतून अनुकूलच होते. त्यांनीं सम्राट् चार्ल्सचा हुकूम रद्दीत्रजाच मानिला. ल्यूथरच्या अज्ञातवासांत त्यानें सुरू केलेला मतसंप्रदाय व विशेषतः प्रतिपादनांतील बेफिकिरी सर्वत्र पसरली व ठिकठिकाणीं अतिरेक होऊं लागला. शेतकऱ्यांनीं धार्मिक मतसंसर्गानें पण आर्थिक बंडें केलीं. लूथरचें शुद्ध धार्मिक बंड रूपांतरित होऊं लागलें. अज्ञातवासांतून बाहेर पडून त्यानें स्थिरस्थावर करण्यासाठीं पुष्कळ खटपट केली पण एकदां पेटविलेला वणवा काय वाटेल तें जाळूं लागला. त्याला तो आवरतां येईना.

वरील दरबारप्रकरणानंतर सुमारें पांच वर्षांनीं या जोगी उपाध्यायानें ब्रह्मचर्य बाजूस ठेवून लग्न करण्याचें ठरविलें. खुद्द त्याचे अनुयायी लोकही विस्मित झाले. ही नवरी म्हणजे अर्थातच मठांतील एक जोगीण होती. पुढें त्यानें गृहस्थाश्रमही चांगला आचरिला. धार्मिक ग्रंथांचीं भाषांतरें करणें, प्रवचनें करणें अनुयायांस शिस्त लावणें, इत्यादि उद्योगांत त्याचीं पुढील वर्षें गेलीं. त्यांपैकीं कांहींच या लहानशा चरित्रांत सांगण्याचें कारण नाहीं. त्याचा मुख्य पराक्रम वर वर्णिला आहे. लोकांच्या हातीं त्याच्या मताप्रमाणें धर्माचीं केवळ टरफलें राहिलीं होतीं. लोकांच्या पारमार्थिक कल्याणाची त्याला खरी कळकळ होती. तो स्वतः अत्यंत श्रद्धाळू अशा प्रकारचा सुधारक होता. पण आपलें मत प्रतिपादण्यांत त्यानें कधींही कसूर केली नाहीं, स्वकीयांची भीड राखिली नाहीं आणि अधिकाऱ्यांची जरब मानिली नाहीं. त्याच्या चरित्राचें सार हेंच आहे. वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षी लग्न करूनही तो पुष्कळ मुलाबाळांचा बाप झाला, व संसारांतील निरनिराळे रस

नें अनुभवूं लागला. त्याला बायको फार चांगली मिळाली होती. ढें पुढें लूथरचा आदा बऱ्या प्रकारें वाढला आणि त्यामुळें वाढत्या प्रपंचांतही त्याला दारिद्र्याची हाय पोंचली नाहीं. धर्मविषयक तत्त्वांचें चिंतन हा जरी त्याच्या मनाचा मुख्य हव्यास असला तरी मित्रमंडळींशीं हास्यविनोद करणें अशासारखे प्रकार त्यास आवडत असत. तो गायनाचा थोडा षोकी असून बांसरी फार चांगली वाजवीत असे; व अंगीं थोडें कवित्व असल्यामुळें त्याच्या या सर्व सांसारिक सुखांना मोठी चव उत्पन्न झाली होती. तो विद्वान् होता हें खरें आहे; पण महान् पंडित होता असें मात्र नव्हे. पण मतस्वातंत्र्य हाच त्याचा जीवितहेतु होय. एरवीं पाहूं जातां तो थोडा करडा, कांहींसा संतापी व थोडा लहरी स्वभावाचा होता. असा हा युरोपांतील स्वतंत्र मतपंथाचा आद्य संस्थापक सन १५३६ सालीं ख्रिस्तवासी झाला.

* * *

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... दि: .............
क्रमांक .......................... नोंद दि: ..............

# कोलंबस

कोलंबस हा जिनोआ शहरीं इ. सन १४३५ सालीं जन्मला. आईबाप घरचे गरीबच असले तरी चांगले कुलवान् होते. दोन भाऊ च एक बहीण मिळून हीं चार भावंडें होतीं. कोलंबस हा बापाचा पहिलाच मुलगा असल्यामुळें त्यानें त्यास फार लहानपणींच मोठ्या हौसेने शिकवावयास आरंभ केला. लिहिणें, वाचणें, थोडे हिशेबठिशेब, व्याकरण आणि बरेंचसें ड्रॉइंग या गोष्टी कोलंबसास फार लहानपणीं माहीत झाल्या. हे विषय शिकवीत असतां बापाच्या ध्यानांत आलें कीं, मुलाला भूगोलाच्या माहितीची आवड फार आहे. त्यांचें राहणेंही समुद्रापासून फारसें दूर नसल्यामुळें तितक्या लहानपणींसुद्धां आपण नावाडी बनावें अशी कोलंबसाला फार आवड वाटे. बापही भला शहाणा माणूस होता. ज्या विद्येकडे मुलाचा कल तीच विद्या त्यास शिकवली तर तें त्यास फार हिताचें होईल हें जाणून दर्यावर्दीपणाच्या कामाला जरूर तें तें ज्ञान देणाऱ्या प्याव्हिआ येथील शाळेंत त्यानें त्यास घातलें. कोलंबस तेथें भूमिति, भूगोलविद्या, खगोलविद्या व नावाडीपणा इत्यादि गोष्टी शिकूं लागला. लॅटिन भाषेचेंही थोडेंसें ज्ञान

ला तेथें प्राप्त झालें. शाळेंतील पंतोजीचें भांडवल संपतांच कोलं-
बसानें शाळा सोडली व दुसरीकडे कोठें मोठ्या शाळेंत न जातां तो एकदम खलाशीच बनला. या वेळीं तो अवघा चवदा वर्षांचा होता. त्याच्या नातेवाइकांत कोलंबो नांवाचा एक कोणी धाडसी खलाशी होता. त्याच्या दिमतीस कोलंबस राहिला.

त्या वेळीं इटली देशांत आणि भूमध्यसमुद्राच्या सर्व कांठभर लहान लहान राज्यें पसरलेलीं असून प्रत्येक राजाचें म्हणून एक लहानसें आरमार असे. कांहीं धाडशी नावाड्यांनीं तर कोठेंही नोकरी न पत्करतां आपल्याच हिमतीवर दहा-पांच तरांडीं जवळ बाळगून, पांच-पन्नास आपल्यासारखेच धाडशी लोक पदरीं ठेवून समुद्रावर वाटमारीचा धंदा बेधडक चालविला होता. सबंध भूमध्य समुद्रावर असल्या भुरट्या वाटमारेकऱ्यांचा धुमाकूळ चालत असे. कोलंबसाचा वर सांगितलेला जो कोलंबो तो असल्या लोकांमध्येंसुद्धां बडा बिलंदर म्हणून समजत असत. त्याच्याच शिडाखालीं समुद्रावर अहोरात्र भटक्या मारावयास कोलंबस शिकत असल्यामुळें त्याची समुद्राची भीति पार मरून गेली. इतक्या लहानपणीं मन व पोंच हींही अगदी लहान असल्यामुळें खरें भयसुद्धां लहान पोरांना नीटसें उमगत नाहीं. मन इतकेंच वाढलेलें असतांना कोलंबसाला धैर्य प्राप्त झालें. इ० सन १४४९ सालीं त्याच्या राजानें नेपल्स शहरावर छापा घालण्याचें ठरवून एक आरमार तयार केलें आणि त्यांपैकीं जहाजांचा एक ताफा वरील कोलंबोच्या हवालीं केला. कोलंबो म्हटला कीं कोलंबस आलाच. हें दर्यावरचें झुंज चार वर्षें चाललें होतें. वल्हवणें, दूरचें न्याहाळणें, प्रसंग आला असतां दर्यांत उडी फेकणें, जहाजावर बसून समुद्राच्या लाटा डोक्यावरून जाऊं देणें, रात्रीं अपरात्रीं जागत राहून संधि साधून शत्रूवर तुटून पडणें, असल्या गोष्टींना कोलंबस अगदीं सरावून गेला. अटलांटिक महासागरासारख्या

'तामसी' समुद्रावर होडग्यांत बसून दोन दोन महिने विनदि हेलपाटत राहणें आणि खरोखरीच मुलुखानिराळ्या देशांत सांपडूनसु. तिथल्या राक्षसी रानव्यांना वठणीवर आणणें, असलीं जीं कामें त्याच्या हातून पुढें झालीं तीं करावयास लागणारें मनाचें व शरीराचें बळ त्याला या कोलंब्रोच्या देखरेखीखालीं मिळालें. याप्रमाणें या धंद्यांत कोलंबस वाढत असतां कोलंब्रो मृत्यु पावला. त्याचा पुतण्या धाकटा कोलंब्रो हाही मोठा धाडशी तांडेल म्हणून समुद्रावर गाजून राहिला होता. कोलंबसाची व त्याची चांगली गट्टी जमली. हा कोलंब्रो असा निर्दय आणि आडदांड होता कीं, आफ्रिकेंतल्या आडदांड मूरिश लोकांनासुद्धां त्याचा मोठा वचक बसून राहिला होता.

एकदां असें झालें कीं, वेनिस शहरचीं कांहीं गलबतें फ्लॅन्डर्स देशांतून आपल्या देशाकडे परत जात होतीं. गलबतावर मोठ्या मोलवान् चिजा भरल्या होत्या. हीं जहाजें पोर्तुगाल देशच्या किनाऱ्यानें सुखानें चाललीं असतां या दोघांनीं त्यांच्यावर अचानक हल्ला केला. जहाजावरचे लोकही भले खंबीर भांडखोर होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखी मारामारी चालली होती. दोघांचेंही माणूस फार मेलें. जहाजाला जहाज भिडून हाणाहाणी चालली असतां कोलंबस ज्या जहाजावर होता त्यानें पेट घेतला. ह्यांनीं व त्यांनीं आपापलीं निरनिराळीं जहाजें साखळदंडानें एकमेकांस बांधून घातलीं होतीं व शत्रूचीं जहाजें अगदीं टेकल्यावर त्यांवर उड्या टाकून भांडावयास सांपडावें म्हणून त्यांचीं जहाजेंही आपल्या जहाजांस त्यांनीं साखळ्यांनीं गुंतविलीं. त्यामुळें असें झालें कीं, एक जहाज पेटतांच भोंवतालचीं सर्व पेटलीं. होतां होतां दोन्हीकडील सगळींच जहाजें पेटून एकच डोंबाळा माजला. आतां जहाजें सोडवितां येत नाहींत हें पाहून पटाईत पोहणारांनीं बेलाशक समुद्रांत उड्या झोंकून दिल्या. कोलंबसानेंही तेंच केलें. पाण्यांत

ावर त्याला एक वांसा सांपडला. त्याला धरून कोलंबस किनाऱ्या-पोहत जाऊं लागला. किनारा जवळपास सहा मैल होता. तरी कोलंबस पोहण्याच्या कामांतही चांगला निष्णात असल्यामुळें तो लवकरच पोर्तुगाल देशच्या किनाऱ्यास येऊन लागला. म्हणजे जिनोआ शहरचा हा दर्यावर्दी रहिवासी आपल्या चांचेगिरीच्या धंद्यानिमित्त समुद्रावर फिरत असतां एका मोठ्या अरिष्टांतून निभावून कोठल्यातरी एका देशाच्या अनोळखी किनाऱ्यावर येऊन पडला.

याच पोर्तुगाल देशांत त्याच्या कल्पना वाढत जावयाच्या होत्या. कोणाकोणाचें असें म्हणणें आहे कीं, त्याचें पोर्तुगाल देशांत येणें असल्या आकस्मिक रीतीनें झालेलें नसून, आपलें गांव सोडून तो बुद्धिपुरस्सरपणें तेथें गेला होता. त्यांचें म्हणणें कीं, जिनोआ शहरीं असतां त्याला भूगोलविषयक ज्ञानाची व देशपर्यटनाची फार हौस उत्पन्न झाली होती. आणि तेव्हांच्या काळीं आफ्रिकेचा पश्चिम किनारा शोधून काढणें, हिंदुस्थानास मार्ग शोधून काढणें, असल्या ज्या कांहीं खळबळी समुद्रकांठच्या लोकांत चालू होत्या त्यांत त्याचें मन गर्क झालेलें असे. त्याच्या स्वतःच्या म्हणून ज्या कांहीं कल्पना होत्या त्या तपासून पहावयास व जमल्यास त्या अमलांत आणण्याची संधि साधावयास मुद्दाम धरून उठून तो पोर्तुगाल देशांत गेला. त्यानें पुढें जें कांहीं महत्कार्य केलें त्याच्याशीं ही कल्पना चांगली जुळत असल्यामुळें हीच बरोबर असावी व हा वेळपर्यंत तो म्हणजे एक नुसता भटक्या मारणारा चांच्याच नसावा असें मानण्याकडे आपला कल होतो. पण तेवढ्यामुळें म्हणजे संगतवारपणामुळें हाच इतिहास खरा आहे असें निश्चित म्हणतां यावयाचें नाहीं. दर्याचें व खुष्कीचें चांगलें ज्ञान असल्याशिवाय माणूस चांचेपणा तरी कसा करील? शिवाय तेव्हां चांचेगिरींत कांहीं लाज अशी उरलीच नव्हती, अथवा उत्पन्नच झाली

नव्हती. पोर्तुगाल देशांत आल्यानंतरच तेथील भूगोल-शोधाच्या चळवळी ऐकून त्याचें लक्ष त्याजकडे जोरानें वेधलें असेल. वेळपर्यंत तो जरी वयानें लहानच होता व आपलें सर्व जीवित चांचेगिरी करीतच दवडावयाचें असाही कांहीं त्याचा निश्चय झाला होता असें नाहीं. कसेंही असो. आगंतुकरीत्या तो पोर्तुगाल देशीं आला असला तरी त्याला पुढें आनंदच वाटला असला पाहिजे व आपण होऊन तो आला असल्यास आपण एका फार चांगल्या राजाच्या राज्यांत येऊन दाखल झालों आहों असा त्यास अनुभव आला असेल. हा आनंद त्याला कां झाला व अनुकूल अनुभव कां आला त्याचें ज्ञान होण्यास पुढें वाचण्याची जरुरी आहे.

या वेळीं पोर्तुगालच्या गादीवर प्रिन्स हेन्री नांवाचा राजा होता. भोंवतालीं सर्वत्र पसरलेल्या भूगोल-शोधविषयक कल्पनेंत हाही सांपडला होता. आपल्या बापाबरोबर मूर लोकांना झोडपावयासाठीं तो आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें थोडासा खालीं दक्षिणेकडे गेला होता. तेव्हांच त्याला अटकळ आली होती कीं, खूप खालीं गेलें तर आफ्रिकेलाही वळसा घालतां येईल व तसें झालें तर कदाचित् तिकडून हिंदुस्थानाला जातां येईल. पण माहीतगार लोक म्हणत कीं, आफ्रिकेच्या किनाऱ्यानें थोडें दक्षिणेस खालीं जातांच माणूस अत्यंत प्रखर अशा कटिबंधांत जाऊन पोंचतें आणि तेथें गेल्यावर त्या उन्हांतून व तापलेल्या दर्यांतून परत येण्याची आशाच नको. तेथें जहाज व नावाडी दोघेही जळून बुडायचे. हेन्रीला हें खरें वाटेना. त्यानें सामुद्रिकांचें म्हणजे समुद्रविषयक ज्ञान ज्यांना चांगलें होतें त्यांचें एक मंडळ स्थापन केलें. देशोदेशींचे माहीतगार लोक, ज्योतिषी आणि साहसप्रिय नावाडी यांचाही त्यानें तेथें संग्रह केला. पुष्कळ दिवस शोधपूर्वक पाहिल्यावर त्याची खात्री होऊन चुकली कीं, उष्णकटिबंधांतील भस्म करणाऱ्या उष्णतेचें बुजगावणें

च आहे. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें थेट खालीं जातां येईल व शेवटीं कोठें तरी तें महाद्वीप निमुळतें झालेंच असेल. निदान वळसण्यासारखें खास असेल. राजाच्या या निश्चित अनुमानामुळें साहसी लोकांना नवें स्फुरण आलें. पोर्तुगाल व स्पेन यांच्या समुद्रकांठभर आतां जिकडे तिकडे हा एकच विषय भरून राहिला होता व साहस करणाराला 'श्री ' प्राप्त होते हा न्याय सर्वकालीं सारखाच महशूर असल्यामुळें आपल्या नशिबाची परीक्षा पहावयास सर्व उत्साही नावाडी तत्पर झाले होते. अशा या चलविचलीच्या वेळीं कोलंबस पोर्तुगालच्या किनाऱ्यास लागला किंवा आला. ही गोष्ट सरासरी इ. स. १४०० सालीं घडली.

कोलंबस चांगला उंच असून अंगापिंडानें मजबूत व पिळदार दिसत असे. त्याची चालण्याची ढब मोठी ऐटदार होती. चेहरा किंचित् लांबट असून मांसानें लद्बदलेलाही नव्हता अगर वाळकाही नव्हता. डोळ्यांखालचीं हाडें मात्र जरा वर आलेलीं दिसत. नाक चोंचदार असून डोळे कांहींसे घारे असत. डोळ्यांचीं भिंगें स्वच्छ आणि लखलखणारीं होतीं. एकंदरीनें हा गृहस्थ मोठा रुबाबदार दिसे. पण बत्तिशी पार पडली नाहीं तोंच त्याचे केंस मात्र शुभ्र पांढरे होऊन गेले होते. कपडालत्ता आणि खाणेंपिणें यांत त्याची मिजास म्हणून कांहीं नव्हती. जवळचा असो, परका असो, कोणाशींही बोलत असला तरी तो मोठ्या प्रेमळपणानें बोले. घरीं मुलांमाणसांशीं त्यानें कधींही खेंकसाखेंकशी केली नाहीं; त्यामुळें घरींदारीं आनंद असे. तो मोठा श्रद्धाळू होता पण त्याची धर्मबुद्धि तान्त्रिक नसून चित्तांत गूढपणें भरलेली होती.

लिस्बन येथें असतांना त्यानें न चुकतां प्रार्थनेला जात असावें. त्याच देवळाच्या शेजारीं डोना फिनिपा नांवाची एक मोठी प्रतिष्ठित व उच्च दर्जाची स्त्री रहात होती. हिचा बाप एक मोठा प्रसिद्ध दर्यावर्दी म्हणून लोकांत प्रसिद्ध होता. या स्त्रीचें मन कोलंबसावर बसलें. लवकरच

विवाहविधि होऊन त्याला सासूबाईनीं घरजांवई केलें. हा सर्व मोठा चमत्कारिक असा म्हणावयास हवा. कारण कीं, यानें कोलंबसाच्-जीवितहेतूच्या रेषा स्पष्ट झाल्या. त्याला सफरी करण्याचा हव्यास होताच. पण आतां सासूबाईनीं त्यास प्रोत्साहन दिलें. सासरा वारलाच होता, पण आपल्या हयातींत त्यानें ज्या कांहीं सफरी केल्या होत्या त्यांचे नकाशे इत्यादि सर्व गोष्टी त्यानें फार काळजीपूर्वक राखून ठेवल्या होत्या. सासूनें हे सर्व कागदपत्र जांवयाच्या हवालीं केले. रोज नवऱ्याच्या वेळच्या समुद्रावरील गोष्टी ही बाई त्यास वारकाईनें सांगे. कोलंबसानें आतां समुद्राचे नकाशे तयार करून देण्याचा धंदाच सुरू केला. धंदाच तो झाल्यामुळें घरींदारीं दिवसांरात्रीं अष्टौप्रहर त्यानें समुद्राचाच ध्यास घेतला. कोण कोठें सफरीस जात आहे याची नोंद ठेवावी, कोण कोठून आला हें हुडकून काढून त्यानें कोणचा नवीन शोध लावला त्याची पूसतपास करावी, त्यास अनुसरून ते तेच नकाशे पण पुनः पुन्हा जास्त मजकूर भरून आणखी तयार करून विकावे, असा त्याचा क्रम चालू झाला.

अर्थात् कोणाही नावाड्यापेक्षां त्याची माहिती जास्त व निश्चित अशी असे. त्याच विषयाच्या चिंतनानें व सुपूर्त माहितीच्या बळावर त्याला नव्या कल्पना सुचूं लागल्या. पूर्वी होऊन गेलेल्या भूगोलवेत्त्यांनीं लिहिलेले जुने ग्रंथ त्यानें वाचून काढिले व आधुनिकांची माहिती कोठें जुळते, कोठें जुळत नाहीं हेंही त्यानें शोधिलें. प्रिन्स हेन्रीच्या सामुद्रिक चळवळीमुळें अवघा दर्याकांठ नित्य नव्या येणाऱ्या बातम्यांनीं नादावून गेला होता. त्यांत कित्येक खऱ्या, कित्येक साफ खोट्या असत; पण या सर्वांचा रोंख आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें दक्षिणेकडे उतरून त्या निमुळत्या टोंकास वळसा घालून पूर्वेकडे वळल्यावर हिंदुस्थानास पोंचतां यावें अशा प्रकारचा होता. हिंदुस्थानांतला सोन्याचा धूर फार उंच

असावा असें दिसतें, कीं इतक्या दूरच्या लोकांस इकडे येण्याची लगबग व्हावी ! कोलंबसाचें अवलोकन व चालना अखंड होती. कोणीही नवा आणि धाडसी तांडेल उठो, त्यानें हिंदुस्थानची वाट आफ्रिकेला वळसूनच सांपडणार असें गृहीत धरून समुद्रावर शिडें रोंखावीं असा क्रम चालू होता. कोलंबस जणुं कांहीं दूर उभा राहून ही चढाओढ पहात होता. नाविकांची व भूगोलवेत्त्यांची ही धडपड पाहून त्याच्या मनानें मात्र एक निराळीच कल्पना बांधिली. एखाद्या विषयाचें सांगोपांग ज्ञान व अविरत चिंतन असलें तर माणसास सर्वथा नवीन कल्पना सुचते व बुद्धीला स्वतंत्र स्फुरण खास येतें. कोलंबसाला ही धडपड पटेना. 'इकडूनच हे सगळे कां मरताहेत ?' तो स्वतःस म्हणे, 'चतुःसीमेस दर्या अफाट पसरला आहे. मग दक्षिणेकडेच कां ? मग काय वाटेल तिकडे जाऊन पूर्वेकडील हिंदुस्थान हातीं लागेल ?' तसेंही नाहीं. पण त्याच्या बुद्धीला नुसतीच वंडखोरी लाभलेली नव्हती, तिला शिस्तही होती.

पुष्कळ दिवसपर्यंत फ्लोरेन्स शहरचा भूगोलवेत्ता पोलो टॉस्कानेली याजबरोबर त्याचा पत्रव्यवहार चालू होता; कां कीं, या पंडिताच्या मनांतही कोलंबसाचीच कल्पना बऱ्याच वर्षांपूर्वीपासून खेळत होती. पृथ्वी ही वाटोळी असून पूर्वेकडून पश्चिमेस व पश्चिमेकडून पूर्वेस जातां येणें सहज शक्य आहे असा त्याचा सिद्धान्त होता. पूर्वेकडे पसरलेलें आशिया-खंड पसरत पसरत युरोपच्या पश्चिमेस थोडासाच समुद्र मध्यें रहाण्या-इतकें पसरलें असावें असा त्याचा अंदाज होता. आशिया खंडाचा पूर्वकिनारा व युरोपचा पश्चिम किनारा यांजमध्यें फार थोडें अंतर त्यानें कल्पिलें होतें. या दोहोंच्या मध्यें प्रचंड दर्या असून त्यांत आणखी एक विस्तीर्ण खंड असेल अशी त्यास कल्पना नव्हती. म्हणजे एकंदर पृथ्वीचा परिघ आहे त्याहून फार लहान असावा अशी त्याची अटकळ

होती. पोलो टॉस्कानेली यानें आपलें हें मत नकाशासह कोलं‍ब‍स
कळविलें. कोलंबसला फार धीर आला व युरोप आणि आशिया यांमध
समुद्राचें थोडेंसें अंतर आपण ओलांडण्याचें धाडस केलें तर आपण आशियांत व मग हिंदुस्थानास जाऊं शकूं असें त्याच्या मनानें घेतलें. वास्तविक वरील पंडिताचें हें अंतरविषयक मत साफ चुकलेलें होतें हें स्पष्टच आहे; पण चुकलें होतें हेंच बरें झालें! कारण खरोखरीचें अंतर त्यास कळलें असतें तर तें अंतर ओलांडावयास जाण्याची कोलंबसाचीही छाती झाली नसती. मार्कोपोलो, अल्फिर्गॅनस इत्यादींचीं मतेंही त्यानें शोधून पाहिलीं. अरिस्तातल, सेनेकाप्लिनी इत्यादींच्या मतांचा झोंक त्याच्या विचारास पोषकच होता. म्हणजे काय कीं, पूर्वकालीन व समकालीन अशा सर्व पंडितांचीं मतें त्यानें तपासून आपलें मत निश्चित केलें होतें. हें शास्त्रविशारदांविषयीं झालें.

जे कोणी प्रत्यक्ष नावाडपण करीत होते त्यांच्या माहितीकडेही त्याचें लक्ष होतें. मदिरा गांवचा लिओनामा खलाशी सांगे कीं, पश्चिमेकडे तीनचारशें मैल गेलों असतां तेथें आपणांस कांहीं बेटें दिसलीं. आयर्लंडचा एक खलाशी सांगे कीं, दूर पश्चिमेस गेलों असतां तार्तरी देशाचा किनारा लांब दिसत होता. कोणास हजार हजार मैल समुद्रावर पश्चिमेकडून वहात येणारीं कोरींव लांकडें, कोणास ताजे ऊंस, कोणास चमत्कारिक रंगाचीं माणसें अशीं भेटल्याच्या कथाही सर्वत्र ऐकूं येत. याही कथा तारतम्यभावानें त्यानें जमेस धरल्या; पण या सर्वांच्याहून बलवत्तर असें एक प्रमाण त्याच्या धर्मश्रद्धाळू बुद्धीस माहीत होतें. बायबलांत म्हटलें आहे कीं, "पुढें पृथ्वीचीं दोन टोकें एकत्र येतील व माणसें आपापलीं राष्ट्रें, भाषा इत्यादि विसरून तारकाच्या निशाणाखालीं गोळा होतील." कोलंबसास वाटे, हीं दोन टोंकें म्हणजे युरोपचा पश्चिम किनारा व आशियाचा पूर्व किनारा हे होत व त्यांस एकत्र आण-

ामीं तारकानें आपणांस नेमिलें आहे. असो. याप्रमाणें शास्त्र, व श्रद्धा या सर्वांच्या संमतीनें " पश्चिमेकडे निघालों असतां पूर्वेकडील हिंदुस्थान केव्हांना केव्हां भेटलेंच पाहिजे " हा सिद्धान्त कोलंबसानें कायम केला व तो पडताळून पहाण्याच्या उद्योगास तो लागला.

तेव्हांचें युग राजयुग होतें. अर्थात् राजाच्या आश्रयाशिवाय हें काम तडीस जाणारें नव्हतें. या वेळीं मागें उल्लेखिलेल्या हेन्रीचा नातू जॉन गादीवर होता. त्यासही सफरीचा व शोधाचा मोठा नाद होता. त्यानें भूगोल-खगोल-शास्त्रवेत्ते एकत्र केले होते व त्यांनीं नौकानयनास अत्यंत उपयोगी असें ॲस्ट्रोलेब् नांवाचें साधन तयार केलें होतें. अशा या राजाकडे कोलंबसानें बोलणें लाविलें. कोलंबसाची मुलाखत होऊन राजानें एक कमिटी नेमिली व प्रकरण योग्यपणें निकालांत काढा म्हणून सांगितलें. कमिटीवाले कांहीं अडाणी व कांहीं मत्सरी होते. त्यांनीं राजास कळविलें कीं, हा कल्पनाबाज माणूस केवळ वेडा आहे. राजाचें समाधान होईना. यावर त्यांनीं एक डाव केला. ते राजास म्हणाले, ' हा जेथें व ज्या दिशेनें जावयाचें असें हटकून म्हणतो तेथें व तिकडे आपलेच नावाडी आपण धाडूं व नवीन भूमि शोधण्याचें श्रेय आपणच घेऊं. ' राजानें हुंकार दिला. कोलंबसाचे सर्व नकाशे या लुच्च्यांनीं मागून नेले व कोणास नकळत आपलींच जहाजें त्या अनुरोधानें पश्चिमेस रवाना केलीं व इकडे कोलंबसास बोलण्याचालण्यावारीच झुलत ठेविलें. कांहीं दिवसांनीं ते वळेंच दर्यांत दवडलेले खलाशी रडत परत आले. त्यांना उल्हास ना ज्ञान. चार दिवस समुद्राची हवा पिऊन ते सांगत आले कीं, पश्चिमेकडे वाटेल तितकें जा, जमीन म्हणून कोठेंही नाहीं. हा कोलंबस उगाच उपरा, उपद्व्या दिसतो. या त्यांच्या बतावणीवर विश्वास ठेवून राजानें कोलंबसास परत धाडिलें. राजाची ही लबाडी त्याला कळल्यावर

त्यानें तिरस्कारानें त्याचें तोंड पुन्हा न पहाण्याचा निश्चय केला.
त्याची बायको वारली. प्रपंचाची ओढाताण फार होऊं लागली,
कपाळ छिनत चाललें. वरील तिरस्काराची या ओढगस्तपणांत भर पडून
त्यानें पोर्तुगाल देशास रामराम ठोकला. कोणी म्हणतात सावकारांचें
तोंड चुकविण्यासाठींच तो तेथून निसटला.

जिनोआ शहरच्या राजाकडे तो तडक गेला. पण त्याच्यांत दम
नव्हता. तो म्हणाला, मला खर्चाचें झेंपणार नाहीं. मग त्यानें आपला
भाऊ बार्थोलोमो यास इंग्लंडचा सातवा हेन्री याजकडे पाठविलें; कारण
कीं, त्याचाही या कामांतील लौकिक बरा होता. त्यास तिकडे पाठवून
तो स्वतः स्पेन देशांत गेला. बरोबर एकुलता एक मुलगा, अंगावर
कपडा नाहीं, खिशांत छदाम नाहीं अशी या वेळीं त्याची स्थिति होती.
त्याचा मेहुणा तिकडेच एका खेडेगांवीं रहात असे. त्याच्या आश्रयास
जावें म्हणून तो वणवण करीत निघाला होता तों वाटेंत एका धर्मोप-
देशकानें त्याचें बोलणें नीट ऐकून घेतलें व त्याच्या चर्येवरून हा
कोणी तरी साहसी व प्रतिभाशाली माणूस असावा असें ओळखून त्यास
पत्र देऊन आलोंझो पिंझो नांवाच्या तेव्हांच्या एका प्रसिद्ध दर्यासारंगा-
कडे त्यानें त्यास पाठविलें. त्यानें कोलंबसाची वाहवा करून त्यास
राजदरबाराकडे रवाना केलें. इ० सन १४८६ च्या वसंतांत कोलंबस
राजधानीस आला.

तेथें पहातो तों निराळाच प्रकार चालू होता. राजा मूर लोकांशीं युद्ध
सुरू करणार होता. त्यानिमित्त जिकडे तिकडे तयारीची दंगल माजून
राहिली होती. वास्तविक राजा व राणी हीं चांगलीं होतीं. पण त्यांचीं
कामें त्यांना पुरेशीं असल्यामुळें कोलंबसच्या व्याख्यानाकडे लक्ष
द्यावयास त्यांस फुरसतच होईना. आतां तर त्याला अन्नाचीही मोताद
पडूं लागली. कोणी विचारीना व धंदा मिळेना असें झालें. पण दुसरा

बरा वठला. त्याची रूपसंपदा, सतेज कान्ति व भव्य मुद्रा हीं एक चांगल्याची तरुण विधवा स्त्री त्यावर फिदा झाली. उभयतांनीं लग्नाची तसदी घेतलीच नाहीं. खुशाल नवराबायको म्हणून राहूं लागलीं. पण कांहीं झालें, तरी हिंदुस्थानास पश्चिमेकडून जाण्याचा त्याचा ध्यास सुटेना. त्यानें आपली कहाणी अनेकांना सांगितली. शेवटीं याच्याकडून त्याच्याकडे, त्याच्याकडून याच्याकडे असें होतां होतां टोलेडे येथील महोपाध्याय कीं, जो फार विद्वान्, बहुश्रुत व चतुर होता, त्यानें त्याचें काम मनावर घेतलें आणि त्यानें खुद्द राजाशीं त्याची गांठ घालून दिली. राजा तरी आपल्या एकट्याच्या मतानें काय करणार? त्यानें एक सभा बोलाविली व कोलंबसाच्या म्हणण्याची भवति न भवति चालू झाली.

कोलंबस हा एकटाच काय तो आपली बाजू सजविणारा होता. बाकीचे सभासद त्याची परीक्षा करावयास जमलेले. कोणी त्यास पैसाकाढू उपट्या म्हणत व कोणी भोळा, वेडगळ म्हणत. अन्नास महाग झालेला, पोळी पिकवावयास पहातो आहे, असें कोणी म्हणत. पण या कुत्सितांच्या बोलण्यानें निराश न होतां त्यानें आपलें म्हणणें कमिटीपुढें मांडिलें. भौतिकशास्त्रें व अध्यात्मविद्या हीं त्या काळीं अजून अलग अलग झालेलीं नव्हतीं. प्रत्यक्षानें जें खरें असेल तें सुद्धां धर्मशास्त्राशीं विसंवादी असलें तर तें खोटें मानण्याची चाल असे. मूळ बायबल अथवा त्यावरील भाष्यें हींच सर्व ज्ञाताज्ञात ज्ञानाचे सुपूर्ण कुंभ असून जें त्यांत नाहीं तें ज्ञानच नव्हे असें समजत असत. अर्थात् कोलंबसच्या भाषणांत जेव्हां 'पृथ्वीचा गोलाकार,' 'गोलकाच्या दुसऱ्या बाजूस असणारे प्रतिपादाति (ॲंडिपोडिज्)' इत्यादि प्रयोग येऊं लागले तेव्हां त्या चिकित्सकमंडळांत 'पाखंड–पाखंड' म्हणून एकच गिल्ला झाला. कारण मागें असल्याच एका प्रसंगीं सत्पुरुष लाक्तनियस हा उसळून म्हणाला होता कीं, "असल्या थोतांडावर विश्वास

कसा बसणार? ज्यांच्या पायाचे तळवे आमच्या तळव्यांकडे असे मानवप्राणी पृथ्वीवर आहेत? मग त्यांच्या टांचा जमिनीस ... डोकीं मात्र उरफाटीं लोंबत नसतील काय? पृथ्वीवर असा प्रदेश असणें शक्य आहे काय, कीं जेथें अवघ्या वस्तु 'खालीं डोकें वर पाय' अशा आहेत? जेथें झाडांच्या मुळ्या वर भुईंत व फांद्या खालीं अंतराळांत लोंबत आहेत? जेथें गारा, पाऊस वर पडतो? खरोखर या सर्व कुकल्पना दुसऱ्या एका मूर्ख कल्पनेमुळें पत्कराव्या लागत आहेत आणि ती म्हणजे पृथ्वी गोल आहे असें मानणें ही होय. हे नवमतवादी लोक अगोदर एक चुकीचें बोलतात आणि मग त्यांतून हजारों चुकीचींच प्रमेयें बाहेर पडतात!" सदर महंताचे बोल प्रस्तुत प्रसंगीं जबरदस्त शस्त्र म्हणून कोलंबसावर उगारण्यांत आलें.

कोणी म्हणाले, "ही प्रतिपादातीची कल्पना सर्वथा अग्राह्य होय. ती जर मानिली तर आदामपासून अवघी मानवजात जन्मली हा बायबलप्रणीत सिद्धान्त खोटा पडतो. जर ते आदामचेच वंशज तर ते तेथें गेले कसे! एवढा अफाट समुद्र त्यांनीं उल्लंघिला कसा? अर्थात् मुळांत ते नसलेच पाहिजेत." कोणी 'मूले कुठारः' या न्यायानें म्हणाले, "अगोदर पृथ्वी गोल आहे हेंच खोटें आहे. कारण बायबलांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, हें नीलवर्ण आकाश पृथ्वीवर तंबूप्रमाणें आहे. मग आकाश जर तंबू तर त्याच्या खालची पृथ्वी ही एक विस्तीर्ण सपाट सतरंजीच नव्हे काय?" कोणी म्हणत, "पृथ्वीचा गोलाकार व प्रतिपादातीचें अस्तित्व खरें धरलें तरी हा कोलंबस उष्ण कटिबंधांत जाऊन जगणार कसा?" कोणास चिंता पडली कीं, जी सफर निदान तीन वर्षें चालवावी लागणार तींत हा अन्नपाण्यावांचून मरणार नाहीं काय? शेवटीं एका चतुर श्रोत्यानें विचारलें कीं, "समजा, तुम्ही हिंदुस्थानास पोंचलां; तरी पण पोंचलों म्हणून सांगण्यास तुम्ही परत

कसे येणार ? तुम्हीच म्हणतां पृथ्वी गोल आहे. अर्थात् इकडून तिकडे जातांना तुम्हांस उतरणच लागेल व सफर सहज होईल; पण तिकडून परत फिरल्यावर तुम्हांस सारखा चढच लागणार. मग या अखंड चढानें तुम्ही परत कसे येणार ? " हा विनतोड कोटिक्रम ऐकून तेंव्हांचे श्रोते कौतुकानें स्तिमित झाले, कीं आपल्याचपैकीं एकाचें अज्ञान पाहून ओशाळले याची नोंद इतिहासांत नाहीं ! पण मागें मागें जाऊन प्रस्तुतच्या उत्क्रान्त कल्पनांची वाढ तपासली म्हणजे ज्ञानाची गति किती मंद आहे हें लक्षांत भरून आपल्या बुद्धीस गांभीर्य प्राप्त होतें. या गोंधळांतसुद्धां कांहीं उपाध्याय खरे चिकित्सक होते. त्यांनीं त्याचें म्हणणें खरें आहे असें ठरविलें व त्याप्रमाणें बादशहास कळविलें. पण बहुमत मात्र विरुद्ध होतें.

इकडे राजा आपल्याच लगबगींत होता. शेवटीं आज पाहूं, उद्यां पाहूं असें करतां करतां तो युद्धावर निघून गेला आणि कोलंबसास हात पांघरून बसण्याची पाळी आली. पुढें आपणांस तरी घरीं बसून काय फायदा हें पाहून कोलंबसही लढाईवर गेला. दोन वर्षें या नादांत गेलीं. पुढें थोडें स्थिरस्थावर झाल्यावर त्यानें पुन्हा बोलणें सुरू केलें. पुन्हा सभा, पुन्हा चर्चा असें होऊन दरबारच्या पंडितांपुढें राजाचें कांहीं चालेना. त्याच्या मनांत मदत करावयाचें होतें; पण पंडितांचा बुद्धिवाद — म्हणजे अज्ञानवाद — त्याला तरी कोठें खोडतां येत होता ? शेवटीं कांहीं होत नाहींसें पाहून कोलंबसानें कानास खडा लाविला व राजधानी सोडली. दरम्यान इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल या देशांतून राजांचीं पत्रें आलीं होतीं. हे राजे म्हणजे मोठे शोधलालस होते असें नव्हे, तर कोलंबसाच्या प्रयत्नामुळें स्वतंत्र देश सांपडला तर आपला व्यापार आणि राज्य हीं वाढतील असें त्यांस वाटत होतें. कोलंबस राजदरबारां-तून विन्मुख परत जातो हें पाहून जॉन पेरे या मठाधिकाऱ्यास फार

वाईट वाटलें व त्यानें राणीसाहेबांकडे जाऊन त्रागा केला कीं, असला उमदा शोधक परत दवडूं नये. राणी राजाची बायको खरी; पण प्रत्येक कामांत सरकारस्वारी काय म्हणते हें पाहण्याची तिला जरूर नव्हती. तिचें व राजाचें मिळून एक संयुक्त असें तें राज्य होतें. काय वाटेल तें होवो त्याला मदत करीन असें वचन तिनें दिलें व राजधानी सोडून गेलेल्या कोलंबसास जासूद धाडून परत आणिलें. दरम्यान युद्धाचा शेवटही गोड होऊन मूर लोकांची स्पेन देशांतून पूर्ण हकालपट्टी झाली. अर्थात् राजाही खुषींत होता. राणीसाहेबांचा कल पाहून त्यानेंही संमति दिली व कोलंबसास सर्व सिद्धता करून द्यावयाचा त्यांचा निश्चय झाला. अर्थात् यापूर्वी कोलंबसाशीं अटी ठरवितांना पुन्हा विनसेलसें दिसूं लागलें होतें. पण दागिनेसुद्धां गहाण टाकीन, पण आतां माघार घेणार नाहीं ही राणीची प्रतिज्ञा राजानें ऐकिली तेव्हां त्यानेंही रुकार भरला. याप्रमाणें राजाश्रयार्थ दाही दिशा भटकणाऱ्या कोलंबसाला आपली कल्पना खरी करून दाखविण्याचा सुयोग प्राप्त झाला.

राजा व कोलंबस यांच्यांत ठरलेल्या अटीही मनोरंजक आहेत. पहिली अट अशी होती कीं, कोलंबस जे जे देश व समुद्र हुडकून काढील तेथील सर्व-सत्ताधारीपणा कोलंबसास असावा व तो त्याच्या मागून त्याच्या कुळांत चालावा. दुसरी अशी कीं, नवीन भूमीवर त्याच्याकडे राजाचें प्रतिनिधिपण असावें. तिसरी अशी कीं, त्या देशाचीं उत्पन्नें व त्यांशीं होणारा व्यापार यांवरील नफ्यापैकीं दहावा हिस्सा कोलंबसाला मिळावा. चवथी अशी कीं, तद्देशीयांशीं जे काय तंटे निघतील ते तोडण्याचा सर्व हक्क त्यासच असावा आणि शेवटची अशी कीं, त्याच्या या व पुढील सफरींना लागणाऱ्या खर्चापैकींही आठवा हिस्सा त्यानें द्यावा व त्याबाबत नफ्यापैकींही आठवा हिस्सा त्यास

मिळावा. इ० सन १४९२ एप्रिल ता. १७ ला फर्डिनंड राजा व इझाबेला राणी यांनीं या दस्तैवजावर सही केली व लागलींच तीं दोघें सफरीच्या तयारीला लागलीं. पश्चिमेकडे आशियांतील पूर्वेकडचा तार्तरी देश लागेल या कल्पनेवर त्यांनीं तार्तरीच्या बड्या खानास पत्रें दिलीं व पेलोस बंदरच्या अधिकाऱ्यांना हुकूम फर्माविले कीं, जहाजांची तयारी करावी. भोंवतालच्या खलाशी लोकांवर सक्ती करून त्यांस सफरीवर जावयास लाविलें. जिकडे तिकडे हालचाल सुरू झाली.

सफरीचें स्वरूप जेव्हां खलाशांस कळलें तेव्हां त्यांच्या घरीं रडारड सुरू झाली. जहाजांचे मालकही सर्वथा नाखुष होते, पण करतात काय? 'राजा बोले आणि दळ हालें!' आपण परत येऊंच अशी खुद्द कोलंबसासही खात्री नव्हती. त्यानें ख्रिस्ती पद्धतीनें उपदेशकापुढें पातकोच्चार केला. सर्व दुय्यम तांडेलांनीं व खलाशांनींही हा विधि उरकला. आपल्याकडे काशीस जातांना सर्व निरवानिरव करून जाण्याची चाल होती तसेंच या वेळीं झालें. किनाऱ्यावर अत्यंत कष्टी अशा सग्यासोयऱ्यांचे व बायकापोरांचे थवेच्या थवे जमा झाले. राजानें हें काय ओढून आणिलें आणि आमचीं माणसें आम्हांला अंतरविलीं म्हणून जिकडे तिकडे रडणींभेंकणीं चालू झालीं. खुद्द खलाशीही नशिबाला हात लावून बायकापोरांकडे शेवटचें पाहून कामाला लागले. खरा कार्योत्साह काय तो कोलंबस व त्याचा दुय्यम पिंझो यांच्या मनांत होता. अशा रीतीनें मनांत कल्पना आल्यापासून धडपड करीत असतां अठरा वर्षांनीं कोलंबसास अनुकूलता प्राप्त झाली! दुसरा एखादा कमी धीराचा माणूस दारिद्र्य, अवहेलना, अवमान व दुःख यांनीं खचून जावयाचा; पण कोलंबस खरा तत्त्वनिष्ठ होता आणि खरा धर्मश्रद्धाळू होता. त्याच्या मनांत अशी खोल आकांक्षा होती कीं, नवी भूमि शोधून काढीन, पुष्कळ धन मिळवीन आणि त्याच्या जोरावर फौजा उभारून

ख्रिस्त्यांचें पवित्र स्थान जें येरुशालेम तें मुसलमानांच्या हातून सोडवीन. कोलंबसाच्या चारित्र्याचा हा भाग अत्यंत बोधप्रद आहे. एकेका गोष्टीचें असें वेड लागल्याशिवाय कार्यें तडीस जात नाहींत हें यावरून स्पष्ट दिसतें.

इ० सन १४९२ ऑगस्ट ३ रोजीं या सफरीसाठीं कोलंबसानें जहाजें हांकारिलीं. सप्टेंबर ता. ९ ला पोर्तुगीज लोकांचें फेरो बेट त्याला लागलें. तेथून पुढें सगळा समुद्र केवळ अज्ञातच होता. जमीन दिसेनाशी झाल्यावर खलाशी जास्तच हिरमुसलेले दिसूं लागले. त्यांना मारून मुटकून जहाजांबरोबर पिटाळलेलें होतें. त्यांच्या मनानें खास घेतलें कीं, आतां आपण घरादारांस मुकलों. मर्दासारखे मर्द पण ते बायकासारखे रडूं लागले. कप्तानानें त्यांना समजुतीच्या गोष्टी सांगून पाहिल्या. जेथें पोंचावयाचे ते देश कसे सुंदर आहेत, तेथील जमिनी कशा सुपीक आहेत आणि सोनें तर किती सुलभ आहे इत्यादि अनेक काल्पनिक वर्णनें त्यानें केलीं; पण त्यांना वाटे कीं हें सगळें जगलों वांचलों तर मिळावयाचें.

तीनही जहाजांच्या तांडेलांस त्यानें हुकूम केला कीं, थेट पश्चिमेकडे चलावें. खलाशांचें भय वाढत जाऊं नये म्हणून त्यानें एक हिकमत योजिली. आपण फार अंतर तोडीत चाललों नाहीं असें त्यांस वाटविण्यासाठीं त्यानें अंतर मोजण्याचीं दोन मापें केलीं. खरें आपल्यापाशीं व खोटें सर्वांना दिसेसें. प्रत्येक दिवशींच्या मैलांतून अमुक एक वजा करून उरलेला आंकडा मात्र पाटीवर लावावा असा त्याचा क्रम असे. सप्टेंबर ता. १३ ला होकायंत्राची सळई सरळ राहीनाशी झाली. प्रथम त्यानें हें कोणास दिसूं दिलें नाहीं; पण सुकाणूवाल्यांच्या तें लवकरच ध्यानांत आलें व सर्व जहाजांवर जिकडे तिकडे खळबळ झाली. कारण सळई वांकडी झालेली त्यांनीं कधीं पाहिली नव्हती. अर्थात् दिशासुद्धां

फिरल्या कीं काय, असें लोक कुजबुजूं लागले; पण कोलंबसानें आपल्या ज्योतिषाच्या ज्ञानावर वेळ मारून नेली. तो जेव्हां नक्षत्र-तारांचीं नांवें व होकायंत्राचा त्यांच्याशीं संबंध इत्यादि बाबी सांगूं लागला, तेव्हां कांहींच न कळल्यामुळें त्यांनीं त्याचा बोज राखला व पडतें घेतलें. थोड्याच दिवसांत समुद्रावर फांद्या, फळें, लांकडें इत्यादि दिसलीं आणि तीं जिकडे जात आहेत तिकडे जावें असें कित्येकांनीं सुचविलें; पण तो म्हणाला, 'हिंदुस्थान तिकडे सांपडावयाचें नाहीं, आपणांस सरळच गेलें पाहिजे'. त्याही खुणा पुढें दिसेनाशा झाल्या. दिवसांमागें दिवस व रात्रींमागें रात्र यावी व जावी असें झालें. वर आकाश व खालीं पाणी यांशिवाय तिसरा पदार्थ नाहीं असें झालें. त्यांना वारा फार अनुकूल होता व त्यामुळें प्रवास जलदीनें चालू होता. पुष्कळांना शंका येऊं लागली कीं, कप्तान खोटे मैल लावीत असावा. शेवटीं हा अनुकूल वाराच त्यांना शत्रु वाटूं लागला. कारण पश्चिमेकडून वारा मुळींच येईना. त्यांना वाटे कीं, आपणांस परत वळतां यावयाचें नाहीं. पूर्वेकडूनच जर वारा वहात राहिला तर उरफाटें फिरतां तरी कसें येईल? कोलंबसास यावर कांहीं तोड सुचेना. पण दैवयोगानें पश्चिमेकडून वारा वाहूं लागला व खलाशांचा जीव भांड्यांत पडला. कारण कीं, इतक्या दूरच्या समुद्रावरही वाऱ्यास पश्चिमेकडून वहात येण्याची संवय आहे हें त्यांस दिसलें!

पुढें तीन चार दिवसांनीं वारा अगदींच पडला. समुद्र हलेना कीं डोलेना. खलाशांस वाटलें, आतां तर बोटी जागच्या हलावयाच्यासुद्धां नाहींत! समुद्रांत मध्येंच असलेल्या एखाद्या उथळ जागीं आपण आलों असून रेताडांत वगैरे नावा अडकणार ही भीति त्यास वाटूं लागली. कोलंबसानें लागलीच नांगर टाकून किती खोल पाणी तेथें आहे हें त्यांस पटवून दिलें. तरी त्यांस दम निघेना. ते म्हणत, 'असें जर आहे

तर नावा सरकत कां नाहींत ?' पण दैवयोगानें दुसरे दिवशीं समुद्रास गरगरून भरतें आलें व नावा भराभर चालूं लागल्या. तरी पण जमीन कोठेंच नाहीं! मागली फार मागें राहिली; पुढें असेलच अशी खात्री नाहीं. नावाड्यांत फार चुळबूळ सुरू झाली. "राजानें हा कोठला भुरटा परदेशी जवळ केला आणि स्वदेशच्या माणसांच्या गळ्याला दावें लावून तें त्यांच्या हातीं दिलें." अशी जो तो तक्रार करूं लागला. "लोक चांगलें सांगत होते कीं, हा उगाच एक उडाणटप्पू भटक्या आहे. पण तें राजानें ऐकलें नाहीं आणि आतां आमच्या जिवाला तांत लागली आहे, आम्हीं याचें आतां कां ऐकावें ?" दुसरा म्हणे, "खरेंच आहे. परत फीर म्हटलें तर हा ऐकत नाहीं." तिसरा म्हणाला, "हा बऱ्या बोलानें ऐकेलसें दिसत नाहीं. त्याला जरा चुणूकच दाखविली पाहिजे." शेवटीं कांहीं लोक बेफाम होऊन त्याला म्हणाले, "आतां जर तूं परत फिरला नाहींस तर तुझे हातपाय बांधून तुला समुद्रांत फेंकून देऊं. नाहीं तर परत फीर." कोलंबसही भला हिकमती व धीट होता. केव्हां शिवी हसडून, केव्हां दादा-बाबा करून, केव्हां भेद पाडून तो त्यांस वळवूं लागला.

एकदां असें झालें कीं, पिंझो आपल्या जहाजावरून 'जमीन जमीन' म्हणून मोठ्यानें ओरडला. वेळ रात्रींची होती. कोलंबसासही वाटलें जमीनच आहे. जिकडे तिकडे आनंद झाला. पण सकाळीं पाहातात तों एका ढगापलीकडे तेथें कांहीं नाहीं. खलाशी जास्तच चवताळले. ऑक्टोबर ता. ७ च्या सुमारास संध्याकाळीं पक्ष्यांचे थवेच्या थवे डोक्या-वर उडत जात असतांना त्यांस दिसले. पक्षी आपल्या घरट्यांसच जात असावे हें उघड होतें. म्हणून त्या रोखानें कोलंबसानें जहाजें वळविलीं. तरी तीन दिवस जमीन नाहीं! चवथे दिवशीं एक झाडाचीं फळें असलेली फांदी, एक नकशी केलेला लाकडी सोटा, समुद्रकांठीं जसले

असतात तसले मासे अशा वस्तु त्यांस दिसल्या. इतक्यांत त्या दिवशीं रात्रीं कोलंबसास दोनदां उजेड दिसलासा वाटला. पण उगाच खोटी आशा वाटूं लागूं नये म्हणून त्यानें एक दोघांस निरखून पहावयास सांगितलें. त्यांनाही ओझरता उजेड दिसला. अर्थात् ते सर्व गप्प बसले. शेवटीं रात्रीं दोहोंच्या अमलांत आघाडीस असलेल्या पिंटो जहाजावरून जमीनसूचक असा कडाडून बंदुकीचा बार झाला ! सर्व लोक ताडकन् उभे राहिले. ज्याला हा उजेड प्रथम दिसला त्याचें नांव रॉड्रिग् वर्मेजो असें होतें. जिकडे तिकडे लगबग झाली. जमीन तर आहेच आहे; पण तेथें माणसेंही आहेत असें वाटून मंडळी आनंदांत गर्क झाली.

तांबडें फुटतांच जमीन स्पष्ट दिसूं लागली. तीवरील झाडें, थुईथुई करणारे झरे, गवताळ रानें हीं दुरून पाहून सर्वांना आनंदाचें भरतें आलें. कोलंबस काळजीनें खंगत होता. त्याला एकदम स्फुरण चढलें. त्यानें कृतज्ञताबुद्धीनें आकाशाकडे पाहिलें आणि अश्रूंचा प्रवाह त्याच्या डोळ्यांतून वाहूं लागला. वीस वर्षांची तपस्या फळास आली. अवमान, अवहेलना, दारिद्र्य धुऊन निघालें. लबाड, उपट्या, भटक्या या नांवांनीं संबोधिलेले आपण, खरोखर, परमेश्वराची इच्छा व्यक्त होण्याचें साधन झालों म्हणून त्यास समाधान झालें. जे मारावयास उठले होते ते चरणीं लोळण घेऊं लागले. शिव्या देणारे घसा फोडून त्याचा जयजयकार करूं लागले. त्याचें भाकीत खरें झालें. सकाळ होतांच सर्वांनीं आपापले पोषाख चढविले. कोलंबसानें आपला दर्यासारंगाचा जरतारी झगा घातला. कमरेस समशेर लटकाविली व हातांत स्पेनच्या राजाचें निशाण घेऊन तो जमिनीवर उतरला. सर्वांनीं जमिनीचें चुंबन घेतलें व गुडघे टेकून मनोभावें ईश्वराची प्रार्थना केली. या ठिकाणीं एका नवीन जगाचा आणि नवीन युगाचा अनावरणविधि झाला व तो कोलंबसाच्या हस्तें झाला.

तेथच्या उघड्यानागड्या लोकांनीं जेव्हां हे उंच, सुस्वरूप, शुभ्रवर्ण, रंगीबेरंगी कपडयांनीं झकमकणारे आणि तलवार-बंदुकांनीं उग्र झालेले लोक समुद्रांत अचानक पाहिले तेव्हां त्यांस आश्चर्य वाटलें. इकडे कोलंबसास वाटलें, आपण हिंदुस्थानासच आलों! व त्या कल्पनेनें तो तेथील सर्व गोष्टींचा अर्थ बसवूं लागला. तेथील सुंदर व तेजःपुंज पक्षी, उबदार आणि खेळकरपणा आणणारी हवा हीं पाहून त्याची खात्री झाली कीं, हें हिंदुस्थानच! हिंदुस्थानांत मसाल्याचीं रानेंच्या रानें आहेत असें त्यानें ऐकिलें होतें. येथील हवेलाही मसाल्याचा वास येत आहे असें त्यास वाटूं लागलें! अर्थात् शोधासाठीं त्यानें कांहीं हत्यारबंदांस 'आंत जा' म्हणून सांगितलें. त्यांना अनेक तद्देशीय भेटले. हे फार सुजन व सभ्य दिसले. त्यांचीही कल्पना तीच झाली. येथेंच त्यांच्या नजरेस पानाच्या सुरळ्या एका टोंकास पेटवून दुसरें टोंक तोंडांत धरून जिकडे तिकडे धूर माजविणारे लोक दिसले. हीच आपली तमाखू! बरेच दिवस किनाऱ्यानें फिरून बेटा-भुशिरांना नवीं नांवें देऊन कोलंबसानें तेथील लोकांशीं स्नेह संपादिला. सर्वभर हिंडून सोन्याचाहि शोध लाविला. मग बरेच दिवस घालविल्यावर सोनें, सुंदर पक्षी, पांच-सहा तद्देशीय माणसें व इतर अनेक वस्तु घेऊन परत फिरण्याचा त्यानें निश्चय केला. पण कित्येक खलाशांना त्या देशाचें इतकें वेड लागलें कीं, तेथेंच रहाण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. म्हणून कोलंबसानें तेथें एक किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. ही वसाहतीची मूळ कल्पना होय. किल्ला, खंदक तयार करून जवळचा जरूर तो दारूगोळा तेथें ठेवून त्यानें वसाहतवाल्यांस बऱ्या हुशारीनें रहावयास सांगितलें आणि कृतकृत्य होत्साता तो स्पेन देशास परत निघाला. परतवाट फारशी सुखाची गेली नाहीं. पिंझो भांडून दूर निघून गेला. वादळें झालीं व आपण आतां सर्व बुडणार असें कोलंबसला

वाटूं लागलें. त्यानें आपलें सर्व वृत्त लिहून काढिलें, तो कागद मेण-कापडांत बंद करून वरून पुन्हा मेणाचे थर वसवून ते सर्व एका पिंपांत बसविले व पीप चांगलें बंद करून समुद्रांत फेंकून दिलें. हेतु हा कीं, आपण बुडाल्यास तें वहात वहात कदाचित् युरोपास जाऊन लागावें ! पण वादळें शांत झालीं व हाल-विपत्ति सोसून कोलंबसाचें जहाज पोर्तुगालच्या किनाऱ्यास लागलें.

धिक्कारिलेला तांडेल नवें जग हुडकून काढून परत आला हें पाहून राजाला खंती वाटली. पण त्यानें उदारपणानें त्याचें स्वागत केलें. सर्व लिस्बन शहर त्यास पहावयास लोटलें. लवकरच कोलंबस स्पेनच्या किनाऱ्यास लागला. तेथून त्यानें फर्डिनंड व इझाबेला यांस आपण परत आल्याचीं पत्रें लिहिलीं. राजधानींतच काय, सर्व मुलुखभर ही बातमी हां हां म्हणतां पसरली. सर्व लवाजम्यासह कोलंबस राजधानीस आला. तेथून राजवाड्याकडे त्याची मिरवणूक सुरू झाली. रोमन वीरांचाही असा सन्मान कधीं झाला नसेल. आघाडीला ते सहा इंडिअन्स चालले होते. त्यांचीं रंगविलेलीं अंगें व सुवर्णभूषणें पाहून लोक चकित झाले. त्यांच्यामागें पोपट व इतर नवे पक्षी व पशु यांचे पिंजरे होते. त्यांच्यामागें उंचावर ठेवलेले सोन्याचे मुकुट, सलकडीं इत्यादि सोन्याच्या जिनसा चकमकत ठेविल्या होत्या. त्यांच्यामागून स्वतः कोलंबस स्वतः घोडेस्वार होऊन हातांत राजाचें निशाण घेऊन दिमाखानें चालला होता. आज राजानें आपलें सिंहासन वाड्यापुढील पटांगणांत मांडविलें होतें. सर्व मांडलिक, अमीर-उमराव, सरदार, दरकदार, विद्वान्, शास्त्रवेत्ते यांनीं दरबार गच्च भरून गेला होता. कोलंबस तेथें येतांच सर्वांनीं खडी ताजीम दिली. प्रत्यक्ष राजा-राणी उभीं राहिलीं व कोलंबस आतां गुडघे टेकणार तोंच त्यास हात देऊन त्यांनीं उभें केलें. सर्वांना आनंदाश्रूंनीं गहिंवरून आलें. यत्न

करूनही कोलंबसास शब्द उमटेना. शेवटीं आनंदभार हलका झाल्या-वर त्यानें सर्वांस स्वमुखानें सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून राजाराणी खूष झालीं. त्यांनीं देवाची प्रार्थना केली व त्याजवर बक्षिसांचा सडा केला. जो कोणी जमीन पहिल्यानें पाहील त्यास बडें पेन्शन मिळणार होतें. तेंही त्यांनीं कोलंबसासच दिलें. कारण रीड्रिगोच्या आधीं त्यानेंच उजेड पाहिला होता. पण यामुळें रीड्रिगो इतका रागावला कीं, हे सर्व लोक लबाड व खोटे खिस्ती आहेत असें म्हणून तो वेडानें मुसलमान होऊन परागंदा झाला! असो. तेथें कोलंबसाच्या कर्तबगारीचा कळस झाला. कारण त्याचा जीवितहेतु पूर्णतेस गेला.

वास्तविक, त्याला या वेळींच मरण यावयास हवें होतें. कारण त्यानें येथून पुढें केलेल्या गोष्टी कोणाही सामान्य माणसास करतां आल्या असत्या. पण पुष्कळदां असें दिसतें कीं, जीवितहेतु संपल्यावरही कित्येक थोर विभूतिसुद्धां उगाच लुडबूड करीत जगत असतात व त्यायोगें त्यांच्या उज्ज्वल नांवास कलंक लागेशीं कृत्यें त्यांच्या हातून होतात. कोलंबसाचें असेंच झालें. ती हकीकत थोडक्यांत देतों.

एका सफरींत विजय आल्यामुळें कोलंबसास व राजास सारखाच हुरूप येऊन त्यांनीं दुसऱ्या सफरीची तयारी केली. अशा पांच चार सफरी त्यानें केल्या. तेथें जावें, तेथिलांशीं संबंध सुरू करावे, भांडणें निघावीं, मारामाऱ्या व्हाव्या, तद्देशियांच्या कत्तली व्हाव्या, त्यांच्या बायकापोरी जबरदस्तीनें ओरबाडाव्या, आपापसांत मारामाऱ्या कराव्या, सोन्याच्यामागें पळावें, गुलाम नेऊन विकावे, नव्या मुलुखाचें नामकरण करावें, हाच काय तो कार्यक्रम. दुसऱ्या सफरीसच तेथील लोकांच्या ध्यानीं आलें कीं, हे लोक बदमाष आहेत. एक कोलंबस नसेल दुर्वृत्त; पण बरोबरचे खलाशी व स्वदेशांत नकोसे झालेले लुच्चे हे महा पागल असत. आपल्या सुधारलेल्या शस्त्रास्त्रांनीं ते त्यांस हैराण करीत

व त्यांचें सोनेंनाणें बुचाडून वर ते त्यांच्या बायकाही फुसलावून नेत. कोलंबसाचें हें नवें युग खरें; पण खुद्द मूळ अमेरिकनांस हळूहळू चेंपीत नेणारें आणि शेवटीं भूतलावरून निखालस निपटून टाकणारें हें प्राणसंकटच होतें. कोलंबस स्वतः या बाबतींत फार मर्यादेनें व सचोटीनें वागत असे. पण बरोबरचे लोक त्यास आवरत नसत. कित्येकदां ते त्याजवरच उसळून उठत; पण या बाबतींत जरी तो भला होता तरी दुसऱ्या एका महापातकी संस्थेचा आरंभही त्याच्याच हातून झाला. नवीन स्थापिलेल्या वसाहतींचा खर्च भागावा आणि खजिन्यांतही भर पडावी म्हणून त्यानें राजास पत्र लिहून सुचविलें कीं, क्यारिबियन बेटावरचे नरमांसभक्षक लोक युरोपांत धरून न्यावे व तेथें गुलाम म्हणून विकावे! व्यापाराला हा उत्तम माल आहे! पण पत्र लिहितांना तो एवढ्यावरच थांबला नाहीं. दुष्ट कृत्य सोज्वळ करण्याची कलाही त्याला साधली होती. त्यानें लिहिलें, हे अज्ञ लोक तिकडे विकले गेले म्हणजे ख्रिस्ती होण्याची संधि त्यांस सहजच मिळेल व अशा रीतीनें राजाचा स्वार्थ व गुलामांचा परमार्थ एकदमच साधतील! एका सफरींत तर त्यानें कित्येक मण सोनें, स्वादिष्ट फळें याबरोबरच राजधानींत विकावयासाठीं पांचशें इंडियन गुलाम जहाजें भरून पाठविले! सोन्याचा हव्यास तर त्याला इतका सुटला कीं, तिकडे "चवदा वर्षांवरील प्रत्येक माणसाने दर तीन महिन्यांस चारपांच तोळे सोनें गोळा करून दिलेंच पाहिजे" अशी सक्ती त्यानें केली! जे प्रतिष्ठित असत त्यांस तर सोनें शेरावारी द्यावें लागे! जेथें सोनें नसेल तेथें प्रत्येकानें अमूक गठ्ठे कापूस दिलाच पाहिजे असा दंडक होता. ज्यांनीं हे कर भरले असतील त्यांच्या गळयांत खूण म्हणून एक तांब्याची खापरखुंटी अडकवीत असत. अशा प्रकारें प्रथम देवदूता-सारखे दिसणारे हे परके लोक सैतान आहेत हें त्या नेटिवांस कळून

चुकलें. कोलंबसानें ठिकठिकाणीं किल्ले बांधून तेथें सोनें गोळा करण्याचीं मकाणें केलीं. कोणीं जरा हू कीं चू केलें, कीं किल्ल्यावरील शिबंदीचे लोक त्यास चाबकाखालीं मारीत असत. एक गोष्ट मात्र सांगावयास हवी. जेव्हां जेव्हां त्यानें गुलामांचें भरताड भरून घरीं पाठविलें तेव्हां तेव्हां इझाबेला राणीस परम दुःख होई. तिला संताप येई आणि "या लोकांस परत आपल्या घरादारांत नेऊन सोडा" असा हुकूम ती सोडी. पण एकटीचें कांहींच चाललें नाहीं. पुढें कोलंबसची ग्रहदशा फिरली. शेंकडों दर्यावर्दी तसल्या सफरी करून संपत्ति आणूं लागल्यामुळें त्याची मातब्बरी कोणास वाटेनाशी झाली. राजाराणी थकत चाललीं. बरोबरच्या लोकांस कोलंबस इतका धाकांत ठेवी कीं, ते शेवटीं बंड करून उठत. त्यांनीं अमेरिकेंत त्याज-विरुद्ध अनेक कारस्थानें रचिलीं; व दरबारांत सारख्या कागाळ्या येऊं लागल्या. शेवटीं त्या खऱ्या आहेत, असें वाटून राजाराणीनें त्यांस बडतर्फ करून परत बोलाविलें. त्याच्या जागीं आलेल्या अम्मलदारानें त्यास एखाद्या साध्या कैद्याप्रमाणें वागविलें, त्याच्या हातांत दंडाबेडी घालून त्यास स्वदेशास परत धाडिलें. त्याजवर आरोप असे होते कीं, तद्देशीयांस ख्रिस्ती केलें असतां गुलाम म्हणून विकतां यावयाचें नाहीं म्हणून मिशनऱ्याच्या कामास हा प्रतिबंध करतो व परिचयाच्या किनाऱ्यावर जें खंडोगणती मोतीं सांपडतें तें हा आपल्यासाठीं दाबून ठेवतो. चोरट्या बदमाशाप्रमाणें जरी त्याची रवानगी घराकडे करण्यांत आली तरी त्याचें पूर्ववृत्त स्मरून राणीनें गय केली. पण तीही पुढें मरली व त्यास कोणीही वाली नाहींसा झाला. त्याचें वयही बरेंच झालें व हळूहळू अशक्तता येऊं लागली. जवळचें सर्वस्व नाहींसें होऊन ब्रह्मस्वाची पाळी आली. संधिवातादि रोगांनीं शरीरांत घर केलें. त्याला स्वतःला अवघ्या पृथ्वीवर आपली म्हणून एक टीचभरसुद्धां जागा

राहिली नाहीं. आपल्या मुलास तो काकुळतीनें लिहितो, "माझ्या इनामापैकीं एक कपर्दिकही मला मिळत नाहीं. मी उचापतीवर जगत आहें. वीस वर्षें मीं हाडांचीं काडें केलीं, नवीन पृथ्वी माणसांना दाखविली; पण माझी अशी अंगुळभरही जमीन स्पेन देशांत नाहीं. कोठें तरी भटारखान्यांत तुकडे खातों आणि आतां बिलाचे पैसे कोठले द्यावे म्हणून काळजी मला खाते." अशा आपत्तींत असतांनाच आपलें आटपत आल्याचें त्यास दिसूं लागलें. कागदोपत्रीं जें काय जवळ होतें तें सर्वांना यथायोग्य वांटून देऊन श्रद्धाळूपणानें त्यानें देवाची करुणा भाकिली व वयाच्या ७० व्या वर्षी म्हणजे इ० सन १५०६ मे महिन्याच्या २० तारखेस प्राण सोडिला.

* * *

स्थळप्र
दि: ........................
नोंद दि: ........................

# ऑलिव्हर क्रॉम्वेल

ऑलिव्हर क्रॉम्वेल याचा जन्म इ. स. १५९९ सालीं झाला. चुलत्याचेंच नांव याला मिळालें. चुलता थोडा प्रसिद्ध माणूस होता व नामकरणविधीच्या वेळेस ख्रिस्ती लोकांत जो एक गॉडफादर म्हणून करावा लागतो तोही त्याचा चुलताच झाला असल्यामुळें त्याचेंच नांव त्याला मिळालें. क्रॉम्वेलचा बाप मात्र आपली शेतीभाती संभाळून असे. पदरीं चार पोरेंबाळें असल्यामुळें तेवढया शेतीवर चालेना म्हणून तो दारू गाळण्याचा धंदा करी. आपला धंदा बरा कीं आपण बरे अशी त्याची प्रवृत्ति असल्यामुळें तो शहराकडे वगैरे फारसा फिरकत नसे. मुलें पुढें मोठीं निवटलीं म्हणजे त्यांच्या त्या भावी मोठेपणाच्या खुणा लहानपणच्या वयांत कांहीं सांपडतात काय याची चौकशी माणसें करतात; व चौकशीसच निघाल्यानंतर त्याच्या हातीं कांहींना कांहीं तरी लागतेंच. असें सांगतात कीं, ऑलिव्हर हा अगदीं लहान असतांना एके दिवशीं एका वानरीनें, त्याच्या आईचा डोळा चुकवून, घरांत पाळण्यापर्यंत शिरकाव केला व बाळंत्यांत निजलेल्या या मुलास पोटाशीं घेऊन तिनें दूर उड्डाण केलें. कोठें

कौलाघरावर बसून, त्या भांबावलेल्या माणसांना खिजविण्याचें काम या वानरीनें चालू केलें. सगळ्या आळींतील माणसें गाद्या, ब्लँकेटें, पासोड्या घेऊन तेथें धांवलीं; अशासाठीं कीं, वानरीनें जर कदाचित् बाळ खालीं टाकून दिलें तर तें अल्लाद झेलतां यावें. वानरीनें मुलाच्या आईचें दुःख पाहून आणि आळीकरांचा कल्लोळ पाहून मूल हलकेंच खालीं आणिलें व यत्किंचितही न दुखवितां रस्त्यावर ठेवून दिलें. सर्वांस आनंद झाला हें सांगणें नकोच; पण पुढें क्रॉम्वेलवर जीं मोठमोठालीं संकटें आलीं व तसेंच त्याचा जो उत्कर्ष झाला त्याचें हें पूर्वचिन्ह होतें असें मागील आठवण उकरून काढून, म्हातारे लोक पुढें मानूं लागले.

ऑलिव्हर हा लहानपणीं चांगला बलदंड होता. शेतवाडीवर राहणें, बक्खळ खाणेंपिणें आणि उघडी हवा यांमुळें तो लहानपणापासून चांगला सकत किंबहुना आडदांडसुद्धां बनला. शहरच्या वस्तींत प्राप्त होणारें नागर वळण त्याला लहानपणीं मुळींच लाभलें नाहीं; आणि मोठेपणीं जेव्हां तें लाभण्याची संधि आली तेव्हां तो इतका निबर झाला होता व गावंढ्या राहणींत इतका खारून गेला होता कीं, शहरांतील वागणुकीची सफाई आणि टापटीप हीं त्याला केव्हांच उचलतां आलीं नाहींत. लहानपणीं तो चुलत्याचा बराच लाडका असावा असें दिसतें. चुलता लहानसा जहागीरदार आणि मोठा तालेवार गृहस्थ होता. प्रत्यक्ष राजघराण्याशीं कांहीं संबंध नसला तरी आपण तितक्याच खानदानीचे आहों व म्हणून प्रसंगविशेषीं राजघराण्यांतील माणसांशीं आपली थोडीबहुत घसट असल्याचा देखावा दाखवितां आला तर तो केवळ आपल्या पोकळ डौलाचें लक्षण आहे असें कोणीं मानण्याचें कारण नाहीं असें त्यास वाटे. इंग्लंडांतून स्कॉटलंडकडे जावयास त्या वेळीं जो एक मोठा हमरस्ता होता त्यावर या सर ऑलिव्हर क्रॉम्वेलचा मोठा जमीनजुमला

होता. त्यावर त्यानें एक चांगला बंगलाही बांधला होता. अर्थात् जेव्हां जेव्हां राजघराण्यांतील मंडळी या रस्त्यानें स्कॉटलंडमध्यें जात येत तेव्हां त्यांनीं आपल्या या बंगल्यांत एकादा मुक्काम टाकलाच पाहिजे असा त्यानें शिरस्ता घालून टाकला होता. पहिला चार्लस या नांवानें इंग्लंडच्या गादीवर बसलेला राजपुत्र ड्यूक ऑफ यॉर्क हा स्कॉटलंडहून लंडनकडे जात असतां एकदां या ठिकाणीं मुक्कामास उतरला. ड्यूक हें बडें नांव असलें तरी राजपुत्र अगदीं दुबळा होता. आपल्या घरीं राजपुत्र मुक्कामास आला यामुळें सर ऑलिव्हर याला मोठा अभिमान वाटला. त्यानें राजपुत्राची उत्तम बडदास्त ठेविली व त्याच्याशीं खेळावयास म्हणून त्यानें आपल्या पुतण्यास म्हणजे आपल्या चरित्रनायकास तेथें मागवून घेतलें. दोघांची गट्टी बरी जमली; पण कांहीं वेळानें कोठेंसें बिनसलें. होतां होतां प्रकरण हातघाईवर आलें आणि जवळपास तर दुसरें कोणीही नव्हतें. ऑलिव्हर यानें फार मस्ती केली, आणि राजपुत्राच्या नाकावर असा ठोसा दिला कीं, तें रक्तबंबाळ झालें. पुढें देशांत बखेडे माजून ज्या वेळेस चार्लस यास पलायन करावें लागलें व ऑलिव्हर सर्वसत्ताधीश झाला त्या वेळीं ही जुनी आठवण काढून, वृद्ध लोक आपापसांत पुटपुटले कीं, “ या गोष्टीचें भाकीत आम्हीं पूर्वीच केलें होतें. ”

पण खुद्द ऑलिव्हर यालासुद्धां आपल्या भावी उत्कर्षाचीं स्वप्नें आधींच पडूं लागलीं होतीं असें म्हणतात. मोठा झाल्यावर तो नेहमीं सांगत असे कीं, लहानपणीं माझ्या मच्छरदाणीचा पडदा बाजूस सारून एक मोठा धिप्पाड पुरुष माझ्यासमोर उभा राहिला आणि म्हणाला कीं, तूं या देशांत सर्वश्रेष्ठ माणूस होशील. त्याला हा झालेला दृष्टान्त त्यानें लहानपणींच आईबापांस व शेजाऱ्यापाजाऱ्यांस सांगितला होता. पण तेव्हां त्याला कोणी बोलूं देईना. कारण त्यामुळें राजाचा अवमान होतो असें सर्वांचें मत पडलें. नातेवाईकचसे काय पण त्याचे

पंतोजीसुद्धां त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच त्याच्यावर तावदारून उठले! पण ऑलिव्हर मात्र शेवटपर्यंत या दृष्टान्ताबद्दल बोलत असे. असो. वानरीनें त्यास उचललें नसतें, त्यानें चार्लसचा घुणा फोडिला नसता किंवा त्याला हा दृष्टान्त झाला नसता तरीही तो मोठा व्हावयाचा तो झालाच असता. पण लहानपणच्या हकीकतींवरून भावी मोठेपण अजमाविण्याचें अथवा भावी मोठेपणावरून लहानपणच्या सामान्य गोष्टीचेही अनुकूल अर्थ बसविण्याचे प्रयत्न कसे होतात त्याचें हें एक गमतीचें उदाहरण आहे, इतकेंच.

गांवच्या इतर मुलांप्रमाणेंच ऑलिव्हर शाळेंत जाऊं लागला. परंतु तेथें त्यानें कांहीं बुद्धीची विशेष चमक दाखविली असें मुळींच नाहीं. यानें लहानपणीं विद्येचा अभ्यास झटून केला नाहीं हें भावी काळांत तो जीं भाषणें वगैरे करी त्यावरून श्रोत्यांच्या ध्यानीं येई. खेडेगांवचे मास्तरही बरेच कडक असावेत असें दिसतें. बायबल वाचावयास शिकविणें आणि तें न आलें तर चांगल्या छड्या मारणें एवढ्या दोनच गोष्टी ते करीत असत. सन १६१६ सालीं तो केंब्रिज येथें कॉलेजमध्यें दाखल झाला. तेथें थोडेंसें लॅटिन व ग्रीक आणि रोमन इतिहास यांचें ज्ञान त्यानें पैदा केलें. त्यानें प्रत्यक्ष विद्या अशी जरी फारशी हस्तगत केली नाहीं तरी विद्येविषयीं मोठी आदरबुद्धि त्याच्या मनांत येथें उत्पन्न झाली. पुढें मोठा झाल्यावर त्यानें स्वतःकरितां जो पुस्तकसंग्रह केला, पंडित आणि शास्त्रवेत्ते यांची जी तो संभवना करीत असे, आणि केंब्रिज येथील विद्यापीठाबद्दल त्याला जो शेवटपर्यंत आदर वाटत राहिला त्यावरून हें दिसून येतें. फुटबॉल, क्रिकेट, कुस्ती खेळणें यांच्यापायींच त्याचा सगळा वेळ गेला. तसा गेला असता तरी इतकीशी हरकत नव्हती; पण याच्या जोडीला हेंही सांगावयास हवें कीं, एकंदर हकीकतींवरून पाहातां वर्तनानेंसुद्धां तो कांहीं विशेष चांगला असेल

असें वाटत नाहीं. असो.

लौकरच त्याचा बाप वारला. आई मोठी शहाणी व दक्ष बाई होती. तिनें मुलाची चाल आतापर्यंत ओळखलीच होती; म्हणून आतां कोणीतरी घरचें पाहावयास हवें या निमित्तानें तिनें त्याला कॉलेजांतून काढून घरीं आणलें. तेथें आल्यावर व घरीं कोणी अडपतेंदडपतें नसल्यामुळें तो अगदींच ताळ सोडून वागूं लागला. पुन्हां एकदां त्याला अभ्यासाची हुक्की आली व आपण वकील बनावें असें ठरवून तो लंडन शहरास आला. त्याच्या स्वच्छंदी वर्तनाला येथें चांगलीच जागा सांपडली. तरी कायद्याचें जुजबी ज्ञान संपादन करून क्रॉम्वेल आपल्या गांवीं परत आला. त्यानें लौकरच लग्न केलें. येथून पुढें त्याची वृत्ति चांगली निवळली. आपण बहकत चाललों होतों हें त्याच्या ध्यानीं आलें. आतां त्यानें संसारांत चांगलें मन घातलें. तो टापटिपीनें राहूं लागला; त्याच्या बुद्धींत धर्मप्रवणता उत्पन्न झाली; तो आसपासच्या लोकांच्या फार उपयोगी पडूं लागला व अशा रीतीनें थोडा नांवलौकिक संपादून तो सुखानें कालक्रमण करूं लागला. दरम्यान त्याच्या या सुखवस्तु वृत्तीस अचानक निराळें वळण मिळेल अशा प्रकारें देशांतील राजकारण फिरत चाललेलें होतें.

राजा जें राज्य करितो तें तो देवाच्यां मर्जीनें करतो, तें त्याला देवानें दिलें आहे, जीं कांहीं बरींवाईट कृत्यें त्याच्या हातून होतील त्याबद्दलचा जाब त्याला विचारण्याचा एका परमेश्वराशिवाय कोणासही अधिकार नाहीं, हें तत्त्व अजूनसुद्धां जगांत कोठें कोठें घुटमळत राहिलेलें सांपडतें. दोनतीनशें वर्षांपूर्वीं तर सर्वच देशांत या तत्त्वाचा अंमल जारी होता. आम्ही देवाचे प्रेषित आहों असें परमार्थानें खरे मानणारे राजे जर परवांपर्यंत राज्य करीत होते आणि जर त्यांच्या प्रजा त्यांचीं हीं वचनें खुशीनें ऐकून घेत होत्या तर दोनतीनशें

वर्षांपूर्वीं राजा आणि प्रजा या सर्वांनाच प्रस्तुत तत्त्वांचा अंमल चालविणें आणि चालवून घेणें हें अगदीं योग्य आहे असें वाटणें केवळ साहजिक होतें. क्रॉम्वेलच्या आधीं थोडीं वर्षें या तत्त्वाच्या उच्छेदास प्रारंभ झाला होता. पण भावी काळांत हास्यास्पदतेस प्राप्त झालेल्या या तत्त्वाचा संभावितपणा अजूनपर्यंत सर्वमान्यच होता. राजांना वाटे, आम्ही प्रजांचें काय लागतों ? आणि प्रजांना वाटे कीं, राजा आपल्याकडून पैसा उकळतो यांत तो तरी गैर काय करतो ? परंतु परमेश्वराच्या इच्छेचे अर्थ आपल्याला हवे आहेत तसे बदलण्याची इच्छा इंग्लंडांत प्रादुर्भूत झाली होती व तेथील लोकांच्या पुढें असा प्रश्न उभा होता कीं, मोकाट सुटलेल्या गुराप्रमाणें राजाला राज्य करूं द्यावयाचें, का या त्याच्या प्रवृत्तीस पायबंद घालण्याचा प्रजांना कांहीं अधिकार आहे ? हें भांडण उत्पन्न होऊन कित्येक वर्षेंपर्यंत इंग्रज लोकांच्या जीवितांत चरत चाललें होतें. आपल्या श्रमानें आपण पैसा उत्पन्न करावा आणि 'राजा' नांव पावलेल्या कोणा बेजबाबदार व्यक्तीनें त्याची वाटेल तशी उधळपट्टी करावी हा विचार मानी इंग्रज लोकांना असह्य होऊं लागला. बरें, आपण कोण आहों याचें ज्ञान राजे लोकांना नव्हतें असें मुळींच नाहीं; पण आशीर्वाद देणारा भिक्षुक आणि दक्षणा देणारा यजमान यांना आपापल्या नैतिक अधिकारांची जाणीव असूनसुद्धां ते जसे एका स्वाभाविक परमार्थसूत्राच्या धोरणानें वागत राहातात तसेंच हें राजाचें व प्रजांचें वागणें चालू होतें. हा परस्परांच्या हक्कांचा झगडा चालू होतांच उभयपक्ष आपल्या पदरीं असलेल्या साधनांचा या झगड्यांत यथास्थित उपयोग करूं लागले. या झगड्यामुळें प्रजांचे हक्क जरी दिवसेंदिवस जास्त प्रस्थापित होऊं लागले तरी त्याची गति फारच मंद होती. याच्या जोडीला दुसरें एक भांडण येऊन मिळालें.

रोमन कॅथॉलिक पंथाचा पाडाव इंग्लंडांत आगाऊच झाला होता; तरीपण तो पंथ पुनः पुन्हा आपलें डोकें वर करी. खुद्द चार्लस राजा या पंथाचाच कडवा अभिमानी असे. लोकांतही अनेक पंथ पसरले होते. त्यांत प्यूरिटन लोकांचें बंड फार मोठें होतें. इंग्रजी इतिहासाच्या सामान्य वाचकालासुद्धां प्रॉटेस्टंट लोक म्हणजे कोण हें माहीत आहे. त्या प्रॉटेस्टंट पंथांतील जे अगदीं कडवे ते हे प्यूरिटन लोक होत. क्रॉम्वेलही प्यूरिटनच होता. राजा रोमन कॅथॉलिक व आपल्याला राज्य करण्याची सनद देवानें दिली आहे असें मानणारा आणि प्रजेपैकीं लक्षावधि लोक जुना रोमन कॅथॉलिक पंथ झुगारून देऊन निरनिराळीं नवीं मतें पत्करलेले व जसे राजाला तसे प्रजांनाही कांहीं स्वतंत्र हक्क आहेत हें तत्त्व घेऊन उठलेले; यामुळें राजकारण आणि धर्ममतें यांचा संकर झाला. जे राजकारणाच्या ओढीनें राजाशीं भांडावयास उठले, त्यांना पोटांतून रोमन कॅथॉलिक पंथाची आवड असली तरी राजकारणासाठीं त्यांना नवमतवादी लोकांशीं एक व्हावें लागे. या मतामतांच्या संकरामुळें स्पष्ट आणि आखीव असे पक्ष देशांत उत्पन्नच होईनात. कोणाशीं थोडेंसें जमावें तों एकदम मतभेद उपन्न होऊन त्या पक्षाच्या चिरफळ्या व्हाव्या, असें सारखें चालू होतें. राजाही आपलें स्थान कायम टिकविण्याच्या कामीं खूप खटपट करून राहिला होता. पण हट्टामुळें म्हणा कीं त्याच्या अंगीं पुरेंसें चातुर्य नव्हतें म्हणून म्हणा, त्याचें सिंहासन डळमळूं लागलें. कोठेंही मोठी रक्कम खर्चावयाची झाली तर पार्लमेंटकडून पैशाची मंजुरी मिळाल्याशिवाय त्याला खर्च करतां येत नसे. यामुळें लोकप्रतिनिधींची याचना करणें हें त्याला भागच पडे. बरें, पार्लमेंट बोलवावें व पैशाची मागणी करावी तर प्रतिनिधि म्हणत कीं, तुम्हीं गेल्या कांहीं दिवसांत जीं कांहीं अपकृत्यें केलीं आहेत तीं

जर दुरुस्त करीत असाल तर आम्ही पैशाची मंजुरी देऊं. राजाला हेंही अवमानाचें वाटे. म्हणून तो पार्लमेंटसभा पुनः पुन्हा बरखास्त करी. त्याला फूस देण्याच्या कामीं प्यूरिटन लोकांचा वैरी जो आर्चबिशप लॉड तो फार मेहनत घेई. राजाचें राजकीय भांडण राजानें लढावेंच; पण धर्मविषयक बाबतींत त्यानें आपल्या तंत्रानें वागावें व प्यूरिटन मतपंथाचा उच्छेद करावा असा त्याचा यत्न अहर्निश चालू होता. या लढथडी सुमारें १०।१२ वर्षे चालू होत्या. एवढ्या मुदतींत तिकडे क्रॉम्वेल हा आपल्या बाजूच्या मुलखांत चांगली प्रसिद्धि पावला होता व लोकांच्या विश्वासास पात्र बनून, या वरचेवर बरखास्त होणाऱ्या पार्लमेंटांत त्यानें आपला प्रवेशही करून घेतला होता.

हंटिंग्डन हें त्याच्या उत्पन्नाचें गांव. पण तेथें त्यास चैन पडेना; कां कीं, तेथील लोक फारच राजनिष्ठ होते आणि वर नांव आलेला त्याचा चुलता सर ऑलिव्हर क्रॉम्वेल हाही उठल्याबसल्या राजाशिवाय कसल्याच गोष्टी बोलत नसे. म्हणून त्यानें हें उत्पन्न विकून टाकून सेंट ईव्हज् येथें मळेतळे खरेदी केले. परंतु तेथील कामाची त्याला पुरेशी माहिती नसल्यामुळें सगळा धंदा आंतबट्ट्याचा होऊं लागला व त्याची थोडी कुचंबणाच झाली. दरम्यान त्याचा मामा मृत्यु पावला व त्याची सर्व इस्टेट क्रॉम्वेलला मिळाली. अर्थात् सेंट ईव्हज् हें ठिकाण सोडून देऊन ईलाय येथें कायमचें ठाणें करून तो राहूं लागला. हें उत्पन्न फार मोठें असून तेथील कुळाडाळांची संख्याही फार मोठी होती. या उत्पन्नाचा जो मालक असेल तो भोंवतालच्या शेतकऱ्यांचा आपोआपच पुढारी बनावयाचा असें ठरलेलें होतें. त्याप्रमाणें क्रॉम्वेलकडे भोंवतालच्या गांवांचें पुढारीपण आलें. इतक्यांत तेथील आसपासची एक मोठी दलदल नाले काढून कोरडी करण्याचें

व अशा रीतीनें लागवडीला नवीन जमीन पैदा करण्याचें काम एका कंपनीला सरकारांतून मिळालें. आपल्या शेजारची दलदल जाणार हें ऐकून भोंवतालच्या खेडेगांवांतील लोक अगदी रागावून गेले. ते म्हणाले, गुरें चारावयास व लागेल त्या वेळीं मासोळी धरावयास आम्हांला या जागेचा उपयोग अतिशय होतो. सरकारनें ही जमीन कां द्यावी ?

क्रॉम्वेलनें त्यांचा पक्ष उचलला. वास्तविक पाहतां ही जमीन कोरडी होऊन शेतकामाला मिळाली असती तर गांवकऱ्यांचें सुद्धां बरेंच झालें असतें; पण आपल्या कुळांचा कल पाहून क्रॉम्वेलनें खूप जोराचा वाद चालविला; इतका कीं, कामें सुरू करावयास आलेल्या कंपनीला आपला गाशा लवकरच गुंडाळावा लागला. क्रॉम्वेलनें मिळविलेल्या विजय-परंपरेंतील हा पहिला विजय होय. त्याची चोहोंकडे मोठी वाहवा झाली व लोकपक्षाचा पुढारी म्हणून लोकांमध्यें त्याची प्रतिष्ठा वाढली.

पण या वेळेपर्यंतसुद्धां त्याच्या मनांत धार्मिक मतांची खळबळ सारखी चालत असे. खुद्द राजाचें व आर्चबिशप लॉड याचें प्रतिगामी धोरण पाहून, व आपल्या मनाप्रमाणें आपल्याला धर्माचार करतां येत नाहीं हें पाहून त्यानें देशत्याग करावयाचें ठरविलें. मोठमोठाले उत्पन्नदार व श्रीमंत असे प्यूरिटन लोक परदेशीं जाण्यास सिद्ध झाले. जहाजें ठरलीं; बांधाबांध झाली व देशत्यागामुळें येणारी उद्विग्नता त्यांच्या घरांत पसरली. इतक्यांत चार्लस राजाला ही वर्दी लागली. एवढे मातबर लोक आपल्याला जिंदगीसह देशांतर करणार ही गोष्ट त्याला मानवेना. त्यानें जहाजांना दिलेले परवाने काढून घेतले ! अर्थात् क्राम्वेल इत्यादिकांचे सर्व बेत जागच्या जागीं जिरले व पुन्हा ईलाय गांवीं येऊन तो घरचें काम पाहूं लागला. पण या

अपयशामुळें व तेंही धार्मिक मतभेदामुळें आलें असल्यामुळें तो अगदीं चिडून गेला. वर सांगितलेंच आहे कीं, आसपासच्या लोकांनीं त्याला पार्लमेंट सभेमध्यें निवडून दिलें होतें. अर्थात् तेथें गेल्यावर धार्मिक अवमानानें चिडलेल्या या खेडेगांवच्या वड्या इनामदारानें तेथें राजाच्या राजकीय मागण्यांचा कितीसा पुरस्कार केला असेल हें ओळखतां येण्यासारखें आहे.

चार्लस राजानें जशा इंग्रज लोकांवरोबर तशा तिकडे स्कॉटिश लोकांबरोबरही कटकटी चालू केल्या; राजाला फौजा सिद्ध कराव्या लागल्या; पैसा उभा करण्याची जरुरी त्याला जास्त भासूं लागली; पण पार्लमेंटचें व त्याचें अगदींच जमेना. शेवटीं राजाच्या मनानें घेतलें कीं, या पार्लमेंटचीं हाडें मोडल्याशिवाय आतां आपल्याला तरणोपाय नाहीं. म्हणून नॉटिंगहॅम येथें त्यानें पार्लमेंटविरुद्ध उघडपणें युद्ध पुकारलें. इकडे पार्लमेंटनेंही तयारी चालविली व अर्ल ऑफ इसेक्स यास आपला सेनापति नेमिलें. क्रॉम्वेल मोठ्या ईर्षेनें या युद्धांत सामील झाला. तो म्हणाला, माणसाला माणूस म्हणून जे काहीं हक्क असावयास हवेत व ख्रिस्ती माणसाला ख्रिस्ती म्हणून जे कांहीं हक्क असावयास हवेत ते मिळविण्यासाठीं मी युद्धांत दाखल होत आहें. क्रॉम्वेलच्या घरांत मोठी फाटाफूट झाली. चुलता व चुलतभाऊ हे राजाच्या अंगास मिळाले व क्रॉम्वेल पार्लमेंटची बाजू घेऊन उठला. एकदां कामांत पडल्यावर मग त्यानें मागें पाहिलें नाहीं. फौज उभारण्यासाठीं त्यानें ५०० पौंडांची पहिली वर्गणी दिली. मग तो तडक केंब्रिज येथें गेला व दोन लाख रुपये किंमतीचें राजाचें सोनें-नाणें त्यानें जप्त केलें. एवढ्या बळावर त्याचें घोडेस्वारांची तुकडी तयार केली व या सुरू झालेल्या झगड्यांतील पहिली जी ‘एज हिल’ येथील लढाई तींत त्यानें मोठा पराक्रम गाजविला. कांहीं

नवीन करावें व तें फलदायी व्हावें तेव्हां माणसाचें नांव होतें. आजपर्यंत इंग्लंडांत लढाया झाल्याच होत्या; पण हातीं असलेल्या फौजेंतील कांहीं तुकड्या वगळून ठेवून, शत्रूची व आपली हातघाई सुरू होऊन बरोबरी होत आहे असें दिसलें कीं, ही शिलकी ठेविलेली फौज शत्रूवर आणून आदळावी हें कुणाच्या मनांत फारसें आलें नव्हतें व अंमलांत तर कुणीच आणलें नव्हतें. पण या 'एजहिल' च्या लढाईंत, कोणी न शिकवितांच क्रॉम्वेलनें हें करून दाखविलें. यांत आणखी एक नवी बाब दिसली. जी फौज शिलकी ठेवावयाची, तिला फार शिस्त लावलेली असावयास हवी; अमुक वेळ थांबा म्हटलें तर तिनें थांबलें पाहिजे, अमुक वेळीं चाल करा असें म्हटलें तर त्याच वेळीं तिनें चाल केली पाहिजे; घाई करतां उपयोगाची नाहीं हें सर्व वळण क्रॉम्वेलनें आपल्या लहानशा फौजेस दिलेलें होतें. म्हणून क्रॉम्वेल यांस हटकून यश प्राप्त झालें. घोडदळाची जरूर किती असते हेंही या प्रसंगीं त्यानें सर्वांस दाखवून दिलें. त्या वेळेस पायदळाचें काम थोडें अवघड असे. उडवावयाची बंदूक ही बाभळीच्या चोपण्याप्रमाणें अतिशय जड असे. तिच्यांत दारू ठांसावयास फार वेळ लागे आणि शिलगावल्यापासून गोळी उडावयासही त्याच्याहून जास्त वेळ लागे. हा सर्व व्यापार स्वस्थपणें व्हावयाचा तर दोन्ही बगलांकडे घोडदळाचें संरक्षण जरूर होतें. हें या घोडदळाचें महत्त्व क्रॉम्वेलनें लढाऊ लोकांच्या ध्यानांत आणून दिलें. क्रॉम्वेलचा नातेवाईक जो इतिहासप्रसिद्ध हॅम्पडन यास त्यानें एकदां लिहिलें, "तुमची फौज म्हणजे सगळीं मोडावलेलीं बुड्ढकें, खानावळींतील वाढपी आणि खटपट्ये असल्या लोकांची बनलेली आहे. तेंच राजाच्या फौजांकडे पाहा; त्याचे शिपाई मोठे मानी, निश्चयी आणि धैर्यवान् असे दिसतात. अशा लोकांच्या पुढें आपल्या या भिकारटाकार लोकांचें भरताड काय

करणार ?" पार्लमेंटच्या पक्षास खानदानीचे आणि कुलीन असे लोक फारसे कोणी येऊन मिळेनात; ते सर्व राजाच्या फौजांत येऊन दाखल होत. पण कोणत्या तरी अभिमानाचीं माणसें पदरीं असल्या-शिवाय लढण्याचें काम नीट व्हावयाचें नाहीं म्हणून त्यानें राजाच्या विरुद्ध असलेला जो धार्मिक मतपंथ त्या पंथांतील माणसें आपल्या पलटणींत भरलीं. अशासाठीं कीं, त्यांनीं कोणत्या तरी एका आवे-शानें लढावें. यावरून ध्यानांत आलें असेल कीं, युद्धाच्या अगदीं पहिल्या तोंडालासुद्धां, पूर्वीचा कसलाही अनुभव नसतां क्रॉम्वेल यानें चांगल्या मुरलेल्या सेनापतीसारख्या कांहीं कांहीं गोष्टी केल्या.

पुढील वर्षीं राजाच्या बाजूचें पारडें जरा जड झालें व याचें कारण अगदीं उघड होतें. सामान्य लोकांत सुद्धां वागणारी राजा-विषयींची पूज्यबुद्धि, मोठमोठाल्या अमीरउमरावांचें पाठबळ, आणि द्रव्यबळ यांचा पाठपुरावा चार्लस यांस चांगला होत असल्यामुळें फौज उभारणें आणि ती चालविणें त्याला फारसें जड जात नसे. पण पार्लमेंटची गोष्ट तशी नव्हती. कांहीं बळकट अशी संघटना करून ठेवल्याशिवाय व शिपाई लोकांचा पगार थकूं न देण्याची तजवीज केल्याशिवाय आपला गाडा नीट चाला-वयाचा नाहीं हें क्रॉम्वेल यानें ओळखलें होतें. म्हणून नॉर्फोक, सफोक, इसेक्स, केंब्रिज इत्यादि पूर्वेकडील पर-गण्यांचा त्यानें एक मोठा बळकट संघ तयार केला व सगळ्यांनीं मिळून आपल्या फौजांचा खर्च सोसावयाचा असें ठरविलें. पगाराची व्यवस्था अशा रीतीनें होतांच फौजेंत दाखल करावयाची माणसें मात्र प्युरिटन पंथाचींच घ्यावीं असें त्यानें निश्चित ठरवून टाकलें. यामुळें असें झालें कीं, शिपायाशिपायांत कांहीं एक प्रकारचें नातें उत्पन्न झालें व पगार महिन्याच्या महिन्यास मिळाल्यामुळें

त्यांना प्रपंचाची काळजी मुळींच उरली नाहीं. वास्तविक पहात समान कल्पनांचे लोक एकत्र आणणें आणि त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करणें या कल्पना म्हणजे न सुचण्यासारख्या होत्या असें मुळींच नव्हतें. घरीं बसल्या त्या अनेक लोकांना तेव्हां सुद्धां सुचल्या असतील. पण मनांत आल्याबरोबर, कामास लागून त्या अंमलांत आणून दाखवणें, एका क्रॉम्वेलवांचून तेव्हां इतर कोणाच्यानें झालें नाहीं. तसेंच वर उल्लेखिलेलें जें शिस्तीचें कलम तेंही त्यास फार उपयोगी पडलें. लोकांना जें नवें दिसून आलें तें हें कीं, राजाच्या फौजा जोरानें चाल करून जात, शत्रूंची फळी फोडीत व विजय मिळवीत; पण हें झाल्यावर त्यांची अगदीं पांगापांग होऊन जात असे व त्याच दिवशीं दुसरा हल्ला करावयाचें त्यांच्या सेनापतीनें ठरविल्यास तें अगदीं अशक्य होई. कारण शिपायी लोकांचा पुन्हा जथ पडावयास फार वेळ लागे. पण क्रॉम्वेलनें मात्र शिपायांस अशी शिस्त लाविली होती कीं, शत्रूवर विजय मिळवून त्यांचा पाठलाग करीत ते कितीही दूर गेले असले तरी पुन्हा परत वळून पहिल्या-प्रमाणें सेनापतीच्या हाताखालीं त्यांचा जथ हटकून पडे व पुन्हा हल्ला करावयाचा असला तरीही ते तयारी दाखवीत.

विन्सवी गांवीं क्रॉम्वेल यानें राजाच्या सेनापतीचा लवकरच फार मोठा पराभव केला. यामुळें पार्लमेंटनें त्यास शाबासकी दिली व त्याच्या नांवाचा मोठा दरारा उत्पन्न झाला. पुढें लवकरच मार्स्टन-मूर येथें मोठें घनचक्कर युद्ध झालें. चार हजार फौजेनिशीं तो राजाचा सेनापति रूपर्ट याजवर जाऊन पडला व त्याच्या फौजा पराभूत करून पिटाळून दिल्यानंतर त्यानें आपली फौज पुन्हा मागें आवळून घेतली व मोहरा फिरवून दुसऱ्या बाजूनें येणाऱ्या एका यशस्वी फौजेवर त्यानें पुन्हा. हल्ला केला व फार मोठें यश मिळविलें. या

लढाईंत त्याच्या फौजेला ‘ लोखंडी फौज ’ असें नांव मिळालें. कारण तिच्यावर शत्रूंनीं कितीही धडका दिल्या तरी ती भंगेना. आपल्या स्वतःच्या यशासंबंधानें क्रॉम्वेलनें जें लिहिलें आहे त्यावरून त्याच्या मनाची धार्मिक ठेवण ध्यानांत येते. तो लिहितो, “ देवानें फार मोठें यश दिलें; युद्ध सुरू झाल्यापासून असें यश कोणाला लाभलें नव्हतें; तें आम्हांस मिळालें; कारण आम्ही परमेश्वराचे भक्त आहों; आम्हीं चढाई केली आणि जय मिळाला नाहीं असें झालेंच नाहीं; अहो, आमच्या तलवारीपुढें ते जोंधळ्याच्या ताटासारखे तटातट तुटत असत; हें सर्व परमेश्वराचें देणें आहे. ” दरम्यान मुख्य सेनापतीशीं त्याची हुज्जत चालू झाली. हा गृहस्थ क्रॉम्वेलइतका शूर नव्हताच, पण शिवाय क्रॉम्वेलच्या धर्ममताचें त्याला भारीच वावडें असे. तरी पण राष्ट्राच्या कल्याणाकडे लक्ष देऊन क्रॉम्वेलनें हें भांडण विकोपास जाऊं दिलें नाहीं. इ. सन १६४५ सालीं नेस्बी येथें फार मोठा संग्राम झाला. मार्स्टनमूर येथें त्यानें ज्या हिकमती योजल्या त्याच येथेंही योजल्या. राजाचा पूर्ण पराभव झाला व त्यानें अगदीं हातपाय गाळले. याचा अर्थ असा झाला कीं, ही यादवी संपून इंग्लंड देशाची भावी राज्यव्यवस्था कशी करावी याचा विचार क्रॉम्वेलपुढें येऊन पडला.

चार्लस मोठा शिपाईगडी नव्हताच; पण आत्मसंरक्षणाच्या बुद्धीनें कोणालाही सुचणारें कुत्सित शहाणपण मात्र त्याच्या अंगीं बरेंच होतें. आतां पुढें नेमकें काय व्हावयाचें याची कोणासच कल्पना होईना. तरी पार्लमेंटच्या पक्षांत कांहीं भांडणें लावून देण्याची खटपट राजानें चालू केली. शिपाई लोकही आतां कंटाळून गेले होते. प्युरिटन पंथांतच आणखी जे कांहीं पोटपंथ होते त्यांतील एक शिरजोर झाला व त्यानें माताधिक्याच्या बळावर क्रॉम्वेलचें उच्चाटन करण्याचें ठरविलें. तसेंच फौजांनाही रजा देण्याची युक्ति या मंडळींनीं काढली. पण त्यांच्या

पगाराची बाकी थकलेली होती त्यामुळें मुख्य सेनापतिसाहेबांनीं निरोप दिला तरी ते जागचे हालेचनात. क्रॉम्वेलनें यांतील मर्म ओळखलें. त्याचें शौर्य शिपायांनीं पाहिलें होतें व त्याजवर त्यांची निष्ठा बसली होती. क्रॉम्वेल यानें ही फौज झट्कन् आपल्या हातीं घेतली. याचा अर्थ असा झाला कीं, क्रॉम्वेल व त्याची फौज आतां जें काय करील तें व्हावयाचें.

पण कोणी कोणी असें म्हणतात कीं, चार्लससंबंधानें क्रॉम्वेलच्या मनांत कायमची अढी वसलेली होती. जर फौजेंत भरती करावयाची वेळ आली, तर राजाच्या विरुद्ध वाटेल तें करावयास सांगितलें असतां जे कोणी नाकारणार नाहींत, त्यांचींच नांवें तो दाखल करीत असे. क्रॉम्वेल हें एक डोईजड प्रकरण होऊन बसेल, हें मुख्य धर्मगुरु जो वुइल्यम्स यानें मागेंच ओळखलें होतें. त्याचा राजाला असा सारखा आग्रह चालू असे कीं, या माणसाला एखादें मोठें अवदान चारून कायमचा आपलासा करून ठेवा, किंवा मारेकरी घालून कायमचा नाहींसा तरी करून टाका. पण हें त्याचें बोलणें राजा केवळ हंसण्यावारी नेई. पण पुढें पुढें जेव्हां क्रॉम्वेल हा त्याचा जबरदस्त प्रतिपक्षी बनला, तेव्हां वुइल्यम्सच्या जुन्या इशारतीची त्याला पुनःपुन्हा आठवण होऊं लागली.

चार्लस राजा महत्त्वाकांक्षी असला तरी, ती महत्त्वाकांक्षा सफल व्हावयास जे गुण लागतात, ते त्याच्या अंगीं नव्हते. उलट तो मोठा संशयी, दगलबाज व कारस्थानी असून अमुक एक गोष्ट हटकून करावी कीं न करावी हें त्याचें ठरतच नसे; त्यामुळें त्याला विश्वासू मित्रसुद्धां फारसे लाभले नाहींत. क्रॉम्वेलच्या बाबतींत पुढें पुढें त्याची सारखी कुरकूर चाललेली असे; पण त्याचा निश्चय म्हणून होईना. त्यानें राणीस लिहिलेल्या पत्रांत क्रॉम्वेलविरुद्ध पुष्कळ लिहिलेलें आहे. पण लिहिण्याच्या पलीकडे त्याच्यानें जाववलें नाहीं. इकडे, राजवाड्यांत आपल्याविरुद्ध चाललेल्या हालचालींवर क्रॉम्वेल याची सारखी पाळत होती. त्या

हालचालींचें धोरण पाहून त्याचें मन राजाविरुद्ध अगदीं भडकून गेलें व प्रसंग येतांच या राजाला फांशीं देण्याचें आज्ञापत्र काढण्यास तो मुळींच कचरला नाहीं. असो.

विचाराच्या एका प्रणालींतून दुसरींत पोहोंचेपर्यंत जी कांहीं बजबज माजावयाची ती सर्व या प्रसंगीं माजली. नुसत्या कल्पना काढणारे, असें कां व्हावें, तसेंच कां होऊं नये असें म्हणणारे, व कायदाकानू इत्यादिकांचीं ज्ञानें सांगणारे अनेक लोक होते. पण एक एक घटना ढांसळत चालल्यामुळें लोकांना तत्त्वापेक्षां माणसाचा आधार जास्त चांगला वाटूं लागला; आणि या प्रसंगीं तो माणूस म्हणजे ऑलिव्हर क्रॉम्वेल हा होता. बरीच भवती न भवती झाल्यावर अगदीं निभ्रांतपणें क्रॉम्वेलच्या ध्यानांत आलें कीं, चार्लस हा अगदीं कुचकामाचा माणूस आहे; कोणतीही नवी घडी बसविली तरी त्यांत हा कांहीं जमून बसावयाचा नाहीं. वास्तविक पाहतां खुद्द त्याला व बहुजनसमाजाला जें हवें होतें तें इतकेंच कीं, राजा असावा, पण कर बसविणें आणि न्याय देणें या बाबतींत पार्लमेंटची हुकमत त्यानें पाळली पाहिजे. पण चार्लस हें पत्करील असें दिसेना. बरें, सवाईसोट फौजेच्या हातीं देशाचा कारभार सोंपवावा हेंही बरोबर नव्हतें. पुन्हा यादवी माजली, पार्लमेंट सभेंतून राजाचे उरलेसुरले पक्षपाती होते त्यांची तेथून हकालपट्टी झाली व खुद्द चार्लस यास कैद करून न्यायाधिशापुढें उभें करण्यांत आलें. लवकरच तो फांशीं गेला. या घडामोडी फार प्रचंड स्वरूपाच्या होत्या. जाऊं द्या, आपल्याला काय करावयाचें आहे, असें धरसोडीचें बोलणें पुढारी जर आयत्या वेळीं बोलूं लागले असते तर देशांत याहीपेक्षां कल्लोळ माजला असता; पण क्रॉम्वेलनें डोकें शांत ठेवलें होतें. राजाशीं मिटतें घेण्याचा यत्न करूनही तें जमेना व म्हणून ओघा-

ओघानेंच गोष्टी या थराला आल्या आहेत, तेव्हां त्याचें वाईट वाटूं देतां उपयोगाचें नाहीं, हें त्यानें पक्कें ठरवून टाकलें होतें असें दिसतें. वर सांगितल्याप्रमाणें राजाची वासलात लागल्यानंतर पार्लमेंट-संस्था सर्वस्वी क्रॉम्वेलच्या हातीं गेली व तेंच बरें झालें. कारण त्याच्या फौजेच्या साहाय्यावांचून या पार्लमेंटचें कोणींही ऐकलें नसतें.

खुद्द इंग्लंडांत आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून राजपक्षीय लोकांनीं, आयर्लंड व स्कॉटलंड इकडे धामधूम चालू केली. या वेळीं क्रॉम्वेल ही केवढी जबरदस्त असामी आहे आणि तो म्हणेल त्याच्यापुढें मान लववणें कसें जरूर आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलें. आपण केलेल्या कामाचा नाश करण्यासाठींच ही बंडाळी उपस्थित झाली आहे असें हेरून तो मोठ्या त्वरेनें आयर्लंडमध्यें दाखल झाला आणि ड्रोघेडा व वेक्सफोर्ड येथें त्यानें या बंडखोरांवर हत्यार इतकें निष्ठुरपणें चालविलें कीं, त्या प्रसंगाच्या स्मरणानेंसुद्धां पुढें कित्येक वर्षें माणसें भयभीत होत होतीं. स्कॉटलंडचेंही असेंच झालें. एक चार्लस गेला तर तेथें कांहीं लोकांनीं दुसऱ्या चार्लसच्या नांवानें द्वाही फिरवली. पुन्हा येरे माझ्या मागल्या, असा प्रकार होणार हें ओळखून क्रॉम्वेल स्कॉटलंड देशांत उतरला आणि डन्बार्क वूस्टर येथें त्यानें बंडखोरांची अशी लांडगेतोड केली कीं, त्यांनीं पुन्हा माना काय वर कराव्या! वूस्टर येथें मिळविलेल्या यशा-संबंधानें क्रॉम्वेल म्हणाला, "परमेश्वरी कृपेचें माप एवढें मोठें आहे कीं, माझ्या मनांत तें मावत नाहीं; खरोखर येथें अगदीं कळस झाला." आणि हें अगदीं खरें आहे. कारण यानंतर पुन्हा त्याला तरवारीस हात म्हणून घालावा लागला नाहीं.

हें यश मिळवल्यानंतरही आपापसांतील कटकटी चालू होत्याच.

नानाप्रकारच्या कल्पना, ध्येयें, योजना, संघटना सुचविल्या जात. शेवटीं पार्लमेंटच्या कांहीं तडफदार मेंबरांनीं बाकीच्यांना गप्प बसवून सर्व सत्ता क्रॉम्वेलच्या हवालीं केली. 'राजशासन' लिहून काढलें व त्याच्या बळावर क्रॉम्वेलला 'लॉर्ड प्रोटेक्टर' हें नांव देऊन त्यांनीं त्यास बहुतेक सर्व सत्ता दिली. नवे कायदे करणें व नवे कर बसविणें या कामीं मात्र त्यानें पार्लमेंटसभेस विचारावें असें ठरविण्यांत आलें. हातीं आलेल्या सत्तेचा क्रॉम्वेलनें फार चांगला वापर केला. ही जी नवीन घटना बनली आहे तिला सर्व जनतेची संमति आहे असें नव्हे व म्हणून फौजेच्या बळावरच हा सर्व गाडा सुरळीत चालणार हें ओळखून त्यानें सर्व कामें मोठ्या धूर्तपणानें चालू ठेविलीं. वरचें 'राजशासन' सर्व पार्लमेंटनें मान्य केलें होतें असेंही नाहीं; तरी पण लोकांना आतां कांहीं स्थिरस्थावर व्हावयास हवीच होती व म्हणून अधिकाराच्या सनदशीरपणाचा फाजील हट्ट त्यांनीं धरला नाहीं. तिकडे क्रॉम्वेलनें आणखी एक युक्ति योजिली. देशांतील लोकांचें लक्ष दुसरीकडे कोठेंतरी गुंतविलें पाहिजे हें त्यानें ओळखलें. म्हणून फारसें कारण नसतां त्यानें एकदां स्पेन देशाशीं व एकदां फ्रान्सशीं युद्धाचा पुकारा केला.

सुदैवानें क्रॉम्वेलच्या आरमारानें स्पेनच्या आरमाराचा चांगलाच पराभव केला आणि त्यावरील सर्व चांदीचे पाट त्यानें लुटून इंग्लंडास आणिले. इकडे घरीं उरल्यासुरल्या पार्लमेंटशीं क्रॉम्वेल याचीं भांडणें चालूच होतीं. त्यानें म्हणावें, 'नवी स्वारी काढावयाची आहे, पैसा द्या." पार्लमेंटनें म्हणावें, "लोक आधींच गांजले आहेत, पैसा द्या कुठला ?" पण इतक्यांत ही लुटून आणलेली चांदी अडतीस गाड्यांवर भरून जेव्हां राजधानीच्या शहरांत वाजतगाजत आली तेव्हां विरोधकांचा विरोध अगदीं वितळला आणि राजकीय वातावरण त्याला

सर्वथा अनुकूल होऊं लागलें. पण असें झालें तरी राज्यघटनेची एक घडी उसकटून टाकण्यांत त्याला यश आलें एवढेंच काय तें खरें; व फौजेच्या बळावर आपला अंमल जरी त्यानें सडकून चालविला होता तरी राज्यघटनेची नवीन घडी कोणती याचा जाब त्याचा त्यालाच देतां येण्यासारखा नव्हता. बरें, कांहीं नवीन कल्पावें व बळजबरीनें अंमलांत आणावें तर आतां त्याला तें वयाच्या मानानें शक्य दिसेना.

वयाचीं पहिलीं त्रेचाळीस वर्षें त्यानें संथ रोजगारांतच घालविलीं होतीं. जवळ जवळ पंचेचाळिशीला आल्यावर तो युद्धाच्या धामधुमींत सांपडला व पुढें तेराचौदा वर्षें अहोरात्र दगदग करावी लागल्यामुळें आपलें शरीर आपल्या हातांत राहात नाहीं असें त्यास दिसूं लागलें. तो कित्येकदां म्हणे, " माझी शेतीवाडी सोडून या राजकारणाच्या जंजाळांत मी कशाला येऊन पडलों कोणास माहीत ! " या काळांत प्रपंचांत लक्ष घालावयाससुद्धां त्याला वेळ सांपडत नव्हता. आपण दिवसेंदिवस थकत चाललों हें त्याला दिसून आलें; त्यांतच त्याला उद्विग्नता आणणारी एक गोष्ट घडून आली. त्याला मुलेंबाळें पुष्कळ होतीं; पण त्यांतील एका मुलीवर त्याचें निरतिशय प्रेम असे. तीच एकदम मृत्यु पावली. त्या दुःखानें क्रॉम्वेल झपाट्यानें खचूं लागला.

क्रॉम्वेल यानें राजसत्तेचा उच्छेद केला त्यावरून इंग्रज राष्ट्राला इतकेंच ज्ञान झालें कीं, देशांत लोकसत्तात्मक राज्य स्थापन व्हावयास हवें; निदान राजसत्ता इतकी संकुचित व्हावयास हवी कीं, आपला कारभार आपणच पहात आहों ही जाणीव लोकांना प्राप्त व्हावी. हीच काय ती त्याची कामगिरी होय. त्यानें स्थापन केलेली घटना त्याच्या-बरोबरच मरून गेली आणि त्यानें फांसावर चढविलेला राजा जरी पुन्हा परत आला नाहीं तरी राजसत्ता मात्र परत आलीच आली. इतकें खरें कीं, त्यानें दिलेल्या या तडाक्याचा वण राजसत्तेच्या अंगावर

कायमचा राहिला. राजसत्ता परत आली इतकेंच नव्हे, तर क्रॉम्वेलनें जें कांहीं घडवून आणलें होतें त्यामुळें चिडून गेलेले कांहीं कांहीं लोक पुन्हा अधिकाराच्या जागीं येतांच तो जिवंत नव्हता म्हणून, त्यांनीं त्याच्या प्रेतावर सूड उगविला. ज्या तारखेस त्यानें चार्लस राजास वधस्तंभाकडे धाडिलें होतें ती तारीख येतांच त्यांनीं वेस्टमिन्स्टर ॲबे येथें पुरलेलें त्याचें प्रेत उकरून काढिलें व गाडयावर घालून तें टायबर्न येथें नेलें. पुढें संध्याकाळपर्यंत त्यांनीं तें शव तसेंच वधस्तंभावर लोंबत ठेविलें व शेवटीं त्याचा शिरच्छेद केला. धड वधस्तंभाच्या खालीं एका खबदाडांत खुपसून ठेविलें आणि शीर एका कळकाच्या टोकाला बांधून त्यांनीं तो कळक वेस्टमिन्स्टर ॲबेच्या कौलाघरावर उभा करून ठेवला. अशा रीतीनें ही फिटासफीट झाली. ही रागलोभाची देवघेव कशीही झाली असली तरी क्रॉम्वेलनें केलेल्या क्रान्तिविषयक कामगिरीचें महत्त्व तिनें कमी होत नाहीं. असो.

क्रॉम्वेल हा शरीरानें भला धट्टाकट्टा असून वागणुकींत साधारणतः गांवढ्यासारखाच असे. शहरांतील राहणीनें आणि मोठमोठ्या लोकांच्या संगतींत वागल्यानें जरी त्यास थोडें मार्दव आलें होतें तरी एकंदरीनें तो शेवटपर्यंत थोडासा असंस्कृतच दिसे. वर वर्णिलेल्या राजकारणाच्या घडामोडी चालू असतांच तो अतिशय आजारी पडला. त्याचे वैरी म्हणूं लागले, "या माणसाला सद्गति कधींही मिळावयाची नाहीं; याचा आत्मा सैतानाच्या तावडींत जाणार." परंतु खुद्द क्रॉम्वेल याचें नेहमीचेंच श्रद्धाळू मन, मरण नजीक येऊन ठेपल्यानंतर, अधिकच लीन झालें. आपण आज खास जाणार हें पाहून त्यानें उघडपणें म्हटलें कीं, "हे प्रभो, मी तर एक साधा पामर आहें. पण माझ्या द्वारां तूं या लोकांचें कल्याण केलेंस. माझ्या हस्तें आपली स्वतःची सेवा करून घेतलीस. पुष्कळ लोक म्हणतात, हा फार मोठा माणूस आहे; पण

दुसरे कांहीं म्हणतात कीं हा मेला तर बरें होईल. पण प्रभो, तूं माझी वासलात कशीही लावलीस तरी या बांधवांचें बरेंच करीत राहा. त्यांनीं परस्परांवर प्रेम करीत राहावें, त्यांनीं एकविचारें राहावें आणि त्यांची बुद्धि कधीं भ्रंश पावूं नये असेंच तूं कर. कोणाचा कसाही अपराध असो, तीं तुझींच लेकरें आहेत; हें जें मीं तुझें थोडेसें स्तवन केलें आहे तें येशूच्याद्वारां तुला पावूं दे आणि तुझी मर्जी असेल तर आतां मला सुखाची कायमची झोंप लागूं दे. " श्रद्धाळू खिस्त्याला चांगले शोभतील अशा तऱ्हेनें हे उद्गार काढल्यानंतर तीन दिवसांनीं ऑलिव्हर क्रॉम्वेल मृत्यु पावला. ही गोष्ट इ० सन १६५८ त घडली.

* * *

# जॉन सोबेस्की

जॉन सोबेस्की हा इ. सन १६२९ सालीं जन्मला. शिवाजी इ० सन १६३० सालीं जन्मला. सोबेस्कीच्या मागोमाग शिवाजीचें नांव सांगण्यांत मुद्दा आहे. शिवाजीचा जीवितहेतु म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांत आधींच माजलेल्या व हळूहळू सर्व दक्षिणेंत पसरत चाललेल्या मुसलमानी सत्तेचा विध्वंस हा होता. जॉन सोबेस्की याच्या जीविताचा हेतूही यूरोपांत पसरत चाललेल्या मुसलमानी आक्रमणाला जोराचा तडाखा देऊन यूरोप तुर्की अंमलांतून मुक्त करणें हाच होता. ज्या दोघांची कामगिरी इतकी सारखी, ते दोघे कालदृष्ट्या जुळे असावे हेंही मुसलमानी सत्तेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें ठरेल जीवितांत समान हेतु असणें येवढेंच सारखेपण या उभयतांत नाहीं. जसे शिवाजीमहाराज तसा सोबेस्की सामान्य सरदार घराण्यांतीलच होता व आपल्या पराक्रमाच्या बळावर जसे शिवाजीमहाराज महाराष्ट्राचे राजे झाले तसाच जॉन सोबेस्की हा आपल्या बळावर पोलंड देशचा राजा झाला. लहानपणापासून म्हणजे खास गृहशिक्षणांतसुद्धां मुसलमानांचा द्वेष हा जसा महाराजांच्या रोमरोमीं भिनला होता, तसा तुर्कांचा म्हणजे

मुसलमानांचाच द्वेष हा वारशाच्या रूपानें सोबेस्की यास बापाकडून मिळाला होता. असें सांगतात कीं, रोमन लोकांचा महान् द्वेष्टा हॅमिलकर यानें मरतांना आपल्या दहा वर्षांच्या मुलास म्हणजे हॅनिबॉल यास अग्निकुंडापुढें उभें केलें व शपथ घ्यावयास लाविली की, 'रोमन लोकांचा मी प्राणान्त द्वेष करीन'. हें जसें हॅमिलकर यानें केलें होतें व शिवाजीमहाराजांच्या घरीं जसें त्यांस शिकविलें गेलें, तसेंच जॉन सोबेस्की यास त्याच्या लहानपणींच बापानें शिकविलें होतें. हिंदुधर्माचा उच्छेद हें दक्षिणेंतील मुसलमानांच्या आक्रमणाचें शेवटचें रूप होतें. त्याप्रमाणेंच व्हिएन्ना शहर कबजांत घेऊन जर तुर्क लोक मध्ययुरोपांत उतरले असते तर ख्रिस्ती धर्माची इमारत खिळखिळी होऊन कदाचित कोसळलीसुद्धां असती. परंतु शिवाजीमहाराजांनीं मुसलमानी आक्रमणाची लाट जशी दोन हातांनीं मागें परतविली, तसें सोबेस्की यानेंही तुर्कांनीं चालविलेलें युरोपखंडाचें आक्रमण कायमचें बंद पाडिलें; इतकेंच नव्हे तर परत वळविलें. इ० सन १६७४ सालीं शिवाजीमहाराजांनीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतला व त्याच सालीं जॉन सोबेस्की हा पोलंड देशाचा अधिपति झाला. शिवाजीमहाराज वारल्यानंतर इ० सन १६८२ सालीं प्रचंड सेना घेऊन औरंगजेब बादशहा दक्षिणेंत यावयास निघाला. त्याप्रमाणेंच कॉन्स्टँटिनोपलचा वजीर इ० सन १६८३ सालींच व्हिएन्ना शहर घ्यावयास बाल्कन द्वीपकल्पांत शिरला. परंतु ह्या स्वारीचा सन व येथून पुढील हकीकत यांत महाराजांचें व सोबेस्कीचें सारखेपण राहिलें नाहीं. तें असो. परंतु आधीं दिलेली हकीकत एकमेकांशीं इतकी जुळती आहे कीं, ती खास मनोरंजक वाटेल.

सोबेस्कीच्या रक्तांतच तुर्कांचा द्वेष उतरला होता. त्याची आई म्हणजे पोलंडांतील महाविख्यात सेनापति झोल्किस्की याची नात होय.

या झोल्किस्कीनें रशियन लोकांचे भडाभड पराभव केले होते आणि थोड्यांत चुकलें, नाहीं तर, मॉस्कोच्या सिंहासनावर पोलंडचा राजा बसविण्यास तो चुकता ना. शेवटीं शेवटीं तुर्क लोकांशीं त्याचें भांडण जुंपलें आणि इ० सन १६२० सालीं एका हातघाईच्या लढाईंत हा तुर्कांच्या हातून मारला गेला. तेव्हांपासून त्याच्या घरांत तुर्कांचा द्वेष हा सांचत चालला होता. आईनें माहेराहून तुरुकद्वेषाच्या अनेक कथा आणिल्या होत्या. त्याचा बाप जेम्स सोबेस्की हा मोठा विद्याभिलाषी व भला मनुष्य होता. जमीनजुमला आणि जंगम मिळकत ही जवळ रगड्न असल्यामुळें त्या दिवसांत जें जें म्हणून नागर रहाणीचें असे तें तें त्यानें घरीं जमा केलें होतें. मुलांच्या शिक्षणाकडेही तो फार बारकाईनें पहात असे. त्याचा जमीनजुमला त्याला बायकोकडूनच आला होता. तेथें तो, आपल्याकडले छोटे राजेमहाराजे असतात त्यांच्यासारखें, राज्य करीत असे. त्यानें थोडासा फौजफाटाही बाळगला होता. कोणीं विचारलेंच तर सांगे कीं, 'हे माझे हुजरे आहेत'. घोड्यांच्या पागा, शिकारीचे कुत्रे, मेजवान्यांसाठी बांधलेले दिवाणखाने, सोन्यारुप्यांचीं ताटेंवाट्या, किनखावी पडदे, गाणारांचे ताफे आणि एकंदरीनें जीवित सुखाचे बनविण्यास ज्या कांहीं बारीकसारीक सोयी आपण उत्पन्न केल्या आहेत, त्यांचीसुद्धां त्यानें आपल्या घरांत समृद्धि केली होती. दरबारी व कांहीं विलासी असा जरी घरचा थाट होता तरी मुलांच्या शिक्षणासंबंधानें मात्र बाप सक्त काळजी घेई. त्यानें मुलांस कित्येक भाषा शिकविल्या. घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें ह्या विद्याही जॉननें उत्तम अभ्यासिल्या होत्या; त्याप्रमाणें कोणच्याही दिलेल्या विषयावर ताबडतोब वक्तृत्व करण्याचा सरावसुद्धां त्याला चांगला झाला होता. शिकार करण्यांतही हा मुलगा बांका होता. आई आणि मुलें एकत्र बसलीं म्हणजे आपला आजा तुर्कांशीं कसा लढला याचीं वर्णनें ती चांगलीं तिखटमीठ लावून

मुलांना सांगे. अर्थात् तुर्कांच्या हातून त्याचा प्रत्यक्षच घात झाला असल्यामुळें मुलांच्या मनांत तुर्कांविषयीं कायमची अढी बसून होती. सोबेस्कीस वाटे कीं, आपण मोठे केव्हां होऊं आणि आपल्या पोलंड देशाच्या जिवावर उठलेल्या तुर्कांचा नायनाट कसा करूं.

शिक्षण पुरतें व्हावें म्हणून युरोपांतील चालीप्रमाणें बापानें त्यास देशाटन करावयास पाठविलें; पण पॅरिस शहराकडून पोलंड देशांत सोबेस्की परत येतो तों तेथें बरीच बजबज माजली आहे असें त्याला दिसलें. इतिहासांत प्रसिद्ध असलेले जे कोसॅक लोक त्यांनीं या वेळीं रशियाचा पक्ष घेतला होता व बरोबर रशियन आणि तार्तार फौजा घेऊन ते मजल दर मजल पोलंड देशावर चाल करून येत होते. पोलंडचा राजा त्यास आडवा आला. दोन दिवसपर्यंत मोठी घनचक्कर लढाई झाल्यावर पोलिश फौजा किंचित घाबऱ्या झाल्याचें दिसूं लागलें. राजानें आपल्या भीति खाल्लेल्या फौजांना थोपवून धरण्याची शिकस्त केली; पण जो तो रणमैदानांतून काढता पाय घेऊं लागला. अशा वेळीं या चरित्राचा नायक जो सोबेस्की तो त्वरेनें पुढें झाला आणि पोलिश लोकांच्या देशाभिमानास हांक देऊन त्यानें त्या पळपुट्यांस परत वळविलें. जी गोष्ट राजाच्या तपानेंसुद्धां साधली नाहीं ती ह्या जहागिरदाराच्या नवीन मुलानें घडवून आणली यामुळें लोकांस मोठा अचंबा वाटला. राजानें त्यास एकदम एका प्रांताचा सुभेदार नेमिलें. येथून सोबेस्की हा पोलिश लोकांच्या डोळ्यांपुढें नवा राष्ट्रवीर म्हणून नांदूं लागला. दरम्यान पोलंड देशांत अनेक उलथापालथी झाल्या. इ० सन १६७० सालीं कोसॅक लोकांनीं पोलंडवर पुन्हा एकदां स्वारी केली. या वेळीं थोडेसे जर्मन शिपाई फौजखात्यांत होते. त्यांच्या अंगावर कुडतींसुद्धां चांगलीं नव्हतीं आणि हत्यारें म्हणजे नुसतीं खळ-पाटणीं होतीं. त्यांचा पगार तर कित्येक वर्षें थकला होता; पण असलेच

हे लोक हाताशीं घेऊन सोबेस्कीनें कोसॅकांची स्वारी मारून काढली व त्यांस नीस्टर नदीपलीकडे पिटाळून दिलें.

दरम्यान तिकडे तुर्कांनीं पोलंडवर स्वारी करण्याचा मांड मांडला होता. तयाऱ्या होतांच त्यांच्या शिपयांचें पेंव पोलंडवर फुटलें. या प्रसंगींसुद्धां देशाच्या संरक्षणाचें काम सोबेस्कीनें आपल्याच शिरावर घेतलें. त्याचा पराक्रम व काम करण्याची हातोटी ही राजास पहावेना. तो त्याचा मत्सर करूं लागला. फौजेस लागणारा दाणागोणा आणि गवतकाडी तो त्यांस मिळूं देईना. पण राजाचा हा मूर्खपणा ओळखून सोबेस्कीनें पदरमोड करून तयारी चालविली. तुर्कांचें बळ फार. ' घे घे मार ' करीत त्यांच्या फौजा देशांत शिरल्या, व लोकांस वाटूं लागलें कीं हे उंडारलेले तुरुक लवकरच राजधानी गांठणार. त्या तुर्की फौजांचे तांडेच्या तांडे चोहोंकडे शिरतांना पाहतांच लोकांचे डोळे उघडले व हजारों लोक सोबेस्कीच्या नांवाचा जयघोष करीत त्याच्या निशाणाखालीं जमा झाले. पण हें सगळें झालें तरी बंधारे आधींच फुटले होते आणि म्हणून तुर्कांचा जमाव सोबेस्कीच्या नवशिक्यांना आंवरेना. राजानें तहाचें बोलणें लाविलें व भल्या मोठ्या खंडणीचा गोळा तुर्कांच्या पदरांत टाकून त्यानें त्यांस माघारीं लाविलें.

पण इस्तंबूलचा सुलतान बडा महत्त्वाकांक्षी. तुर्कांच्या राज्याची हद्द बाल्टिक समुद्रांत जाऊन भिडली पाहिजे अशी त्यानें उमेद धरिली होती. म्हणून पुढील वर्षीं बादशहा चवथा महंमद यानें सेनापतिपण पत्करून फौजा बाहेर काढल्या. नीस्टर नदीवर त्यानें भराभर कित्येक पूल तयार केले. पुन्हा सोबेस्कीस पुढें व्हावें लागलें. हालचालीस तोंड लागलें तें ऐन पावसाळ्यांत. पुढें लगोलग हिंवाळ्याचें बर्फ पडूं लागलें. सोबेस्कीच्या शिपायांस हा थंडीचा तडाका अतिशय बाधला. वास्तविक पहातां सरकारांतून या फौजांची सर्व तयारी व्हावयास हवी होती;

पण राजा मत्सरी बनला होता, तो कांहींच करीना. शेवटीं आपल्याच देशांत लुटालूट करून फौजांना हव्या त्या गोष्टी सोबेस्कीनें ओरबाडून आणल्या. तुर्कांनीं कामिनी नांवाचा किल्ला हस्तगत केला. जवळ फौज नसल्यामुळें तो सोडविण्याचा प्रयत्न सोबेस्कीस करतां येईना. म्हणून भर मैदानांत तुर्कांशीं गांठ घालावी असा त्यानें निश्चय केला. शेवटीं कोशीम नांवाच्या किल्ल्याखालीं नीस्टर नदीच्या उजव्या तीरवर उभयतांची गांठ पडली. तुर्कांची तयारी दांडगी होती. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत त्यांनीं मोठमोठाले खंदकसुद्धां खणले. सोबेस्कीनें बाजूबाजूनें हल्ला करण्याचा अनेक ठिकाणीं देखावा केला; अशासाठीं कीं, तुरुक बोटचेंपा कोठें आहे हें कळावें. तुर्कांना असल्या थंडीची संवय नव्हती. अर्थात् ते थोडे गाफीलच राहिले होते. संधि साधून सोबेस्कीनें एकाएकी असा नेटाचा हल्ला हढविला कीं तुर्कांची फळी एकदम फुटली. त्यांच्या तळाभोंवतीं कोठें कोठें मोठे कडे होते. सोबेस्कीचे कांहीं घोडेस्वार शिड्या लावून वर चढले. हा अचानक छापाही तुर्कांना नीट अजमावतां येईना. फौजांतले नोकरचाकर आणि सरदारांचे जनाने यांच्यांत भयानें एकच आरोळी उठली. सरदारांनीं आवर घालण्याचा खूप यत्न केला; पण कांहीं केल्या माणसांची धावपळ थांबेचना. त्यांनीं प्रतिकाराचाही थोडा डौल घातला पण सोबेस्कीनें तो हां हां म्हणतां मोडून पाडला. तुर्कांचा पराभव झाला, आणि शत्रु पाठीवर घेऊन ते बारा वाटा पळत सुटले. सोबेस्कीनें नुसती लांडगेतोड केली.

पोलीश लोकांना वाटलें कीं, देवानें आपल्याला नवा रक्षक दिला. मध्यंतरीं राजा कोणास निवडावें म्हणून वॉरशॉ शहरीं पुष्कळ खळबळी चालु होत्या. तुर्कांनीं पुन्हा एकदां डोकें वर केलें. या वेळीं सोबेस्कीपाशीं केवळ वीस हजार फौज होती. पण या लहानशा फौजेची फिरवाफिरव त्यानें इतक्या हिकमतीनें चालविली होती कीं,

तुर्कांस नामोहरम होऊन पुन्हा परतावें लागलें. वॉरशॉ शहरची गादी कोणास द्यावी याची भवति न भवति होऊन या रणधुरंधर व खान-दानीच्या घराण्यांतील शूर शिपायास लोकांनीं गादीवर बसविलें. सोबेस्कीच्या चरित्रांतील हा अत्यंत महत्त्वाचा प्रसंग होय. तुर्कांशीं झुंजतांना जगावयाचें कीं मरावयाचें हा प्रश्न केवळ पोलंडपुढेंच काय, पण अवघ्या युरोपखंडापुढें उभा होता आणि तुर्कांचा नायनाट करण्याचा चंग बांधलेला सेनापति गादीवर आणून पोलंडनें या तुर्की झगड्याचा कायमचा सोक्षमोक्ष करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली.

तुर्कानें पुढें मोठें कारस्थान केलें. धाकदपटशा दाखवून त्यानें मोठी मसलत रचली. पोलंड आणि तुर्क यांच्यामध्यें ऑस्ट्रिया देशाचा हॅप्सबूर्ग राजा होता. भोंवतालचे अनेक स्वकीय तुर्कांस मिळालेले पाहून तो भयानें अगदीं गांगरला. तुर्कांची तयारी फार मोठी चालू होती. लक्षावधि फौज व मोठा पोक्त सरंजाम त्यांनीं जमा केला आणि इ० सन १६६३ सालच्या जून महिन्याच्या तिसाऱ्या तारखेस तुर्क लोकांचें प्रचंड लष्कर आपल्या अवाढव्य लवाजम्यासह सध्यांच्या सर्व्हिया देशाचें राजधानीचें शहर जें बेलग्रेड त्यावर चाल करून निघालें. वाटेनें लुटालूट व जाळपोळ हीं मनसोक्त चाललेलीं होतीं. शत्रूनें लवकर शरण यावें, त्याला चांगला धाक बसावा किंवा आपण पुढें गेलों असतां मागें लोकांनीं बंड उभारूं नये अशांसारखे अनेक चांगले हेतु, लुटारू लोकांना जे तत्त्वज्ञान पुरवितात त्यांच्या ग्रंथांत दाखल असतीलच; परंतु तुमच्पाआमच्यासारख्या सामान्य लोकांना ही लूट म्हणजे केवळ लोभ आणि हावरेपणा होय असेंच वाटतें. तुर्कांच्या फौजा जरी अधूनमधून भोंवतालचा मुलूख ओरबडण्यासाठीं रेंगाळत चालल्या असल्या तरी त्यांचें कूच व्हिएन्ना शहरच्या रोखानेंच चाललें

होतें. एवढी मोठी प्रचंड नगरी हस्तगत झाली आणि तेथील इतिहास प्रसिद्ध हॅप्सबूर्ग घराणें उद्ध्वस्त करतां आलें म्हणजे युरोपचा आग्नेय कोपरा केवळ तुर्कांचा होणार आहे हें त्यास माहीत होतें. वास्तविक पाहातां सोबेस्की यानें बादशहास आधींच सूचना दिलेली होती. त्यानें आपले बातमीदार तुर्की दरबारांत चांगले पेरून ठेविले होते. त्याप्रमाणेंच तुर्की सरदारांचीं एकमेकांस जाणारीं येणारीं पत्रें छापे घालून त्यानें धरिलीं होतीं. अर्थात् तुर्कांच्या स्वारीचा सुगावा त्याला चांगला लागलेला असल्यामुळें व्हिएन्ना शहरावर काय घोरपड येत आहे याची जाणीव त्यानें राजास दिली होती. तुर्क लोक झपाट्यानें पुढें येऊन व्हिएन्ना हस्तगत करणार हें तर ठरलेंच होतें. पण राजानें त्यांना हें सर्व सुखासमाधानानें करूं द्यावें कीं काय हाच केवळ प्रश्न होता. म्हणून सोबेस्की यानें राजास कळविलें कीं, शहरच्या भिंतीखालच्या वाड्या उठवा व वेढा बसणार असल्यामुळें बचावाच्या तरतुदीस लागा.

लिओपोल्ड हा 'ऐकावें जनाचें व करावें मनाचें' ही म्हण फारच चांगली पढला होता असें दिसतें. त्यानें मनाशीं हिशेब बांधला कीं, तुरुक एकदम व्हिएन्नावर येणार कसा? त्याच्या वाटेंत दोन प्रचंड किल्ले उभे आहेत व त्यांपैकीं एक एक घ्यावयाचा म्हणजे तुर्कांना एकेक स्वतंत्र स्वारी काढावी लागेल, इतके ते बलाढ्य आहेत. अर्थात तुर्कांच्या आणखी दोन स्वाऱ्या होईपर्यंत खुशाल झोंपा काढावयास हरकत नाहीं. असा मनसुबा करून लिओपोल्ड राजे आपल्या नगरींत खुशाल होते. इतक्यांत ३० जूनला तुर्कांच्या स्वारीची हूल उठली. ती ऐकतांच राजा पराकाष्ठेचा भांबावला. सोबेस्कीचें ऐकलें नाहीं म्हणून त्यास वाईटही वाटलें असेल; पण विचारा करतो काय? काय करावें आणि काय न करावें यांच्या धांदलींत शेवटीं लोकांचे लोक काय वाटेल तें करोत; आपलें शीर सलामत ठेवण्याच्या हेतूनें त्यानें

पळून जाण्याचा अगदीं साधा इलाज ठरवला व तो तावडतोब अमलांत आणला. राजाच पळाला मग प्रजेची गत काय झाली असेल हें दिसतच आहे. ' महाजनो येन गतः स पन्थाः ' या न्यायानें सरासरी साठ हजार लोक राजाबरोबर जीव घेऊन पळाले. या पळणारांची फार कठीण अवस्था झाली. इकडे शहरांत शिल्लक राहिलेले लोक मात्र या पळपुट्या राजांवर केवळ खवळून गेले. उद्यां काय होणार याची त्यांना नीट कल्पना येईना. त्यांनीं तुर्कांच्या स्वाऱ्यांचीं भयानक वर्णनें ऐकलेलीं होतीं. त्यामुळें तुर्की फौजांचा लांब उठलेला धुरोळा त्यांनीं आकाशांत पाहिला तेव्हां त्यांना धडकीच भरली. कांहीं सरदारांनीं थोडी जमवा-जमव केली; परंतु तुर्की फौजांचें जगड्व्याळ रूप पाहून लोकांच्या चित्तानें ठाव सोडला. लोक पहातात तों तुर्कांनीं एका नवीन शहराची वसाहत करावयासच आरंभ केला आहे असें त्यांस दिसलें. लक्षावधि शिपाई जमले होते. सांडणीस्वार, उंट, हत्ती, घोडे यांना तर गणती नव्हती. खुद्द वजीरसाहेब ज्या किनखाबी तंबूंत आपल्या झनान्यासह उतरले होते त्यानें कित्येक एकर जागा व्यापिली होती. तुर्कांच्या तळावर निदानपक्ष तीन लक्ष माणूस असावें. एवढें हें अरिष्ट पाहतांच शहरांतील उरल्यासुरल्या लोकांची गाळण उडाली यांत काय नवल ? पण भिऊन भागण्यासारखें नव्हतें.

जुलै १६ ला वजीरसाहेबांनीं आपला तोफखाना सुरू केला. शहरा-वर गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. शिखरें, देवळें, मनोरे यांवर गोळे टिचून येऊं लागले. इतपत धडकी लोकांत उत्पन्न करून वजीरसाहे-बांनीं गांवकऱ्यांस सांगून धाडिलें कीं, शहर खालीं करावें. कौन्ट स्टारेनबर्ग या नांवाचा एक सरदार खूप धडपड करून राहिला होता व लोकांच्या मनांत त्यानें बराच विश्वास उत्पन्न केला होता. पण खुद्द त्यालाच मोठी जखम झाली. ह्यामुळें गांवचे लोक अधिकच घाबरले.

गांवकुसवाला भराभर भगदाडें पडत होती. तीं बुजवावयास जावें तों तुर्कांचे नवे नवे हल्ले येत. यामुळें लोकांची मोठी तारांबळ झाली. एकदां तर एक मोठा थोरला मोहोलाचा मोहोला गोळ्यांच्या आगीनें भडकला. तुर्कांनीं सुरंग लावले म्हणजे यांनीं उफराटे सुरंग लावावे. केव्हां केव्हां तर भराव टाकणाऱ्या कामकऱ्यांनीं खोरींटिकावांनींच एकमेकांस मारावें असें चाललें होतें. आपल्या शहरची दैना लिओपोल्ड याला ऐकवेना. त्यानें युरोपांतील सर्व राजांकडे निकडीच्या विनवण्या केल्या. ऑगस्टच्या ९ व्या तारखेस त्याचा वकील व पोपमहाराजांचा प्रतिनिधि असे सोबेस्की यांस येऊन भेटले व हातींपायीं पडून ‘ कसेंही करा आणि आतां लाज राखा ’ असें म्हणून त्यांनीं मदतीची याचना केली. ‘ पोल लोकांनीं जर आपल्या मदतीला धांव घेतली तर त्यांना मी काय वाटेल तें देईन ’, असें लिओपोल्डचें सांगणें होतें. सोबेस्कीच्या मनांत तुर्कांविषयीं अगोदरच पराकाष्ठेचा तिटकारा होता; त्यांत लिओपोल्डची ही गयावया ऐकल्यावर त्यानें एकदम निघण्याचें ठरविलें. तुरुक कुठें आहे, काय आहे, व तो हंगेरींत कसा परतला आहे याची बारीकसारीक माहितीसुद्धां त्यानें काढली होती. अर्थात् आपलें क्रॅको शहर सोडून प्रत्यक्ष स्वारी सुरू करण्यापूर्वीं त्यानें स्वारीचा नकाशा कायम केला होता. सोबेस्की म्हणजे काय प्रकरण आहे हें तुर्की वजिरास ऐकून तरी माहीत होतें. पण तो मोठ्या गुमानींतच होता. त्याला वाटलें, आपल्या पदरीं एवढी प्रचंड फौज असल्यावर सोबेस्कीचा काय पाड लागला आहे ? म्हणून सोबेस्कीची कांहींच क्षिति न बाळगतां त्यानें व्हिएन्ना शहराला हळूहळू वेढा भरला. लिओपोल्डची राजधानी मात्र आतां अगदीं टेंकीस आली होती. शहरची शिबंदी खंगून गेली; रोगराई पसरली आणि जिकडे तिकडे उपासमारीनें माणसें पटापट मरूं लागलीं. खरोखरच सर्व व्हिएन्ना शहराचा प्राण डोळ्यांत आला होता.

'कोणी आपल्या मदतीस येईल का ?' म्हणून शहरांतले लोक चारी दिशांना डोळे लावून बसले होते.

इतक्यांत एके दिवशीं संध्याकाळीं दूरच्या डोंगरावर उजेड दिसूं लागला व थोड्याच वेळांत हें स्पष्ट झालें कीं, तुर्कांचा हाडवैरी जो सोबेस्की तो झपाट्यानें मदतीसाठीं येत आहे. दूरचीं मैदानें त्याच्या घोडेस्वारांनीं गजबजून गेलेलीं दिसूं लागलीं. वजिरानें निराळाच नकाशा आंखला. त्यानें आपल्या फौजेच्या तीन तुकड्या केल्या. एकीनें सोबेस्कीवर चालून जावें; दुसरीनें शहरावर शेवटचा निकराचा हल्ला चढवावा; आणि तिसरीनें पदरांत पडलेली लूट घेऊन हंगेरीच्या मैदानाकडे कूच करावें असें त्यानें ठरविलें. शहराच्या तटाच्या आंत सारखा झगडत असलेला जो स्टारेनबर्ग त्याला सोबेस्कीचें निशाण पहातांच वाटलें की, 'मोक्षाची म्हणजे सुटकेची वेळ जवळ आली' आणि पुन्हा एकदां बळ बांधून त्यानें तमाम लोक तटावर जमा केले. सोबेस्कीनें डान्यूब नदीवर मोठा पूल तयार केला व मदतीस आलेल्या चार्लसच्या फौजेस तो येऊन मिळाला. वजीर हें सर्व निमूटपणें पहात होता. उभय दळें सिद्ध झाल्यावर सरासरी सत्तर हजार फौजेनिशीं सप्टेंबर १२ तारखेस सोबेस्कीनें युद्धाची गर्जना केली. सोबेस्कीचे पोलंडांतील घोडेस्वार विलक्षण पराक्रमी होते. त्यांच्या दौडीपुढें वजीरसाहेबांचे मिजासी मुसलमान उभे राहीनात. सोबेस्की स्वतः सर्व रणांगणावर मारामारी करीत आणि तुर्की फौजा मागें चेंपीत सारखा चालला होता. पुढें मोठा रणगाजी म्हणून प्रसिद्धीस आलेला जो प्रिन्स युजीन तो या वेळीं सोबेस्कीच्या हाताखालीं उमेदवारी करीत होता! असें सोबेस्कीचें वैभव होतें. बराच वेळ रणधुमाळी उडाल्यानंतर तुरुक हळूहळू कच खाऊं लागला. सोबेस्कीनें शेवटीं त्यांची फळी फोडली; इतकें होतांच सर्व तुर्की शिपाई जीव घेऊन दाही दिशा

पळाले. त्यांनीं सामानसुमान किती टाकलें याला तर गणतीच नाहीं. वर सांगितलें आहे कीं, वजीरसाहेबांचा व एकंदर तुर्की लष्कराचा डामडौल फार मोठा होता. तुर्कांच्या या हवेलंडीचें वर्णन खुद्द विजय मिळवणाऱ्या सोबेस्कीनें आपल्या राणीस लिहिलेल्या एका पत्रांत फार सुंदर तऱ्हेनें दिलें आहे. तें पत्र असें :—

" माझ्या चित्तास सदैव आनंदविणारी रमणीय प्रियकरणी मेरी ईस—

" परमेश्वराची स्तुति माझे मुखांतून सदैव होवो. आपल्या राष्ट्राला देवानें यश दिलें आहे. असें यश पूर्वीं कोणास कधीं लाभलें असेल कीं नाहीं, असें मला वाटतें. मुसलमान लोकांचा वडा तोफखाना, त्यांची अपार संपत्ति, इतकेंच नव्हे, तर त्यांची सगळी छावणीच्या छावणी आपल्या हातीं लागली आहे. राजधानीला जाणारे सर्व रस्ते आणि भोंवतालचें सगळें रान तुर्की शिपायांच्या प्रेतांनीं भरून गेलें आहे. जे कोणी आमच्या तावडींतून सुटले ते जीव घेऊन घाबरटपणानें पळून जात आहेत. तलवारीची टिपरघाई ऐन रंगांत आली असतांना, शत्रूनें एकदम कच खाल्ली. जयश्री येवढी मोठी व इतकी अकल्पितपणें प्राप्त झाली कीं, राजधानींत व आमच्या शिबिरांतसुद्धां ' मुसलमान परत येणार ! परत येणार ! ' म्हणून सारख्या भुमका उठत आहेत; पण ते आतां कसचे येतात. ते पळपुटे कोट्यवधि रुपयांचा दारूगोळा छावणींत टाकून पळाले आहेत.

" सध्यांच माझ्या डोळ्यांपुढें असा देखावा दिसत आहे कीं, ज्याची तहान मला फार दिवस लागली होती. शत्रूचीं हीं दारूगोळ्याचीं कोठारें आमचे शिपाई धडाधड उडवून देत आहेत. त्यांचे आवाज तर येवढे होत आहेत कीं, ' पृथ्वी गेली रे गेली ' असें देव ओरडत असतील. पण आभाळांत उठलेले हे धुराचे लोट पाहून जरी मनाला समाधान

वाटलें, तरी होत असलेलें नुकसान पाहून वाईट वाटतें. वजीरसाहेब घोड्यावर स्वार होऊन एका वस्त्रानिशीं पळून गेले; उरलेल्यांनीं आपापलें पाहावें ! आतां त्यांच्या वस्तूंचा वारसा मीं आपल्याकडे घेतला आहे, कारण त्यांची बहुतेक दौलत माझ्या हातांत पडली आहे. या वजिराला चेंपीत चेंपीत विनीच्या फौजेवर मी पुढें जात असतां त्याच्या एका नोकरानें मला त्याचे तंबू आणि खाजगी रंगमहाल दाखविला. हे तंबू इतके मोठे आहेत कीं, त्यांच्यांत सगळी वॉरशॉ राजधानी मावली असती. वजिराच्या पुढें डौलानें चालणारीं सर्व निशाणें आणि तोरणें मीं हस्तगत केलीं आहेत; पण बादशहानें त्याजबरोबर दिलेलें महंमदाचें प्रचंड निशाण मात्र मीं मजपाशीं न ठेवतां रोमला पाठवून दिलें आहे. सांपडलेल्या सामानांत भरगच्ची तंबू, सुंदर कनाती आणि हजारों मोलवान् गमतीच्या चिजा आहेत. मीं अजून त्या सगळ्या पाहिल्याही नाहींत; पण तुला एवढेंच सांगतों कीं, ह्या लुटीला दुसरी तोड नाहीं. बाणांचे चार पांच भाते माझ्या हातीं लागले आहेत. त्यांजवर बसविलेलीं रत्नें व इंद्रनील मणि लाखालाखांचे असतील. तार्तरी मुलुखांतला मर्द मुलुखगिरी करून परत आला; पण तो जर कां हात हालवीतच परत आला, तर त्याची बायको त्याला म्हणते, ' तुम्ही शूर मर्द नव्हांत; तुम्हीं मला कांहींच आणिलें नाहीं; जो शूर असतो तो जोरानें तुरमुंडी देतो व लूट पैदा करितो. ' प्रिये मेरी, मला मात्र तूं असें खास म्हणणार नाहींस.

" हे तुरुक म्हणजे घमेंडखोर आणि चढेल. त्यांना वाटलें डाव स्वस्तांत पडेल. म्हणून निम्म्या फौजेनें आमच्याशीं मारामारी सुरू केली आणि निम्मीनें राजधानीवर घाला घातला. त्याचें माणूसबळ फार मोठें ! करोल तीन लाख शिपाई वजिरापाशीं होता. मदतीस घेतलेल्या तार्तरांच्या फौजा निराळ्या. नुसते तंबू मोजले तर थोडे कमी एक लक्ष

भरले! दोन दिवस झाले, अहोरात्र लूट चालली आहे. ज्यास जें आवडेल तें तो उचलीत आहे. राजधानींतले गांवकरीसुद्धां हात मारून घेत आहेत. आणखी पांच–सात दिवस लुटीचें काम ह्या लोकांना सहज पुरेल. तुर्कांनीं शेंकडों कैदी मागें टाकले. त्यांत बायका फार होत्या; पण जितक्या मारतां आल्या तितक्या त्यांनीं मारिल्या. हे कैदी आणि बायका कोठल्या म्हणशील तर या देशांत तळ दिल्यापासून त्यांनीं भोंवतालच्या जमा केलेल्या. वजिरापाशीं एक सुंदर शहामृग होता; पण पळून जावयाच्या आधीं आम्हां ख्रिस्त्यांच्या हातीं तो पडूं नये म्हणून त्यानें त्याची मान उडविली. वजिराच्या तंबूंत सुखोपभोगाचीं विविध साधनें काय मनमुराद जमविलीं होतीं तें सांगतां पुरवत नाहीं. जलविहारासाठीं लहान लहान तडाग केले होते. जिकडे तिकडे बगीचे पसरले असून त्यांत शेंकडों कारंजीं थुइथुइ करीत होतीं. एक राघूसुद्धां मोठा गमतीचा होता. पण तो आम्हांस गवसला नाहीं. आज मी शहरांत गेलों होतों. तेथील स्थिति पाहून मला वाटलें, तुरुक जर पळाला नसता तर चार पांच दिवसांहून जास्त दम धरतां येता ना. राजाच्या वाड्याला गोळ्यांनीं भगदाडें पाडिलीं आहेत आणि ते प्रचंड बुरूज फाटून जाऊन कोसळा-वयास ठेपले आहेत. वजिराला जेव्हां दिसलें कीं, आपली आतां धडगत नाहीं तेव्हां त्यानें आपल्या सर्व मुलांस बोलाविलें आणि पोरासारखा गळा काढून तो रडूं लागला. तो तार्तरीच्या राजास म्हणाला, 'मला आतां ताराल काय?' खान खट्टू होऊन उद्गारला, 'हें कसें होईल? प्रसंग पोलंडच्या राजाशीं आहे. त्याच्याशीं टक्कर देणें आतां व्हावयाचें नाहीं. आतां काढता पाय घेऊं या.'

"हंगेरीची स्वारी सुरू करण्यासाठीं रिकिबींत पाय घालावयाच्या आधीं हें पत्र मी तुला लिहीत आहें. राजानें लिहावें आणि राणीने वाचावें अशाच थाटाचें हें पत्र आहे ना? बव्हेरिआ आणि सॅक्सनी येथील

मांडलिक मजबरोबर वाटेल तिकडे यावयास कबूल आहेत. मेलेलीं माणसें, उंट आणि घोडीं याच्या दुर्गंधींतून तुर्कांच्या पाठीवर आम्हांस दौडत जावयाचें आहे. ”

तुर्कांची पांगापांग होऊन तळ ओस पडल्यावर सोबेस्कीनें व्हिएन्ना शहरांत प्रवेश केला. आपल्या पराक्रमी उपकारकर्त्याचें दर्शन होतांच त्या दीनावलेल्या प्रजेला अश्रूंचें भरतें आलें. हर्षनिर्भर होऊन त्यांनीं त्याचें स्वागत केलें, व आनंदाच्या टाळ्यांनीं आणि आरोळ्यांनीं गांवचे रस्ते दणाणून सोडले. सर्व लोक शहरच्या मुख्य देवळांत जमले. त्या ठिकाणीं धर्मोपदेशकांनीं धर्मपुस्तकांतील एक आख्यान लाविलें. त्याचा आरंभही असाच होता :—‘ मग परमेश्वरानें दयाळु होऊन एक त्राता पाठविला. त्याचें नाव जॉन ’. वास्तविक बायबलांतील मूळचा जॉन हा निराळाच होता; पण हरिदासबुवांनीं त्या जॉनशीं हा जॉन मोठ्या खुबीनें जुळवून घेतला. असो. सर्व शहराला हायसें झालें. आपणांस मारावयास आलेल्याचा तळ लुटावयाचें काम आता त्यांना करावयाचें होतें. डिसेंबर ता. २३ ला हा बाजीराव व्हिएन्नाचा छत्रसालाचा गजेंद्र-मोक्ष आटोपून आपल्या क्रॅको शहरास परत आला.

सोबेस्कीच्या या विजयाची वार्ता सर्व युरोपभर झपाझप पसरली. आजपर्यंत तुरुक म्हणजे एक बंडच बनून राहिलें होतें. त्याच्या नांवाची दहशत अवघ्या युरोपखंडांत अशी बसली होती कीं, ख्रिस्ती लोकांचा जीव सारखा धाकधूक करीत असे. वर्षामागें वर्ष लोटले कीं, तुर्कांचा पाय मध्ययुरोपाकडे अधिकाधिक येत चालला असें सारखें होत होतें. कोणाच्यानें मान उंच करवेना. येवढे देशोदेशींचे शूर योद्धे खरे, पण सगळे आपापल्या ठिकाणी चिडीचीप बसले होते. परंतु सोबेस्की यानें हा जबरदस्त टोला दिल्यानंतर मुसलमानी सत्तेच्या चाललेल्या लाटा परत वळल्या. ख्रिस्ती लोकांना जीव भांड्यांत पडल्यासारखें झालें.

तुर्कांचा अंमल म्हणजे काय हें ते पहातच. होते. अर्थात् ख्रिस्तीधर्म या त्याच्या पराक्रमामुळें कायम टिकला; इतकेंच नव्हे तर प्रत्येक राष्ट्रांत नवजीवनाचें वारें पुन्हा मोकळेपणानें वाहूं लागलें.

पण सोबेस्कीसारखा धुरंधर नेता मिळूनसुद्धां पोलंडदेशाची व्हावी तशी प्रगति झाली नाही. कारण पोलंड म्हणजे भांडखोरीबद्दल मोठें नाणावलेलें राष्ट्र आहे. लोकांनीं जसें त्याच्या श्रमाचें चीज केलें नाहीं तशीच त्याची बायको जी मेरी तीही त्याची कीर्ति कमी करण्यास कारण झाली. तीं दोघें परस्परांस जरी अत्यंत प्रिय असत, तरी ती मोठी महत्त्वाकांक्षी आणि घरबसल्या अनेक खेंकटीं उत्पन्न करणारीं होती. सोबेस्की हा रणांगणावर मोठा कर्दनकाळ होता; पण बायकोचा शब्द डावलणें त्याच्या मोठें जिवावर येत असे. राजा जिवंत आहे तोंच त्याच्या घरीं, गांवांत व सगळ्या युरोपभर हें राज्य आतां कोणाच्या हातीं जावें यासंबंधानें सारखी बाचाबाच चालू होती. राजा शेवटीं जिवाला कंटाळला. शरीरही त्याच्या स्वाधीन राहिलें नाहीं. सोबेस्कीचें वर्णन लंडनच्या एका उपाध्यायानें केलें आहे तें असें—' हा राजा मोठा भला माणूस आहे. अतिशय सभ्य आहे. कोणासही त्याजकडे जाण्याची बंदी नाहीं. समरांगणावरची विद्या तर तो जाणतोच जाणतो; परंतु फ्रेंच भाषेचा अभ्यास करून त्याच्या द्वारा त्यानें फार मोठें ज्ञानार्जन केलें आहे. लॅटिन, फ्रेंच, इटालियन, जर्मन या परकी भाषासुद्धां तो स्वतःच्या पोलिश भाषेसारख्याच बोलतो. पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रांचाही त्याला मोठा शोक आहे. राजा खूप उंच असून त्याचें पोट बरेंच सुटलें आहे; तोंड बरेंच जाड असून डोळे मोठे आहेत. गांवचे लोक जसा पोशाख करतात तसाच राजासुद्धां करतो. तो कोठेंही जावो, एक भली मोठी समशेर त्याच्या कमरपट्ट्याला लोंबत असावयाची. ' असो. सोबेस्की विद्येचा मोठा अभिलाषी, कुशल सेनापति

व शूर शिपाईगडी होता. तो आपले शेवटचे दिवस या ठिकाणीं घालवीत असतां काळज्यांनीं वगैरे तो अगदीं खंगून गेला आणि शेवटीं मुसलमान आणि ख्रिस्ती हे शब्द युरोपांत जोंपर्यंत चालू राहतील तोंपर्यंत ज्याच्या नांवाला मरणाचें भयच नाहीं तो हा नवीन काळाचा उत्पादक पराक्रमी जॉन सोबेस्की १६९६ सालीं आपल्या वयाच्या सदुसष्टाव्या वर्षी स्वर्गवासी झाला.

* * *

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
.............. दि: ..................
.......................... नोंद दि ..............

# पीटर दि ग्रेट

पीटर दि ग्रेट हा इ० सन १६७२ मेच्या ३० तारखेला जन्मला. रोमॅनोव् राजवंशातील हा चवथा पुरुष होय. प्रत्यक्ष शककर्ता जरी नव्हे, तरी रशियन इतिहासांत एका नव्या काळाचा कर्ता व पौर्वात्य रशियाला पाश्चिमात्य रशिया बनविणारा असा हा मोठा जबरदस्त वीर होऊन गेला. याचा आजा मायकेल रोमॅनोव् हा इ० सन १६१३ त रशियाच्या गादीवर बसला. याच्या आधींच्या काळांत या भिन्नवंशीय लोकांच्या देशांत अनेक उत्पात होऊन गेले होते. अगोदर सध्यांच्या रशियाच्या उत्तरेचा बहुतेक सगळा भाग उजाडच होता. खरी वसति काय ती पश्चिम व दक्षिण या दिशांसच होती. तेथेंही स्लाव जातीचे लोक मुख्यतः असत आणि आहेत. हे स्लाव कोणाच्या मतें मोगल व कोणाच्या मतें इराणी असे आहेत. शक, मेद इत्यादि जातींचा उल्लेखहि त्यांच्यासंबंधीं लिहितांना केला जातो. कसेंही असलें तरी चरित्रनायकाचा राजवंश स्थापित व्हावयाच्या वेळीं स्लाव हेच तेथें मुख्य लोक होते. तेराव्या शतकापासून तों पंधराव्यापर्यंत या लोकांवर मोगल लोकांचें मोठें करडें राज्य चालू होतें. पंधराव्या शतकांच्या शेवटीं शेवटीं त्यांचा

अंमल अगदीं बसला. कोठेंकोठें कांहीं नाकीं शिल्लक राहिलीं इतकेंच. मोगली अम्मल म्हणजे इतका जाचाचा झाला होता कीं, सोय नाहीं. सर्व देशभर या रानवटांच्या टोळया बेदरकार हिंडत राहात व पिकें, मेंढरें, गुरें हांकून नेऊन शेवटीं माणसेंही मुसक्या बांधून हे दक्षिणेकडे पिटाळीत नेत व क्रिमिया दीपकल्पांत एका प्रचंड गुलामांच्या बाजारांत त्यांची विक्री करीत असत. असें अडीच तीन शतकें चाललें होतें. शेवटीं एकदां त्यांचें बळ कायमचें मोडलें. तेव्हांपासून इ० सन १६०० पर्यंतच्या सुमारें दोनशें वर्षांच्या इतिहासांत रशियाचा विस्तार बराच झाला; भयंकर ईव्हॅन्, बोरीस इत्यादि पराक्रमी राजे झाले; सायबेरियाचीं वैराण अरण्यें रशियाला जोडलीं गेलीं; पोलिश राजांच्या स्वाऱ्या रशियावर आल्या; स्वीडनशीं कटकटी माजून तहनामे झाले; शेवटीं घरगुती भांडणें विकोपास जाऊन सिंहासन मोकळें पडलें. या सिंहासनावर कोणास बसवावें याबद्दलची भवति न भवति होऊन रोमॅनोव् आडनांवाच्या सरदार घराण्यांतील मायकेल नांवाच्या सोळा वर्षांच्या मुलास सिंहासनावर बसविण्याचें ठरलें. या सरदार घराण्याचा व पूर्वीच्या झारचा शरीरसंबंध झालेला होता. येवढ्या बळावर या घराण्यास राजवंशाचें वैभव प्राप्त झालें.

या मायकेलनें इ० सन १६४५ पर्यंत राज्य केलें व पुढें त्याचा मुलगा आलेक्झी हा गादीवर बसला. हा राजा सुधारणाप्रिय होता. त्यानें पहिली गोष्ट केली, ती ही कीं, त्यानें कायद्याचें कोड वाढविलें. त्याच्या अनेक कायद्यांपैकीं एक असा होता कीं, जो कोणी चिलीम ओढील त्याचें नाक कापून टाकलें जाईल ! चिलीम ओढणारे लोक नाकांतून धूर सोडतांना पाहून राजा फार चिडत असावा असें दिसतें. पण हा राजाचा चिडखोरपणा व हा निर्बंध चिरंजीवांनीं अतिरेक करूनच घालविला. कारण पीटर हा अतिशय तमाखू ओढूं लागला !

राजाला कामाची हौस फार असे. स्वतः तो स्वस्थ बसत नसे व दुसऱ्यास बसूं देत नसे. वाड्यापुढें एक तक्रार अर्जाची पेटी ठेवलेली असे. अर्ज पाहून राजा रोजच्या रोज त्यांचा निकाल लावी. रात्रीच्या वेळीं तो प्रधानांच्या टेबलांचे खण उघडून पाही व कांहीं कामें शिल्लक राहिलीं असल्यास त्यांस जाब विचारी.

शेजारच्या लोकांशीं मिळतें घेऊन राज्य वाढविण्याचीही त्याची मोठी खटपट असे. पुढें रशियाच्या इतिहासांत शौर्याबद्दल नांवाजलेले जे कोसॅक स्वार त्यांचे पूर्वज जरी स्वतंत्र टोळ्या करूनच रहात असत, तरी पोलंडच्या राजानें आपणांस आपलें म्हणावें अशी त्यांची फार खटपट असे. पण त्याला आपलें हित कळेना. तो त्यांच्यावरच जबरदस्ती करूं लागला. शेवटीं या लोकांनीं आलेक्झीकडे आश्रय मागितला. त्यांचे धैर्यशौर्यादि गुण पाहून राजानें त्यांस आपल्या अंमलाखालीं घेतलें. तेव्हांपासून रशियन फौज शौर्याच्या बाबतींत चांगलीच समृद्ध झाली. नीपर नदीच्या पलीकडीलपर्यंतचा प्रान्त व स्लाव लोकांचें सुप्रसिद्ध नगर कीव् हींहि त्यानें युक्तिप्रयुक्तीनें मिळविलीं.

याच्याच राजवटींत ख्रिस्ती धर्मग्रंथाची म्हणजे बायबलाची उजळणी करण्यांत आली. निकन नांवाच्या आचार्यानें ही गोष्ट मनांत आणिली. कारण कीं, नकला करणारांच्या हातून साहजिकच होणाऱ्या चुका शतकानुशतक बायबलांत इतक्या सांचत आल्या होत्या कीं, मूळ शुद्ध पाठ कित्येक ठिकाणीं भलतेच होऊन बसले होते. वास्तविक असलीं संस्करणें हवींच असतात. पण निकननें हें काम सुरू करतांच लोकांचा विरोध सुरू झाला ! लोकांना येवढें माहीत कीं, जुनें जपावें. निकन तरी जुनें खरें कोणतें तेंच सांगत होता, पण तें त्यांस पटेना. ग्रीक बायबलावरून शुद्ध भाषांतराच्या नकला त्यानें करविल्या व ठिक-ठिकाणच्या प्रार्थनामंदिरांतील जुनीं बाडें परत मागवून तेथें त्यानें हीं

नवीं पुस्तकें धाडून दिलीं. पण एवढ्यावरून रशियन धार्मिकांत दोन पंथ झाले. एक जुनेवाले म्हणजे चुक्यावाले व दुसरे नवेवाले. या निकनला राजाचा मोटा पाठिंबा होता. याशिवाय राजानें राज्याची व राजधानीची शोभा वाढविण्यासाठींही पुष्कळ खटपटी केल्या. बाहेरच्या देशांतील एखादा शेलका माणूस कामापुरता नोकर म्हणून ठेवण्याचीहि त्याची तयारी असे. एकंदरीनें आलेक्झी हा बऱ्यापैकीं राजा झाला. हा इ० सन १६४८ त वारला. याच्या पहिल्या राणीला फेओदर व इव्हॅन असे दोन मुलगे आणि सोफिया नांवाची मुलगी अशीं तीन अपत्यें होतीं व दुसरीला पीटर नांवाचा एकच मुलगा होता.

आलेक्झीच्या मृत्यूनंतर फेओदर गादीवर बसला. पण त्यानें अवघें सहा-सात वर्षेंच राज्य केलें. तो प्रकृतीनें अगदीं दुबळा असून कर्तबगारहि नव्हता. त्याला मूलबाळहि कांहीं झालें नाहीं. पण कुळांत सुरू झालेली सुधारणाप्रियता त्याच्या दुबळ्या शरीरांतहि उतरली होती. ती त्यानें एका बाबतींत चमत्कारिक रीतीनें जगास दाखविली. पूर्वी रशियन लोकांतील प्रतिष्ठित लोकांच्या वंशावळ्या दरबारांतच ठेवीत असत. मोठमोठाले अमीरउमराव, सरदार, दरकदार, इनामदार, कीं ज्यांच्या वाडवडिलांनीं सरकारची बहुत सेवाचाकरी केली आहे, अशांचे वंशवेल दरबारांत असून प्रत्येक पिढीच्या कोणच्या पुरुषानें कोणचीं कामें केलीं याचीहि नोंद त्यांत असे. तेथपर्यंत सर्व ठीक झालें. पण पुढें पुढें असें होऊं लागलें कीं, ज्यांच्या शूर, बुद्धिवान् पूर्वजांनीं सरकारचीं मोठमोठीं कामें केलीं असतील, ते स्वतः कितीहि नामर्द व मूर्ख असले तरी त्यांच्या पूर्वजांस सरकारनें सांगितलेल्या कामांहून कमी दर्जाचीं कामें करावयास ते नाखुषी दाखवूं लागले. ते म्हणत, येवढ्या थोरांच्या वंशजांनीं कमी दर्जाचीं कामें कशीं करावीं ? यामुळें नालायक व ऐदी प्रतिष्ठितांचा लोंबाळा दरबारामध्यें

फारच माजला. ही एक अडचण झाली. दुसरी अशी कीं, एक चमत्कारिक पीठिका उत्पन्न होऊन बसली. कोणास किती पूर्वज मोजतां येतात यावर लायकी नालायकी ठरावी, असा आग्रह सुरू झाला. म्हणजे असें कीं, आपले दहा पूर्वज ओळीनें सांगतां येणाऱ्या एखाद्या जमाबंदी खात्यांतल्या नोकरानें सेवान्तवेतन घेतलें व त्याच्या जागीं नेमावयासाठीं जर राजानें दुसऱ्यास बोलाविलें तर तो नवा माणूस प्रथम ही चवकशी करी कीं, पेन्शनींत निघालेल्या नोकरास स्वतःचे किती पूर्वज सांगतां येत होते ? जर आढळून आलें कीं, त्यास दहा पूर्वज सांगतां येत असत; पण याला मात्र जर स्वतःचे पंधरा सांगतां येत असले तर तो राजासच परत टाफरून विचारी कीं, माझ्याहून आंखूड वंशवेलाच्या माणसानें हाताळलेली नोकरी मला करावयास सांगणें तुम्हांस शोभतें काय ? असल्या या मानापमानाच्या कल्पनांमुळें राजाची मोठी कुचंबणा होत असे.

तेव्हांचें राजयुग होतें. अर्थात् राजाचें कुल, त्यांचे आप्तइष्ट व अमीरउमराव अगर तत्सम तालेवार लोक यांच्यांतूनच त्याला माणसें काढावीं लागत. समाजाच्या वाटेल त्या थरांतून माणसें उचलून घेणें अजून इतकेंसें सुरू झालें नव्हतें. अर्थात् राज्यकारभार चालवावयाचा म्हणजे वरील मंडळींतूनच लोक काढावे लागत व त्यांची अपेक्षाही तशीच असे. जर करतां राजानें यांना दूर सारून वाटेल तेथलीं माणसें भोंवतीं जमविलीं असतीं तरी तिकडूनहि हे फुकटमानी लोक राजाच्या नांवानें खडे फोडीत बसले असते. ज्याला जें करतां येईल तेंच त्यानें करावें असें म्हटलें म्हणजे त्यांच्यांतील एखाद्या ठोंब्यानेंसुद्धां म्हणावें, माझा खापरपणजा सरफडणीस होता आणि मीं आतां कारकुनी कशी करावी ; किंवा दुसऱ्या एखाद्यानें म्हणावें, ज्याला दहाच बापजादे सांगतां येतात त्याची जागा मी पंधरा सांगणाऱ्यानें कशीं भरावी ?

या अडचणीमुळें राजा अगदीं किडून गेला. कुलपरंपरेचा अखंडपणा हा अभिजातपणा आणि गुणवृद्धि करतो हा विचार व त्याचप्रमाणेंच राजसत्ता जशी तशी, राजसत्तेचा अंशरूप असलेली जी सरकारी नोकरी तीहि, भोगवट्याच्या दृष्टीनें त्या त्याच कुळांत चालावी हा विचार, हे अतिरेकास गेले.

परंपरा आणि पीठिका कालगतीनें झिजून जाऊं शकतात हें माणसाच्या ध्यानांत येईना; पण जें सामान्यांस दिसेना अगर पटेना तें द्रष्ट्यांस दिसलें. फेओदर राजा एरवीं दुबळा खरा, पण वेसिल गोलित्सिन या मुत्सद्द्याच्या संगतींत ही गोष्ट त्याच्या मनांत फार भरली व अगदीं कदरून गेल्यामुळें त्यानें एक घाव दोन तुकडे करून टाकण्याचें मनांत आणिलें. या वंशावळ्यांचे शेंकडों रुमाल सरकारी दप्तरांत असत. एके दिवशीं चुकलेल्या वंशावळ्या दुरुस्त करण्यासाठीं सर्वच तपासून पहाणें जरूर आहे तर दप्तरें राजवाड्यांत हजर करावीं असा हुकूम त्यानें दप्तरदारास काढिला. हुकमाप्रमाणें दप्तरें येऊन पडतांच तीं एकमेकांवर रचून ठेवावयास त्यानें सांगितलें व हातांत चुडी घेऊन त्यानें तो ढिगारा पेटवून दिला. क्षणार्धांत सर्व परंपरा व पीठिका भस्मसात् झाल्या. नालायकांत हलकल्लोळ उडाला. लायक लोकांस कांहीं वाटलें नसावें. कारण मनःशक्तीचा दम त्यांच्या अंगीं होता. याप्रमाणें सहस्रावधि धष्टपुष्ट माणसें या किचकट राजानें देशसेवेस मोकळीं केलीं ! ही कथा बोधप्रद आहे. शरीरशुद्धि, धर्मग्रंथांची जपणूक, व्यवसायपरंपरा, वंशशुद्धि, आचारशुद्धि, संस्काराची आवश्यकता, विधींची उपयुक्तता या व एतत्सदृश गोष्टी खरोखरच केव्हांहि उपहास्य अथवा निंद्य ठरावयाच्या नाहींत. निदान ठरवूं नयेत; कारण त्या तसल्या प्रयत्नानें मानवी मनाच्या वाढीचाच आपण उपहास अगर तिची निंदा करतों असा त्याचा अर्थ होईल. पण त्या त्या गोष्टी खरोखरी विद्यमान असल्या तरच

त्यांचा अभिमान बाळगणें व त्यांची कड घेऊन बोलणें रास्त होईल. पण त्यांची सावलीसुद्धां जर शिल्लक राहिली नसली व वृथाभिमानानें व हट्टानें, विशेषतः लोकांच्या सामुदायिक जीवितांत कुचंबणा उत्पन्न झाली तर असला जालीम तोडगा करण्याची वासना करड्या प्रवृत्तीच्या माणसास होते; व मग त्याला उगाच शिव्या खाव्या लागतात. असो.

दुसऱ्याही एका तऱ्हेनें ही कथा बोधप्रद ठरते. पुढें येणारा पीटर राजा वडा सुधारक म्हणून गाजला; पण पीटर काय आभाळांतून पडला काय! त्याच्या मनांत भूतकाळची मगरमिठी झिंजाडून देण्याची व नवीनांचा स्वीकार करण्याची आणि करविण्याची इच्छा कशानें उत्पन्न झाली? याला एकच जबाब आहे. त्याचा आजा मायकेल या राज्याची घडी बसवितां बसवितांच मेला. त्याच्या कल्पनेंतील विधायकपणा पीटरच्या बापाच्या म्हणजे आलेक्झीच्या अंगांत पूर्ण उतरला होता, हें वर दाखविलेंच आहे. आलेक्झीनें जें आरंभिलें तेंच त्याच्या थोरल्या मुलानें म्हणजे फेओदरनें कडकपणें चालू ठेविलें व पुढें धाकटा मुलगा पीटर यानें तें कळसास नेलें. घरांत ते ते विचार हजारदां बोलले जातात, आचरिले जातात व त्यामुळें त्यासंबंधीं आवड व अभिमान उत्पन्न होतात आणि त्यांच्यासाठीं पराकाष्ठा करण्याची बुद्धि उत्पन्न होते. ही खरी परंपरा अगर पीठिका होय. कारण तींत विधायकत्व व जिवंतपणा आहे. ही असावयासच हवी, नाहींतर गुणोत्कर्ष होणार नाहीं. तिचा अभिमानही हवा, कारण त्या अभिमानाच्या बळावर ती टिकून राहण्याचा संभव असतो. पण तिचें अस्तित्व निपटून निघालें असलें तरी व अंगीं काडीचाही वकूब नसला तरी जुनीं टरफलें चाटीत बसणें वाईट आहे. हें सांगावयासाठींच रामदासांनीं आपली प्रसिद्ध ओवी लिहिली असावी कीं, ' सांगे वडिलांची

कीर्ति तो एक पढतमूर्ख '. असो. म्हणजे या रोमॅनोव्ह् नांवाच्या नव्या राजवंशांत नव्या परंपरेचें धारण व पोषण आणि जुनीचें निर्दालन बरोबरच चाललें होतें असें दिसेल. हा फेओदर इ० सन १६७२ त मरण पावला व गादीवर कोणीं बसावें याविषयीं घरांत तंटे सुरू झाले. फेओदरचा भाऊ इव्हॅन हाहि नेभळाच होता. तो कांहीं आटोप दाखवील असें दिसेना. पीटर तर लहानच होता. अर्थात् कारभारी लोकांचें राज्य सुरू होईलसें दिसूं लागलें.

पण या मुलांची बहीण जी सोफिया ती गप्प बसणारी नव्हती. कोणी कोणी कुजबुजत कीं, ज्याअर्थी ईव्हॅन कसावसाच आहे त्याअर्थी पीटरला गादीवर बसवावें. पण सोफियास तें मान्य होईना. मोठा भाऊ असतां, धाकट्या सावत्र भावास गादी देण्यास ती राजी नव्हती. येवढ्याशा वयांतही मोठी खबरदार बायको म्हणून ती राजकुलांत व सरदारमंडळांत प्रसिद्ध होती. ती बारभाईच्या कारभारास संमति देईना. शेवटीं वादविवाद होऊन दोघांही भावांस गादीवर बसवावें व कारभारी-पण सोफियाकडे राहावें असें ठरलें. कारभार सुरू झाला, पण सोफिया एरवीं खबरदार असली तरी पुरुषविषयक भावनेंत ती जितकी कडवी असावयास हवी होती तितकी नव्हती. मागें सांगितलेला गोलित्सिन हा अजून प्रधानकीवर होताच. त्याच्यापुढें या बाईचें सगळें शहाणपण लटपटूं लागलें. शेवटीं ती त्याच्या इतकी आहारीं गेली कीं, हीं दोघें आतां लगीन लावणार असेंही लोकांस वाटूं लागलें. पीटर लहान होता, तरी आपल्या नांवावर या दोघांनीं मन मानेल तसा राज्यकारभार करावा हें त्यास पसंत पडेना. हळूहळू कुरबुरी होतां होतां सोफिया का पीटर असा हा वाद आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलें. गॉर्डन नांवाचा एक स्कॉच सरदार रशियन फौजेंत नोकरीस होता, त्यास पीटरनें आंतून वश करून घेतलें. सोफियाशीं म्हणजे रीतसर नेमल्या गेलेल्या कार-

भाऱ्यांशीं उघड कलागत सुरू होतांच तो पीटर यास जाऊन मिळाला. पीटरनें बहिणीस पकडून दूरच्या एका मठांत राहावयास पाठवून दिलें. तेथें ती पंधरा वर्षें कुजून शेवटीं मेली. गोलित्सिन यास हद्दपारी सांगितली. याप्रमाणें या दोघांचा निकाल लावल्यावर पीटरला सगळें रान मोकळेंच झालें. कारण जोडवारस जो ईव्हॅन् तो केवळ वेडसर व अजागळच होता. पीटर तरी अवघा १८ वर्षांचा होता; पण इतक्या लहानपणींसुद्धां त्याच्या अंगांत बरीच आवरशक्ति व हें करीन, तें करीन असा हव्यास होता. लवकरच हा ईव्हॅनही मरण पावला आणि पीटरचा मार्ग निष्कंटक झाला.

सोफिया अंमलदारीण असतां पीटर बहुतेककरून राजधानींत क्वचित् एखाद्या वेळीं येत असे. एरवीं तो दुसरीकडे राहात असे. कारण त्याच्या शिक्षणाची व्यवस्था तिकडेच केलेली होती. नेमलेले शिक्षक मोठे बोजड, आळशी व आपला धंदा नीट न जाणणारे असे होते. शिक्षकांच्या हातून असें पीटरचें कांहींच बरें झालें नाहीं; पण जात्याच याचा अंकुर फार जोराचा होता. पीटर म्हणजे मूर्तिमंत जिज्ञासा होता असें म्हणावयास हरकत नाहीं. तरी कांहीं प्रास्ताविक शिक्षण म्हणून हवेंच असतें. पण चार ओळीसुद्धां व्याकरणशुद्ध लिहावयास त्यास शिकविलें नव्हतें! जहाजें बांधावयाची विद्या त्याला एका डच माणसानें शिकविली. लष्करी शिक्षण वर सांगितलेल्या गॉर्डननें दिलें. थोडें जुजबी अंकगणित त्यास शिकविलें होतें. इतर युरोपियन भाषांपैकीं फक्त डच भाषाच काय ती त्यास बोलतां येत असे. तेव्हांच्या राजपुत्राच्या मानानें हें शिक्षण कांहींच नव्हतें. रशिया म्हणजे एक भला आडदांड, अर्बुज, असंस्कृत व चर्बट लोकांचा देश होता. सगळेच लोक केवळ गांवढे असत. कायदे फार थोडे; देशांत हालचाल काय जी चोर-दरवडेखोर करतील ती. इतकाच प्रकार होता. राजघराणें व कांहीं

सरदारांचीं घराणीं यांचेंच लक्ष काय तें वरिष्ठ प्रकारच्या हालचालींत गुंतलेलें असावयाचें. बाकी सर्व आपापल्या व्यवसायांत गुंतलेलें. राजकारणाच्या उलाढाली करणारे तरी कांहीं विशेष फिरलेले, नव्या कल्पना आणणारे, ज्ञानाचे लोभी, देशाचे कडकडून अभिमानी असे होते म्हणाल तर तसेंही नाहीं. कांहीं आडाख्यावर कामें करणारे व हळूहळू मिळत जाणाऱ्या अनुभवानें शहाणे होत जाणारे, असे लोक असतात; त्यांतलेच हे लोक असत. मोगल, तार्तार, कोसॅक इत्यादि बिलंदर भामट्यांशीं नित्य वागण्याचा प्रसंग असल्यामुळें त्यांच्या वृत्तींतही रानवटपणा भरला होता. माणसांचीं नाकें कापणें, हात तोडणें, जीव घेणें, वगैरेंत विशेष उग्र असें त्यांस कांहींच वाटत नसे.

असल्या लोकांतच पीटर वाढलेला होता. अर्थात् त्या मानानें तोही असला जंबूशेरी वळणाचाच माणूस होता. राजाचा मुलगा म्हणून त्याच्यावर कांहीं अभिजातपणाची लकतकी दिसे असें मुळींच नाहीं. बोलणेंचालणें, निदान लहानपणचे मनाचे व्याप, करमणुकीचीं साधनें, थट्टामस्करी यांच्या पद्धति, यांवरून हा माणूस केवळ जाडाभरडा व रांकट संवयीचा असा दिसे. राजा झाल्यावर टकरी लावणें, लटक्या लढाया लावणें यांत वाटेल तितका वेळ तो घालवी. रक्तपात झाला तरी त्याच्या मतानें ती खोटी लढाई असावयाची! शोभेची दारू उडवायची म्हटली कीं इतकी बेसुमार उडवावयाची कीं, गांवांतल्या घरादारांना आगी लागल्या तरी याची हौस चाललेलीच असावयाची. पण इतकेंही असलें तरी हें ध्यानांत हवें कीं, या वेळीं तो केवळ पोरसवदा माणूस होता.

मॉस्को शहराच्या शेजारीं एक सरोवर आहे. तेथें नावा बांधण्याचें काम सुरू होतें. त्याकडे पीटरचें लक्ष फार असे. अर्थात् एकदां समुद्र तरी कसा असतो हें पाहावें म्हणून तो वयाच्या २१।२२ व्या वर्षी

आर्केंजल येथें आला. तेथील समुद्राचा तो गंभीर घोष ऐकून व अफाट विस्तार पाहून त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. इतर देशांच्या नाविकांच्या नवलकथा, इंग्लंड, हॉलंड, स्पेन इत्यादि देशांतील शूर दर्यावर्दी तांडेलांचे पराक्रम व त्यांनीं केलेलें इतर देशांचें आक्रमण यांविषयीं पुष्कळ गोष्टी त्यानें ऐकिल्या होत्या. समुद्र पाहून त्याला उल्हास वाटला आणि हा दर्या हस्तगत झाला तर आपलें वैभव वाढेल व इतर यूरोपीय राष्ट्रांशीं आपली बरोबरी होईल असें त्याच्या मनानें घेतलें. त्यानें आपले कांहीं स्नेही परदेशीं धाडिले. अशासाठीं कीं, त्यांनीं नव्या विद्या रशियांत आणाव्या. पण तेवढयानें त्याचें समाधान होईना. आपण स्वतःच जाऊन सर्व देश पाहावे, राजकारणी लोकांशीं बोलावें व विशेषतः निरनिराळ्या विद्या शिकाव्या अशी त्यास इच्छा झाली. दरम्यान अझोवच्या अंगास कांहीं युद्धप्रसंग निघाला. राजा म्हणून हाही लढाईंत होता. तेथें शत्रूंनीं याच्या फौजेस चांगलें चोपलें. पुढील वर्षी तयारी करून तो पुन्हा गेला व त्यानें तें ठाणें घेतलें. येथें त्याच्या ध्यानांत आलें कीं, राजा होणें फुकटचें काम नाहीं. इतउत्तरकाळांत शेजाऱ्यांशीं व युद्धांत तरबेज असलेल्या स्वीडन देशाशीं युद्धें करावीं लागणार हेंही त्यास दिसत होतें. अर्थात् सगळ्या युरोपभर फिरून नाना कला व हरतऱ्हेच्या विद्या या स्वतः अवगत करून घेतल्या पाहिजेत असें ठरवून तो परदेशीं जावयास निघाला. ही गोष्ट दिसावयास साधी वाटते; पण सर्व इतिहासांत हिला जोड नाहीं. आपल्या देशाच्या उत्कर्षासाठीं स्वतः शहाणें झालें पाहिजे व आपण विद्यार्थिपण पत्करून, क्षुल्लकपणा घेऊन प्रजांना धडा लावून दिला पाहिजे ही वासना राजालाच झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत इतरत्र सांपडणार नाहींत.

आपण विद्या व कला शिकावयास परदेशीं जात आहों असें पीटरनें

आपल्या प्रजेस केव्हांही सांगितलें नाहीं. इतर राजेलोकांशीं राजकारणें करण्याकरितां आपण जात आहों असें सांगून व पीटर मिहिलो हें टोपणनांव धारण करून तो बाहेर पडला. रिगा, लिबो या गांवांवरून तो कोनिंग्जबर्गकडे गेला. त्या वेळीं स्वीडन देशाची हद्द बाल्टिक समुद्राच्या अलीकडे मुख्य भूप्रदेशावर पुष्कळच पसरली होती, व बाल्टिक समुद्र म्हणजे स्वीडिश राज्याच्या पोटांत असलेल्या प्रचंड सरोवरासारखा होता. स्वीडिश लोक मोठे भांडखोर होते; त्यांचा उपद्रव रशियाला फार होई. म्हणून पीटरनें जातां जातां त्यांच्या विरुद्ध इतरांशीं कांहीं करारनामे करण्याची खटपट केली, पण तिचा उपयोग झाला नाहीं. रशियाला समुद्रकिनारा नाहीं ही गोष्ट त्यास येथें फार जाणवली व तो मिळविणें म्हणजे बाल्टिकच्या दक्षिणेस असलेला स्वीडिश अम्मल कायमचा उठविल्याशिवाय भागावयाचें नाहीं ही बाब त्याच्या मनांत कायम ठसली.

एके जागीं त्यानें एक अपराध्यांस फांशीं देण्याचें चक्र पाहिलें. त्यावर बांधून घालून गरगरा भोंवडून अपराध्यास कसें मारतात हें त्यास पाहावयाचें होतें. कारण आपल्या देशांतही ही पद्धत त्यास सुरू करावयाची होती. पण त्या वेळीं कोणी फांसाचें गिऱ्हाईकच तेथें मिळेना! तेथून तो पोलंडकडे वळला व मग बर्लिन शहरीं बॅंडेन्बुर्गच्या राणीसाहेबांची मुलाखत घेऊन हॉलंडकडे वळला. वाटेनें त्याची सुधारणाप्रियता ऐकून लिब्निज नांवाच्या तत्त्ववेत्त्यानें एक मोठी थोरली योजना त्याजपुढें हजर केली. पीटर म्हणाला, 'मला इतक्या भानगडी नकोत; तुला जहाजें कशीं बांधावयाचीं हें शिकवितां येत नाहीं ना? मग तुझें काल्पनिक कोळ्याचें जाळें ठेवून दे.' आमस्टरडॅमच्याजवळ समुद्रकांठच्या एका खेड्यास तो पुढें गेला. तेथें बोटींत बसून वल्हवणें, मच्छीमार लोकांशीं सारखें बोलत राहणें यांत तो गुंग होऊन गेला.

पण त्याच्या जिज्ञासेला डोळे फार होते. सडकेनें फिरतांना कोठें पूल दिसला कीं, गाडींतून उतरून त्यानें त्याची लांबीरुंदी मोजावी; कोठें गिरणी दिसली कीं ती कशी चालती हें बारकाईनें पाहावें किंवा विशेष बरी वस्ती कोठें दिसली कीं तेथें शिरून त्या घरांची पाहाणी करावी, असा त्याचा शिरस्ता असे. आपण राजे, तेव्हां या गोष्टी कशा कराव्या असा विचार त्याला शिवलाही नाहीं. यंत्रें पाहिलीं कीं पराकाष्ठेचा मोह त्याला पडे व त्यांच्या गतीची व जोराची त्यास कल्पना नसल्यामुळें तो भलतेंच कांहींतरी करी. एकदां एक रेशमाची गिरणी पाहात असतां तिचें झपाटयानें गरगरणारें चाक हातानें थांबविण्याचा प्रयत्न यानें केला ! थोड्यांत चुकलें नाहीं तर तेथेंच सगळा ग्रंथ आटपावयाचा ! तो छापावयाची कला शिकला; खोदकाम शिकला; शरीररचनाशास्त्र व वस्तुधर्मशास्त्र यांचाही त्यानें अभ्यास केला. रेखा-कला म्हणजे ड्रॉइंग तेंही येत असलें पाहिजे असें त्यास दिसलें. कारण त्याशिवाय सुतारकाम नीट यावयाचें नाहीं व सुतारकाम आल्याशिवाय जहाज बांधण्याची कला यावयाची नाहीं हें त्यानें ओळखिलें होतें. या सर्वांचें ज्ञान मिळविण्याची त्याची अहर्निश खटपट चालू होती ! शेवटीं आपल्या हातानें त्यानें एक जहाज बांधिलें तेव्हां त्यास पराकाष्ठेचा हर्ष झाला आणि हीं कामें करीत असतां स्वतःची हंडी तो स्वतःच उकडीत असे. पण इतकें झालें तरी आमस्टरडॅम येथील जहाजाची कला त्यास इतकीशी पसंत पडेना, म्हणून त्यानें इंग्लंडास जावयाचें ठरविलें. तेथें जातांच टंकशाळा, वेधशाळा, रॉयल सोसायटी इत्यादि संस्था त्यानें पाहिल्या. कारखान्यांत तो एखाद्या हमालासारखा राबूं लागला. हातांत घण, हातोडा, करवत घेऊन कामाच्या बारीक-सारीक खोंचाखांचासुद्धां त्यानें माहीत करून घेतल्या. एकदां असाच हमालकामाचा झपाटा चालू असतां इंग्लंडचा राजा त्यास पाहावयास

कारखान्यांत आला होता. याप्रमाणें सर्व सामुद्रिक माहिती करून घेतल्यावर पीटर परत फिरला व स्वदेशांत मोठें बंड उद्भवल्याचें ऐकून कोठेंही न रेंगाळतां त्वरेनें राजधानीस प्राप्त झाला. ही पीटरच्या ज्ञानार्जनाची हकीकत थोडक्यांत सांगून झाली आहे, पण येवढ्या वेळांत तो पहिल्या प्रतीचा नावाडी बनला. जहाजाचें बांधकाम करण्यांत पटाईत झाला व शिवाय गोलंदाजीची विद्याही पढला. पुढील वीस वर्षांत त्याला या सर्वांचा अतोनात उपयोग झाला.

पीटरनें आपल्या कारकीर्दीत केलेल्या अनेक युद्धांची हकीकत थोड्यांतच द्यावयास हवी, कारण तो त्याचा मुख्य पेशा नव्हे. त्यानें स्वीडनशीं सारखा झगडा चालू ठेविला. तेथील राजा बारावा चार्ल्स् हा मोठा आडदांड योद्धा होता. सर्व जन्मभर तो मारामारी करीत होता. एखादे वेळीं झालेल्या पराभवानें केव्हांही न खचतां तो पुनः पुन्हा उसळून उठे व बाल्टिक समुद्रापासून तों थेट दक्षिणेकडे आजोवच्या समुद्रापर्यंत अवघ्या राजांस व मुलखास त्यानें हैराण केलें. पीटरलासुद्धां हा अनावरच होता. तरी त्यानें फिनलंडवर स्वारी करून त्याचा एक लचका तोडून घेतला. पीटरला हें माणिक पचणें शक्य नव्हतें; कारण चार्ल्स् महाधाडसी आणि वाटेल तें अनन्वित आचरणारा होता. पण पीटरच्या नशिबानें चार्ल्स् मृत्यु पावला. लागलीच पीटरनें थोडी देवघेव करून बाल्टिक समुद्राच्या दक्षिणेकडील व लाडोगा सरोवराच्या सभोंवारच्या सर्व प्रदेश हस्तगत केला. यामुळें असें झालें कीं, फिनलंडच्या आखातापासून पूर्वेकडील सर्व समुद्रकिनारा पीटरला मिळाला व रशियास समुद्रकिनारा पाहिजे ही त्याची हौस पूर्ण झाली. मग त्यानें पीटर्सबर्ग म्हणजे पेट्रोग्राड म्हणजेच आतांचें लेनिनग्राड सुशोभित केलें व रशियन आरमाराच्या बांधणीस आरंभ केला. वायव्येकडे जसा त्यानें मुलूख संपादिला तसा आग्नेयीकडे कास्पियन समुद्रांतून खालीं इराणांत

शिरूनही कांहीं प्रदेश त्यानें मिळविला. तो थोडाच होता. पण भावी काळांत 'ईस्टर्न क्श्चन' (प्राचीकडील प्रकरण) म्हणून ज्या प्रकरणास नांव मिळालें त्याचा प्रारंभ अशा रीतीनें पीटरनेंच केला. म्हणजे त्याच्या युद्धांचा टिकाऊ परिणाम काय म्हणून विचारलें तर असें सांगतां येईल कीं, रशियाच्या आरमारास समुद्र प्राप्त करून देणें व पूर्वेकडील रशियन साम्राज्याचा इतर लोकांशीं निकट संबंध सुरू करणें हा होय.

पण पीटरचें खरें वैभव हें नव्हे. त्यानें आपल्या अर्धरानटी राज्यांत सुधारणा करण्यासाठीं स्वतः जे अपरिमित कष्ट केले त्यामुळें त्याचें नांव रशियाच्याच काय पण अवघ्या युरोपच्या इतिहासांत अजरामर आहे. पीटर पुढें येण्याच्या आधीं प्रगति घडवून आणण्यासाठीं खटपट करणारे लोक अगदींच नव्हते असें नाहीं; पण त्यांच्याहून जाणता आणि कष्टाळू असा एखादा म्होरक्या त्यांस हवा होता. पीटरच्या रूपानें तो त्यांस मिळाला. या लोकांच्या मदतीनें पीटरनें अनेक उलाढाली केल्या.

पहिल्या सपाट्याला त्यानें राज्यांतील सुभेदारपद्धति मोडून टाकली. रशियादेश अवाढव्य आहे. त्याचे अनेक सुभे पाडून त्यांवर कारभारासाठी सुभेदार नेमलेले असत. या सुभेदारांना मोठमोठ्या जहागिरी असत; पण पगार मात्र मुळींच नसे. आपल्या इकडेही हाच प्रकार पूर्वी होता. आपल्या जहागिरीचें उत्पन्न खाऊन सुभ्याचा कारभार चालवणें हें वास्तविक यांचें काम होतें. पण कारभारांत टंगळमंगळ करून आपल्या उत्पन्नाबरोबर सुभ्याचें उत्पन्नही खाण्यास हे लोक सोकावलेले होते. पीटरनें ही जहागिरदारी बंद केली व प्रत्येक कामगाराला त्या त्या जागेचा पगार नेमून दिला सुभेदारांच्या प्रांतांचीही गुंतागुंत झालेली होती. एकाच गांवावर अनेकांनीं आपापला हक्क सांगावा असें झालें होतें. त्या वांटण्या

त्यानें नीट आंखून दिल्या. या सुधारणा करतांना कित्येक अमीरउमरावांचा रोष त्याला सहन करावा लागला. पण तो रोष झाला तरी वेहेत्तर असें म्हणणारा पीटर होता. याप्रमाणें रशियाचे ४३ प्रांत पडून प्रत्येक सुभेदारास वरिष्ठाकडे कारभाराचा जाब देणें प्राप्त झालें.

पुढें पीटरनें अष्टप्रधान अथवा दशप्रधानपद्धति सुरू केली व परदेशी राजकारण, युद्ध, आरमार, खजिना, कायदा इत्यादि दहा खात्यांवर दहा मंत्री नेमिले. ही वरील कारभाराची व्यवस्था झाल्यामुळें सरदारांचा लुटारूपणा थांबून प्रजेस हायसें झालें आणि कामाची वांटणी खातेवार झाल्यामुळें, एकेका प्रकरणाचा निकाल होऊं लागून प्रजेस सुख होऊं लागलें. प्रजेच्या अंगीं लागण्यासारख्या आणखी दोन सुधारणा त्यानें केल्या. परदेशाशी लढाई चालू नसणें म्हणजे शांतता आहेसें मानणें अशी चाल असे. पीटरनें हा अर्थ बदलला. प्रजेला आपल्या व्यवहाराला सोपेपणा व निर्धास्तपणा प्राप्त झाला तरच ती खरी शांतता हें पाहून त्यानें पोलिसखातें चांगलें बलिष्ठ केलें आणि सर्व देशभर चोऱ्या, मारामाऱ्या करीत फिरणाऱ्या उचल्या उडाणटप्पूंच्या मागें शिपायांचा ससेमिरा सारखा लाविला; इतका कीं, देशांत चोऱ्या, मारामाऱ्या बंद झाल्या. खोटीं नाणीं पाडणारे व चोर यांच्या बातम्या प्रजेनें सरकारांत ताबडतोब कळविल्या पाहिजेत असा सक्त दंडक त्यानें घातला. या सुधारणेनें एकंदर जनसमूहाची पीटरवर विलक्षण भक्ति बसली. धार्मिक बाबतींतही त्यानें हात घातला. धर्मगुरूंच्या मठाकडे मोठमोठालीं उत्पन्नें होतीं. प्रत्येक घराचा एक धर्मोपदेशक असे. यामुळें मठांत उपदेशकांची म्हणजे जोगी आणि जोगतिणी यांची गर्दी जमलेली असे. पीटरने ओळखलें कीं, धर्मोपदेशकांची जरुरी असली व त्याचें चालावें म्हणून उत्पन्नें हवीं असलीं तरी घरटी एक उपदेशक असण्याची जरुरी नाहीं. त्यानें एक आचार्यमंडळ नेमून उपदेशकांचें स्वतंत्र खातें बनविलें. व त्यांच्याद्वारा सरकारी उत्पन्नें

फुकट खाणारे हजारों ऐदी लोक मठांतून पिटाळून लाविले.

याप्रमाणें हातीं असलेल्या उत्पन्नाची शिस्तवार वांटणी, त्याच्या सुयुक्त विनिमयावर राज्यकारभारांची घडी व प्रजेच्या सुखाची वाढ हीं कायम करतांना, उत्पन्न वाढविल्याशिवाय नवीन गोष्टींचा उपक्रम करतां येत नाहीं, हें पीटर ओळखून होता. रशियाच्या बाजारपेठा तेव्हां पर-देशी मालाने भरलेल्या असत. पीटरने सर्वत्र प्रवास केला तेव्हांच कोणकोण परके लोक रशियांतील पैका खाऊन गबर होत आहेत, हें त्याच्या ध्यानांत येऊन चुकलें होतें. म्हणून देशी उद्योगधंद्यांना त्यानें हरतऱ्हेनें उत्तेजन दिलें. उगाच इकडे तिकडे भटकून लोकांच्या दातृत्वाचा गैरफायदा घेणारे सहस्त्रावधि लोक त्याने धनोत्पादक धंद्यांत राबावयास लाविले. खाणींचे शोध लावून लोखंडाचा व्यापार त्यानें सुरू केला. परदेशी कारागिरांच्या पगारी मदतीने त्याने उंची कापड, पायमोजे, कातडी सामान इत्यादि धंदे उभारून शेतकऱ्यांच्या हिता-साठीं आउतें व जनावरांची पैदास या कामांकडेही लक्ष पोंचविलें. या उद्योगाचें माप पंधरा वर्षांच्या अवधींत त्याला उत्तम काढतां आलें. कारण राज्याचें मूळचें तीस लक्षांचें उत्पन्न येवढ्या अवधींत एक कोटीवर गेलें !

रशियाला शत्रु बरेच होते. स्वीडनच्या चार्ल्सचा उल्लेख मागें आलाच आहे. त्याच्याशीं झुंजतांना त्याच्या ध्यानांत आलें कीं, आपली फौज म्हणजे केवळ बाजारबुणगे होत. पण तेही पुरेसे मिळत नसत. म्हणून त्यानें लष्करी नोकरी सक्तीची केली. तिचें रूप मात्र असें होतें कीं, प्रत्येक परगण्यानें अमुक इतके शिपाई सरकारांत पुरविलेच पाहिजेत. प्रत्येक धडधाकटानें लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे असें मात्र नव्हे. हळूहळू त्याची फौज बलिष्ठ झाली, व तिच्या बळावर इतरांना त्याचा वचकही जास्त बसूं लागला. ३२००० पासून

२००००० पर्यंत त्यानें फौजेची वाढ केली. तिच्या बळावर वर उल्लेखिलेला बाल्टिकचा दक्षिणकिनारा व लाडोगा सरोवराच्या भोंवता-लचा सर्व किनारा त्यानें हस्तगत केला. फौजेला शिक्षा देण्याच्या कामीं पीटर काळासारखा करडा होता. जो शिस्त मोडील त्याचें ‘ डोकें मेक्सूखालीं ’ सडकलें जाईल, असा त्याचा नियम असे.

शिक्षणाकडेही पीटरचा ओढा अतिशय होता. ज्या माणसाला लिहिण्यावाचण्याचा गंधही नाहीं, त्याला सरकारी नोकरी देतां कामा नये, असें त्याचें मत असे. तसेंच ज्या सरदारांना सहीसुद्धां करतां येत नाहीं, त्यांच्या पदव्या काढून घेतल्या पाहिजेत असें तो स्पष्ट म्हणे. तो गादीवर बसला तेव्हां मठांतून शाळा असत; नाहीं असें नाहीं; पण तेथें शिक्षण म्हणजे इतकेंच कीं, र ट फ करीत बायबल वाचतां यावें व राजांची आणि पृथ्वीवरील देशांची जुजबी माहिती व्हावी. इ० सन १७१४ सालीं प्रांतोप्रांतीं अमुक एक तऱ्हेच्या शाळा उघडण्यांत याव्या असा त्यानें हुकूम सोडला. पण अनेक खटपटी होऊन पांच वर्षांच्या मुदतींत मोठ्या मारामारीनें एक शाळा सुरू झाली आणि तिच्यांत अवघे सव्वीस विद्यार्थी दाखल झाले ! सुधारणा करणारा असेल मोठा आकांक्षी आणि हिम्मतवान्, पण त्या सुधारणा तो कोणच्या लोकांत करीत आहे यावर पुष्कळच अवलंबून आहे. पीटरच्या ज्या अनेक सुधारणा केवळ मुंगीच्या पायानेंच चालू झाल्या त्यांतील शिक्षण ही एक होती. कित्येक लेखकांनीं त्याला दोषसुद्धां दिला आहे कीं, नाहीं त्या लोकांपुढें हा भला गृहस्थ विनाकारण डोकेंफोड करीत बसला होता. पीटरनें देशाटन फार केलेलें असल्यामुळें हजारों गोष्टी त्यानें पाहिल्या होत्या. अर्थात् त्यास वाटे कीं, आपल्या देशांत त्या त्या सर्व असाव्या. पण त्याचे ते सहस्रावधि वर्षांच्या ज्ञानविन्मुखतेंत आणि आळसांत खारलेले ‘ देशबंधु’ नव्या गोष्टी भराभर पत्करीनात. स्थापत्य, नौकानयन व गणित यांच्या

अभ्यासासाठीं पाठशाला जरूर आहेत असें ठरवून सरकारांतून जी काय हरतऱ्हेची तरतूद करावयास हवी होती ती त्यानें केली. मोठमोठे पगार देऊन जर्मनी, इंग्लंड इत्यादि देशांतून प्रोफेसर लोकही त्यानें आणविले. पण प्रश्न हा पडला कीं, त्यांच्यापुढें बसावयाचें कोणीं! स्थापत्याच्या कॉलेजमध्यें मोठ्या मिनतवारीनें १२ विद्यार्थी आले. शेवटीं पीटरचा खरा स्वभाव प्रकट झाला. हे लोक बऱ्या बोलानें आपलीं मुलें शाळेंत धाडावयाचे नाहींत, हें पाहून स्वतःचीं आश्रित अशीं जीं कित्येक घराणीं होतीं त्यांतील ८० मुलगे त्यानें निवडून काढले आणि त्यांनीं शिकलेंच पाहिजे अशी सक्ती आरंभिली. अर्थात् येवढ्या अवाढव्य देशांत हा प्रयत्न म्हणजे 'दर्यामें खसखस' असाच होता. पण पीटरच्या धडपडीमुळें इतकें मात्र झालें कीं, विद्येसंबंधानें समाजांत जी उपहासबुद्धि होती ती नष्ट झाली आणि लिहितां वाचतां न येणें म्हणजे मोठी नामुष्कीची गोष्ट आहे इतकें त्यांस वाटूं लागलें. सन १७०७ सालीं एक छापखाना आणि कांहीं कंपॉझिटर असें साहित्य त्यानें मॉस्को राजधानीस आणविलें व तेथें छापण्याचें काम सुरू केलें. भाषा कोणची वापरावी असा प्रश्न पुढें निघाला. तेव्हां दरबारची भाषा हीच छापखान्यांत सुरू करावी असा निकाल देऊन त्यानें सर्व रशियाची एकच भाषा अथवा बोली करून टाकली. कारण जी भाषा छापली जाईल, तीच शेवटीं लोक पत्करणार हें त्यास माहीत होतें. त्यानें लायब्ररी, पदार्थसंग्रहालय व कलाभुवन अशांसारख्या संस्थाही चालू केल्या. व सन १७०३ सालीं मॉस्को शहरीं पहिलें रशियन वर्तमानपत्र सुरू केलें. त्या वेळेपर्यंत सृष्टीच्या आरंभापासून कालगणना करण्याची व वर्षारंभ सप्टेंबरांत धरण्याची चाल रशियांत होती. ती त्यानें बंद करून इतर खिस्त्यांचा प्रघात उचलला. यावरून दिसून येईल कीं, पीटरची दृष्टि फार फांकली होती व स्वदेशकल्याणाची त्याची इच्छा केवळ अनिवार होती.

घरगुती व व्यक्तिविषयक आचारांत आणि चालीरीतींतसुद्धां त्यानें उलथापालथी केल्या. त्याच्या कालापर्यंत बायकांनीं म्हणजे झांकून-पाकूनच राहिलें पाहिजे अशी सक्तीं असे. पीटरनें ही चाल साफ मोडून टाकिली व वागणुकीचे नवे दंडक घातले. म्हणजे असें कीं, पूर्वेकडील चाली मोडून पश्चिमेकडील सुरू केल्या. पूर्वींचा पोषाखसुद्धां त्यानें फेंकून दिला आणि जरा तरतरीत दिसेल असा नवा पेहेराव कसा करावा हें त्यानें लोकांस शिकविलें. फ्रान्स इत्यादि देशांतील सोज्वळ, दिसण्यांत ठाकठिकीचीं व शारीरिक सौंदर्याकडे बारीक लक्ष देणारीं माणसें त्यानें पाहिलीं होतीं. पण घरीं पाहावें तों हजामती वाढलेले, बोकडासारख्या दाढया पिंजारलेले, असले घामट, गबाळशाही आणि घाणेरड्या पिंवळ्या दांतांचे सगळें लोक ! शेवटीं चिडून जाऊन त्यानें कायदा केला कीं, सर्वांनीं दाढया केल्या पाहिजेत. जो करणार नाहीं त्यांला दंड ठोठावण्यांत येईल ! ही तऱ्हा पाहून एकदां हॉलंडचा वकील म्हणाला, "सरकार, हें काय चालू आहे ?" पीटरनें उत्तर केलें, "गाढवांचीं माणसें बनवीत आहें."

परंतु सगळ्या जगाला सुधारावयास निघालेल्या या प्रचंड पुरुषास घरांतलीं दोन माणसें मात्र सुधारतां आलीं नाहींत. एक त्याची बायको व दुसरा त्याचा मुलगा. बायकोचें आणि त्याचें पहिल्यापासूनच फारसें कधीं जमलें नाहीं. ती घरबसल्या याच्या धोरणांविरुद्ध कटकटी उत्पन्न करी. शेवटीं कंटाळून त्यानें तिला एका मठांत राहावयास पाठवून दिलें. तेथें तर ती मोकळी होऊन अधिकच कारस्थानें करूं लागली. चिरंजीव अलेक्झी हेही त्याच्याविरुद्ध लावालावी करीत. सुधारणेस विन्मुख असलेल्या मठवाल्यांनीं आणि पुराणमतवाल्यांनीं या घरभेदाचा फायदा चटकन् घेतला आणि या मायलेकांच्या पुरस्कारानें पीटरच्या सुधारणाविषयक चळवळीस विरोध

सुरू केला. पण अलेक्झी येवढ्यावरच थांबला नाहीं. तो बापापासून पळून परदेशीं शत्रूंच्या आश्रयास गेला व तेथून जमवाजमव करून पीटरला सतावण्यासारख्या बाता बोलूं लागला. पीटर त्याच्या बारशाला खरोखरीच जेवला होता. तो जात्याच महातामसी, क्रूर आणि आडदांड असा होता. त्यांत मुलाची ही सुधारणाविध्वंसाची आणि आपल्या अंगावर उठण्याची प्रवृत्ति पाहून तो चवताळून गेला. अलेक्झीस त्यानें हिकमतीनें परत आणविलें आणि एखाद्या कैद्याप्रमाणें त्याच्यावर खटला भरून गादीवर आपला कसलाही वारसा नाहीं असें त्याजकडून कबूल करून घेतलें. पण तेवढ्यावर तृप्त न होतां त्यानें त्यास शेवटीं ठार मारविलें. या भयानक कृत्यानंतर, आपल्या मागें मुलगा नाहीं म्हणून रिकाम्या पडणाऱ्या गादीसाठीं पुन्हा मारामाऱ्या होऊं नयेत म्हणून त्यानें वारसाचा कायदाच बदलला व ठरविलें कीं, गादीवर बसावयास झारला मुलगाच पाहिजे किंवा असावा तर त्यास गादी मिळालीच पाहिजे असें नसून तो गादीचा मालक ज्यास ठरवील त्यानें राजा व्हावें! असा हा कर्ता राजा केलेली गोष्ट जपावयास वाटेल तें आचारावयास न भिणारा असा होता.

या त्याच्या कर्तबगारीमुळें त्याच्या वैगुण्याकडे आपलें लक्ष इतकेंसें जात नाहीं. अपराध्यांना शिक्षा काय कराव्या किंवा करूं नयेत याचा कसलाही विवेक तो करीत नसे. कोठें बंडें उठलीं तर बंडखोरांची कसलीही गय न करतां, त्यांचा बीमोड करून, तो त्यांस इतकें हैराण करी कीं त्यांस 'त्राहि भगवन्' होत असे. नीतिविचारही त्याला अगदीं वावडा होता. रोजच्या रोज दारू ढोसून झिंगून पडण्यांत त्याला कांहींच विशेष वाटत नसे. एरवींही स्वभावानें उथळ, उतावळी, किंबहुना पोरकट असे. एखादें कांहीं चांगलें वर्तमान आलें तर मोठमोठ्यानें घसा फोडून भोंवतालच्या सर्व लोकांना तो तें सांगत असे.

कोणच्याशा एका युद्धानंतर त्याला हवा होता तसा तह ठरल्याचें ऐकल्याबरोबर भर चव्हाट्यावर तो प्रत्यक्ष नाचूं-उडूं लागला! राजधानींत नेहमी आगी फार लागत. त्यांतूनच त्यानें एकदां करमणूक करून घेतली. एके दिवशीं आग लागल्याचीं शिंगें गांवभर उगीचच्या उगीच वाजवावीं म्हणून त्यानें बंबवाल्यांना सांगितलें, लगोलग बोभाटलेल्या ठिकाणीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या; त्यांजकडे पाहून डोळे मिचकावून पीटर म्हणाला. 'आगबीग कांहीं नाहीं. तुमची थोडी गंमत केली!' पण खुद्द राजेसाहेब व प्रजा या सांस्कृतिक दृष्टया एकाच तोलाच्या असल्यामुळें असल्या गोष्टीचें कोणास कांहीं वाटत नसे. हें सर्व खरें असलें तरी त्याला कामाचा कंटाळा नसे.

रोज पहांटे पांच वाजतां उठून, सर्व विधि उरकून तो शिरस्तेदारास कामाला बोलवी. सात वाजतां अठरा कारखाने तपासावयास निघे. परत येऊन एक वाजेपर्यंत टपाल रवाना करी. मग जेवणखाण इत्यादि होई. जेवणांतही फारसा खादाडपणा नव्हता. उगाच शंभर हजार वाटपे आणि आचारी तो मुदपाकखान्यांत बाळगीत नसे. कामें उरकणारा जबरदस्त असे. एक परराष्ट्रीय वकील लिहितो, "हा राजा म्हणजे रशियांत उभ्या असलेल्या एखाद्या उंच शिखरासारखा आहे. शहाणपणा, बारकाई, अवलोकन, विचारांचा स्पष्टपणा आणि मनाची बळकटी या गुणांत याला तोड नाहीं." खरोखर, सध्यांच्या रशियन जीवितांचें असें एकही अंग नाहीं कीं, ज्यावर पीटरच्या हाताचा ठसा उमटलेला नाहीं. त्याच्या कल्पनेला विधायकपणा व हाताला यश विलक्षण होतें. सुधारणेपुढें आपलें शरीरसुख, नाजूक नातीं आणि विरोधाचें बुजगावणें हीं त्यानें कःपदार्थ मानिलीं. त्याचें सर्व आयुष्य म्हणजे कर्तबगारीनें खेचून भरलेलें एक ५३ वर्षें उंचीचें एक लहानसें पोतें होतें. अहोरात्र

कष्टांनीं त्याच्या शरीराला झीज येऊन नव्या रशियाला जन्म देणारा हा कर्मशूर राजा वयाच्या केवळ ५३ व्या वर्षी म्हणजे इ० सन १७२५ सालीं मरण पावला.

* * *

मराठ
अनुक्र. ४७४३२
९३६०
दा. क्र. १५२६१
REFBK 0015261
REFBK-0015261